S P E A K | R E A D | W R I T E

# माय मराठी २
# My Marathi 2



अभ्यासपुस्तक | WORKBOOK FOR COMMUNICATIVE MARATHI




Suhas Limaye
Madhuri Purandare

UNIVERSITY OF MUMBAI
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

सुहास लिमये / Suhas Limaye
माधुरी पुरंदरे / Madhuri Purandare
ज्योत्स्ना भिडे / Jyotsna Bhide
सोनाली गुजर / Sonalee Gujar

# माय मराठी २
# My Marathi 2

अभ्यासपुस्तक / Workbook for Communicative Marathi

**संपादक / Editors**
विभा सुराणा / Vibha Surana, आनन्द काटीकर / Anand Katikar

संकल्पना, निर्मिती आणि प्रकाशन / Concept, Production & Publication

University of Mumbai

मुंबई विद्यापीठ / University of Mumbai

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai

ISBN 978-93-5291-443-2

First Edition, 2019

पहिली आवृत्ती, २०१९

क्रिएटिव्ह कॉमन्स अँट्रिब्यूशन – शेअरअलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0) ह्याअन्वये उपलब्ध
Published under Creative Commons Attribution – ShareAlike license (CC BY-SA 4.0)
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

**प्रकल्प समन्वयक / Project Co-ordinator**
विभा सुराणा / Vibha Surana

**लेखक / Authors**
सुहास लिमये / Suhas Limaye
माधुरी पुरंदरे / Madhuri Purandare
ज्योत्स्ना भिडे / Jyotsna Bhide
सोनाली गुजर / Sonalee Gujar

**संपादक / Editors**
विभा सुराणा / Vibha Surana, आनन्द काटीकर / Anand Katikar

**सहलेखक / Co-authors**
गिरिजा गोंधळेकर / Girija Gondhalekar, भारती केळकर / Bharati Kelkar, कृत्तिका भोसले / Kruttika Bhosale,
गिरिषा टिळक / Girissha Tilak, जुईली वैद्य / Juilee Vaidya, शिवानी वैद्य / Shivani Vaidya,
तुषार घाटे / Tushar Ghate, गायत्री भिडे / Gayatri Bhide, प्राची शर्मा / Prachi Sharma,
मानसी सामंत / Manasi Samant, अलकनंदा काळे / Alaknanda Kale, मधुरा जोशी / Madhura Joshi
अपर्णा वैद्य / Aparna Vaidya, प्रभव सखदेव / Prabhav Sakhdeo, अक्षय पराडकर / Akshay Paradkar

**संपादकीय मंडळ / Editorial Team**
मेहेर भूत / Meher Bhoot, प्र॰ ना॰ परांजपे / P. N. Paranjape, प्रतिभा गोपुजकर / Pratibha Gopujkar,
भारती केळकर / Bharati Kelkar, जमीर कांबळे / Zameer Kamble,
गुरुनाथ कलमकर / Gurunath Kalamkar, जुईली म्हात्रे / Jueli Mhatre, सायली थारळी / Sayali Tharali

**मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / Technical Support for Marathi**
मस्त रेडिओ, कन्फ्युशिअस इंस्टिट्युट, (गुरुनाथ कलमकर) मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ

**कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी - Layout Design / Photos / Typesetting**
संदीप देशपांडे, पुणे / Sandeep Deshpande, Pune

**प्रकाशन / Publication**
मुंबई विद्यापीठ / University of Mumbai,
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai

**संकेतस्थळ / Website Address**
https://www.learn-marathi.com
rmvs.maharashtra.gov.in

**ई-पत्ता / E-mail**
rmvs_mumbai@yahoo.com

Online access link: https://mu.ac.in/mymarathi2

**Textbook, Workbook, Glossary and 1 Free DVD**

INR 1250 | $25 | €20

# प्रस्तावना

भारतीय अन्यभाषक, त्याचप्रमाणे परदेशी तरुण आणि प्रौढ व्यक्तींना मराठी भाषा शिकण्यासाठी 'माय मराठी' हे द्वितीय पातळीचे पाठ्यपुस्तक आहे. सर्वसमावेशक सामग्रीतून संवादात्मक, कृतीशील आणि निर्मितीक्षम अशा पायाभूत आधारावर ह्या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मराठी भाषेचे काटेकोर पण परिणामकारक अध्यापन करण्याकरता हा एक अद्ययावत पद्धतीने भाषा शिकवण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आकलन, संवाद, वाचन तसेच लिखाण यांद्वारे मराठी भाषेतून योग्य रीतीने आणि परिणामकारक संवाद कसा साधावा याचे शिक्षण दिले जाते.

ह्या अभ्यासक्रमाच्या अध्यापन सामग्रीत प्रामुख्याने तीन पुस्तके आहेत, १) डीव्हीडीसहित पाठ्यपुस्तक, २) सराव, चाचणी, ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे लिखित मजकूर आणि उत्तरसंच असणारे अभ्यासपुस्तक आणि ३) मराठी - इंग्रजी आणि हिंदी, असा शब्दसंग्रह.

'माय मराठी, पातळी २'च्या ह्या खास पाठ्यपुस्तकात विषयानुरूप छायाचित्रे, रेखाचित्रे, मजकूर, कविता आणि गाणी, म्हणी आणि वाक्प्रचार, व्याकरण, साचेबद्ध सराव, 'करा आणि शिका' स्वाध्याय आहेत. तसेच खेळाद्वारे शिकवणी, समर्पक अर्कचित्रे, विषयानुसार येणारी अतिरिक्त शब्दसंपदा आणि दृष्टिक्षेप, सराव करण्यास उपयुक्त श्राव्य आणि दृक्श्राव्य चित्रफिती आहेत. तसेच सर्वच धड्यांची रचना विद्यार्थ्यांना समजेल अशी आहे. सोबत विनामूल्य दिल्या गेलेल्या दृक्श्राव्य डीव्हीडीसह हे पाठ्यपुस्तक वापरायचे आहे.

'माय मराठी, पातळी २'च्या अभ्यासपुस्तकात १) पाठ्यपुस्तकातील प्रत्येक धड्याखाली स्वाध्याय आहेत. त्यासोबतच २) पातळी १च्या उजळणीसाठी 'मागील भागात' हा सरावाचा धडा, ३) प्रत्येक दोन धड्यांसाठी चाचणी प्रश्नावली, शेवटी ४) संपूर्ण पातळी २च्या अभ्यासक्रमाची एकत्रित चाचणी, ५) ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे लिखित मजकूर आणि ६) उत्तरे यांचा समावेश आहे.

ग्लॉसरी म्हणजे शब्दसंग्रहात कठीण शब्दांची लिंगानुसार, तिन्ही वचनांनुसार आणि सामान्यरूपांनुसार विस्तृत माहिती समाविष्ट केलेली आहे.

संवादात्मक मराठीच्या पातळी २चा संपूर्ण अभ्यासक्रम म्हणजे साधारणपणे १२० तासांची शिकवणी आहे. तथापि, ह्याचे अध्यापन करताना शिक्षकाला ह्यातील प्रत्येक धड्यासाठी साधारणपणे १२ तासांचा अवधी लागेल. ह्या सामग्रीत सराव आणि चाचणीसाठी पुरेशी सामग्री समाविष्ट केलेली असली, तरी प्रत्यक्ष शिकवताना संबंधित शिक्षकाला अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर माहितीही द्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांसाठीही एक सूचना आहे की, योग्य तऱ्हेने मराठी बोलण्यासाठी त्यांनी एकवचन, अनेकवचन, सामान्यरूप तसेच लिंगानुसार नामांचा अभ्यास करण्याचा सराव करावा. सदर पुस्तके ही वर्गात शिक्षकांकडून समजून घेऊन शिकण्याच्या स्वरूपाची असली, तरी स्वयं-अध्ययन करणाऱ्यांना दिलेल्या सामग्रीतील विस्तृत शब्दसंग्रहाच्या आधारे ती समजून घेऊन शिकता येईल.

सोबत जोडलेली दृक्‌श्राव्य डीव्हीडी ह्या अध्यापन सामग्रीसोबत विनामूल्य देण्यात येणार आहे कारण हा प्रकल्प पूर्णपणे शैक्षणिक तत्त्वावर राबवला जात आहे. परिपूर्णपणे भाषा शिकण्यास मदत व्हावी ह्या हेतूने ह्या डीव्हीडीमध्ये श्राव्य ध्वनिफिती तसेच निरनिराळ्या माध्यमांतून निवडलेल्या वैविध्यपूर्ण दृक्‌श्राव्य चित्रफिती समाविष्ट केल्या आहेत. शिक्षकांनी सुचवलेल्या उत्तरासहची प्रश्नावली घेताना तसेच इतर प्रश्नोत्तरांच्या वेळी ह्या डीव्हीडीची मदत घेणे अपेक्षित आहे.

हा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी असा सल्ला आहे की, त्यांनी शिक्षकांसाठी असणाऱ्या भाषा-प्रशिक्षण वर्गांना उपस्थित राहावे; तसेच, ह्या संदर्भात त्यांनी संपादक वा राज्य मराठी विकास संस्थेशी संपर्क साधावा.

प्रकल्पातील इथवरची ही अध्यापनसामग्री तयार करण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी लागला असून त्यासाठी कष्ट घेऊन हे सारे पूर्णत्वास नेण्यास साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आभार.

इंग्लिश आणि जर्मनप्रमाणे मराठीदेखील संपन्न आणि पूर्वपरंपरा असणारी इंडो-युरोपियन भाषा आहे. ह्या भाषेचे अध्यापन करून त्यात सर्वसामान्य निजभाषकाइतके प्रभुत्व येण्याकरता किमान ६ पातळ्यांची म्हणजेच अंदाजे ८०० तासांची आवश्यकता आहे. पुढील चार पातळ्यांसाठी यथायोग्य सामग्री तयार करणे हे आमचे पुढील उद्दिष्ट आहे. या प्रकल्पांतर्गत स्वयं-अध्ययन करणाऱ्यांसाठी संगणक आणि सहध्वनीद्वारे वापरले जाणारे मोबाईल ॲप्लिकेशन्सही बनवले जाणार आहेत.

या कामात बहुमोल साहाय्य करणाऱ्या राज्य मराठी विकास संस्थेच्या सुशान्त देवळेकर आणि कादंबरी भंडारे यांचेही आम्ही आभारी आहोत.

कुलगुरू सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्या नेतृत्वासह कार्यशील अशा मुंबई विद्यापाठाच्या अधिकाऱ्यांचे आम्ही आभारी आहोत. हा प्रकल्प सुरळीत चालण्यासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

**विभा सुराणा आणि आनन्द काटीकर**

संपादक

# Preface

My Marathi Level 2 is a Marathi course book particularly meant for non-native teens and adults, for both Indian and foreign Marathi language learners. It is prepared using an integrated communicative, action and task based approach. It is a modest attempt to apply latest language teaching tools to facilitate the learning of the Marathi language systematically and effectively by imparting understanding, speaking, reading as well as writing skills.

This course material consists of three books, namely 1) a Textbook with a DVD, 2) a Workbook with exercises, tests, transcripts of audios and answer keys and 3) a Marathi Glossary in English and Hindi.

This particular Textbook of 'My Marathi Level 2' consists of units such as thematic images and illustrations, texts, poems and songs, idioms and proverbs, grammar, pattern drills (saraav), 'do and learn' exercises, learning games, cartoons, audios and audio-visual components with exercises, vocabulary as per topics (shabdsampada), vocabulary as per chapters (drishtikshep), as well as learner self-evaluation in all chapters. The textbook is to be used along with the free audio-visual DVD attached to it.

The Workbook of 'My Marathi Level 2' consists of 1) exercises for each chapter as well as the following regular tests 2) a comprehensive test for level 1 after mageel bhagat, 3) a test after every two chapters 4) a comprehensive test for level 2 5) transcripts of audios from the textbook and 6) answer keys.

The Glossary or shabdasangraha gives a detailed list of difficult words with their gender in singular and plural forms as well as their oblique forms. English and Hindi word meanings are given along with the usage of these words in sentences.

The entire Communicative Marathi Level 2 Course is designed for approximately 120 teaching hours. Thus, the teacher may take about 12 hours for each of the 10 chapters. Though enough exercises and tests have been given, the teacher is expected to give not only regular dictations but also more exercises as and when required. The learners are advised to learn the nouns along with their gender with singular and plural forms as well as the oblique forms in order to learn to speak

correct Marathi. Though the book is meant for classroom teaching, self-learners too can make use of it with the help of the comprehensive glossary.

The audio-visual DVD at the end comes free with the book and is meant purely for educational purpose. It consists of the audio section and a wide spectrum of audiovisual clips from the media which have been collated in accordance with the language proficiency level of the learners. The teachers are expected to use audio-visual material along with specific MCQs and other questions (written & oral).

The teachers using this book are advised to undergo rigorous teachers' training for the integrated communicative approach and may contact the editor or Rajya Marathi Vikas Sanstha for the same. It has taken three years of sustained intensive work to prepare this material and we are extremely thankful to the entire team for making it happen.

Like English and German, Marathi too is a rich and old Indo-European Language and similarly requires at least 6 levels of language learning, i.e. approx. 800 hours for near native language proficiency. Preparing standardized material for further 4 levels for learning Marathi is a daunting task ahead of us. Computer and Mobile applications (Apps) for self learners are also being prepared under this project. Such enterprises require expert inputs from diverse domains.

We are extremely thankful to Sushant Devlekar and Kadambari Bhandare from Rajya Marathi Vikas Sanstha for their valuable inputs.

We thank the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Suhas Pednekar and Pro-Vice Chancellor Ravindra Kulkarni to facilitate the smooth running of this project.

**Vibha Surana and Anand Katikar**

Editors

# आभार / Acknowledgement


Abhijeet Ranadive

Aditya Badle

Amit Varandekar

Amruta Sudame

Anagha Mandavkar

Anil Sapkal

Anuradha Mishra

Ashish Sawant

Bharati Chhatre

Bharati Nirgudkar

Chandrakant Margaj

Dipti Tambe

Disha Gudulkar

Gauri Bramhe

Gurudutt Kamath

Isha Pandit

Kadambari Bhandare

Kamala Ganesh

Kavya Chintala

Kiran Sawant (M.U.S.T. Radio)

Manasi Samant

Manish Bawkar

Manjiri Paranjape

Mihir Kulkarni

Neha Thombare

Nirupama Joshi

Pradnya Dalvi

Prasanna Bhave

Prathmesh Jagtap

Pushpa Gavit

Ramji Tiwari

Sammati Balgi

Sandeep Avhad

Sanjay Deshmukh

Shaleen Sharama

Shrikant Pathak

Smita Shukla

Tanvi Paradkar

Vidya Pingle

**Permission from copyright holders**

ABP Maza

Ajit Padgaonkar

Charuhas Pandit
and Prabhakar Wadekar
(For 'Chintu' cartoon strips)

Geeta Gramopadhye

Girish Kuber

Jayawant Kakade

Kaushik Lele

Kesari Tours

Maharashtra Times

Narendra Badambe

Neha Badjatya

Nilesh Mayekar

Popular Prakashan

S. D. Phadnis

Sakal Today

Sanjay Raut

Sanjay Upadhye

Uday Karandikar

Vinda Karandikar

# व्याकरणिक पारिभाषिक संज्ञा

# Grammar Terminology

| | |
|---|---|
| नाम = Noun | लिंग = Gender एकवचन = Singular अनेकवचन = Plural |
| सामान्यरूपे = Oblique Forms | अकारान्त नाम = Noun ending with अ<br>आकारान्त नाम = Noun ending with आ<br>इकारान्त नाम = Noun ending with इ<br>ईकारान्त नाम = Noun ending with ई<br>उकारान्त नाम = Noun ending with उ<br>ऊकारान्त नाम = Noun ending with ऊ<br>एकारान्त नाम = Noun ending with ए<br>ओकारान्त नाम = Noun ending with ओ |
| विभक्ती = Case<br>प्रत्यय = Suffix | प्रथमा = Nominative द्वितीया = Accusative<br>तृतीया = Instrumental चतुर्थी = Dative पंचमी = Ablative<br>षष्ठी = Genitive / Possessive सप्तमी = Locative /<br>Prepositional अष्टमी / संबोधन = Vocative |
| सर्वनाम = Pronoun | पुरुष = Person<br>प्रथम पुरुष = First Person<br>द्वितीय पुरुष = Second Person<br>तृतीय पुरुष = Third Person<br>दर्शक सर्वनाम = Demonstrative pronoun<br>सर्वनामांची षष्ठी = Possessive Case of Pronouns /<br>Possessive Pronouns |
| विशेषण = Adjective | विकारी विशेषणे = Adjectives with Declension<br>अविकारी विशेषणे = Adjectives without Declension |
| क्रियापद = Verb<br>धातू = Root | नियमित क्रियापदे = Regular Verbs<br>अनियमित क्रियापदे = Irregular verbs<br>अकर्मक क्रियापदे = Intransitive verbs<br>सकर्मक क्रियापदे = Transitive verbs |

| | |
|---|---|
| वर्तमानकाळ = Present Tense | साधा / सामान्य वर्तमानकाळ = Simple Present Tense<br>चालू / अपूर्ण वर्तमानकाळ = Present Continuous Tense<br>पूर्ण वर्तमानकाळ = Present Perfect Tense |
| भूतकाळ = Past Tense | साधा / सामान्य भूतकाळ = Simple Past Tense<br>अकर्मक भूतकाळ = Intransitive Past Tense<br>चालू / अपूर्ण भूतकाळ = Past Continuous Tense<br>पूर्ण भूतकाळ = Past Perfect Tense |
| भविष्यकाळ = Future Tense | साधा / सामान्य भविष्यकाळ = Simple Future Tense |
| क्रियाविशेषण = Adverb | धातुसाधित क्रियाविशेषण = Adverb formed from root |
| शब्दयोगी अव्यय = Post Position | |
| उभयान्वयी अव्यय = Conjunction | |
| केवलप्रयोगी अव्यय = Interjection | |
| प्रश्नशब्द = Question Word | |
| वाक्य = Sentences | होकारार्थी = Affirmative नकारार्थी = Negative |

# विभक्ती तक्ता : Cases

| विभक्ती | Cases | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| प्रथमा | Nominative | - | - |
| द्वितीया | Accusative | स, ला, ते | स, ला, ना, ते |
| तृतीया | Instrumental | ने, ए, शी | नी, ही, ई, शी |
| चतुर्थी | Dative | स, ला, ते | स, ला, ना, ते |
| पंचमी | Ablative | ऊन, हून | ऊन, हून |
| षष्ठी | Genitive | चा, ची, चे | चे, च्या, ची |
| सप्तमी | Locative | त, ई, आ | त, ई, आ |
| संबोधन | Vocative | - | हो, नो |

## पाठ्यपुस्तकात आणि अभ्यासपुस्तकात येणारी सर्व लघुरूपे :
## Abbreviations that appear in the textbook and workbook

अ॰पु॰ = अभ्यासपुस्तक (Workbook)
औप॰ = औपचारिक (Formal)
अनौप॰ = अनौपचारिक (Informal)
पु॰ए॰व॰ = पुल्लिंग एकवचन (Masculine Singular)
पु॰अ॰व॰ = पुल्लिंग अनेकवचन (Masculine Plural)
स्त्री॰ए॰व॰ = स्त्रीलिंग एकवचन (Feminine Singular)
स्त्री॰अ॰व॰ = स्त्रीलिंग अनेकवचन (Feminine Plural)
नपुं॰ए॰व॰ = नपुंसकलिंग एकवचन (Neuter Singular)
नपुं॰अ॰व॰ = नपुंसकलिंग अनेकवचन (Neuter Plural)
प्र॰पु॰ = प्रथम पुरुष (First Person)
द्वि॰पु॰ = द्वितीय पुरुष (Second Person)
तृ॰पु॰ = तृतीय पुरुष (Third Person)
सा॰रू॰ = सामान्य रूप (Oblique Form)

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | मागील भागात | प्रश्नशब्द : कसा, काय, कधी, कुठला, कोण, कोणता इ.<br>नाम आणि सर्वनाम यांच्या वचन आणि लिंग यांनुसार क्रियापदांचे रूप बदलून वाक्य लिहिणे | स्वतःची आणि इतरांची ओळख करून देणे<br>प्रश्न विचारणे<br>कागदपत्र ओळखणे, अर्ज भरणे<br>'करा' किंवा 'करू नका' असे सांगणे<br>दिवाळी या सणाबद्दल थोडे सांगणे, शुभेच्छा देणे<br>दैनंदिन व्यवहारात संभाषण करणे | नातेसंबंध<br>रंग<br>महिने, दिवस,<br>खाद्यपदार्थ,<br>कपडे, पशु-पक्षी<br>चव, अंक आणि संख्या | १५ |
| १ | प्रसारमाध्यमे | प्रश्नशब्द : कितीचा, कितीला, कधीपासून, कधीपर्यंत<br>असणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप (आहे, होता, नव्हता)<br>होणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप (होता, झाला, झाला नाही)<br>अव्यये : जरी / तरी, जेव्हा / तेव्हा, जसं / तसं, जो / तो<br>क्रियापद + ताना | वेळ ठरवणे<br>प्रसारमाध्यमांबद्दल बोलणे<br>स्वत:चे मत व्यक्त करणे<br>ई-पत्र लिहिणे | प्रसारमाध्यमे | ३३ |
| २ | आरोग्य | सामान्य भविष्यकाळ (बसेन, बसणार, बसणार नाही, करीन, खाईन) | अवयव सांगणे<br>डॉक्टर-पेशंट संभाषण करणे<br>काय झाले ते सांगणे आणि सल्ला देणे<br>किरकोळ आजारांबद्दल बोलणे<br>तब्येतीसाठी आणि स्वत:साठी काय करीन, हे सांगणे | अवयव<br>फळे<br>भाज्या | ७१ |
| ३ | आवडनिवड | विकारी / अविकारी विशेषण<br>क्रियापद + ला<br>प्रश्नशब्द : कसाय, कशीय, कसंय...<br>आम्ही दोघे, आम्ही दोघी, आम्ही दोघं | आवडी निवडी सांगणे<br>वस्तूंचे / व्यक्तींचे वर्णन करणे<br>अभिप्राय देणे | छंद<br>खरेदी<br>दागदागिने | ९५ |

| पाठ | विषय | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ४ | नातेसंबंध | षष्ठी नाम आणि सर्वनामांची रूपे<br>प्रश्नशब्द : कोणाचा<br>षष्ठीचे प्रत्यय आणि शुद्ध शब्दयोगी अव्यय 'च'<br>'रोजच्या रोज', 'आजच्या आज' असे वाक्प्रचार | नातेसंबंध ओळखणे<br>चित्र वर्णन करणे | नातेसंबंध | ८५ |
| ५ | आनंदतरंग | सर्वनामांची सामान्यरूपे + शब्दयोगी अव्यय<br>तरी, आता तरी, निदान | सणांविषयी बोलणे<br>आनंदाचे प्रसंग<br>अभिनंदन करणे / शुभेच्छा देणे<br>मराठी न्याहारी आणि जेवण<br>एखादी मराठी पाककृती बनवणे, त्यावर लिहिणे आणि बोलणे | अवयव<br>फळे<br>सण<br>खाद्यपदार्थ<br>पेये | १०९ |
| ६ | भाषा | प्रश्नशब्द : का<br>संयुक्त वाक्ये : कारण, त्यामुळे, म्हणून<br>सामान्यनामांची सामान्यरूपे<br>'च'चा वापर | भाषेबद्दल बोलणे<br>इच्छा व्यक्त करणे<br>कारण आणि परिणाम सांगणे | वर्गात<br>व्याकरण | ११६ |
| ७ | दैनंदिन व्यवहार | द्वितीया आणि चतुर्थी विभक्ती<br>प्रश्नशब्द : कोणाला<br>विशेषनामांची सामान्यरूपे<br>विकारी विशेषणांची सामान्यरूपे<br>विध्यर्थ : असणे आणि नसणे | रोजच्या घडामोडींवर संभाषण करणे<br>व्यवसाय आणि कार्यक्षेत्रे यांबद्दल बोलणे | व्यवसाय,<br>सरकारी वापर<br>घर आणि घरातल्या वस्तू<br>भांडी | १४७ |
| ८ | करावे तसे भरावे | विध्यर्थ, आज्ञार्थ :<br>सकारात्मक / नकारात्मक<br>सर्वनाम / नाम + तृतीया<br>कधीतरी / काहीतरी<br>जिथे / तिथे, जिकडे / तिकडे, ज्याने / त्याने, ज्याच्याशी / त्याच्याशी, ज्याला / त्याला<br>शब्दयोगी अव्यय : आधी / मग, पूर्वी / आत्ता, अगोदर / नंतर<br>जोडक्रियाविशेषणे :<br>इकडेतिकडे, रात्रीअपरात्री ... | सूचना देणे / सल्ला देणे / नियम सांगणे<br>हवंय / नकोय<br>सर्वनाम / नाम + तृतीया | जोडशब्द | १५९ |

| पाठ | विषय | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ९ | भ्रमंती | सामान्य भूतकाळ (सकर्मक)<br>विशेषनाम, सामान्यनाम, सर्वनाम, क्रियापद + शब्दयोगी अव्यय<br>प्रश्नशब्द + शब्दयोगी अव्यय (कुठे + पर्यंत = कुठपर्यंत)<br>ऊन, हून, पासून/पर्यंत, कडून<br>प्रश्नशब्द : कोणी, कोणाशी, कुठे | प्रवास, सुट्टी, सहल यांबद्दल सांगणे<br>मुख्य शहरांची व पर्यटन स्थळांची माहिती सांगणे | ठिकाणे<br>वाहतूक | १८३ |
| १० | नवी जुनी पिढी | सप्तमी प्रश्नशब्द : कोणावर, कोणात, कुठे<br>द्विकर्मक भूतकाळ | नव्या-जुन्या पिढीची मते मांडणे<br>नेट-नाद<br>व्यक्तिमत्त्व, प्रवृत्ती व राहणीमान यांविषयी बोलणे | व्यक्ती आणि काम<br>भाववाचक आणि इतर नामे | १९९ |
| | उत्तरे | | | | २४० |

# मागील भागात



## चला, उजळणी करू या...

- स्वतःची आणि इतरांची ओळख करून देणे
- प्रश्न विचारणे : कसा, काय, कधी, कुठला, कोण, कोणता इ॰
- नातेसंबंध, रंग, महिने, दिवस, खाद्यपदार्थ, कपडे, पशुपक्षी
- चव सांगणे आणि लिहिणे
- अंक आणि संख्या ओळखणे, बोलणे, लिहिणे
- नाम / सर्वनाम यांच्या वचन / लिंगानुसार क्रियापदातील बदल
- कागदपत्र ओळखणे, अर्ज भरणे
- 'करा' किंवा 'करू नका' असे सांगणे
- दिवाळी या सणाबद्दल सांगणे, शुभेच्छा देणे
- दैनंदिन व्यवहारांत संभाषण करणे

## १ खालील उत्तरांसाठी कंसात दिलेल्या शैलीत योग्य प्रश्न लिहा.

१. .................................................................................... (अनौप०)

हो, आम्ही विद्यार्थी आहोत.

२. .................................................................................... (औप०)

नाही, मी नाशिकला राहते.

३. .................................................................................... (औप०)

हो, टीव्ही बघणे माझा छंद आहे.

४. .................................................................................... (अनौप०)

नाही, मी अविवाहित आहे.

५. .................................................................................... (अनौप०)

हो, तो म्यानमारचा आहे.

६. .................................................................................... (औप०)

नाही, त्या मुंबई विद्यापीठामध्ये फ्रेंच शिकवतात.

७. .................................................................................... (अनौप०)

नाही, मला लाल रंग आवडतो.

८. .................................................................................... (अनौप०)

हो, आम्हाला 'पा' हा सिनेमा आवडतो.

९. .................................................................................... (औप०)

हो, त्या बँकेत काम करतात.



## २ खालील उत्तरांसाठी उदाहरणाप्रमाणे संवादात्मक शैलीत योग्य प्रश्न लिहा.

उदा॰ मी सोनाली बोलतेय.
कोण बोलतंय?

टीप : पडतायत = पडताहेत = पडतायेत

१. बॅगा खाली पडतायत.

..........

२. बाबा कॉम्प्युटर दुरुस्त करतोय.

..........

३. आठ वाजलेयत.

..........

४. डॉक्टर ऑपरेशन थिएटरमध्ये आहेत.

..........

५. साक्षी कॉलेजला जातेय.

..........

६. ती माकडं खूप दंगा करतायेत.

..........



## ३ योग्य वार लिहा.

| काल | आज | उद्या | परवा | तेरवा |
|---|---|---|---|---|
| | | रविवार | | |
| मंगळवार | | | | शुक्रवार |
| | | | बुधवार | |

# मागील भागात

## ४ पुढील शब्द पूर्ण करून खाद्यपदार्थांची नावे पूर्ण करा.



उदा॰ तो बटाटावडा,
ते बटाटेवडे

१.


ती पुरण..................

२.


ती पाणी..................

३.


ती पाव..................

४.


तो वरण..................

५.


तो तिळ..................

## ५ बटाटावड्याची पाककृती : कंसातील क्रियापदांचे योग्य रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.

उदा॰ बटाटे (उकडणे) उकडा. (१) मग सालं काढून ते (कुस्करणे) ..................... (२) आलं, लसूण आणि मिरची यांचा ठेचा तयार (करणे) ..................... (३) आता ते बटाटे, कोथिंबीर, ठेचा, हळद आणि मीठ एकत्र (मिसळणे) ..................... (४) या मिश्रणाचे गोळे (बनवणे) ..................... (५) बेसनात लाल तिखट, हळद व मीठ (घालणे) .................... आणि थोड्याशा पाण्यात दाट मिश्रण (करणे) ..................... (६) कढईत तेल (तापवणे) ..................... (७) बटाट्याचे गोळे बेसनात (बुडवणे) .................... आणि मग गरम तेलात लालसर होईपर्यंत (तळणे) .....................



६ तक्ता पूर्ण करा.

| नाम | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| उदा॰ उंदीर | तो उंदीर | ते उंदीर |
| १. पोपट | | |
| २. गाय | | |
| ३. मांजर | | |
| ४. कुत्रा | | |
| ५. चिमणी | | |
| ६. कबुतर | | |

७ वेळ लिहा.

| | | |
|---|---|---|
| | १.३० | उदा॰ एक वाजून तीस मिनिटे किंवा दीड |
| १) | २.३० | |
| २) | १२.४५ | |
| ३) | ८.५५ | |
| ४) | ५.५० | |
| ५) | ३.३० | |
| ६) | १.१५ | |

८ संवाद वाचा आणि नवीन नामे वापरून संवाद परत लिहा.

**पुस्तकं**

शिक्षक : तुझी पुस्तकं कुठेयत?

विद्यार्थी : ती घरी आहेत.

शिक्षक : ती घरी काय करतायत?

विद्यार्थी : सर, ती घरी माझ्यापेक्षा जास्त मजा करतायत.



**१. वही (स्त्री॰ए॰व॰)**

शिक्षक : तुझी वही कुठे आहे?

विद्यार्थी : ..................................................

शिक्षक : ..................................................

विद्यार्थी : ..................................................

**२. वह्या (स्त्री॰अ॰व॰)**

शिक्षक : ..................................................

विद्यार्थी : ..................................................

शिक्षक : ..................................................

विद्यार्थी : ..................................................

**३. पुस्तक (नपुं॰ए॰व॰)**

शिक्षक : ..................................................

विद्यार्थी : ..................................................

शिक्षक : ..................................................

विद्यार्थी : ..................................................

**४. पेन (नपुं॰ए॰व॰)**

शिक्षक : ..................................................

विद्यार्थी : ..................................................

शिक्षक : ..................................................

विद्यार्थी : ..................................................

५. पेन्सिल (स्त्री०ए०व०)

शिक्षक : ..........

विद्यार्थी : ..........

..........

शिक्षक : ..........

..........

विद्यार्थी : ..........

..........

६. पेन्सिली (स्त्री०अ०व०)

शिक्षक : ..........

विद्यार्थी : ..........

..........

शिक्षक : ..........

..........

विद्यार्थी : ..........

..........

७. कागद (पु०ए०व०)

शिक्षक : ..........

विद्यार्थी : ..........

..........

शिक्षक : ..........

..........

विद्यार्थी : ..........

..........

८. उत्तरं (नपुं०अ०व०)

शिक्षक : ..........

विद्यार्थी : ..........

..........

शिक्षक : ..........

..........

विद्यार्थी : ..........

..........

९. फाईल (स्त्री०ए०व०)

शिक्षक : ..........

विद्यार्थी : ..........

..........

शिक्षक : ..........

..........

विद्यार्थी : ..........

..........

१०. फाईली (स्त्री०अ०व०)

शिक्षक : ..........

विद्यार्थी : ..........

..........

शिक्षक : ..........

..........

विद्यार्थी : ..........

..........

९ दिलेल्या वाक्यांतील क्रियापद आणि नामाचे संवादात्मक रूप लिहून वाक्ये पुन्हा लिहा.

उदा॰ विद्यार्थी पुस्तके वाचत आहेत.

विद्यार्थी पुस्तकं वाचताहेत.

१. तो खेळाडू धावत नाही आहे.

..........

२. काही शास्त्रज्ञ गप्पा मारत आहेत.

..........

३. मिस्टर गोखले, तुम्ही काय शोधत आहात?

..........

४. ती लहान मुले झोपत नाही आहेत.

..........

५. आम्ही लंगडी खेळत आहोत.

..........

६. त्या बायकांना गोष्टी सांगता येत नाही आहेत.

..........

७. हल्ली तरुण मुले कोणती गाणी ऐकत आहेत ?

..........

८. ते गाढव काय करत आहे ?

..........

९. म्हात्रेकाका कुठे जात आहेत ?

..........





## १० अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.

उदा॰ विद्यार्थी पुस्तक वाचतोय.

विद्यार्थी पुस्तकं वाचतायत.

१. तो खेळाडू धावत नाहीये.

.............................................................................................................

२. तुम्ही (पु॰) काय शोधताय?

.............................................................................................................

३. ती लहान मुलं झोपत नाहीयेत.

.............................................................................................................

४. आम्ही (स्त्री॰) लंगडी खेळतोय.

.............................................................................................................

५. त्या बायका गोष्टी सांगत नाहीयेत.

.............................................................................................................

६. त्या कोणती गाणी ऐकतायत?

.............................................................................................................

७. ते गाढव काय करतेय? / करतंय?

.............................................................................................................





## मागील भागात

११ सुट्टीचे दिवस आहेत. चित्र पाहून सांगा, कोण काय करत आहे? योग्य क्रियापदे वापरून वाक्ये बनवा.



धुणे वाचणे धुणे वाचणे
खेळणे काढणे खेळणे काढणे
ऐकणे करणे ऐकणे करणे
बघणे मारणे बघणे मारणे
धुणे वाचणे धुणे वाचणे
खेळणे काढणे खेळणे काढणे
ऐकणे करणे ऐकणे करणे
बघणे मारणे बघणे मारणे



धुणे वाचणे धुणे वाचणे
खेळणे काढणे खेळणे काढणे
ऐकणे करणे ऐकणे करणे
बघणे मारणे बघणे मारणे
धुणे वाचणे धुणे वाचणे
खेळणे काढणे खेळणे काढणे
ऐकणे करणे ऐकणे करणे
बघणे मारणे बघणे मारणे

| कोण? (कर्ता) | काय? (कर्म) | क्रियापद |
|---|---|---|
| ते (अ॰व॰) | गाणी | धुणे |
| १. ती | झोपा | वाचणे |
| २. ते (पु॰ आणि स्त्री॰) | स्वयंपाक | खेळणे |
| ३. तो | टीव्ही | काढणे |
| ४. सगळी मुले | वृत्तपत्र | ऐकणे |
| ५. त्या | गप्पा | करणे |
| ६. तो | पत्ते | बघणे |
| ७. त्या बायका | कपडे | मारणे |

उदा॰ ते टीव्ही बघतायत.

## १२ खालील चित्रे पाहा आणि कोण काय बोलत आहे ते लिहा.

१.



२.



वेटर :

चेतना :

तेजस :

भारत :

माया :

दुकानदार :

आकाश :

## १३ खालील प्रपत्र वाचून त्यापुढे दिलेले प्रश्न सोडवा.

भारतीय विशिष्ट पहचान प्राधिकरण
भारत सरकार

AADHAAR

### AADHAAR ENROLMENT / CORRECTION FORM
### आधार नोंदणी/दुरूस्ती प्रपत्र

*Aadhaar Enrolment is free and voluntary. Correction within 96 hours of enrolment is also free.* No charges are applicable for form and Aadhaar Enrolment. In case of correction provide your EID, Name and only that field which needs correction. / *आधार नोंदणी ही मोफत आणि स्वेच्छिक आहे. नोंदणी केल्यानंतर 96 तासांच्या आत दुरूस्ती केल्यास ती मोफत आहे.* आधार प्रपत्र आणि नोंदणीसाठी शुल्क लागू नाही. दुरूस्ती करायची असल्यास तुमचा ईआयडी, नाव आणि फक्त ज्यात सुधारणा करायची आहे तो रकाना द्या.

In case of correction provide your EID No here: / दुरूस्ती करायची असल्यास तुमचा ईआयडी क्रमांक येथे द्या: | | | | | | | | | | | | | | dd | mm | yyyy | hh:mm:ss |

***Please follow the instructions overleaf while filling up the form. Use capital letters only. / कृपया प्रपत्र भरताना मागील पानावरील सूचनांचे पालन करा. फक्त ठळक अक्षरांचा उपयोग करा.***

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Pre-Enrolment ID: / नोंदणीपूर्व आयडी : | 2. NPR Receipt/TIN Number: / एनपीआर पावती/टीआयएन क्रमांक: | |
| 3. | Full Name: / संपूर्ण नाव: | | |
| 4. | Gender / लिंग: Male / पुरूष ( ) Female / स्त्री ( ) Transgender / ट्रान्सजेन्डर ( ) | 5. Age / वय: Yrs / वर्ष OR/ किंवा Date of Birth / जन्मतारीख: Declared / घोषित ( ) Verified / पडताळणी केलेली ( ) | |
| 6. | Address / पत्ता: C/o / द्वारा ( ) D/o / ची मुलगी ( ) S/o / चा मुलगा ( ) W/o / ची पत्नी ( ) H/o / चा पती ( ) Name / नाव | | |
| | House No/Bldg./Apt / घर क्रमांक/इमारत क्रमांक/अपार्टमेन्ट | Street/Road/Lane / रस्ता/मार्ग/गल्ली | |
| | Landmark / महत्त्वाचे ठिकाण | Area/locality/sector / विभाग/ठिकाण/क्षेत्र | |
| | Village/Town/City / गाव/शहर | Post Office / डाकघर | |
| | District / जिल्हा | Sub-Division / उप विभाग | State / राज्य |
| | E mail / ई-मेल | Mobile No / मोबाईल क्रमांक | PIN CODE / पिन कोड |

## १४ मोकळ्या जागा भरा.

आधार नोंदणी / दुरुस्ती प्रपत्र

| | | |
|---|---|---|
| उदा॰ नाव : राजेंद्र राम कांबळे | १) .................. : पुरुष | |
| २) .................. : १२/०२/१९७१ | ३) .................. : ४५ | ४) .......... : rajendrak@raindrop.com |
| ५) .................. : सी/१७२, ए विंग | ६) .......... : नेहरू रोड | ७) .................. : वाकोला |
| ८) .................. : सांताक्रूझ | ९) .................. : मुंबई | १०) .................. : ४०००५५ |
| ११) .................. : महाराष्ट्र | | |

## १५ मी कोण?

**खाली दिलेली वाक्ये वाचा आणि कंसातील योग्य शब्द निवडून एका शब्दात उत्तर लिहा.**

**(पारपत्र / पासपोर्ट, वाहनचालक परवाना, पेन्शन कार्ड, मतदार ओळखपत्र, शेतकरी पासबुक, आधारकार्ड)**

| | |
|---|---|
| १. आजोबा, तुम्ही पैशांची अजिबात काळजी करू नका. मी आहे ना तुमच्या मदतीला! | |
| २. शेतात राबताना पैशांचीही चिंता आहे? काळजी नको! मी आहे. | |
| ३. माझ्याशिवाय जर तुम्ही गाडी चालवलीत, तर पोलीस तुम्हाला पकडतील. | |
| ४. परदेशी जाताना मला सोबत न्यायला विसरू नका. | |
| ५. मी नसलो, तर तुम्ही आमदार / खासदार कसा निवडू शकाल? | |
| ६. माझ्याशिवाय तुम्ही स्वतःची ओळख पटवून तरी कशी द्याल? | |

## १६ व्हॉट्सॲपवर संदेश पाठवा.

| | |
|---|---|
| १. आज तुमच्या मैत्रिणीचा वाढदिवस आहे. | बानी, |
| २. तुमच्या मोठ्या भावाला गाण्याच्या स्पर्धेत पहिलं बक्षीस मिळालं आहे. | दादा, |
| ३. आज २५ डिसेंबर आहे. तुमच्या मित्राला शुभेच्छा द्या. | पीटर, |
| ४. तुमच्या नातेवाइकांना दिवाळीच्या शुभेच्छा द्या. | काका-काकी, |
| ५. तुमच्या आईचे १० एस॰एम॰एस॰ येऊन गेले, पण तुम्ही एस॰एम॰एस॰ला उत्तर दिले नाही. तुमची चूक कबूल करा आणि माफी मागा. | आई, |



# तोंडी परीक्षा – एकूण गुण २०

## १. वाचन आणि आकलन (एकूण २० गुण)

**१. खालील उतारा वाचून दाखवा.** (२)

भारतातील उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आता बहुतेक ठिकाणी विमान सेवा उपलब्ध आहे. म्हणून प्रवाशांना कमी दिवसांमध्ये भरपूर आनंद घेता येतो. 'टीना वर्ल्ड'च्या वेबसाईटवर खास तुमच्यासाठी एअर रिझर्वेशनची सुविधा आहे. त्यामुळे घरबसल्या कुठल्याही ठिकाणाचे विमानाचे तिकीट तुम्ही काढू शकता. मात्र जरा लवकर! उन्हाळ्याची सुट्टी जवळ येताच तिकिटाची किंमत खूप वाढते. मग लगेच ठरवा! या उन्हाळ्यात भारतात कूल कूल हॉलिडेसाठी कुठे जायचे?

**२. खालील प्रश्नांची तोंडी उत्तरे द्या.** (३)

क. 'टीना वर्ल्ड'च्या वेबसाईटवर विमानाचे तिकीट काढण्यासाठी कोणती सुविधा आहे?

ख. या उताऱ्यातील दोन आंतरराष्ट्रीय शब्द सांगा.

ग. तुम्हाला विमानाने प्रवास करायला आवडते का? त्याचे कारण काय?

## २. संभाषण करा. (एकूण ५ गुण)

**१. कुठलेही एक चित्र निवडा. चित्रामधील एका व्यक्तीची भूमिका करा आणि दोन-दोन जणांचे एक संभाषण सादर करा. (क. किंवा ख.)**

**क. ओळख :**

**संभाषणासाठी मदत :** अभिवादन – परिचय – नाव – गाव – व्यवसाय / शिक्षण – खुशाली – आवड – कुटुंब – संपर्क क्रमांक






**ख. खरेदी :**

**संभाषणासाठी मदत :** खरेदी करणे - वस्तूंच्या किमती विचारणे, सांगणे - वजने आणि मापे - पैसे




**३. तुम्ही काय म्हणाल?** **(एकूण ५ गुण)**

१. एक व्यक्ती तुम्हाला एक पत्ता विचारत आहे, पण तुम्हाला तो पत्ता माहीत नाही.
२. तुमची तब्येत बरी नाही. तुमचा मित्र तुम्हाला तुमची खुशाली विचारत आहे.
३. तुमचे छंद कोणते?
४. तुमचा वाढदिवस कधी असतो?
५. उपाहारगृहात ऑर्डर कशी द्याल?

**४. आज्ञार्थी रूप वापरून योग्य आज्ञा द्या.** **(एकूण ५ गुण)**

१. तुमचा मुलगा खूप भरभर जेवतोय.
२. तुम्ही शिक्षक आहात. तुमचे विद्यार्थी वर्गात खूप ओरडताहेत.
३. तुम्हाला एक गोष्ट ऐकायची आहे. तुमची आजी छान गोष्ट सांगते.
४. तुमचा नवरा रोज कामावरून उशिरा घरी येतो.
५. तुमची मुलगी अमेरिकेला जात आहे.









# लेखी परीक्षा – एकूण गुण ८०

## १. वाचन आणि आकलन (एकूण ५ गुण)

प्रिय नयना,

आज मला फ्रान्समध्ये येऊन दोन महिने झाले. मी पॅरिसमध्ये राहतो. पॅरिस खूप सुंदर शहर आहे. दर शनिवारी आणि रविवारी मी सकाळी लवकर उठतो आणि पॅरिसमधलं एक नवीन ठिकाण बघतो. आतापर्यंत मी 'व्हर्सायचा राजवाडा, 'आयफल टॉवर', 'शाँझेलिझे' आणि 'डिस्नीलँड' बघितलं आहे. सोमवार ते शुक्रवार मी सकाळी ऑफिसला जातो. माझं ऑफिस नऊला सुरू होतं. ऑफिस घरापासून जवळ आहे. म्हणून मी नऊला दहा कमी असताना घरातून निघतो. मी डिसेंबर महिन्यात भारतात सुट्टीसाठी येतोय आणि माझ्या फ्रेंच गर्लफ्रेंडलासुद्धा घेऊन येतोय. ब्रिटिश एअरवेजची तिकिटं बुक केली आहेत. तू आम्हाला घ्यायला विमानतळावर येशील ना?

तुझा केतन.

**१. केतनची मैत्रीण प्रीती नयनाकडे केतनची चौकशी करतेय. खाली नयनाने दिलेली उत्तरे आहेत. प्रीतीने कोणते प्रश्न विचारले असतील?**

प्रीती : ............................................................?

नयना : पॅरिस हे शहर सुंदर आहे.

प्रीती : ............................................................?

नयना : केतन पॅरिसमध्ये नोकरी करतोय.

प्रीती : ............................................................?

नयना : केतन सकाळी ८.५० वाजता ऑफिसला जातो.

प्रीती : ............................................................?

नयना : तो आठवड्यातले पाच दिवस काम करतो.

प्रीती : ............................................................?

नयना : केतनची गर्लफ्रेंड फ्रेंच आहे.



२. **चित्रांमधील व्यक्तींची माहिती वाचा आणि पुढील तक्ता भरा.** **(एकूण ५ गुण)**



लायोनेल मेस्सी
खेळाडू
अर्जेंटिना
फुटबॉल



जे॰ के॰ रावलिंग
लेखिका
ब्रिटन
हॅरी पॉटर



शाहरुख खान
अभिनेता
भारत
बॉलीवूड

| | | | |
|---|---|---|---|
| **नाव** | | | |
| **देश** | | | |
| **व्यवसाय** | | | अभिनय |
| **भाषा** | | | |
| **प्रसिद्धी** | | | |

३. **संवाद लिहा.** **(एकूण १० गुण)**

**प्रसंग :** आज रविवार आहे. तुम्हाला तुमच्या जिवलग मित्रासोबत किंवा मैत्रिणीसोबत एखाद्या नाटकाला किंवा सिनेमाला जायचे आहे. वृत्तपत्रातील खालील जाहिराती वाचून तुम्ही तुमच्या मित्राला / मैत्रिणीला फोन करता आणि कार्यक्रम ठरवता. हा संवाद लिहा.



४. रिकाम्या जागी योग्य महिन्यांची आणि योग्य ठिकाणी वारांची नावे लिहा. (एकूण ५ गुण)

१. ख्रिसमस हा सण ............ महिन्यात येतो.
२. वर्षातील आठवा महिना ............ हा असतो.
३. ............ महिन्यात पुण्यात खूप उकाडा असतो.
४. २००६च्या जु ...... महिन्यात मुंबईत खूप पाऊस पडला.
५. र ............ हा सुट्टीचा वार असतो, त्या दिवशी मी खूप झोपतो.

५. रिकाम्या जागी अंकात किंवा अक्षरात आकडे लिहून तक्ता पूर्ण करा. (एकूण ५ गुण)

| अंकात | अक्षरात | अंकात | अक्षरात |
|---|---|---|---|
| ९९ | ............ | ............ | अडुसष्ट |
| ............ | बावीस | ८७ | ............ |
| ४३ | ............ | | |

६. लिंग किंवा वचन बदलून वाक्ये पुन्हा लिहा. (एकूण ५ गुण)

१. ती पोळी खाते. ............
२. ते गाणी गातात. ............
३. आजी गोष्ट सांगते. ............
४. मुले चित्र काढतात. ............
५. पक्षी आकाशात उंच उडतो. ............

७. खालील वाक्यातील क्रियापदांची रूपे सूचनेनुसार बदलून वाक्ये पुन्हा लिहा. (एकूण ५ गुण)

उदा॰ राधिकाला गाणं गायचं आहे.

राधिकाला गाणी (अ॰व॰) गायची आहेत.

१. मला बटाटावडा आवडतो.

त्यांना ............ (अ॰व॰) ............ .

२. तो पत्ता विचारतोय.

ती ............ (अ॰व॰) ............ .

३. ती जोरात धावते.

त्या जोरात ............ .

४. त्याचा मोबाईल बिघडलाय.

तिचे .................... (अ॰व॰) .................... .

५. गाडी हळूहळू जात आहे.

.................... (अ॰व॰) हळूहळू .................... .

८. **खालील वाक्यातील सर्वनामांची चुकीची रूपे दुरुस्त करून वाक्ये पुन्हा लिहा.** **(एकूण ५ गुण)**

१. तो पुस्तके वाचते. .................... .

२. ते फिरायला जातो. .................... .

३. ती वह्या सुंदर आहेत. .................... .

४. तो मुले पतंग उडवतात. .................... .

५. ती बायका सायकल चालवतात. .................... .

९. **सुसंगत वाक्य निवडा.** **(एकूण ५ गुण)**

१. तू फारच सुंदर आहेस.

क. मला नाही आवडत. ख. धन्यवाद. ग. असं कसं होईल?

२. तुझं पुस्तक हरवलंय का?

क. कशाला? ख. मी हरवलो नाही. ग. हो, कालच.

३. गाडी जरा हळू चालव.

क. मी चालत नाही. ख. ठीक आहे. ग. मला गाडी चालते.

४. तो खूप दुष्ट आहे.

क. तिला दुष्ट म्हणू नकोस. ख. ते दुष्ट नाहीत. ग. कोण म्हणतं असं?

५. मी शाळा शोधतोय.

क. शाळेत जा लवकर. ख. इथून बरीच लांब आहे. ग. शाळेतून ये लवकर.

१०. **खालील शब्द वापरून चालू वर्तमानकाळ आणि साध्या वर्तमानकाळात वाक्ये लिहा.** **(एकूण १० गुण)**

क. अदिती, पुस्तक, वाचणे ....................

ख. मीना, सिनेमा, बघणे ....................

ग. महेश, फुटबॉल, खेळणे ....................

घ. जयेश, गाणी, ऐकणे ....................

च. जॉन, गप्पा, मारणे ....................

**११. किती वाजले ते अक्षरात लिहा. (जमल्यास दोन प्रकारे लिहा.)** **(एकूण ५ गुण)**

क. ३.१५ ..........

..........

ख. ८.४० ..........

..........

ग. ६.४५ ..........

..........

घ. ५.५० ..........

..........

च. २.३० ..........

..........

**१२. भाषा - देश - राष्ट्रीयत्व - राजधानी** **(एकूण ५ गुण)**

| | शब्द | भाषा | देश | राष्ट्रीयत्व | राजधानी |
|---|---|---|---|---|---|
| १ | हॅलो | | इंग्लंड | | |
| २ | झाओ शांग हाओ | | | | बिजींग |
| ३ | बों जूर | | | फ्रेन्च | |
| ४ | ओहायो गोझायमास | | | | टोकियो |
| ५ | गुटेन मॉरगेन | जर्मन | | | |

**(एकूण ५ गुण)**

**१३. खालील वाक्यांमध्ये 'आणि' किंवा 'पण' ही उभयान्वयी अव्यये योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पूर्ण करा.**

१. ते पळतपळत स्टेशनवर जातात .......... गाडी पकडतात.

२. शिक्षिका वर्गात शिकवतात .......... मुले कंटाळतात.

३. दुकानदाराकडे चांगल्या वस्तू आहेत .......... महाग आहेत.

४. मुले मैदानावर खेळाचा खूप सराव करतात .......... सामना जिंकतात.

५. तो खूप कष्ट करतो .......... यश मिळत नाही.

१४. खाली दिलेल्या कोणत्याही पाच विशेषणांच्या पुढे कंसातील योग्य नाम / नामे लिहा. (एकूण ५ गुण)

(एका विशेषणापुढे एकापेक्षा जास्त नामे असू शकतात.)

(उद्योजक, पदार्थ, पुस्तक, साडी, इमारत, कुत्रा, कॉम्प्युटर, स्वयंपाक, मुलगा, शिक्षिका, नाटक, माणूस, वस्तू)

१. सुंदर ..........

२. उंच ..........

३. आळशी ..........

४. उत्तम ..........

५. प्रेमळ ..........

६. श्रीमंत ..........

७. चविष्ट ..........

८. महाग ..........











# प्रसारमाध्यमे

९



## चला, शिकू या...

- वेळ ठरवणे
- प्रश्नशब्द : कितीचा, कितीला, कधीपासून, कधीपर्यंत
- असणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप (आहे, होता, नव्हता)
- होणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप (होतो, झाला, झाला नाही)
- अकर्मक भूतकाळ
- प्रसारमाध्यमांबद्दल बोलणे
- स्वत:चे मत व्यक्त करणे
- अव्यये : जरी / तरी, जेव्हा / तेव्हा, जसं / तसं, जो / तो
- क्रियापद + ताना
- ई-पत्र लिहिणे

## १ काळ आणि वेळ

**१. भूतकाळ वापरून पुन्हा लिहा.**

आम्ही कल्याणमध्ये राहतो. क) आता या परिसरात खूप वस्ती आहे. ख) आता पुलाजवळ शाळा नाहीये. ग) शाळेपुढील मैदानही नाहीये. घ) खरेदीसाठी आता बाजार नाहीये, पण मोठा मॉल आहे. च) आता इथे हिरवी झाडे नाहीत, केवळ इमारतींचं जंगल आहे.

उदा॰ आम्ही कल्याणमध्ये राहात होतो.

..........

..........

..........

..........

..........

**२. किती वाजले आहेत ते लिहा.**

उदा॰ ४.५५ चार वाजून पंचावन्न मिनिटे / चार पंचावन्न / पाच वाजायला पाच मिनिटे कमी / पाचला पाच कमी

क. २.३७ ..........

ख. १०.५२ ..........

ग. ६.४९ ..........

घ. १.४५ ..........

च. ४.५३ ..........

छ. ३.१५ ..........

ज. ८.५० ..........

झ. २.३८ ..........

३. किती वाजले आहेत ते लिहा.

| | | |
|---|---|---|
| उदा॰ |  | सव्वाबारा वाजले आहेत.<br>सव्वाबारा झाले आहेत.<br>बारा वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत. |
| क. |  | |
| ख. |  | |
| ग. |  | |
| घ. |  | |
| च. |  | |

४. खालील कवितेमध्ये यमक जुळेल अशा प्रकारे वेळ लिहा.

उदा॰ (दीड, पाऊण, अडीच, साडेसहा, पावणेदोन, एक)

घड्याळात वाजला पाऊण, दादा आला पोहून

त्याच्याशी बोलण्यात माझा वेळ गेला, मी नाही अभ्यास केला.

क. घड्याळात वाजला ................................................, आईने केला केक

केक खाण्यात माझा वेळ गेला, मी नाही अभ्यास केला.

ख. घड्याळात वाजला ................................................, ताईने केली चिडचिड

तिला मनवण्यात माझा वेळ गेला, मी नाही अभ्यास केला.

ग. घड्याळात वाजले ........................, मैत्रिणीचा आला फोन

फोनवर बोलण्यात माझा वेळ गेला, मी नाही अभ्यास केला.

घ. घड्याळात वाजले ........................, आजीची कामं बरीच

कामं करण्यात माझा वेळ गेला, मी नाही अभ्यास केला.

च. घड्याळात वाजले ........................, अभ्यास राहिला पहा

जाते मी आता अभ्यासाला, मिळवायचेत दहापैकी दहा.

## २ 'असणे' की 'होणे'?

**रिकाम्या जागा भरा.**

उदा॰ माझं नाव स्मिता आहे. मी एक गृहिणी आहे, पण त्याचबरोबर मी माझ्या मुलाला त्याच्या व्यवसायात मदतदेखील करते. त्यामुळे माझा दिवस तसा धावपळीचाच असतो.

१. सकाळची वेळ ही आमच्याकडे नेहमीच गडबडीची ........................, कारण यावेळी सगळ्यांचीच ऑफिस किंवा कॉलेजला जायची घाई ........................ .

२. सगळे वेळेवर उठणं, त्यांच्या आंघोळी आणि नाश्ता वेळेवर ........................, ही माझ्यासाठी एक तारेवरची कसरतच ........................ .

३. पण त्यांच्या डब्याच्या निमित्ताने एक गोष्ट चांगली ........................ . माझा स्वयंपाक सकाळी सकाळीच तयार ........................ .

४. त्यानंतर मात्र माझी पेपर वाचण्याची वेळ ........................ . ही वेळ मी कधीच चुकवत नाही. जगात इतक्या गोष्टी घडत ........................ . त्या चुकवून कशा चालतील?

५. दुपारच्या वेळेत घरबसल्याच मी माझ्या मुलाला लागेल ती मदत करते. त्यामुळे मला दुपारी बरीच बँकेची तसंच अकाउंट्सची कामं ........................ .




६. ती कामं होईपर्यंत माझी मुलगी घरी येण्याची वेळ ........................ . संध्याकाळी मायलेकींचा गप्पांचा तास ........................ .

७. तो झाल्यावर पुन्हा रात्रीच्या स्वयंपाकाची तयारी सुरू ........................ .

८. सगळ्यांची जेवणं आटपली की आम्ही एकत्र थोडा वेळ टीव्ही बघतो. आमच्या संपूर्ण कुटुंबानं एकत्र घालवण्याचा हाच काय तो वेळ! ते झालं की झोपायची वेळ ........................ . असा ........................ माझा रोजचा दिवस.

## ३ जोड्या जुळवा.

| असणे | होणे |
|---|---|
| १. घरातून निघताना जेवणाचा डबा नेहमीच गरम असतो. | क. एप्रिलपासून मात्र कामाचा ताण परत थोडा कमी होतो. |
| २. सकाळी नऊ - साडेनऊच्या सुमारास ट्रेनला नेहमीच गर्दी असते. | ख. मोठी झाल्यावर मात्र ती आगाऊ होतात. |
| ३. सगळीच लहान मुलं निरागस असतात. | ग. पण अकरा - साडेअकराच्या सुमारास मात्र ती कमी होते. |
| ४. मार्च महिन्यात बँकेतील कर्मचाऱ्यांना खूप काम असतं. | घ. ऑफिसला पोचल्यावर मात्र तो थंड होतो. |





## ४ वर्तमानकाळ

**१. वर्तमानकाळ वापरून वाक्ये बनवा.**

उदा॰



उदा० मला सर्दी होते.

क. मला ........

ख. माझी ........

ग. माझी ........

घ. मला ........

च. मला ........

छ. मला ........

ज. माझी ........

झ. मला ........

ट. नऊ वाजता माझी ........

ठ. माझा ........

ड. माझे ........

**२. वरील वाक्ये भूतकाळात लिहा.**

उदा० मला सर्दी झाली.

क. ........

ख. ........

ग. ........

घ. ........

च. ........

छ. ........

ज. ........

झ. ........

ट. ........

ठ. ........

ड. ........

**३. 'जेव्हा / तेव्हा' वापरून वाक्ये बनवा.**

उदा॰ जेव्हा शाळेची मधली सुट्टी होते, तेव्हा मैदानात मुलांची खूप गर्दी होते.

क. जेव्हा तिला अपचन होते, तेव्हा ........................................ .

ख. जेव्हा तिचा पगार होतो, तेव्हा ........................................ .

ग. जेव्हा त्याची फजिती होते, तेव्हा ........................................ .

घ. जेव्हा त्यांची पळापळ होते, तेव्हा ........................................ .

च. जेव्हा तिला कसं तरी होतं, तेव्हा ........................................ .

छ. जेव्हा तिची दमछाक होते, तेव्हा ........................................ .

**४. रिकाम्या जागा भरा.**

| क्रियापद | सामान्य वर्तमानकाळ | नकारात्मक रूप | सामान्य भूतकाळ | नकारात्मक रूप |
|---|---|---|---|---|
| असणे | .................... | नाही | होतो | नव्हतो |
| होणे | होतो | .................... नाही | .................... | झाला .................... |

**५ रिकाम्या जागी 'असणे' या क्रियापदाचे योग्य रूप लिहा.**

उदा॰ श्री॰ चव्हाण मागच्या वर्षी तुमचे शिक्षक होते का?

१. माझा प्रश्न बरोबर ........................................ का?

नाही, चुकीचा ........................................ .

२. कुठे ........................................ काल तू, अजय? आला का नाहीस?

आजारी ........................................ .

३. कालचे नाटक कसे ........................................?

मस्त ........................................ .

४. काल तुम्ही कुठे ........................................?

आम्ही काल औरंगाबादेत ........................................ .

## ६ 'असणे' आणि 'होणे' या क्रियापदांची योग्य रूपे रिकाम्या जागी भरा.

उदा. "गौतम, गप्प गप्प का (असणे) आहेस रे सकाळपासून?"

१. मुळात, इतका गडद काळा चष्मा लावणारी माणसं मला आवडतच (नसणे) ................................ .

२. समोरच्या माणसाचे डोळे दिसले नाहीत तर मी बेचैन (होणे) ................................ .

३. काल त्या कॅफेमध्ये बरीच टेबलं रिकामी (होणे) ................................ .

४. तेव्हा मी सात-आठ वर्षांचा (असणे) ................................ .

५. एकदा मी आजोबांना विचारलं, "तुम्ही माझ्यासारखे छोटे (असणे) ................................ ना? मग असे म्हातारे कशामुळे (होणे) ................................ ?"

६. मी असा (नसणे) ................................ पूर्वी.

७. दीड वर्षापूर्वी दिवाळीत आत्याकडे गेलो होतो तेव्हा असे रस्ते (नसणे) ................................ .

८. "असू द्या हो साहेब, दहा मिनिटांचं तर काम. या पोराच्यानं होणार (नसणे) ................................ "

९. खरं तर ती मुलगी अजूनसुद्धा माझ्याएवढीच सरळ आणि साधी (असणे) ................................ .

१०. तिचं वाचनदेखील पूर्वीसारखंच अफाट (असणे) ................................ .

## ७ काय आहे, काय होते!

**१. वाक्ये पूर्ण करा.**



ही वैराण जागा आहे,
तिथे पूर्वी एक मस्त बाग होती.





क. हा कोरडा खड्डा ................................ ,
तिथे पूर्वी एक निळंभोर तळं ................................ .





ख. तो धूर ओकणारा कारखाना ................................ ,
तिथे पूर्वी आमचं खेळाचं मैदान ................................ .





ग. कारखान्यामागे गाडीतळ .................................,
तिथेच आमची शाळा .................................





घ. जरा दूर त्या उंच इमारती .................................,
तिथे फक्त जंगल .................................





च. कारखान्याच्या मागे एक घाण प्रदूषित नाला
................................., ती एक झुळझुळ वाहणारी
छोटी नदी .................................





छ. हा गर्दीचा रस्ता ................................. नं,
ती एक लहानशी गल्ली .................................





ज. आणि ज्या इमारतीत आपण
उभे .................................,
तिथंच माझं छोटं घर .................................



**२. विकासाच्या नावाखालचे हे दुष्परिणाम नाही ना आवडले? पण हे असेच असते असे नाही. चला, विकासाची चांगली बाजू दाखवा.**

झोपड्या - चांगली घरे, जुन्या शाळा - आधुनिक शाळा, तंत्रज्ञानाचा अभाव - घराघरात आंतरजाल, नोकऱ्या शहरात - नोकऱ्या गावातही

उदा॰ पूर्वी झोपड्या होत्या. आज चांगली घरे आहेत.

क. .................................

ख. .................................

ग. .................................

घ. .................................

## ८ हे आहे, पण हे नाही.

**१. दिलेले शब्द वापरून वाक्ये लिहा.**

**हे आहे :** काम, घर, बायको आणि मुलं, पैसे, खूप वेळ, औषधे, चालण्याची काठी, सदिच्छा

**पण हे नाही :** आरोग्य, घनदाट केस, मैत्रीण, बिनधास्तपणा, चपळपणा, तारुण्य, दात, शक्ती



| |
|---|
| उदा॰ आज मी प्रौढ आहे, माझ्याकडे खूप काम आहे, पण माझ्याकडे आरोग्य नाही. |
| क. |
| ख. |
| ग. |
| घ. |
| च. |
| छ. |
| ज. |



२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे रिकाम्या जागा भरा.

| उदा॰ मी तरुण आहे / होतो. | | माझ्याकडे पैसे नाहीत / नव्हते. |
|---|---|---|
| क. मी रुबाबदार ........ | | १. माझ्याकडे स्वतःचे घर ........ |
| ख. मी निरोगी ........ | | २. माझ्याकडे गाडी ........ |
| ग. मी बिनधास्त ........ | पण | ३. मला बायको ........ |
| घ. माझ्याकडे खूप वेळ ........ | | ४. मला काही काम ........ |
| च. मला काम करण्याची इच्छा ........ | | ५. मी कामात व्यग्र ........ |



## ९ का बरं?

झालं - झालं नाही

उदा॰ जीवनने आईस्क्रीम खाल्ले आणि त्याला सर्दी झाली.

बबननेपण आईस्क्रीम खाल्ले, मग त्याला सर्दी का झाली नाही?

१. दीपकने खूप चांगली पुस्तके वाचली, आणि तो यशस्वी झाला.

लीनानेपण खूप चांगली पुस्तके वाचली, मग ती का ........?

२. सीमाने खूप सराव केला आणि तिचे हस्ताक्षर सुंदर झाले.

गीतानेपण खूप सराव केला, मग तिचे हस्ताक्षर का ........?

३. रोहनने खूप गणिते सोडविली आणि त्याचे गणित पक्के झाले.

सुलभानेपण ........, मग तिचे गणित का ........?

४. उर्जितने खूप बदाम खाल्ले आणि त्याची बुद्धी तल्लख झाली.

मोहितनेपण ........, मग त्याची बुद्धी का ........?

५. गौरवने खूप कष्ट केले आणि तो श्रीमंत झाला.

भार्गवनेपण ........, मग तो का ........?

६. सुमित्राने रोज व्यायाम केला आणि ती सडपातळ झाली.

बबितानेपण ........, मग ती का ........?

७. अमितने रोज दोरीवरच्या उड्या मारल्या आणि तो खूप उंच झाला.

राजेशनेपण ................, मग तो का ................?

८. मुग्धा रोज दूध-हळद प्यायली आणि ती निरोगी झाली.

स्मितापण ................, मग ती का ................?

९. आजीने खूप प्रयत्न केले आणि ती संगणकप्रवीण झाली.

आजोबांनी पण ................, मग ते संगणकप्रवीण का ................?

## १० भूतकाळी रूपे करा. (अकर्मक क्रियापदे)

| उदा॰ मी धावलो आणि तू (पु॰)? (धावणे) | तू धावलास. |
|---|---|
| ती ................ आणि आपण (द्वि॰पु॰)? (उठणे) | आपण ................ |
| तो ................ आणि आम्ही? (भेटणे) | आम्ही ................ |
| मी (स्त्री॰) ................ आणि तुम्ही? (पळणे) | तुम्ही ................ |
| मी (पु॰) ................ आणि तो? (चढणे) | तो ................ |
| मी (स्त्री॰) ................ आणि ती? (चालणे) | ती ................ |
| आम्ही ................ आणि ते (नपुं॰)? (थांबणे) | ते ................ |
| तुम्ही ................ आणि ते (पु॰)? (झोपणे) | ते ................ |
| तो ................ आणि त्या? (दमणे) | त्या ................ |
| तुम्ही ................ आणि ती (नपुं॰अ॰व॰)? (कंटाळणे) | ती ................ |

## ११ भूतकाळातले रूप घालून रिकाम्या जागा भरा.

उदा॰ अमित नागपूरला (जाणे) गेला. तो माझ्या मामाकडे दोन दिवस (राहणे) राहिला .

१. अदिती शर्यतीत जोरात (धावणे) ................ आणि ती पहिली (येणे) .................

२. मांजर झाडावर (चढणे) ................ आणि झाडावरच (झोपणे) .................

३. ते काल रात्री खूप (दमणे) ................ आणि दहा वाजताच (झोपणे) .................

४. आम्ही काल भरभर (चालणे) ................ आणि वेळेवर घरी (पोहोचणे) .................

५. त्या दोघी दुपारीच (येणे) ................ आणि भरपूर (जेवणे) .................

## १२ जोड्या जुळवा आणि वाक्ये पूर्ण करा.

| | |
|---|---|
| १. सौदी अरेबियामधील | क. जगप्रसिद्ध कोलोसिअम या अँफी थिएटरमध्ये सेल्फीवर बंदी आहे. |
| २. स्पेनमधील | ख. काही समुद्र किनाऱ्यांवर नो सेल्फी झोन आहेत. |
| ३. फ्रान्समधील | ग. मक्केमध्ये सेल्फी क्लिक करण्यावर बंदी आहे. |
| ४. कानच्या | घ. जगप्रसिद्ध बुल्स रनमध्ये सेल्फीवर बंदी आहे. |
| ५. ऑस्ट्रेलियन ओपन आणि विम्बल्डन | च. या टेनिस स्पर्धांमध्ये प्रेक्षक आणि खेळाडूंसाठी सेल्फी आणि सेल्फी स्टिकवर बंदी आहे. |
| ६. रोममधील | छ. रेड कार्पेटवर सेल्फी काढण्यावर बंदी आहे. |

क. ..............................

ख. ..............................

ग. ..............................

घ. ..............................

च. ..............................

छ. ..............................

## १३ वाक्ये तयार करा.

**सेल्फीमुळे...**

उदा॰ उदासीनता येणे - सेल्फीमुळे उदासीनता येते.

१. आत्मविश्वास कमी होणे - ..............................

२. मेंदूचे आजार होणे - ..............................

३. स्वत:बद्दल द्वेष निर्माण होणे - ..............................

४. स्वत:चीच भीती वाटणे - ..............................

५. समाजाने नाकारण्याची भीती वाटणे - ..............................



## १४ तुमचं काय मत आहे?

१. माझ्या मते ..........
२. माझं असं ठाम मत आहे की ..........
३. मला विचाराल तर ..........
४. मला ही गोष्ट पटते / (अजिबात) पटत नाही ..........
५. मला या उताऱ्यात एक गोष्ट खटकते की/ ती म्हणजे ..........
६. मला या उताऱ्यातली सगळ्यात जास्त आवडलेली गोष्ट ही की / म्हणजे ..........
७. हे बरोबर आहे, पण / हे जरी बरोबर असलं तरी ..........
८. हे मला पटत नसलं तरी हे मान्य करावंच लागेल की ..........

१. असं म्हणतात, की एका पाककलेच्या प्रसिद्ध कार्यक्रमामध्ये स्पर्धकांनी बनवायचे सर्व पदार्थ हे हॉटेल्समधून मागवले जातात. 'रिॲलिटी शोज'च्या या सत्याबद्दल तुम्हाला काय वाटतं?

२. आजकाल सोशल नेटवर्कवर एवढा वेळ आपण घालवतो, पण प्रत्यक्ष भेटून एकमेकांशी गप्पा मारणं मात्र आता कठीण होत चाललं आहे.

३. टीव्हीवर होतात त्या चर्चा आहेत की वाद?

४. हल्ली सारं काही इंटरनेटमुळे पटापट करता येतं. अगदी बँकेचे व्यवहारसुद्धा. पण त्यातूनच 'सायबर क्राईम'चं प्रमाण वाढलं आहे.

५. लहान लहान मुलांनाही आधुनिक उपकरणे अगदी छान वापरता येतात. पण त्यामुळे ती खेळणं विसरली आहेत.

## १५ रिकाम्या जागा भरा. (जसं / तसं)



उदा॰ मोमोज कसे दिसतात?
जसा मोदक तसे मोमोज.

१. मार्झीपॅन कसं असतं?
.......... बदामकतली .......... मार्झीपॅन.



२. क्रेप कसा असतो?
.......... डोसा .......... क्रेप.

३. सलवार कशी असते?
.......... पॅन्ट .......... सलवार असते.

४. अन्नू मलिकची काही गाणी कशीयेत?
.......... रिकी मार्टिनची .......... अन्नू मलिकची.

## १६ जाणे, असणे, होणे

**१. रिकाम्या जागी उदाहरणात दिल्याप्रमाणे योग्य रूप लिहा. जाणे, असणे आणि होणे यांपैकी एका क्रियापदाचा वापर करा.**

समीरची आई म्हणजे ऑलराउंडर. कोणाचे कधी काय असते ते तिच्या सर्व लक्षात असते. पाहू या आई काय काय म्हणत आहे.

उदा॰ "समीर, आलास घरी? चहा करते. बस. कसा गेला पेपर?"

क. "अरे, विशाल, तुझी काल मीटिंग होती ना? .................... तुझी मीटिंग?"

ख. "अहो आई, काल उशीर झाला नं तुम्हाला घरी यायला? .................... जोश्यांच्या साठीचा समारंभ?"

ग. ".................... आजचं जेवण? खास पंजाबी बेत केलाय."

घ. "अरे विशाल, काल तू ते 'ग्रेट-भेट' पाहत होतास ना टीव्हीवर? .................... मुलाखत लता मंगेशकरांची?"

च. ".................... तुम्हा जिवाभावाच्या मित्रांची भेट? काय काय केलं मग तुम्ही?"

छ. "समीर, ....................अभ्यास तुमचा काल रात्री? अभ्यासच केलात ना? की नुसते गेम्स ?"

ज. "अहो बाबा, .................... तुमची अमरावतीची ट्रीप? आणि ते कविसंमेलन ....................?

झ. "काय गं सीमा, .................... चहा? या वेळेला जरा वेगळी चहापावडर आणली आहे म्हणून विचारतेय."

ट. ".................... गाण्याचा प्रोग्राम? मला नाही जमलं गं यायला. मिस केला मी, हो ना?"

**२. रिकाम्या जागा भरा.**

(जरी / तरी, जसं / तसं, जे / ते, ज्याला / त्याला)

उदा॰ जरी माझी गाण्याच्या कार्यक्रमाला जायची इच्छा असली, तरी कामामुळे मला जाणे जमणार नाही.

क. .................... पूर्वी उगाच गप्पा मारण्यात वेळ जायचा, ....................च आजकाल फेसबुकवर वेळ वाया जातो.

ख. .................... आज यशस्वी व्हायचं आहे, .................... इंटरनेटचा प्रभावी वापर करता आलाच पाहिजे.

ग. तो .................... रिॲलिटी शो असला, .................... त्यात 'रिॲलिटी' फारच कमी बघायला मिळते.

घ. .................... लोक मनापासून पुस्तकं वाचतात, .................... आता किंडलसुद्धा आवडीनं वापरतात.

## १७ खालील वाक्यांना कोणती प्रतिक्रिया द्याल?

**१. अरे, मी काल सायकल चालवताना पडलो.**
- क. किती छान! मला पण आवडेल असं झालं तर.
- ख. अरेरे! असं कसं झालं?
- ग. पाय दुखतोय का?

**२. महेशचा मोबाईल हरवला.**
- क. शी! मला नाही आवडलं
- ख. विशेष वाईट नाही झालं, कधी झालं हे?
- ग. हो का? पुन्हा?

**३. अरे बघ, त्या आंब्यात अळी आहे.**
- क. ई, यक!
- ख. महाग आहे का?
- ग. मला चालेल.

**४. मीराने शाळेतील पोहण्याची शर्यत जिंकली.**
- क. छान, बरं वाटलं.
- ख. हो? त्यात काय विशेष!

**५. मी ऐकलं, की काल तुला अपघात झाला. कसा आहेस तू आता?**
- क. वैताग नुसता! असं कसं झालं?
- ख. ठीक आहे. काही दिवस कामावर नाही जाऊ शकणार.
- ग. बरं वाटलं ऐकून.

**६. माझ्या मैत्रिणीने मला अभिजित सावंतची नवी सीडी दिली.**
- क. काय कमाल आहे!
- ख. आं! असं कसं झालं?
- ग. वा! कशी आहे? छान ना? मी नाही ऐकली अजून.








## १८ काळ

**१. खालील तक्ता उदाहरणाप्रमाणे पूर्ण करा.**

| | वचन | | होणे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकवचन | अनेकवचन | झाला | झाली | झाले | झाले / झालं | झाल्या |
| उदा॰ तीन वर्षे | | ✓ | | ✓ | | | |
| क. अनेक रात्री | | | | | | | |
| ख. चार आठवडे | | | | | | | |
| ग. एक महिना | | | | | | | |
| घ. दहा दिवस | | | | | | | |
| च. शंभर वर्षं | | | | | | | |
| छ. संध्याकाळ | | | | | | | |
| ज. एक रात्र | | | | | | | |




**२. वाक्ये लिहा.**

उदा॰ तीन वर्षे झाली, मी टीव्ही बघत नाही.

क. ..........

ख. ..........

ग. ..........

घ. ..........

च. ..........

छ. ..........

ज. ..........

# आरोग्य

## २



## चला, शिकू या...

- ◎ अवयव सांगणे
- ◎ साधा भविष्यकाळ (बसेन / बसणार / बसणार नाही / करीन / खाईन)
- ◎ डॉक्टर - पेशंट संभाषण करणे
- ◎ काय झाले ते सांगणे आणि सल्ला देणे
- ◎ किरकोळ आजारांबद्दल बोलणे
- ◎ तब्येतीसाठी आणि स्वत:साठी काय करीन, हे सांगणे

## १ भविष्यकाळ वापरून रिकाम्या जागा भरा.

१. यंदा सरासरीइतका पाऊस पडेल असा वेधशाळेचा अंदाज आहे. तसे झाल्यास दोन वर्षांपासूनचा दुष्काळ (संपणे) ................ .

२. पुढील आठवड्यात शास्त्रज्ञांची पहिली तुकडी उत्तर ध्रुवाकडे जाण्यास (निघणे) ................ . या तुकडीत चार शास्त्रज्ञ, एक डॉक्टर आणि एक छायाचित्रकार आहे. हे सर्व जण उत्तर ध्रुवावर बावीस दिवस (घालवणे) ................ आणि तेथील पर्यावरणाचा अभ्यास (करणे) ................ .

३. उद्या मला टेकडीवर (नेणे) ................ ना, आजोबा?

४. परीक्षा जवळ आली आहे, आता तरी अभ्यास (करणे) ................ का?

५. संध्याकाळी मी सिनेमाला (जाणे) ................ आहे, तू (येणे) ................ का?"

६. उद्या सकाळी मी सहा वाजता (उठणे) ................, मोटारसायकल (काढणे), ................ मस्त भिजत भिजत लोणावळ्याला (जाणे) ................ आणि दिवसभर पावसात मनसोक्त (भटकणे) ................ .

## २ रिकाम्या जागा भरा.

१. विनीतने विराजला फोन केला.

उदा० विनीत विराजला फोन करणार आहे.



२. आईने नवीन पडदे शिवले.

आई नवीन पडदे ................ .



३. या वर्षी चांगले आंबे आले.

या वर्षी चांगले आंबे ................ .

४. सगळ्या मित्रांनी मिळून अभ्यास केला.

................ मिळून अभ्यास ................ .



५. आम्ही फिरायला गेलो.

आम्ही फिरायला ................ .

### ३ पुढील वाक्यांमध्ये कंसांत दिलेल्या क्रियापदांची भविष्यकाळातील रूपे वापरून वाक्ये पूर्ण करा.

१. मी आज सहा वाजता (येणे) .................... तुझ्याकडे, चालेल ना?

२. आता मी खिचडीच टाकतेय. (खाणे) .................... ना?

३. एवढं टेन्शन कशाला घेतोयस? नक्की पास (होणे) .................... .

४. मी पाचला भेटते तुला. मग आपण पार्कात (जाणे) .................... .

५. याची रेसिपी वर्षाकाकींकडे आहे. त्या बनवून (देणे) .................... .



### ४ प्रभाकरला पडलेले प्रश्न पूर्ण करा.

१. नवीन पासबुक करायला टाकले होते. क. उदा॰ नवीन पासबुक उद्या मिळेल ना?

२. सदरा शिवायला टाकला होता.

३. बँकेत चेक भरला होता.

४. काही पुस्तके मागवली होती.

५. चकल्यांची ऑर्डर दिली होती.

६. मुलांचा शाळेचा प्रकल्प पूर्ण करायचा होता.

७. बायकोचा फोन दुरुस्त करायला टाकला होता.

८. संध्याकाळचा स्वयंपाक करायचा होता.

### ५ उत्तरे निवडा.

**१. तन्वी तापाने फणफणली आहे, तर**

क. तिने आईस्क्रीम खावे.

ख. तिने औषधोपचार करून घ्यावेत.

ग. तिने भोकाड पसरून रडावे.

**२. तन्मयला खोकला झाला आहे, म्हणून**

क. त्याचे पोट दुखते आहे.

ख. त्याचे नाक गळते आहे.

ग. त्याचा घसा खवखवत आहे.

**३. विनिता दिवसेंदिवस लठ्ठ होते आहे.**

क. तिने रोज व्यायाम करावा.

ख. तिने गोड पदार्थ खात राहावे.

ग. तिने खाणे पूर्णपणे बंद करावे.

**५. अक्षयला अपचन झाले आहे, त्यामुळे**

क. त्याने पोळीभाजी खावी.

ख. त्याने लंघन करावे.

ग. त्याने खूप पाणी प्यावे.

**४. अरुणचा पाय मुरगळला आहे.**

क. त्याने पायाला मलम लावावे.

ख. त्याने दोरीच्या उड्या माराव्यात.

ग. त्याने हालचाल न करता बसून रहावे.

**६. समीक्षाला हृदयरोग झाला आहे, त्यामुळे**

क. तिचे डोके दुखत आहे.

ख. रक्तदाब खूप जास्त होत आहे.

ग. हृदयाचे ठोके पडत आहेत.



## ६ वाक्ये तयार करा.

**आरोग्याची काळजी घ्यायला तुम्ही काय कराल?**

दोरीच्या / मारेन / रोज / मी / उड्या

घालीन / सूर्यनमस्कार / मी

मी / सकाळी / हवेत / ताज्या / करीन / योगासने

शरीराला / मिळावीत / म्हणून / खाईन/ प्रथिने / मी / आणि / भाज्या / फळे

जाडी / नये / वाढू / म्हणून / मैदा, साखर / खाणार नाही / मी

## ७ योग्य क्रियापदांची भविष्यकाळी रूपे वापरून रिकाम्या जागा भरा.

**१. (होणे, करणे, हसणे, धावणे, पडणे, उडणे)**

क. राज : रूपाच्या आईसमोर काय फजिती झाली रे! वाचलो रे मी जस्ट!

नील : मला तर हसूच आवरत नाहीये. हा हा हा!

नील : जेव्हा तुझी अशी फजिती होईल ना, तेव्हा मीपण असाच .................. .

ख. मी कधी प्रेमात .................. आणि लग्न ..................?

ग. तो पक्षी आता मोठा झाला की आकाशात उंच .................. .

घ. आम्ही उद्या मुंबई मॅराथॉनमध्ये .................. .



२. **(करणे, लावणे, वाचणे, आणणे, काढणे, चालवणे)**

क. आपण उद्या खूप झाडे ............ आणि रविवारी ती टेरेसवर ............, चालेल?

ख. तू व्यवस्थित स्वयंपाक ............ नं? नाही, खूप पाहुणे येणारेत म्हणून म्हटलं.

ग. हुर्रे! त्याला मिळाला एकदाचा परवाना! तोच ............ आता गाडी. माझी सुटका!

घ. मी उद्यापासून रोज वर्तमानपत्र ............ .

च. बाबा, तुम्ही उद्या बँकेत जा आणि लागतील तेवढे पैसे ............. संकोच करू नका.

३. **(खाणे, पिणे, आवरणे, देणे, होणे, जाणे, येणे)**

क. ............ तुपाशी नाही तर उपाशी.

ख. मला तुम्हाला भेटायचं होतं. रविवारी संध्याकाळी घरी ............ सविस्तर बोलू.

ग. आई, बाबा, आपण या उन्हाळ्याच्या सुट्टीत केरळला ............ या का?

घ. गणपती एका आठवड्यावर आलेत. कधी ............ तू घर? खूप कामं करावी लागतील आता, रमेश.

च. डॉक्टरांच्या मते आपण रोज एका फळाचा रस प्यावा. तुम्ही ............ ना आजोबा, रोज?

छ. असेल माझा हरी तर ............ खाटल्यावरी.

ज. घोडामैदान जवळ आलंय आता. ............का आता अभ्यास?

## ८ खालील वाक्ये उदाहरणात दाखवल्याप्रमाणे बदलून लिहा.

उदा० सीमाने खोली सजवली.

सीमा खोली सजवणार आहे.

१. मी आज ऑफिसला दांडी मारली.

............................................................

२. निखिलने निमिषाला पुस्तके दिली.

............................................................

३. जोशीकाकांनी नवीन गाडी घेतली.

............................................................

४. शाळेतील मुलांनी वृक्षारोपण केले.

............................................................

५. समुद्राची पातळी वाढली.

.................................................................................

६. मुख्याध्यापकांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

.................................................................................

७. शेतकऱ्याने या वर्षी कापसाचे बी पेरले.

.................................................................................

८. कामगारांनी दरवर्षीप्रमाणे मोर्चा काढला.

.................................................................................

९. शेजारच्या छोट्या मुलीने खिडकीची काच फोडली.

.................................................................................

**९ ओळखा पाहू, मी कोण आहे? खाली दिलेले शब्दकोडे पाहा आणि त्या आधारे उदाहरणाप्रमाणे वाक्ये तयार करा..**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| न | प | ब | ल | स | का | पी | डॉ |
| क | रि | न | उ | द्यो | जि | का | क |
| आ | चा | री | लं | डॉ | क्ट | र | ला |
| व | रि | स | धो | बी | का | कुं | का |
| शिं | का | न्हा | क | व | चां | भा | र |
| पी | प | वी | पी | सो | ना | र | शिं |

उदा॰ मी डॉक्टर आहे. मी आजार बरा करतो.

मी डॉक्टर होईन. मी आजार बरा करीन.

१. मी .................... आहे. मी डॉक्टरला मदत करते.

.................................................................................

२. मी .................... आहे. मी सोन्याचे दागिने घडवतो.

.................................................................................

३. मी .................... आहे. मी लोकांचे कपडे धुतो.

.................................................................................

४. मी .................................... आहे. मी तुटलेल्या चपला शिवून देतो.

........................................................................................................................

५. मी .................................... आहे. मी कपडे शिवून देतो.

........................................................................................................................

६. मी .................................... आहे. मी मातीची मडकी तयार करतो.

........................................................................................................................

७. मी .................................... आहे. मी केस कापतो आणि दाढी करून देतो.

........................................................................................................................

८. मी .................................... आहे. मी उत्तम स्वयंपाक करून लोकांना खाऊ घालतो.

........................................................................................................................

९. मी .................................... आहे. माझ्या अंगी अनेक कला आहेत,

........................................................................................................................

१०. मी .................................... आहे. मी मालाची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करून विकते.

........................................................................................................................



# तोंडी परीक्षा - एकूण गुण ३०

## १. वाचन व आकलन (एकूण ९ गुण)

**१. पुढील उतारा वाचून दाखवा.** **(३)**

आरोग्यम् धनसंपदा

आरोग्य हीच खरी संपत्ती आहे' हे नेहमी ऐकायला मिळणारे आणि तितकेच खरे असलेले वाक्य आपण लहानपणापासून ऐकतो. आरोग्य ही आयुष्यातील सर्वात मोठी पुंजी असते. सोने, चांदी, पैसा ह्यासारखी संपत्ती म्हणजे श्रीमंती नव्हे! पैशाच्या मागे धावताना तब्येतीकडे दुर्लक्ष झाले आणि ती बिघडली, तर संपत्तीचा उपभोग घेता येणार आहे का? पैसे डॉक्टरकडे जातील आणि शारीरिक हानी होईल ती वेगळीच!

शरीर आणि मन ह्यांचे आरोग्य एकमेकांशी निगडित असते. पाठ, कंबर, डोकेदुखी ह्याकडे दुर्लक्ष केले तर नकळत चिडचिड वाढते, मन:स्वास्थ्य बिघडते आणि त्यामुळे शारीरिक स्वास्थ्यही बिघडते. म्हणून शरीर आणि मन ह्या दोन्ही बाजूंकडे लक्ष देणे महत्त्वाचे ठरते.

आपल्याकडे हल्ली सर्व कार्यालये, बँका वातानुकूलित असतात, पण बाहेरचे हवामान मात्र अगदी विरुद्ध असते. अशा विरोधी वातावरणांमध्ये वावरताना माणसाचे शरीर आणि मन ह्यांचे आरोग्य धोक्यात येते.

**२. खालील प्रश्नांची तोंडी उत्तरे द्या.** **(३)**

क. तब्येतीकडे दुर्लक्ष झाले, तर काय होते?

ख. शरीर आणि मन ह्यांचे स्वास्थ्य एकमेकांशी कसे निगडित आहे?

ग. वातानुकूलित हवेचा आरोग्यावर काय परिणाम होतो?

**३. तुम्ही तुमच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी काय करता ते तीन वाक्यांत सांगा.** **(३)**

## २. खालीलपैकी एका चित्राचे किमान दहा वाक्यांत वर्णन करा. (एकूण ५ गुण)

चित्रांचे वर्णन करण्यासाठी काही प्रश्नांची मदत : चित्रात काय दिसत आहे? चित्रात व्यक्ती असेल तर ती व्यक्ती काय करत आहे? चित्रामध्ये कोणता विषय मांडला आहे? त्या विषयासंबंधी तुमचे काय मत आहे?

१.



२.



३.



४.



३. संभाषण करा. (एकूण १० गुण)

(दोन-दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या कराव्यात. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान पाच वाक्ये बोलावीत.)

**खालीलपैकी एक चित्र निवडा आणि तुमच्या जोडीदाराबरोबर चित्रातील प्रसंगावर दोन मित्रांचे एक संभाषण तयार करा.**








१. पावसात भिजल्यामुळे तुम्हाला ताप आला आहे. तुमच्या मित्राचा सल्ला घ्या.

२. तुमच्या आजीला फेसबुकचं महत्त्व समजावून सांगा.

३. पाय घसरून पडल्यामुळे तुमच्या मित्राची पाठ दुखतेय. त्याला काही उपाय सुचवा.

४. उंच टाचांच्या चपला घातल्यामुळे तुमच्या बहिणीचे पाय दुखतायत. तिला सल्ला द्या.

५. इंटरनेटपेक्षा वृत्तपत्र बरं, असं तुमच्या मित्राला पटवून सांगा.

६. गार पाणी प्यायल्यामुळे तुम्हाला सर्दी खोकला झालाय. तुमच्या मित्राचा सल्ला घ्या.

७. तुमचा मित्र रोज बाहेर खातो म्हणून त्याचं पोट दुखतंय. त्याला उपाय सुचवा.



४. प्रत्येक प्रश्नाला एकेका वाक्याच्या तीन योग्य पण वेगवेगळ्या प्रतिक्रिया द्या. (एकूण ६ गुण)

१. तुमचा मित्र तुम्हाला उद्याच्या एका नाटकाच्या प्रयोगाला बोलावतोय. मात्र, तुमची परीक्षा चालू आहे. तुम्ही त्याला काय म्हणाल?

२. तुम्ही कधीच वेळ पाळत नसल्यामुळे तुमचा मित्र रागावला आहे. तुम्ही त्याला काय म्हणाल?

३. तुमचा मित्र फेसबुकवर सतत व्यग्र असतो, पण तुमच्यासाठी मात्र त्याच्याकडे वेळ नसतो. तुम्ही त्याला काय म्हणाल?

४. तुमचा मुलगा कधीच काही वाचत नाही, सतत व्हिडिओ गेम्स खेळत असतो. तुम्ही त्याला काय म्हणाल?

५. तुमच्या मैत्रिणीला मुळीच लग्न करायचं नाही. तुम्हाला ते अजिबात पटत नाही. तुम्ही तिला काय म्हणाल?

६. तुमच्या मुलाला सतत अरबटचरबट खायला आवडतं, पण तुम्हाला ते पटत नाही. तुम्ही त्याला काय सुचवाल?

# लेखी परीक्षा - एकूण गुण ७०

**१. खालील उतारा वाचा आणि त्यावरील स्वाध्याय सोडवा.** **(एकूण १० गुण)**

सप्टेंबर महिन्याचा पहिला आठवडा (एक ते सात सप्टेंबर) 'राष्ट्रीय आहार सप्ताह' म्हणून साजरा होतो. हा साजरा करण्याचा मूळ उद्देश आहाराबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे असा आहे. आहाराचा परिणाम शरीरावर होतो. चांगला, सकस व समतोल आहार घेतला, तर बरेचसे आजार टाळता येतात. त्यामुळे चांगला आहार हे चांगल्या आरोग्यामागचे गुपित आहे. सर्व लोक सुदृढ असतील, तर आरोग्यसंपन्न राष्ट्र निर्माण होते व त्यामुळे देशाची प्रगती होते. एकोणीसशे ब्याऐंशीपासून सप्टेंबरचा पहिला आठवडा महिला व बालविकास मंत्रालयाच्या आहार मंडळातर्फे आहार सप्ताह म्हणून साजरा केला जातो. या वर्षाची संकल्पना 'आहार जागृती - राष्ट्रीय आरोग्याची गुरुकिल्ली' अशी आहे. आहाराचे महत्त्व सर्वांना माहीत असते, पण त्याचबरोबर आहाराबद्दल फार गैरसमजही आहेत. त्यामुळे आहाराविषयी वैज्ञानिक माहिती साध्या सोप्या भाषेत मिळाली, तर सर्वांना काय खायचे, किती खायचे, हे प्रश्न पडणार नाहीत. असे झाल्यास दैनंदिन जीवनात चांगले अन्नपदार्थ निवडण्यास मदत होईल. समतोल आहार न घेतल्यामुळे कुपोषण आणि अतिपोषण असे दोन्ही विकार होऊ शकतात. आपल्या देशात लहान मुले व स्त्रियांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. अतिपोषण ही आपल्या देशात नवीन पण वाढती समस्या आहे. तेसुद्धा एक प्रकारचे कुपोषणच आहे, कारण अतिपोषण असलेल्या व्यक्तीच्या आहारात एक किंवा दोन अन्नघटकांवर जास्त भर असतो व इतर अन्नघटक, जीवनसत्त्वे, खनिज पदार्थ यांचा अभाव आढळून येतो. प्रथिने, बी बारा आणि डी ही जीवनसत्त्वे यांची कमतरता आहे असे आढळून येते. अतिपोषणामुळे स्थूलता, मधुमेह, हृदयरोग किंवा कर्करोग होण्याची शक्यता वाढते.

**१. चूक की बरोबर?** **(३)**

क. आहाराचा आजाराशी काही संबंध नाही. ☐

ख. कुपोषण आणि अतिपोषण या दोन्ही विकारांची कारणे वेगवेगळी आहेत. ☐

ग. कुपोषणाचे प्रमाण आपल्या देशात स्त्रियांमध्ये व मुलांमध्ये जास्त आहे. ☐

**२. खाली दिलेले आकडे वरील उताऱ्यात कोणती माहिती देतात?** **(३)**

क. १२ : ................................................................

ख. १९८२ : ................................................................

ग. १ ते ७ : ................................................................

**३. खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन वाक्यांत उत्तरे लिहा.** **(४)**

क. आहाराविषयी साध्यासोप्या भाषेत वैज्ञानिक माहिती मिळाली तर कोणते फायदे होतात?

ख. अतिपोषणामुळे होणाऱ्या कुपोषणाची कारणे कोणती?

२. व्याकरण (एकूण १५ गुण)

१. **कंसात दिलेले शब्द योग्य जागी भरा.** (५)

(तेव्हा, तरी, जेव्हा, तसं, कधीपर्यंत, जेव्हा, जरी, जसं, तेव्हा, कधी)

क. .................... आम्ही 'जीवन आणि आहार' या विषयावर कार्यशाळा घ्यायचे ठरवले, .................... या विषयातील एकाही तज्ज्ञाचे नाव आम्हाला माहीत नव्हते.

ख. .................... कार्यशाळा डिसेंबरमध्ये घेण्याचे ठरले होते, .................... ऑक्टोबरपर्यंत कोणीही यासाठी काहीच काम केले नाही.

ग. मग सगळे जागे झाले आणि .................... जमेल .................... काम करू लागले. धावपळ सगळ्यांची होत होती, पण कामाला योग्य दिशा काही मिळत नव्हती.

घ. .................... आम्हाला एका चांगल्या तज्ज्ञाकडून ही कार्यशाळा घेण्यासाठी होकार मिळाला, .................... आम्ही सर्वांनीच सुटकेचा निःश्वास टाकला.

च. आता ही कार्यशाळा प्रत्यक्षात .................... सुरू होईल आणि .................... चालेल, ते कार्यशाळेला मिळणाऱ्या प्रतिसादावर ठरेल.



२. **खालील उताऱ्यात साधा भूतकाळ वापरून रिकाम्या जागा भरा.** (१०)

सह्याद्री वाहिनीवरील ९.३०च्या बातम्यांमधील एक मुलाखत

आज आपण एका आगळ्यावेगळ्या उपवासासंबंधी चर्चा करण्यासाठी नेहाला बोलावलं आहे. नेहाकडून आपण तिच्या ई-उपवासासंबंधी जाणून घेऊ या.

पत्रकार : तर नेहा, हा ई-उपवास काय प्रकार आहे? आणि ही कल्पना तुला कशी सुचली?

नेहा : माझी आई दरवर्षी आषाढी एकादशीच्या वारीला जाते. ती नेहमी मला सांगते, की माझ्याबरोबर वारीला चल आणि उपवास कर. एके दिवशी आमच्या गप्पा चालू असताना माझा मामा मला (म्हणणे) .................... की, आजकालची मुलं उपवास करत नाहीत, कारण त्यांना उपवास करणं जमत नाही व त्याचं महत्त्वही समजत नाही. मी विचार केला, की त्याला उपवास करून दाखवायचा.

पत्रकार : पण या ई-उपवासात तू नक्की काय (करणे) ....................?

नेहा : त्या दिवशी शनिवार असल्यामुळे मी घरीच (असणे) ..................... कोणत्याही परिस्थितीत मोबाईल किंवा कॉम्प्युटर वापरायचा नाही, त्याकडे बघायचंसुद्धा नाही, असं मी ठरवलं. त्यामुळे आता काय करावं ते सुचायला जरा वेळ लागला. अचानक मला (सुचणे)...................., मी माझ्या जुन्या सायकलवरून माझ्या नितीन नावाच्या मित्राबरोबर आमच्या शाळेत (जाणे)..................... आम्ही सगळ्या शिक्षकांना (भेटणे).....................

पत्रकार : मग संध्याकाळपर्यंत तुझा संयम संपला असेल ना? मित्राच्या मोबाईलवर तर नक्कीच बघितलं असशील ना?

नेहा : नाही. तो पूर्ण दिवस मी माझ्या नातेवाइकांना आणि मित्र-मैत्रिणींना प्रत्यक्ष भेटले. वेळ कसा गेला ते कळलंच नाही. आणि गंमत म्हणजे मी सगळ्यांचे फोन नंबरही आठवून आठवून लँडलाईनवरूनच फोन (लावणे) ................................ . हल्ली मोबाईलमुळे फोन नंबर लक्षात ठेवावे लागत नाहीत. शाळेत पाठांतराची सवय होती त्याचा उपयोग झाला. असा होता माझा ई-उपवास.

पत्रकार : नेहा, खूपच छान कल्पना आहे.

नेहा : धन्यवाद! शेवटी उपवास म्हणजे त्याग, मनावर नियंत्रण. आज खाण्यापिण्यापेक्षा या प्रसारमाध्यमांच्या अतिरिक्त वापरावर नियंत्रण मिळवणं खूप गरजेचं आहे. माझ्या या उपक्रमात आणखी लोकांना सामील करून घेण्याचा प्रयत्न मी सध्या करतेय. माझ्या मित्रमंडळींनी जेव्हा मला (विचारणे) ................................ , की आज तुला एवढा वेळ कसा मिळाला, तेव्हा मी त्यांना ई-उपवास करण्याचा सल्ला (देणे) ................................ . माझ्या उपक्रमाबद्दल ऐकून ते आश्चर्यचकित (होणे) ................................ .

पत्रकार : नेहा, तुझ्या आईवडिलांना तर नक्कीच आनंद झाला असेल. आमच्या कार्यक्रमात येऊन तू आम्हाला तुझ्या या उपक्रमाबद्दल सांगितलंस त्यासाठी तुझे मनापासून आभार आणि तुझ्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

## ३. शब्दसंपदा (एकूण २५ गुण)

**१. कंसात दिलेला योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.** **(५)**

क. (किरकोळ / गंभीर)

# मीना आजारी आहे ना? ती किती दिवस येणार नाही शाळेत?

* अगं, ती उद्याच येईल. तिचा आजार अगदी ................................ आहे.

ख. (निकस / सकस)

अनुजा बघ कशी छान दिसते? ती रोज ................................ आहार घेते.

ग. (रटाळ / रंजक)

बाईंनी आम्हाला आज वर्गात खूप ................................ गोष्ट सांगितली. खूप मजा आली.

घ. (जुनाट / आधुनिक)

माझी आजी मला कोणतीही फॅशन करायला परवानगी देते. अगदी ................................ विचार आहेत तिचे.

च. (चामट / कुरकुरीत)

माझ्या आईने केलेल्या चकल्या अगदी मस्त ................................ असतात. सर्वांनाच आवडतात.

२. **उदाहरणात दाखवल्याप्रमाणे तीच वेळ मोकळ्या जागेत अक्षरात लिहा.** **(५)**

**सीमा :** हॅलो, मीनू!

**मीनू :** हॅलो, सीमा! मी येतेय आत्ता तुझ्याकडे.

**सीमा :** किती वाजता?

**मीनू :** ४.४५ मिनिटांनी (उदा॰ चार वाजून पंचेचाळीस मिनिटांनी / पावणे पाचला)

**सीमा :** आत्ता किती वाजलेत?

**मीनू :** आत्ता ४.१५ वाजलेत. (.................................................... )

**सीमा :** म्हणजे तू तीस मिनिटांत येतेयस? (.................................................... तासात)

**मीनू :** हो.

**सीमा :** तू किती वेळ थांबणार आहेस?

**मीनू :** मी एक तास थांबेन. (.................................................... )

**सीमा :** म्हणजे ५.४५पर्यंत (.................................................... ) ना? ये मग लवकर. मला ६ वाजता डॉक्टरकडे जायचंय.

**मीनू :** बरं, येतेच मी.

३. **खालील चित्रे पाहा आणि चित्रांमध्ये दाखवलेल्या कोणत्याही पाच अवयवांचे नाव उदाहरणात दाखवल्याप्रमाणे लिहा.**

(उदा॰ तो खांदा, ते खांदे...) **(१०)**

| | |
|---|---|
|  | |
|  | |
|  | |
|  | |
|  | |
|  | |

४. **तुम्ही हॉस्टेलमध्ये राहता, तिथे चांगले जेवण मिळत नाही. तुम्हाला स्वतःसाठी सहज करता येतील अशा सोप्या आणि पौष्टिक पाककृती विचारण्यासाठी आईला पत्र लिहा.**

**(८ ते १० ओळी लिहा)** **(५)**

(आईची चौकशी – स्वतःची खुशाली – हॉस्टेलमधील जेवण – तब्येतीच्या तक्रारी – सोप्या आणि पौष्टिक पाककृती)

## ४. चित्रफीत (एकूण १० गुण)

**चित्रफीत पाहा आणि त्यावरचे स्वाध्याय सोडवा.**

१. **चित्रफितीचा पहिला भाग (१.३९ मिनिटे ) पाहा आणि खालील दोन प्रश्नांची उत्तरे द्या.** **(४)**

क. आईने फेसबुकवर लाइव्ह जाण्याची तयारी कशी केली आहे?

ख. फेसबुकवर लाइव्ह जाण्याची आई-बाबांची ही कितवी वेळ आहे?

ग. काही गडबड झाली तर मदत म्हणून आईने कोणती वस्तू जवळ ठेवली आहे?

२. **चित्रफितीचा दुसरा भाग (१.४०-६.२६ मिनिटे) पाहा आणि चूक की बरोबर ते लिहा.** **(३)**

| वाक्य | चूक | बरोबर |
|---|---|---|
| क. फेसबुकवर लाइव्ह असताना जसे आपण लोकांना दिसतो तसेच लोकही आपल्याला दिसतात. | | |
| ख. इथे लाइक्स म्हणजे फेसबुकवरचा आपला लाइव्ह व्हिडिओ लोकांना आवडतोय. | | |
| ग. बाबांचा मित्र 'फेसबुकवर आल्याचा' आईला आनंद झाला आहे. | | |

३. **या चित्रफितीमध्ये आई अगदीच भोळसट आणि बाबा फार हुशार दाखवले आहेत. खऱ्या आयुष्यात देखील स्त्री आणि पुरुष यांच्यात असा फरक असतो असे तुम्हाला वाटते का? तुमचे मत ३-४ वाक्यांत व्यक्त करा.** **(३)**

## ५. श्रुतलेखन (एकूण १० गुण)

प्रत्येक नव्या तंत्रज्ञानाला आपलंसं करण्याची धडपड आता करावीच लागते. संवाद साधण्याच्या साधनांचा तर अतिरेकच! आधी साधे टेलिफोन आले, मग पेजर, नंतर त्यांची जागा झपाट्याने मोबाईलने घेतली. त्यांच्याही दर महिन्याला नवनव्या आवृत्या निघाल्या आणि अजूनही निघत आहेत. सगळंच मोबाईलवर उपलब्ध झालं. इतकं, की सीडी वाजवणंही आता जुनं झालं. कुठूनही काहीही डाऊनलोड करता येतं. पूर्वी आमच्याकडे एका खांबाला लटकवलेल्या पाटीवर एकमेकांसाठी निरोप, आठवण करण्यासाठीचे संदेश लिहून ठेवायची पद्धत होती. कॉम्प्युटर आल्यामुळे या बाळबोध गोष्टी विस्मृतीत जाऊ लागल्या आहेत. त्यातही भराभरा लॅपटॉप, टॅब, किंडल अशा अगणित आवृत्या! तुमच्याकडे असलेली आवृत्ती कशी जुनाट आहे आणि नव्या वस्तूची तुम्हाला नुसती गरजच नाही, तर अत्यावश्यकता आहे याची जाणीव सतत करून देणाऱ्या यंत्रणा जोरात काम करत असतात.

# आवडनिवड

## ३



## चला, शिकू या...

- आवडीनिवडी सांगणे
- विकारी / अविकारी विशेषण
- क्रियापद + ला
- वस्तूंचे / व्यक्तींचे वर्णन करणे, अभिप्राय देणे
- प्रश्नशब्द : कसाय, कशीय, कसंय...
- आम्ही दोघे, आम्ही दोघी, आम्ही दोघं
- छंद, खरेदी, दागदागिने

## १ खालील चित्रे पाहून छंद ओळखा. उदाहरणाप्रमाणे वाक्ये लिहा.


उंच टाचांच्या चपला


सीडी


शब्दकोश


फुलझाडे


क्रिकेटची बॅट


नाचातला जोडीदार


बागकामाची अवजारे


हेल्मेट

| | छंद | छंदासाठी लागणाऱ्या गोष्टी |
|---|---|---|
| | उदा॰ क्रिकेट खेळणे | मला क्रिकेटची बॅट आणि हेल्मेट लागेल. |
| १. | .................... | .................................................... |
| २. | .................... | .................................................... |
| ३. | .................... | .................................................... |







## २ वाक्ये लिहा.

१. मुलगा – गोरा : उदा॰ हा मुलगा गोरा आहे.
२. पुस्तक – जाड : ....................................................
३. खुर्ची – मोठी : ....................................................
४. टॉप – काळा : ....................................................
५. बांगडी – हिरवी : ....................................................
६. झाड – जुने : ....................................................



## ३ वाक्ये लिहा.

पान / पाने : हिरवा — उदा. हे पान हिरवे आहे. ही पाने हिरवी आहेत.

१. खिडकी / खिडक्या : छोटा ..................

२. रुमाल / रुमाल : पांढरा ..................

३. गाव / गावे : चांगला ..................

४. भाषा / भाषा : सोपा ..................

५. वारा / वारे : बोचरा ..................

## ४ अविकारी विशेषणे

**१. जोड्या जुळवा.**

| | |
|---|---|
| क. दमदार | १. मित्र |
| ख. अद्ययावत | २. पाणीपुरी |
| ग. अवाढव्य | ३. इंजिन |
| घ. रहस्यमय | ४. स्मार्टफोन |
| च. हुशार | ५. वृत्ती |
| छ. उंच | ६. ठिकाण |
| ज. तिखट | ७. नागरिक |
| झ. धाडसी | ८. इमारत |
| ट. शांत | ९. चित्रपट |
| ठ. जागरूक | १०. मॉल |









**२. वरील जोड्यांचा उपयोग करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

उदा॰ तुम्हाला कशा बाईकवरून फिरायला आवडते?

मला दमदार इंजिनाच्या बाईकवरून फिरायला आवडते.

क. तुम्हाला कोणत्या मोबाईलवरून चॅट करायला आवडते?

........................................



ख. तुम्हाला कोणत्या मॉलमध्ये फिरायला आवडते?

........................................

ग. तुम्हाला कोणते चित्रपट बघायला आवडतात?

........................................

घ. तुम्हाला कोणत्या मित्रांसोबत गप्पा मारायला आवडते?

........................................

च. तुम्हाला कॉम्प्युटरवर कधी खेळ खेळायला आवडते?

........................................



छ. तुम्हाला कशी पाणीपुरी खायला आवडते?

........................................

ज. तुम्हाला कुठे निवांत पडायला आवडतं?

........................................



झ. साहसी खेळ खेळायला काय लागते?

........................................

ट. पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी माणसाने कसे असावे?

........................................

## ५ नामांची वचने बदलून वाक्ये पुन्हा लिहा.

उदा॰ हा रुमाल पांढरा आहे. हे रुमाल पांढरे आहेत.

१. हे पुस्तक नवे आहे. ........................................

२. ही जीन्स काळी आहे. ........................................

३. हा मोबाईल मोठा आहे. ........................................

४. हे गाणे चांगले आहे. ........................................

५. हे फूल छोटे आहे. ........................................

## ६ रंगुनी रंगात साऱ्या...

| | | | |
|---|---|---|---|
| उदा॰ क) जांभळी<br>ख) जांभळा<br>ग) जांभळे | १. क) जांभळ्या<br>ख) जांभळा<br>ग) जांभळी | २. क) काळी<br>ख) काळे<br>ग) काळ्या | ३. क) निळे<br>ख) निळा<br>ग) निळ्या |
| ४. क) पिवळे<br>ख) पिवळी<br>ग) पिवळा | ५. क) पांढरी<br>ख) पांढरा<br>ग) पांढरे | ६. क) हिरवे<br>ख) हिरव्या<br>ग) हिरवी | ७. क) घारा<br>ख) घाऱ्या<br>ग) घारे |
| ८. क) जांभळी<br>ख) जांभळा<br>ग) जांभळे | ९. क) जांभळ्या<br>ख) जांभळे<br>ग) जांभळी | १०. क) निळे<br>ख) निळा<br>ग) निळ्या | ११. क) काळे<br>ख) काळी<br>ग) काळा |
| १२. क) भुऱ्या<br>ख) भुरी<br>ग) भुरे | १३. क) पिवळे<br>ख) पिवळी<br>ग) पिवळा | १४. क) हिरवा<br>ख) हिरवी<br>ग) हिरवे | १५. क) जांभळी<br>ख) जांभळे<br>ग) जांभळा |

**विशेषणांचे योग्य रूप निवडून पुढील उताऱ्यातील रिकाम्या जागा भरा.**

"जान्हवी जांभळी आहे ना?" छोट्या राजूने विचारले. मी जान्हवीकडे पाहिले, परत परत पाहिले, पण मला काही कुठेच (१) ........................ रंग दिसला नाही. "मला नाही कुठे जांभळा रंग दिसत. चपला (२) ........................ आहेत, कपडे (३) ........................ आहेत, हातातील छत्री (४) ........................ आहे. ओठ लाल आहेत, गाल गुलाबी आहेत. कानातील डूल (५) ........................ आणि बांगड्या (६) ........................ आहेत. डोळे

(७) ........................ आहेत. पण (८) ........................ रंग काही दिसत नाही." सहा वर्षांचा छोटा राजू परत म्हणाला, "जान्हवी जांभळीच आहे". मी परत नीट पाहिले, काहीच

(९) ........................ नव्हते. "बरं, मग मला सांग, चंदन कोणत्या रंगाचा आहे?" "चंदनमामा ना, तो लाल आहे. अगदी लाल लाल लाल, पण तो ना, कधी कधी (१०) ........................ पण दिसतो. आज तो लालच दिसतोय." मी चंदनकडे, माझ्या मित्राकडे निरखून पाहिलं. डोळे (११) ........................, केस (१२) ........................, टी-शर्ट (१३) ........................, पॅन्ट (१४) ........................ . लाल काहीच नाही. मला जे रंग दिसत नाहीत ते माझ्या छोट्या मुलाला, राजूला दिसतात. जान्हवी (१५) ........................, चंदन लाल!

आता मला कळलंय. मोठ्यांना जे दिसत नाही, ते बऱ्याचदा लहान मुलांना दिसते. उदाहरणार्थ माणसांभोवतीची आभा. मुले अनेक गोष्टी मोठ्या माणसांपेक्षा वेगळ्या पाहतात.

## ७ वाचा आणि स्वाध्याय सोडवा.

मी माझ्या बाबाचा मुलगा कसा काय झालो असेन, असा प्रश्न मला नेहमी पडायचा. आमच्यात काहीच साम्य नाही. आम्ही दिसतो वेगळे, आमचा स्वभाव वेगळा, आमच्या आवडी वेगळ्या. माझा चेहरा आईसारखा गोल आहे. नाक आजीसारखे - म्हणजे बाबाच्या आईसारखे आहे. आजी साफ नकटीच आहे, त्या मानाने माझे जरा बरे आहे. बाबाचे नाक चांगले लांब आणि टोकदार आहे. माझेही तसे व्हावे, म्हणून रोज मी ते चिमटीत पकडून ओढतो, पण काही उपयोग होत नाही. माझा रंग आजोबांसारखा सावळा आहे, तर बाबा गोरापान आहे. अगदी लहान बाळ होतो तेव्हा माझे केस बाबासारखेच कुरळे होते. पण हळूहळू तेही सरळ झाले. बाबा बऱ्यापैकी, म्हणजे आमच्या घरात तरी, सगळ्यांत उंच आहे. मी खूप लहान आहे. मोठा होईन तेव्हा, बाबापेक्षा जास्त नको एक वेळ, पण निदान त्याच्याएवढा तरी उंच होईन अशी आशा आहे. सध्या तरी शाळेत मुले रांगेत उभी केली, की रांगेत पहिला मीच असतो. सगळ्यांत बुटका.

बाबाला अजिबात हसता येत नाही. त्याचा चेहरा गंभीर, बोलणे गंभीर, कपडे गंभीर, त्याच्या मिश्यादेखील गंभीर. त्याला विनोद, विनोदी माणसे, विनोदी नाटक-चित्रपट असे काहीच आवडत नाही. "विनोद समजला तर आवडेल ना!", आई पुटपुटते. मी मात्र बोटभर विनोदाला हातभर हसतो. शिवाय, बाबा हुशार आहे, आणि मी म्हणजे... जाऊ दे ना!

त्यामुळेच सगळे म्हणतात, "तू कुठल्याही बाजूनं तुझ्या बाबासारखा दिसत नाहीस. असं कसं रे? दवाखान्यात अदलाबदल झाली नव्हती ना?"

**स्वाध्याय**

१. उताऱ्याला शीर्षक द्या. ..............................

२. विकारी आणि अविकारी विशेषणे शोधून लिहा.

**विकारी विशेषणे :** ..............................

..............................

..............................

**अविकारी विशेषणे :** ..............................

..............................

..............................

३. विरुद्धार्थी विशेषणे शोधून रकान्यांत लिहा.

| विरुद्धार्थी विशेषणे | | विरुद्धार्थी विशेषणे | |
|---|---|---|---|
| उदा॰ नकटे (नाक) | लांब (नाक) | | |
| | | | |
| | | | |

४. निवेदक मुलगी आहे अशी कल्पना करून उतारा परत लिहा.



## ८ वाक्ये तयार करा.

उदा॰ इमारत : (पिवळा / नवा – नवा / पिवळा) :

ती पिवळी इमारत नवी आहे. ती नवी इमारत पिवळी आहे.

१. आरसा : (जुना / फुटका – फुटका / जुना)

.......................................................................................................

२. वाहन : (काळा / मोठा – मोठा / काळा)

.......................................................................................................

३. केळी : (कच्चा / हिरवा – हिरवा / कच्चा)

.......................................................................................................

## ९ चित्रांच्या आधारे योग्य विशेषणांचा वापर करून खालील वाक्ये पूर्ण करा.

उदा॰ तो कुडता / कुर्ता १. ते घड्याळ २. ती पर्स (×२) ३. तो पट्टा (×२)

४. त्या चपला ५. ती जीन्स (×२) ७. तो चष्मा ८. ती सलवार ९. ते पेन

सानिकाकडे,  १.  आणि २.  आहे. तिचा ३.  हरवला आहे, तर ४.  तुटल्या आहेत. तिची ५.  फाटली आहे. आज ती ६.  , ७.  आणि ८.  आणायला बाजारात जाणार आहे. येताना ती तिच्या मैत्रिणीसाठी ९.  , १०.  व ११.  सुद्धा आणणार आहे.

सानिकाकडे पिवळा कुडता,

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

**१० तुमच्या मित्राचे / मैत्रिणीचे नाव वर्तुळात लिहा आणि त्याच्याशी / तिच्याशी संबंधित पाच विशेषणे लिहा.**



**११ खालील संभाषण वाचा. त्याप्रमाणे कंसातील शब्दांचा वापर करून आणखी संभाषण लिहा.**

(घड्याळ, गाडी, टॉप्स, पुस्तकं, आय-पॉड)

(महागडा-परवडणारा, लांब-आखूड, कंटाळवाणा-मनोरंजक, जड-हलका)

मी : माझ्या आईचा आज वाढदिवस आहे. मला तिला भेटवस्तू द्यायची आहे. काही सुचव ना!

मित्र : भेटवस्तू... हा ड्रेस कसा वाटतो?

मी : असा ड्रेस? किती ढगळ आहे तो! अजिबात नाही.

मित्र : बरं, मग तो ड्रेस कसा वाटतो?

मी : हं, तो झकास आहे. तो घेते.



## १२ कशी जुळावी जोडी?

हॅलो...

नमस्कार. मी सारंग नाईक. तुमचा संपर्क क्रमांक मला मित्राकडून मिळाला.

मी एम॰बी॰ए॰ केलं आहे. माझा इव्हेंट मॅनेजमेन्टचा स्वतंत्र व्यवसाय आहे. इव्हेंट असेल तेव्हा भरपूर काम, नाही तर सगळा वेळ माझा, अशा पद्धतीचा माझा जीवनक्रम असतो. कामाबरोबरच मोकळा वेळही मला मिळत असल्याने मला अनेक छंद आहेत. मला ट्रेकिंगची आवड आहे. मी पर्यावरणासाठी काम करत असतो आणि शास्त्रीय संगीतामध्ये मला रस आहे. खूप मैफिली मी ऐकतो. सध्या गिटार वाजवायला शिकत आहे.

मला बायको म्हणून उत्साही मुलगी आवडेल. तिचं कुठल्याही विषयातलं पदव्युत्तर शिक्षण झालेलं असावं. तिचं करियर आणि छंद तिने जरूर जोपासावेत. माझ्या छंदामध्ये तिला रस असलाच पाहिजे अशी अट नाही, पण तशी इच्छा मात्र आहे. माणसांशी संवाद साधण्याची आवड असावी.

आता तुमच्याविषयी जाणून घ्यायला मला आवडेल.

**प्रतिसाद लिहा.**

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

................................................................................

**१३ फावला वेळ. खालील चित्रे आणि आवडी यांच्या जोड्या लावून वाक्ये तयार करा. तसेच खाली दिलेले पर्याय वापरा.**

|  |  |
| --- | --- |
| मजा येणे | अजिबात आवडत नसणे |
| छान वाटणे | कंटाळा येणे |
| गंमत वाटणे | भीती वाटणे |
| आनंद वाटणे | नकोसे वाटणे |

(सायकल चालवणे – हास्ययोग करणे – रेडिओ ऐकणे – गाणी गाणे - फेरफटका मारणे – दोरीच्या उड्या मारणे – ताय ची करणे – कॉम्प्युटरवर खेळणे – वर्तमानपत्र वाचणे – बासरी वाजवणे)

उदा॰



१) 

२) 

३) 

४) 

५) 

६) 

७) 

८) 

९) 

उदा॰ मला सायकल चालवायला आवडते.

१. ..........................................................

२. ..........................................................

३. ..........................................................

४. ..........................................................

५. ..........................................................

६. ..........................................................

७. ..........................................................

८. ..........................................................

९. ..........................................................

## १४ रिकाम्या जागा भरा.

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पु॰ | असा मित्र | असे ............ |
| स्त्री॰ | अशी ............ | अशा मैत्रिणी |
| नपुं॰ | असे / असं मित्रमंडळ | अशी ............ / ............ |
| पु॰ | कसा ............ | कसे बंगले |
| स्त्री॰ | कशी इमारत | कशा ............ |
| नपुं॰ | कसे / कसं ............ | कशी घरे / घरं |
| पु॰ | जसा मुलगा | जसे ............ |
| स्त्री॰ | जशी ............ | जशा मुली |
| नपुं॰ | जसे / जसं मूल | जशी ............ / ............ |
| पु॰ | तसा लेख | तसे ............ |
| स्त्री॰ | तशी कादंबरी | तशा ............ |
| नपुं॰ | तसे / तसं ............ | तशी पुस्तके / पुस्तकं |

## १५ खालील संभाषण वाचा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**स्मिता :** सुजित, शनिवारपासून शूट आहे, आणि मला अजून तीन नट पाहिजेत. शोधून दे. पात्रांचं वर्णन ऐक.

**सुजित :** बोल.

**स्मिता :** वैशाली, एक चाळिशीची, पण तिशीची वाटणारी सावळी बाई. काळी असल्यास जास्त चांगलं. टपोरे डोळे, धीट, चलाख...

**सुजित :** अनिता घोरपडे चालेल?

**स्मिता :** सुजित, तिला दुसरा नातू झाला परवा. शिवाय ती गोरीपान आहे आणि गरगरीत गोल झालीये. तुला फोटोत दिसत नाहीये का?

**सुजित :** माझ्याकडचा फोटो खूप जुना आहे. बरं, मी शोधतो दुसरी.

**स्मिता :** एक आजोबा. वय पासष्टीच्या आसपास, पण जन्माला आले तेव्हापासूनच म्हातारे असावेत असे दिसतात. रंगानं उजळ, डोळे मिचमिचे, शरीर स्थूल. स्वभाव बुजरा, निरुत्साही आणि बुद्धी मंद. मला या वयाचा चांगला अभिनेता दे, मी बाकीचं बघून घेईन.

**सुजित :** एक नट आहे. फोटो पाठवून देतो. पुढे?

**स्मिता :** फिरोझ. तरुण, वय विशीच्या आत. उंच, सडसडीत अंगकाठी आणि खास पारशी गोरा रंग. तल्लख आणि उत्साही. मुली त्याच्यावर लट्टू झाल्या पाहिजेत.

**सुजित :** तौफिक, आपल्या जफरचा धाकटा भाऊ.

**स्मिता :** उत्तम!

**वरील संभाषणात तीन काल्पनिक पात्रांचा उल्लेख झाला आहे. त्यांचे वर्णन करा.**

१. ................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................



२. ................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................



३. ................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

................................................................................................



**१६** काही मित्रांनी सिनेमा बघायला जायचे ठरवले आहे. त्यांच्यातील संभाषण वाचा.

**सुशांत :** अरे सुमित, परवा नटसम्राट बघायला जाऊ या का?

**सुमित :** हो, जाऊ या ना. कोण कोण येणार आहे?

**सुशांत :** तू आणि मी, दोघं तर नक्की आहोत. केतनपण येईल.

**सुमित :** म्हणजे तिघं झालो आपण. आणि मंदारचं काय?

**सुशांत :** अरे हो, मंदारपण आहे ना! तू, मी, केतन आणि मंदार, म्हणजे चौघं झालो.

**सुमित :** बरं झालं. नाही तर 'तीन तिघाडा, काम बिघाडा' झालं असतं.

**१७** सुषमाच्या ऑफिसमधल्या मैत्रिणींनी छोटीशी सहल काढायचे ठरवले आहे. त्यांच्यातील संभाषण वाचा.

**लता :** सुषमा, आपण खूप दिवस ठरवत होतो ना सहलीला जायचं? येत्या शनिवारी जाऊ या का? तुला काय वाटतं?

**सुषमा :** तू कुणाकुणाला विचारलंयस?

**लता :** आत्ता तरी तू, मी आणि शुभांगी आहोत. तिघी तर नक्की आहोत.

**सुषमा :** चालेल. जाऊ या. पण आणखी कुणी नाहीये का? आणि राधिका येणार आहे का? चौघी तरी पाहिजेत गं, त्याशिवाय मजा नाही येणार.

**लता :** अगं चौघी काय, ६ जणी होणार आहेत, विसरलेच होते मी. माधवी आणि अंजलीपण येणार आहेत.

**सुषमा :** भारी! धम्माल करू या.

**लता :** हो ना. चल, आता काम संपवू. संध्याकाळी बाकीचं बोलू निवांत.

**सुषमा :** हो. ठीक आहे.

**१८** वाक्ये लिहा.

आमच्या वर्गात सगळेच जण गाणी ऐकतात.

उदा॰ आमच्या वर्गात सगळेच जण दुपारी झोपतात.






खेळणे
गाणी ऐकणे
झोपणे
प्राणी पाळणे
चित्रे काढणे

## १९ नाम, सर्वनाम, लिंग, वचन

### खेळ खेळा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
|  | सुरू करू या<br>एका वेळी चार जण खेळतील. एक फासा आणि चार सोंगट्या घ्या. फाशावर जे दान मिळेल तेथे सोंगट्या न्या आणि त्या प्रश्नाचे उत्तर द्या. उत्तर चुकले तर तितकेच चौकोन परत मागे या! |  | <br>दोन घरे मागे जा!<br><br>दोन घरे पुढे जा! |  | <br>थोडी विश्रांती. एक खेप थांबा! |
| १.<br>तुमच्या वर्गात एक नवीन विद्यार्थी / विद्यार्थिनी आला / आली आहे. त्याला / तिला ३ प्रश्न विचारा.<br>क. कुठून?<br>ख. कधी?<br>ग. का? | २.<br>पाहुण्यांचे स्वागत कसे करता आणि निरोप कसा घेता? प्रत्येकी दोन वाक्ये सांगा! | ३.<br><br>थोडी विश्रांती. या खेपेला थांबा! | ४.<br>तुम्ही मराठीच्या तासाला कसे येता? | ५.<br>वर्गात दिसणारे ५ रंग सांगा. | ६ .<br><br>दोन घरे पुढे जा! |
| १२.<br><br>किती वाजले आहेत सांगा. | ११.<br>तुमचा मराठीचा वर्ग कोणत्या वारी असतो? | १०.<br>कमीत कमी ३ वाक्यांत स्वतःची ओळख करून द्या. | ९<br>.<br>तुमच्या शेजाऱ्यांच्या डोळ्यांचा आणि केसांचा रंग सांगा. | ८.<br>थोडी विश्रांती. या खेपेला थांबा.<br> | ७.<br>विरुद्ध अर्थाचे शब्द सांगा :<br>चहा थंड आहे.<br>चहा ........... आहे.<br>मराठी अवघड आहे. मराठी ............ आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३.  दोन घरे पुढे जा. | १४. तुमच्या दिनक्रमातील तीन प्रमुख गोष्टी सांगा. | १५. पुढील जोड्या पूर्ण करा. काका - आजोबा - मामी - | १६. तुमच्या मित्राचे किंवा मैत्रिणीचे ३-४ वाक्यांत वर्णन करा. | १७. तुमचे शिक्षक खूप भरभर बोलत आहेत. त्यांना काय विनंती कराल? | १८. या उत्तरांचे प्रश्न कोणते? क. मी पुण्यात राहते. ख. मी सोलापूरहून आलो. |
| २४. "प" ने सुरू होणारे दोन खाद्यपदार्थ सांगा. | २३. तुम्हाला केळी घ्यायची आहेत. भाव कसा विचाराल? | २२. तुम्ही पेन विसरला आहात. शेजाऱ्याकडे मागा. | २१. तुमच्या शेजारच्या विद्यार्थी/ विद्यार्थिनीचे वर्णन करण्यासाठी ३ विशेषणे सांगा. | २०. पुढील ठिकाणांचा पत्ता कसा विचाराल? बाग?, पोस्ट?, सचिवालय? | १९. रविवारी तुम्ही काय करता? तीन गोष्टी सांगा. |
| २५.  दोन घरे मागे जा. | २६. महाराष्ट्रात साजरे होणारे दोन सण सांगा. | २७. महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय खाद्यपदार्थ सांगा आणि त्यात वापरलेले दोन घटकपदार्थ सांगा. | २८.  दोन घरे मागे जा. | २९ तुमच्याकडे पार्टी आहे. कोणत्या चार गोष्टी नक्की लागतीलच? | ३०. आई छोट्या सचिनला काय सांगते? लवकर उठणे, दात घासणे, दूध पिणे... |
| ३६. मराठीत आता तुम्हाला सर्वात चांगलं काय येतं आणि काय येत नाही? | ३५. थोडी विश्रांती. या खेपेला थांबा.  | ३४. या उत्तरांचे प्रश्न कोणते? क. मस्त, मजेत! ख. येऊ लवकरच. | ३३. सुपर मार्केटमध्ये चौकशी : प्रश्न - टूथपेस्ट? उत्तर - दुसरा मजला. | ३२. रात्री कोण काम करतं? दोन व्यवसाय सांगा. | ३१. वीसपर्यंत मराठीत आकडे मोजा. |

२० १. खालील चौकटीत 'मनोरंजन' विषयक आठ शब्द दडले आहेत. ते शोधून काढा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ना | ट | क | फ | ब | ज |
| डा | म | ख | रे | दी | मो |
| सं | ग्र | हा | ल | य | बा |
| कॉ | य | पु | सि | व | ई |
| म्यु | क | स्त | ने | क | ल |
| ट | ट्टा | क | मा | मी | गा |
| र | टी | भू | ना | च | णे |



२. वरील कोड्यात सापडलेले शब्द योग्य त्या लिंगाखाली लिहून त्याचे अनेकवचन लिहा.

| तो (पुल्लिंगी) | ती (स्त्रीलिंगी) | ते (नपुंसकलिंगी) |
|---|---|---|
| ........................ | ........................ | ते नाटक, ती नाटके |
| ........................ | ........................ | ........................ |
| ........................ | ........................ | ........................ |
| ........................ | ........................ | ........................ |

२१ तो, ती की ते?

| सर्वनाम | नाम |
|---|---|
| तो | ........................ |
| ती | ........................ |
| ते | ॲप, पुस्तक |
| ते | ........................ |
| त्या | ........................ |
| ती | ........................ |

जीन्स
गायक
टॉप
गाणी
ॲप्स
खेळ
अभ्यास
नाटक
पॅन्टस्
पुस्तकं
मुलगा
गाणं

# नातेसंबंध

४









## चला, शिकू या...

- नातेसंबंध ओळखणे
- षष्ठी नाम आणि सर्वनामांची रूपे
- प्रश्नशब्द : कोणाचा
- षष्ठीचे प्रत्यय आणि शुद्ध शब्दयोगी अव्यय ‘च’
- ‘रोजच्या रोज’, ‘आजच्या आज’ असे वाक्प्रचार

## १ कुटुंब आणि नातेसंबंध

**१. पाठ्यपुस्तकातील उतारे वाचून योग्य उत्तरे निवडा.**

क. १. सना तीन महिन्यांची कधीच झाली आहे.
   २. सना तीन महिन्यांची हल्लीच झाली आहे.

ख. १. सकीना सनाला आजी-आजोबांकडे ठेवते, कारण त्यांच्याकडे पाळणा आहे.
   २. सकीना सनाला एका संस्थेत ठेवते, जिथे दिवसभर मुलांची काळजी घेतली जाते.

ग. १. सकीना तिच्या मुलीला पाळणाघरात ठेवणार आहे, कारण तिला पुन्हा कामावर हजर व्हावे लागणार आहे.
   २. सकीना सनाला पाळणाघरात ठेवणार आहे, कारण तिला बाहेरगावी नोकरी करावी लागणार आहे.

घ. १. जर पहाटे चार वाजता सना जागी झाली तर तिचे वडील तिला सांभाळतील.
   २. जर पहाटे चार वाजता सना जागी झाली तर तिची आई तिला सांभाळेल.

च. १. साजिद आणि सकीनाला मुलं नको होती.
   २. साजिद आणि सकीनाला एकच मूल हवं होतं.

छ. १. साजिद फक्त दुपटी व लंगोट बदलण्याचं आणि दूध पाजण्याचं काम सकीनाहून चांगलं करतो.
   २. साजिद सनाची संपूर्ण काळजी सकीनापेक्षा जास्त छान घेतो.

**२. पाठ्यपुस्तकातील उतारे वाचून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

क. पीटरचं म्हणणं आहे, “माझे आई-वडील कधीच आमच्याजवळ राहिले नाहीत.” म्हणजेच ते त्यांच्या घराजवळ राहिले नाहीत की त्यांच्यासोबत त्यांच्या घरी राहिले नाहीत?

ख. पीटर डिसूझांच्या मते, कुटुंबाचा अर्थ काय आहे?

ग. पीटर आई-वडिलांना अधूनमधून सहकुटुंब भेटायला जातात का?

घ. मुली गावी न जाण्याची कोणती कारणं पीटर देत आहेत?

च. तुमच्या मते, ही कारणं खरी आहेत की फक्त निमित्तं आहेत? का?

छ. पीटरच्या आयुष्यात नातेवाइकांचं महत्त्व जास्त आहे की मित्रपरिवाराचं?

ज. काही अडचणी असतील तर कोण मदत करतं असं पीटरचं मत आहे?

**३. चूक की बरोबर ते लिहा.**

क. सरस्वतीबाई कुटुंबाची फक्त व्याख्या सांगत आहेत.

ख. कुटुंबात मुलं व नातवंडं महत्त्वाची आहेत.

ग. सरस्वतीबाईंचे सगळे नातेवाईक त्यांच्यापासून दूर झाले आहेत.

घ. उताऱ्यात नातवंडं आपल्या आजी-आजोबांबद्दल आदर दाखवतायत व त्यांना आपल्या आयुष्यात महत्त्व देतायत.

## २ खालील शब्दांचे लिंग लिहून एकवचन की अनेकवचन ते लिहा.

| | ए॰व॰ | अ॰व॰ | | ए॰व॰ | अ॰व॰ |
|---|---|---|---|---|---|
| उदा॰ ती सफरचंदे | | ✓ | ५. ............ गाड्या | | |
| १. ............ ताया | | | ६. ............ मुली | | |
| २. ............ चमचा | | | ७. ............ वही | | |
| ३. ............ चेंडू | | | ८. ............ पाने | | |
| ४. ............ कपडे | | | ९. ............ सासवा | | |

## ३ खालील वाक्यांमधील हिरव्या रंगातील शब्दांचे उदाहरणाप्रमाणे स्पष्टीकरण लिहा.

| | |
|---|---|
| उदा॰ आपण वेगवेगळ्या मैत्रिणींना भेटत असतो. | उदा॰ स्त्रीलिंगी, अनेकवचन |
| १. तशी मला अभ्यासाची फारशी आवड नव्हती. | |
| २. बरीच टेबलं रिकामी होती. | |
| ३. अमितने प्रियाला पुस्तक दिले. | |
| ४. तुझा नवरा कुठे आहे? | |
| ५. तू मित्रांना मदत केलीस का? | |

## ४ फासे टाका. तुमचा मित्र / तुमची मैत्रीण सर्वनामाप्रमाणे क्रियापदाचे योग्य रूप वापरून वाक्य तयार करेल.

(राहणे, झोपणे, येणे, जाणे, पडणे, हसणे, चिडणे, पळणे)



मी | तू | तो / ती | ते | आम्ही | तुम्ही

### ५ कोणी? कोणाशी? काय?



ती - तो : वादावादी करणे : उदा॰ तिने त्याच्याशी वादावादी केली.

तो - ते : गप्पा मारणे : ..........

ती - तो : मैत्री करणे : ..........

तो - ती : लग्न करणे : ..........

### ६ रोहन आणि त्याचे आजोबा यांच्यातल्या या संभाषणात रिकाम्या जागा भरा.

**आजोबा :** अरे रोहन, कुठे निघालास इतक्या सकाळी?

**रोहन :** जिमला जातोय, आजोबा!

**आजोबा :** तुम्ही हल्लीची पोरं ना! उदा॰ (आम्ही) आमच्या वेळी हे जिम वगैरे काहीही नव्हते, तरीही आम्ही फिट होतो.

**रोहन :** आजोबा, (१) (तुम्ही) .......... झालं का सुरू! (२) (आम्ही) .......... वेळी आणि (३) (तुम्ही) .......... वेळी.

**आजोबा :** अरे, रागावू नकोस; पण सांग बरं, खरं नाहीये का ते? (४) (आपण) .......... शरीराला (५) (व्यायाम) .......... गरज असते, मग नुसते फिरायला गेलो काय आणि जिमला गेलो काय, व्यायाम झाल्याशी मतलब.

**रोहन :** हो, पण (६) (व्यायाम) .......... गरज आणि नवीन काहीतरी (७) (करणे) .......... गरज, अशा दोन्ही गरजा आहेत (८) (आम्ही) .........., म्हणून आम्ही जिमला जातो.

**आजोबा :** (९) (तुम्ही) .......... पिढीशी वाद घालण्यात अर्थ नाही. (१०) (आम्ही) .......... तुम्हाला पटत नाही आणि (११) (तुम्ही) .......... आम्हाला.

**रोहन :** अगदी बरोबर बोललात, आजोबा. चला, जातो मी, उशीर झालाय.

## ७ नाती ओळखा.

(बाबा, बहीण, काका, मावशी, भाऊ)

१. माझ्या आईची बहीण माझी कोण? ..........

२. माझ्या भावाचा मी कोण? ..........

३. माझ्या बाबांची मुलगी माझी कोण? ..........

४. माझ्या आजीचा मुलगा माझा कोण? ..........

५. माझ्या बाबांचा भाऊ माझा कोण? ..........

**कोडे**

हा माझा भाऊ नाहीये, ही माझी बहीणपण नाहीये, तरीपण हे माझ्या आई - बाबांचे मूल आहे. ओळखा पाहू कोण आहे तो?

## ८ मीना पहिल्यांदाच प्रियाच्या घरी आली आहे म्हणून प्रिया मीनाला आपल्या घरातल्या व्यक्तींची ओळख करून देत आहे.

**प्रिया :** मीना, हा माझा नवरा, प्रवीण आणि या त्याच्या आई, निर्मला, म्हणजेच माझ्या सासूबाई. हे प्रवीणचे वडील, केशवराव, म्हणजेच माझे सासरे. ही प्रवीणची धाकटी बहीण, पायल, म्हणजेच माझी नणंद. हे माझे दीर, प्रकाश, प्रवीणचे थोरले भाऊ आणि ही त्यांची बायको, पूजा, म्हणजे माझ्या जाऊबाई.

**मीना :** आणि ही सगळी बच्चेकंपनी कोण?

**प्रिया :** त्यांची ओळख माझ्या सासूबाई करून देतील.

**सासूबाई :** ही सगळी आमची नातवंडं - ही माझी नात, पायलची मुलगी, नेहा आणि हा माझा नातू, प्रकाशचा मुलगा, निमेश.

**खालील आकृती नीट पहा आणि प्रियाची वेगवेगळी नाती रेघांच्यामार्फत सांगा. वेगवेगळ्या रंगीत पेन्सिलींचा / स्केचपेनांचा वापर करा.**

निर्मला
निमेश
पूजा
प्रकाश
प्रवीण
केशवराव
नेहा
पायल




उदा॰ प्रियाच्या नवऱ्याची आई म्हणजे प्रियाच्या सासूबाई.

## ९ कोडे कुणी उकलेल का?

१. माझं नाव अनीश. माझ्या बाबांच्या बायकोची मुलगी म्हणजे माझी ................................................ .

२. माझ्या मामाच्या मुलाचा मुलगा म्हणजे माझा ................................................ .

३. ताईच्या नवऱ्याची बहीण म्हणजे ताईची ................................................ .

४. आईच्या आईच्या नवऱ्याचा मुलगा म्हणजे माझा ................................................ .

५. माझा भाऊ म्हणजे माझ्या बायकोचा ................................................ .

६. आईची आई म्हणजे माझी ................................................ .

७. तिचा नवरा म्हणजे माझा ................................................ .

८. त्याचा मुलगा म्हणजे माझा ................................................ .



## १० कुणी कोडे माझे उकलेल का?

१. एक मुलगी म्हणते : मला जितक्या बहिणी आहेत त्याच्या दुप्पट भाऊ आहेत.
तिचा भाऊ पुढे म्हणतो : मला जितक्या बहिणी आहेत त्याच्या निम्मे भाऊ आहेत. तर या कुटुंबात मुलांची आणि मुलींची संख्या काय?

२. रमेश म्हणतो : मी माझ्या भावाच्या वयाच्या दुप्पट मोठा आहे आणि माझ्या मोठ्या बहिणीच्या वयापेक्षा अर्ध्या वयाचा आहे. माझी आई आता ४० वर्षांची आहे. ती माझ्या बहिणीच्या दुप्पट वयाची आहे. सांगा, या भावंडांची वयं!

## ११ नातेसंबंध

**१. रिकाम्या जागा भरा.**

(आई, ताई, काकी, जाऊ, मामी, भाऊ, मेहुणा, सासू, आजी)

माझी (क) ........................ रोज सकाळी ७ वाजता उठते. आईचा स्वयंपाक झाला की (ख) ........................ डबा घेऊन शाळेत जाते. कधी कधी दुपारी (ग) ........................, म्हणजे माझ्या आईची (घ) ........................ तिला भेटायला येते. (च) ........................ शेजारच्याच घरात राहते. ती रोजच भेटते. माझा मोठा (छ) ........................ आणि त्याचा (ज) ........................, म्हणजे माझ्या ताईचा नवरा एकत्रच काम करतात. तिची (झ) ........................ आणि माझी (ट) ........................ मैत्रिणी आहेत. त्या रोज दुपारी देवळात जातात.

**२. वरील उताऱ्यातील कोणते शब्द दीर्घ लिहिले जातात?**

## १२ खालील प्रश्न सोडवा.

१. या पाटीमध्ये 'लग्न' या शब्दाच्या संदर्भात 'स्थळ' या शब्दाचा अर्थ काय आहे?
क. जागा ख. प्रेक्षणीय स्थळ ग. विवाह
घ. लग्नासाठी विचारात घेतलेला मुलगा / मुलगी




२. ही पाटी कुठे लावली आहे असे तुम्हाला वाटते?
क. घराच्या दारावर ख. वस्तुसंग्रहालयात
ग. प्राणिसंग्रहालयात घ. विद्यापीठात

## १३ कोणाला काय त्रास होत आहे?

उदा॰ माझा हात दुखत आहे.

१. (ती) .................... डोके भयंकर दुखत आहे. २. (तो) .................... घसा बसला आहे.
३. (आम्ही) .................... पाय दुखत आहेत. ४. (तू) .................... तोंड नाही का दुखत?
५. (ते) .................... पाठ दुखत असेल ना? ६. (मी) .................... तर सर्व अंगच दुखत आहे.

## १४ सर्वनामाची षष्ठी वापरून योग्य रूपे रिकाम्या जागी लिहा.

१. ही आहे सौ॰ जोशी, (क) .................... शेजारीण. मी हिला दहा वर्षांपासून ओळखते. (ख) .................... हात सुजला आहे कारण ती काल बागेत पडली.
२. ही रेश्मा, (क) .................... मैत्रीण. आम्ही दोघी शाळेत एकत्रच जातो. ती (ख).................... घराच्या जवळ राहते.
३. हे (क) .................... कुटुंब : (ख) .................... बाबा, (ग) .................... आई, (घ) .................... थोरली बहीण आणि (च) .................... मांजर. ते सर्व काल सहलीला गेले होते. मला नाही जमलं जायला.
४. हे आहेत श्री॰ ओक (क) .................... उजवी दाढ खूप दुखत आहे. डॉक्टरांनी त्यांना आज सकाळी दहा वाजता बोलावले आहे. पण यामुळे (ख) .................... कामाचा खोळंबा झाला आहे.
५. ही आहे अनिता. ती कपड्याच्या दुकानात काम करते. तिला (क) .................... काम खूप आवडते.

६. या गृहस्थांचे नाव श्री॰ बॅनर्जी आहे. ऑफिसमध्ये खूप मोठ्या पदावर आहेत. (क) ........................ स्वभाव खूप चांगला आहे. (ख) ........................ सर्व सहकारी (ग) ........................ आदर करतात.

७. हा आहे मनीष. (क) ........................ छंद आहे स्वयंपाक करणे. (ख) ........................ पाककृती नेहमीच चांगल्या होतात.

## १५ सर्वनामांची योग्य रूपे भरा.

उदा॰ (मी) माझ्या घरामध्ये तीन कपाटे आहेत.

१. (आम्ही) ........................ दुकानामध्ये जुना माल ठेवत नाहीत.
२. (ते) ........................ उद्या सकाळी ६ ची गाडी आहे.
३. (तू) ........................ साडी खूप सुंदर आहे.
४. (आपण) ........................ विमानाची वेळ काय आहे?
५. (तो) ........................ टेबलावर मला हे कात्रण सापडले.
६. राधा रोज (ती) ........................ फळ्यावर एक सुविचार लिहिते.

## १६ पूर्ण वाक्ये लिहा.

उदा॰
मी - पार्टनर - व्यापारी
माझा पार्टनर आहे ना,
तो व्यापारी आहे.





ती - नवरा - डॉक्टर

........................
........................
........................

तो - मोठी बहीण - छायाचित्रकार

........................
........................
........................





मी - छोटा भाऊ - रॉकस्टार

..........................................................

..........................................................

ते - वडील - नट

..........................................................

..........................................................





आम्ही - आजोबा - शेतकरी

..........................................................

..........................................................

आम्ही - सासरे - नेता

..........................................................

..........................................................



**१७ 'स्वतः'ची षष्ठीची रूपे भरा.**

उदा॰ "या फोटोत तुम्ही आहात का, तुमच्या स्वतःच्या मुलांबरोबर?"

- "नाही, ती मी आहे लहानपणीची, माझ्या पालकांसोबत."

१. मी इथे आहे. माझ्या .............................. गाडीसमोर उभी आहे. आम्ही खूप आनंदी होतो.

२. या फोटोतील ही माझी आई. खूप मेहनत घेऊन तिने .............................. उद्योग उभा केला होता.

३. हा माझा मुलगा. त्याने आता .............................. मालकीचे घर घेतले आहे. तो .............................. सगळी कामे स्वतःच करतो.

४. हे माझे मिस्टर. पोलिस आहेत. .............................. जीव धोक्यात घालून चोरांना पकडतात.

५. .............................. सामानाची नीट काळजी घ्यावी. हरवल्यास संस्था जबाबदार नाही.

## १८ सापडले आहे.

१. रूहीने जेव्हा तिचे कपाट खूप दिवसांनी साफ करायला घेतले तेव्हा तिला काही वस्तू सापडल्या. त्या तिच्या नव्हत्याच. सर्व वस्तू तिच्या घरातल्यांच्याच आहेत हे तिला नक्की माहीत होते. रूहीने एक पाटी बनवली आणि आपल्या खोलीच्या दरवाजावर लावली. तुम्हीपण तिला पाटी लिहायला मदत करा.

उदा० कोणाचे गॉगल्स हरवले आहेत? ज्याचे गॉगल्स हरवले आहेत त्याने ते घेऊन जावे.

क. कागद
ख. पुस्तक
ग. बाहुली
च. जुनी पत्रे
छ. सदरा
ज. घड्याळ
घ. खेळण्यातली गाडी

..........

..........

..........

..........

..........

..........

..........

२. खालील उदाहरणांप्रमाणे संवाद लिहा.

| | |
|---|---|
| उदा० गॉगल्स<br>• हे गॉगल्स तुझे आहेत का?<br>नाही. हे गॉगल्स माझे नाहीत.<br>• मग कोणाचे आहेत?<br>ते ज्याचे आहेत तो घेऊन जाईल. | उदा० गॉगल्स - गाडी<br>• हे गॉगल्स तुझे आहेत का?<br>हो. हे माझे गॉगल्स आहेत.<br>• आणि ती लाल गाडी कोणाची आहे?<br>माहीत नाही. ज्याची आहे त्याला विचार. |

| | |
|---|---|
| क. कागद<br>..........<br>..........<br>.......... | कागद - पेन<br>..........<br>..........<br>.......... |

| | |
|---|---|
| ख. पुस्तक<br>.......................<br>.......................<br>....................... | पुस्तक - किल्ली<br>.......................<br>.......................<br>....................... |
| ग. बाहुली<br>.......................<br>.......................<br>....................... | बाहुली - खुर्ची<br>.......................<br>.......................<br>....................... |
| घ. खेळण्यातली गाडी<br>.......................<br>.......................<br>....................... | खेळण्यातली गाडी - चेंडू<br>.......................<br>.......................<br>....................... |
| च. जुनी पत्रे<br>.......................<br>.......................<br>....................... | जुनी पत्रे - नोट<br>.......................<br>.......................<br>....................... |
| छ. सदरा<br>.......................<br>.......................<br>....................... | सदरा - पॅन्ट<br>.......................<br>.......................<br>....................... |
| ज. घड्याळ<br>.......................<br>.......................<br>....................... | घड्याळ - लॅपटॉप<br>.......................<br>.......................<br>....................... |

- ही तुझी गाडी आहे का?
  हो, ही माझी गाडी आहे.
- आणि ती लाल गाडी कोणाची आहे?
  माहीत नाही. ज्याची आहे त्याने सांगावे.

## १९ खालील वाक्ये पूर्ण करा.

१. हा फोन ............ आहे? ते काका आहेत ना, ............

२. ही बाटली ............ आहे? त्या काकू आहेत ना, ............

३. इथे कोणीतरी पुस्तकं विसरलं आहे.

(जो) ............ असतील त्याने घेऊन जावी.

## २० मी की तू? योग्य रूप लिहून संभाषण पूर्ण करा.

**रमा :** हॅलो! आई, मी बोलतेय.

**आई :** हॅलो! कशी आहेस? पोहोचलीस का बंगळुरूला?

**रमा :** हो, आई. आत्ताच पोहोचले मी, (क) ............ नव्या घरी.

**आई :** (ख) ............ नवं घर आवडलं का तुला?

**रमा :** हो, खूपच सुंदर आहे आणि खूप प्रशस्त देखील.

**आई :** (ग) ............ काकांचं आहे ना. त्यांना भारी आवड आहे मोठाल्या घरांची. त्यांची सगळीच घरं भली मोठाली असतात.

**रमा :** हो गं! (घ) ............ काका भारीच आहेत. आता फोन ठेवते. फोनची बॅटरी संपतेय. बंदच पडेल आता.

**आई :** अशी कशी गं तू! (च) ............ फोनची बॅटरी कायमच लो असते. जाऊ दे.
तू (छ) ............ काळजी घे.
(ज) ............ काकांना तिकडे जास्त त्रास देऊ नकोस.

**रमा :** हो गं आई! (झ) ............ सूचना देणं बंद कर पाहू. टाटा!

**आई :** (ट) ............ तब्येतीला जप. अच्छा! नंतर करते मी फोन.

## २१ षष्ठी वापरून रिकाम्या जागा भरा.

१. खाऊ (च्या / चे) ............ डबेही नाहीत.

२. बाबाने माझ्या हातातून पाण्या (ची / चा) ............ बाटली घेतली आणि त्या माणसाला दिली.

३. वेटरने थंड पाण्या (चे / च्या) ............ पेले आणून ठेवले.

४. माग (चा / च्या) ............ सीटवरचे जाडजूड हवालदार खाली उतरले.

## २२ कंसातील नामाचे योग्य रूप भरा.

१. समोर दोन (मोटारसायकल) ............ उभ्या होत्या.
२. एक इन्स्पेक्टर आणि दोन हवालदार तरुण (मुलं) ............ काही वाद घालताना दिसत होते.
३. "लायसन्स तपासताहेत बहुधा...," बाबा पुटपुटला आणि त्यानं (गाडी) ............ वेग पुन्हा वाढवला.
४. (बाबा) ............ गर्दी वाढायच्या आत (पुणे) ............ पोहोचायचं होतं.
५. "आता कोणी हवालदार भेटायला नको!" बाबा (स्वत:) ............ बोलला.

## २३ वर्णनावरून ओळखा.

(राधा, बाबा, आई, आजी, आजोबा, थोरली बहीण)

१. मी घरातील सर्वात लहान सदस्य. मी शाळेत जाते. माझे पुष्कळ मित्रमैत्रिणी आहेत. मला सटरफटर खायला आवडतं. [ ]

२. ही या घरातील मोठी मुलगी, रश्मी. ती रोज छान छान कपडे घालून पर्स घेऊन कॉलेजला जाते. तरुण असल्याने, अर्थातच, तिला नवीन नवीन चित्रपट बघायला आवडतात. [ ]

३. हे या घरातील ज्येष्ठ सदस्य, श्रीयुत रमेश देशपांडे. ते रोज सकाळी पेपर वाचतात आणि गरम चहा पितात. मग ते एक मोठ्ठी काळी बॅग घेऊन लाल मोटारीतून ऑफिसला जातात. त्यांना जुनी गाणी ऐकायला आवडतात. [ ]

४. या सौ॰ रमा देशपांडे. सगळ्यांसाठी छान नाश्ता करतात. त्या सतत घरात काम करत असतात आणि घर नीटनेटके ठेवतात. त्यांनी बागेत सुंदर फुलझाडे लावली आहेत. [ ]

५. या वृद्ध बाई आहेत, सौ॰ सुधा देशपांडे. भल्या पहाटे उठून बागेतली टवटवीत फुले तोडतात. अधूनमधून रमा देशपांड्यांना स्वयंपाकात मदतपण करतात. त्यांना थंडगार आईस्क्रीम फार आवडते. [ ]

६. हे घरातील सर्वात वृद्ध आणि आदरणीय गृहस्थ, श्रीयुत सुधीर देशपांडे आहेत. ते रोज सकाळी लांबलचक फेरफटका मारतात. येताना ताजी भाजी आणतात. त्यांना ऐतिहासिक कादंबऱ्या वाचायला आवडतात. [ ]

## २४ रिकाम्या जागा भरा.

उदा॰ कोणी काय खावं ही (जो) ज्याची (तो) त्याची आवड आहे.

१. (जो) .................... जळतं त्याला कळतं.

२. (जो) .................... खावी पोळी (तो) .................... वाजवावी टाळी.

३. (जी) .................... घर जवळ तिनं लवकर यावं.

४. (जो) .................... किंमत जास्त ते तुला आवडतं.

५. हा (जो) .................... (तो) .................... प्रश्न आहे.

६. (जो) .................... करावं भलं तो म्हणतो माझंच खरं.

## २५ भेटवस्तू देणे – घेणे. कोणी कोणाला काय दिले?

(माझ्या, त्याच्या, तिच्या, त्यांच्या, आमच्या)

उदा॰ प्रश्न - तू तुझ्या मित्राला काय देतोस / देतेस?

उत्तर - मी माझ्या मित्राला नवं पुस्तक देते.

**विशेषणे**

निळा, छोटा, नवं, लाल, तपकिरी, महाग, भारी, रेघारेघांचा, घट्ट, मस्त, काळा, जलद, धारदार, लांब, आखूड, गोजिरवाणं, मनोरंजक, गरम, गुलाबी, जांभळं, मजबूत

**वस्तू**

टी-शर्ट, साडी, सायकल, पेन, दप्तर, बूट, फुटबॉल, स्वेटर, मोबाइल फोन, जीन्स, पुस्तक, पर्स, टेनिस रॅकेट, कुत्र्याचे पिल्लू, मनीमाऊ, दुर्बीण, टाय, छत्री, स्कर्ट, पोलके, सुरी



## २६ मन्याच्या गावच्या घराची गोष्ट.



मन्या त्याच्या घरच्यांबरोबर गावच्या कौलारू घरात राहायचा. घरात म्हातारी आजी, आई, बाबा, बहीण पिंकी. शिवाय आजींचा विश्वासू माळी रंगाभाऊ, मन्याचा लाडका कुत्रा वाघ्या आणि पिंकीची मांजर मनी हेही होतेच. गेल्या काही दिवसांत घरातील वस्तू सारख्या हरवत आहेत असे आईला वाटत होते. एके दिवशी तिच्या अचानक लक्षात आले की, आपला मोत्यांचा हार घरात दिसत नाही. अधिक शोधल्यावर तिला स्वातीची बांगडी, आजींची नथ, पिंकीचा एक पैंजण हेही दिसेनात. तिचे कामावरचे लक्ष पार उडाले. तिची घालमेल बाबांच्या लक्षात आली. पण त्यांनी तिला विचारूनही ती काही सांगेना. पण नंतर बोलण्याच्या ओघात ती सर्व सांगून बसली. खाजगी गुप्तहेराची मदत घेऊन या चोरीचा तपास करावा असे बाबांच्या मनात आले आणि ते गुप्तहेर करमचंद यांचा फोन नंबर फिरवणार इतक्यात मन्या म्हणाला, माझे घड्याळही गायब आहे आणि एक अंगठीही दिसत नाही. आता मामला अधिकच गंभीर झाला. मन्याची आजी ही फार हुशार बाई. ती म्हणाली, “थांबा उद्यापर्यंत. मी बघते काय करायचं ते.”

दुसऱ्या दिवशी सकाळी आजीने रंगाभाऊ माळ्याला कुदळ घेऊन बोलाविले. बाकी सर्वांना बाहेर जायला सांगितले. घराचे दार बंद करून दोघे अर्धा तास आत होते. बाहेर आले तेव्हा त्यांच्याजवळ हरवलेल्या सर्व वस्तू तर होत्याच, शिवाय पूर्वी कधी तरी नाहीशा झालेल्या अनेक वस्तूही होत्या, जसे, पिंकीची पेन्सिल, मन्याचे पेन आणि खोडरबर, शिवाय त्यातच लाडवाचे तुकडे, कुरतडलेल्या पोळ्या, चकलीचा तुकडा, सडका बटाटा यांचीही भर होतीच.



## २७ चोर! चोर!

१. ओळखा बरं चोर कोण होता?




२. चोराने कोणाच्या कोणत्या वस्तू पळवल्या होत्या? यादी करा

उदा॰ चोराने मन्याचा खोडरबर पळवला होता.

.........................................................................................................

.........................................................................................................

.........................................................................................................

.........................................................................................................

**२८ तुम्हाला तुमच्या नवीन घरासाठी कोणकोणत्या वस्तू घ्यायला आवडेल? विशेषणे व नामांच्या जोड्या लावून वाक्ये तयार करा.**

(लोखंड, कॉटन, स्टील, लाकूड, सिल्क, प्लॅस्टिक, चांदी, लेदर, बांबू, काच...)

(पुस्तकांचे कपाट, पलंग, जेवणाचे टेबल, खुर्च्या, सोफा, भांडी, कपड्यांचे कपाट, झुंबर, घड्याळ, पडदे...)

उदा॰ मला लोखंडी पलंग घ्यायला आवडेल.

**२९ खालील उदाहरण वाचून त्याप्रमाणे 'जे' 'कोण' आणि 'कसं' या शब्दांचे षष्ठीचे योग्य रूप वापरून लिहा आणि म्हणीही पूर्ण करा.**

राज आणि नील मराठीतील काही म्हणींचा सराव करत आहेत. त्या दोघांना म्हणी नीट येत नसल्या तरी ते त्या समजावू शकतात. बघू या, त्यांना ते जमत आहे का?

उदा॰ **राज :** अरे नील, ज्याच्या हाती कोलीत ते माकड.

**नील :** राज, असं नाहीये ते. काय म्हणालास तू? कुणाच्या हाती कोलीत?

**राज :** माकडाच्या हाती कोलीत.

**नील :** अरे, हो की! हीच तर म्हण आहे ती.

१. **नील :** राज, गाढवाला .................... चव नाही तो गूळ.

**राज :** असं नाहीये ते, नील. काय म्हणालास तू? गाढवाला .................... चव नाही म्हणालास?

**नील :** गुळाची. गाढवाला गुळाची चव नाही. आठवली म्हण.

**राज :** मला जास्त बरोबर आठवली : .....................

२. **नील :** अरे राज, ऐक ना! ....................दिवस चार ती सून.

**राज :** नाही रे, ....................दिवस चार ती सासू. .................... दिवस चार म्हणालास?

**नील :** दोघींचेही.

**राज :** हो, बरोबर आहे : .....................

३. **राज :** मला एक म्हण आठवतेय. .................... पाय धरी तो हरी.

**नील :** काही तरीच काय! अडला गाढव हरीचे पाय धरी. नाही, काही तरी चुकतंय. पाय धरी म्हणालास?

**राज :** गाढवाचे. आठवली म्हण, नील : .................................................................

४. **राज :** ................................................................. जिवावर उदार तो बायजी.

**नील :** नाही रे. ................................................................. जिवावर बायजी उदार?

**राज :** आयजीच्या.

**नील :** हो : ...................................................

५. **नील :** राज, अजून एक. ................................................................. हरी असेल तो देई खाटल्यावरी.

**राज :** काहीपण बोलतोस तू. थांब. ................................................................. हरी आहे बरे ते? आठव जरा.

**नील :** आठवले. माझा हरी.

**राज :** बरोबर. म्हणपण आठवली : .................................................................

६. **राज :** ................................................................. नऊ दिवस ते नवे.

**नील :** काही पण फेकतो. ................................................................. नऊ दिवस म्हणालास?

**राज :** नव्याचे रे! छान, आठवली नं म्हण : .................................................................





# तोंडी परीक्षा – एकूण गुण ३०

## १. वाचन व आकलन (एकूण ९ गुण)

**१. पुढील उतारा वाचून दाखवा.** **(३)**

आजच्या धकाधकीच्या आयुष्यात एखादा छंद जोपासायचा तर त्यासाठी वेळ काढायला आणि त्यासाठी लागणारं साहित्य घ्यायलाही अनेकांकडे वेळ नसतो. दुकानांमध्ये अनेक गोष्टी मिळत नाहीत, त्यामुळे निराश व्हायला होतं. आपल्यापैकी प्रत्येकाला कुठला ना कुठला छंद असतोच. आवडीनिवडी असतात. नवं काही तरी करण्याची इच्छा असते. ज्या गोष्टी करायला आवडतात, त्यात नवनवीन प्रयोग करायचे असतात. त्यातून आपलं व्यक्तिमत्त्व घडत असतं. एखादा छंद जोपासला, की तो आपल्या आयुष्याचा भाग बनून जातो. मग तो छोटा छंद आहे की मोठा याकडे आपण लक्ष देत नाही. ते सर्व करण्यातच आपला आनंद असतो. कोणीकोणी आपल्या लहानपणापासून आपला छंद जोपासत असतात. काहींना तरुणपणी, तर अनेकांना अगदी वृद्धापकाळात छंदाचं वेड लागतं, आणि मग त्यासाठी काहीही करण्याची त्यांची तयारी असते. अशा असंख्य छंदवेड्यांसाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी पुरवण्याकरता वसईच्या विनय निहलानी या तरुणानं 'हॉबीगिरी डॉट कॉम' नावाची एक ई-कॉमर्स वेबसाईट सुरू केलीय. अगदी सायकलिंगपासून ते गिर्यारोहणापर्यंत सर्व छंदांसाठी लागणारे साहित्य या वेबसाईटवर उपलब्ध आहे. वेबसाईटला कुठून सुरुवात झाली हे सांगताना विनय म्हणाला, "माझा आवडता छंद म्हणजे फोटोग्राफी. परंतु तो जोपासण्यासाठी माझ्याकडे कित्येक गोष्टी नव्हत्या, आणि खूप शोधाशोध करूनही त्या सापडल्या नाहीत. तेव्हा मला या वेबसाईटची कल्पना सुचली."

**१. खाली दिलेली विधाने उताऱ्यात वेगळ्या शब्दांत आली आहेत की नाहीत ते सांगा.** **(३)**

क. आपल्यातील प्रत्येकाला नवनवीन प्रयोग करायला आवडतात.

ख. छंदाचा वयाशी काही संबंध नसतो.

ग. फक्त सायकलिंग आणि गिर्यारोहण या दोन छंदांचे साहित्य वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**२. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.** **(३)**

क. छंद जोपासण्यामुळे आपल्या आयुष्यात कोणता चांगला बदल घडतो?

ख. छंद जोपासण्यामध्ये कोणत्या अडचणी येतात?

ग. हॉबीगिरी डॉट कॉम ही वेबसाईट सुरू करण्यामागे विनयचा काय विचार होता?

३. तुम्हाला या वेबसाईटबद्दल काय वाटतं? तुम्ही स्वतः अशा वेबसाईटचा वापर कराल का? कोणत्या कारणासाठी? **(३)**

**२. खालीलपैकी एका चित्राचे किमान दहा वाक्यांत वर्णन करा.** **(एकूण ५ गुण)**

चित्रांचे वर्णन करण्यासाठी काही प्रश्नांची मदत : चित्रात कोण दिसत आहे? चित्रातील व्यक्ती काय करत आहेत? चित्रामध्ये इतर काय दिसत आहे? चित्रामध्ये कोणता विषय मांडला आहे? त्या विषयासंबंधीचे तुमचे काय मत आहे?






**३. संभाषण करा.** **(एकूण १० गुण)**

दोन-दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करून संभाषण तयार करा. दोघांनी खालीलपैकी एक वस्तू दुसऱ्याला विकायची आहे. योग्य ती विशेषणे वापरून आपली वस्तू कशी चांगली आहे हे पटवून द्या. (प्रत्येक विद्यार्थ्याने किमान पाच वाक्ये बोलावीत.)

| | | |
|---|---|---|
| १. संगणक | २. कपडे | ३. पुस्तक |
| ४. टीव्ही | ५. गाडी | ६. गृहोपयोगी वस्तू |

**४. प्रत्येक प्रश्नाला एकेका वाक्याच्या तीन योग्य पण वेगवेगळ्या प्रतिक्रिया द्या.** **(एकूण ६ गुण)**

१. तुम्हाला शिक्षक व्हायचं आहे, पण तुमच्या वडिलांचा त्याला विरोध आहे. तुम्ही त्यांना काय सांगाल?

२. तुमची आजी तुम्हाला म्हणते, की मी आज रात्री एका मैत्रिणीसोबत पबमध्ये जाणार आहे. त्यावर तुमची प्रतिक्रिया काय?

३. तुमच्या मित्राला फोटोग्राफी करायला आवडते. त्याने काढलेले काही फोटो तुम्हाला आवडले आणि काही नाही आवडले. तुम्ही त्याला तुमचे मत सांगा.

४. तुमचा नवरा म्हणतो, की आज मी स्वयंपाक करणार आहे. त्यावर तुम्ही काय म्हणाल?

५. तुम्ही सिनेमाला जायला निघता, तेवढ्यात अचानक तुमचे काही नातेवाईक घरी येतात. त्यांना तुम्ही काय सांगाल?

६. तुम्हाला एका महत्त्वाच्या कामाला जायचे आहे, परंतु तुमच्या बहिणीने बाथरूम बराच वेळ अडवून ठेवली आहे. तुम्ही तिला काय म्हणाल?

## लेखी परीक्षा - एकूण गुण ७०

**१. नातेसंबंध या विषयावर दोन व्यक्तींनी आपली मते मांडली आहेत. ती मते वाचा आणि त्यावरील स्वाध्याय सोडवा. (एकूण १० गुण)**

**प्रियांका :** नातेसंबंध अगदी कुठलेही असतील, म्हणजे जवळचे किंवा लांबचे, तरी एकूण कुठलीही नाती तशी कृत्रिमच. स्वतःचं आयुष्य जगताना, जगाचा अनुभव घेताना, स्वतःचा शोध घेताना नातेसंबंधांची कितीशी गरज माणसाला असते, असा प्रश्न मला पडतो. उलट नाती टिकवण्यासाठी मात्र जिवाचा फारच आटापिटा करावा लागतो, समुदायात वागण्याची एक वेगळी तयारी करावी लागते. मुळात माणूस हा निसर्गतः एकटे राहणे पसंत करणारा आणि फार थोड्या वेळा सामाजिकतेत रमणारा प्राणी आहे. एकटेपणा आणि सामाजिकता यांचं प्रमाण जेव्हा बिघडू लागतं, म्हणजेच जेव्हा समाजाचा विचार जास्त करावा लागतो आणि स्वतःच्या स्वातंत्र्यावर बंधने येतात, तेव्हा माणूस अस्वस्थ होतो. मग त्या सामाजिकतेचा भाग असणारे नातेसंबंध नकोसे आणि अनावश्यक वाटतात. लादलेली सामाजिकता खूप तडजोडी करायला लावते.

**सानिका :** आपल्याला आपल्या मातीशी, जीवनशैलीशी, समाजाशी जोडून ठेवतात ती नाती. आई-मुलाची नाळ जरी जन्माच्या वेळीच तोडली जात असली, तरी हे नाते कधीच तुटत नाही. तसंच जन्मतः आपल्याशी जोडली गेलेली नातेवाईक मंडळी काही झालं तरी आपल्याला तोडता येत नाहीत. जशा झाडाच्या फांद्या तोडल्या, तरी त्या पुन्हा वाढतात, तशी ही वेगळी झालेली, भौगोलिकदृष्ट्या दूर गेलेली माणसंही कुठल्या तरी बंधनाने आपल्याशी जोडलेलीच राहतात. मला तर सर्व नातेवाइकांना कुठल्याही परिस्थितीत सांभाळण्याची फारच सवय आहे. कशीही झाली, तरी ती माझी माणसं आहेत, असं मला वाटतं. कदाचित त्यामुळेच माझा लोकसंग्रह फार मोठा आहे. दुसरी नाती ही जोडलेली, म्हणजे मैत्रीची. तिथे आपल्याला निवडीची संधी असते. त्यामुळेच असेल, ह्या प्रकारातली नाती जास्त जवळची वाटतात. पण शेवटी गरजेला जो धावून येतो, तोच आपला खरा सोयरा, हे मी मनातल्या मनात कधीच कबूल केलंय.

**१. चूक की बरोबर? (३)**

क. नातेसंबंधांविषयीची दोन्ही स्त्रियांची मते सारखीच आहेत.

ख. नाती दोन प्रकारची असतात : जन्मतःच मिळालेली आणि जोडलेली.

ग. माणूस हा एकटे राहणे पसंत करणारा प्राणी आहे.

**२. खालील शब्दांच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा. (३)**

उदा॰ लोकसंग्रह = (जोडलेली माणसे, शब्दसंग्रह, नातेसंबंध)

क. कृत्रिम = (नैसर्गिक, प्रेमळ, अनैसर्गिक) ..........

ख. आटापिटा = (आळस, खूप प्रयत्न, धावाधाव) ..........

ग. अनावश्यक = (गरज नसलेले, अत्यावश्यक, गरज असलेले) ..........

**३. खालील प्रश्नांची दोन वाक्यांत उत्तरे लिहा.** **(४)**

क. “शेवटी गरजेला जो धावून येतो, तोच आपला खरा सोयरा”. तुमचे मत सांगा.

..........

..........

..........

ख. प्रियांकाला कोणती नाती जास्त जवळची वाटतात? त्याचे कारण काय?

..........

..........

..........

## २. व्याकरण (एकूण १५ गुण)

**१. खालील वाक्यांमधील अधोरेखित विशेषणांची रूपे चुकली आहेत असे तुम्हाला वाटत असेल, तर ती दुरुस्त करून पुन्हा लिहा.** **(५)**

क. आज सकाळपासून मला खूपच अडचणी येत होत्या. अगदी सकाळीच आईच्या साडीला माझ्या हातून काळी डाग पडला, म्हणून ती मला खूप ओरडली.

..........

..........

ख. माझा नवे संगणक नीट चालत नव्हता, म्हणून मी आधीच चिडलो होतो.

..........

..........

ग. माझ्या नेहमीच्या हुशार इंजिनियरला मी बोलवलं.

..........

..........

घ. त्याने संगणक दुरुस्त केला, पण मोठा बिल दिलं, त्यामुळे माझा भरलेलं खिसा रिकामा झाला.

..........

..........

**२. खालील उताऱ्यात कंसातील नामांची षष्ठी वापरून रिकाम्या जागा भरा. (१०)**

क. (मेधा) ........................ घरी पार्टी असली, की मला टेन्शनच येते.

ख. (ती) ........................ कपडे, खाणे या बाबतीत आग्रही स्वभाव सगळ्यांनाच त्रासदायक वाटतो.

ग. तुम्ही ठरावीक रंगाचेच कपडे घालायचे, ठरावीक दागिनेच घालायचे, अशा (ती) ........................ लहरी सांभाळताना नाकी नऊ येतात.

घ. जेवणाचे पदार्थही ती (तो) ........................ रंगात ठेवते.

च. म्हणजे आजचा रंग हिरवा असेल, तर (पालक) ........................ सूप, (मटार) ........................ उसळ, (कोथिंबीर) ........................ वड्या, (पुदिना) ........................ चटणी आणि शेवटी (पिस्ता) ........................ आईसक्रीम.

## ३. शब्दसंपदा (एकूण २५ गुण)

**१. रिकाम्या जागी योग्य तो विरुद्धार्थी शब्द लिहून वाक्ये पूर्ण करा. (५)**

क. एक महागडं चित्र विकत घेतलंय. मला खरं तर एक ........................ चित्र घ्यायचं होतं.

ख. अगं, किती ही कठीण परीक्षा ! मला वाटलं होतं खूप ........................ असेल.

ग. या गोष्टीतली परी अगदी दुष्ट दाखवली आहे, आणि चेटकीण खूपच ........................ आहे.

घ. मी परत हा मळका शर्ट घालून बाहेर जाऊ का? माझा ........................ शर्ट कुठे गेला?

च. असा का उदास होऊन बसलायस? सुट्टी लागलीय आता. तू तर ........................ असायला हवंस.

**२. खालील वाक्यांत काही नामांची अक्षरे उलटसुलट झाली आहेत. ती नामे ओळखा. (१०)**

क. मी रडोंग चढतो. ........................

ख. तो कटना करतो. ........................

ग. ती रोज मयाव्या करते. ........................

घ. पीटर रगिटा वाजवतो. ........................

च. आई छान ष्टगो सांगते. ........................

छ. आम्ही खूप वासप्र करतो. ........................

ज. राजू टकेक्रि खेळतो. ........................

झ. मुले लकयसा चालवतात. ........................

ट. आजोबा णेगा गातात. ........................

ठ. बाबा त्रचि काढतात. ........................

३. आता तुम्ही ओळखलेल्या ह्या नामांचे लिंग सांगून अनेकवचन करा. (१०)

| लिंग | अनेकवचन |
| --- | --- |
| क. ........ | ........ |
| ख. ........ | ........ |
| ग. ........ | ........ |
| घ. ........ | ........ |
| च. ........ | ........ |
| छ. ........ | ........ |
| ज. ........ | ........ |
| झ. ........ | ........ |
| ट. ........ | ........ |
| ठ. ........ | ........ |

## ४. चित्रफीत (एकूण १० गुण)

**१. चित्रफीत पाहा व पुढे दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. या चित्रफितीमध्ये कोणते लोक अत्यंत नशीबवान असतात असे म्हटले आहे? (१)

२. आपले छंद आपण कोणत्या गोष्टींमुळे जोपासू शकत नाही असे या चित्रफितीमध्ये सांगितले आहे? (१)

३. आपल्या छंदालाच आपले करिअर बनवायचे असेल, तर त्यासाठी आपल्याकडे कोणकोणते गुण असणे अपेक्षित आहे? (२)

४. गाणे, नाच याशिवाय कोणकोणत्या छंदांचा उल्लेख या चित्रफितीमध्ये केला आहे? (१)

**२. तुमच्या छंदाविषयी किमान पाच ओळीत माहिती लिहा.** (५)





**५. श्रुतलेखन** **(एकूण १० गुण)**

मी वटवृक्ष. गेल्या दोनशे वर्षांपासून मी इथे आहे. अनेक पिढ्या मी बघितल्या. माझी बाळं जमिनीत रुजली, वाढली, मोठी झाली, त्यांचे वृक्ष झाले. माझं कुटुंब माझ्याच अवतीभवती निवांत पसरलंय. जसं माझं कुटुंब विस्तारत गेलं, तसेच माझ्या कुटुंबाच्या आश्रयाने राहणारे प्राणी, पक्षी व सृष्टीही विस्तारत गेली. माझी लाललाल फळे सगळ्यांनाच आकर्षित करत राहिली. एवढ्या वर्षांमध्ये माझ्या कुटुंबातला एकही सदस्य कुटुंब सोडून दूर गेला नाही. फक्त विस्तार वाढत गेला. आणि आता मी असं ऐकतो, की एकत्र कुटुंब ही संकल्पनाच म्हणे संपत चाललीये! म्हणूनच माझ्या कुटुंबाचा विस्तार पाहण्यासाठी आणि त्याच्या सावलीत विश्रांती घेण्यासाठी लांबून माणसं येतात.



# आनंदतरंग

## ५



## चला, शिकू या...

- सणांविषयी बोलणे
- आनंदाचे प्रसंग
- अभिनंदन करणे / शुभेच्छा देणे
- सर्वनामांची सामान्यरूपे + शब्दयोगी अव्यय
- तरी, आता तरी, निदान
- मराठी न्याहारी आणि जेवण याबद्दल
- एखादी मराठी पाककृती बनवणे, त्यावर लिहिणे आणि बोलणे

# ५ आनंदतरंग

## १ अभिनंदनाचे प्रसंग : शुभेच्छा देणे.

**१. तुम्ही काय म्हणाल? योग्य पर्याय निवडा.**

उदा॰ वाढदिवस : वाढदिवसाच्या शुभेच्छा!

(तिळगूळ घ्या आणि गोड बोला, पुढील वर्ष भरभराटीचे जावो, वैवाहिक जीवन सुखाचे जावो, हार्दिक शुभेच्छा, भरपूर यश मिळो)

दिवाळी : .................................................................................................................................................................................................

लग्न : .................................................................................................................................................................................................

परीक्षा : .................................................................................................................................................................................................

नववर्ष : .................................................................................................................................................................................................

मकरसंक्रांत : .................................................................................................................................................................................................

नवीन नोकरी मिळणे : .................................................................................................................................................................................................

बढती मिळणे : .................................................................................................................................................................................................

**२. आमंत्रण : पाठ्यपुस्तकातील लग्नपत्रिका पाहा आणि कुठल्याही एका समारंभाची आमंत्रणपत्रिका बनवा. उदा॰ लग्न, वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस इ॰**

## २ सणाचा सोहळा

**१. चित्रांच्या जागी शब्द भरून उतारा पूर्ण करा.**

(आरती, ढोलताशाच्या, गणपतीचे, विद्येची, नाचते, मूर्ती, विसर्जन, जास्वंदीचे, मोदक)

भाद्रपद महिन्यात चतुर्थीला  ............................ वाजतगाजत आगमन होते.  ............................ आवाजाने आकाश दुमदुमते.  ............................ तालावर तरुणाई मनमुराद  ............................ . घराघरात बसवले जाणारे लहान गणपती, मंडळांचे मोठे गणपती... विविध आकारातील  ............................ उत्सवासाठी सज्ज असतात. गणपती  ............................ देवता आहे. गणपतीला नैवेद्य म्हणून पांढऱ्या शुभ्र रंगाचे  मोदक दाखवतात, लाल रंगाचे  ............................ फूल वाहतात, आणि सुरेल आवाजात  ............................ म्हणतात. अशा प्रकारे गणेशोत्सव साजरा करतात. गणेशमूर्तीचे  ............................ करताना सगळे एका सुरात गजर करतात... 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'.

२. तुमचे मराठी मित्र गणेशोत्सव कसा साजरा करतात? तुम्हाला स्वतःला गणेशोत्सव कसा साजरा करायला आवडेल?

३ खालील चित्रे पाहा आणि त्यातील सणाचे वर्णन करा.



| प्रसंग | आनंदाचा प्रसंग कळवणे | प्रतिक्रिया देणे | शुभेच्छा देणे |
|---|---|---|---|
| **वैयक्तिक शुभप्रसंग :** वाढदिवस, साठी, पंचाहत्तरी, बाळाचा जन्म, बढती, साखरपुडा, परीक्षेतील यश, लग्न | मला कळवण्यास आनंद होत आहे, की... | किती छान बातमी दिलीस! | दिवाळीच्या / होळीच्या / स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा, अभिनंदन! |
| | एक चांगली बातमी सांगायची आहे. | मन प्रसन्न केलेस! मन प्रफुल्लित झाले! | भरपूर यश मिळो! |
| | | खूप छान / बरे वाटले ऐकून! | तिळगूळ घ्या, गोडगोड बोला! |
| **सार्वजनिक प्रसंग :** सण, संस्थांचे सुवर्णमहोत्सव, देशाचा स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, नववर्ष, उद्‌घाटन, शुभारंभ (नाटक, चित्रपट इ.) | | काय बोलतोस, खरंच की काय! | नववर्ष भरभराटीचे जावो! |
| | | माझी छाती गर्वाने फुगली आहे! | वैवाहिक जीवनसुखाचे जावो! |
| | | आयुष्मान भव! खूप मोठा हो! | प्रगती कर, प्रगतीची शिखरे गाठ! |
| | | | वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! |

## ४ रिकाम्या जागा भरा.

१. अमन, आज तुझा वाढदिवस आहे ना? तुला ..........

२. आई गं, आज तुला ..........

.......... मला नोकरीमध्ये बढती मिळाली.

३. काय सांगतोस! तू परीक्षेत पहिला आलास? वा! किती छान बातमी दिलीस.

..........

४. आज मी खूप आनंदी आहे. तुला मुलगी झाली ही बातमी ऐकून

..........

५. काय बोलतोस! खरंच की काय? म्हणजे तुला अमेरिकेत पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळाली? वा! मला तुझा खूप अभिमान वाटतो. असाच ..........
कर आणि ..........!

## ५ योग्य प्रतिक्रिया देऊन खालील संभाषण पूर्ण करा.

१. **अमन** : बाबा, एक आनंदाची बातमी आहे. मी आज कॉलेजच्या वक्तृत्व स्पर्धेत पहिला आलो.

**बाबा** : ..........! (ऐकून छान वाटणे)

२. **सुमन** : आजी, आज माझा वाढदिवस आहे. नमस्कार करते!

**आजी** : ..........! (आशीर्वाद देणे)

३. **सागर** : सचिन, ऐक ना, एक .......... (चांगली बातमी देणे) आपल्या खडूस बॉसची बदली झाली!

**सचिन** : काय सांगतोस! खरंच की काय?

४. **बाळू** : दादा, ऐक ना, एक मस्त बातमी आहे. मी नवीन गाडी घेतली.

**दादा** : .......... (आनंद वाटणे आणि अभिमान वाटणे)

५. **सोनाली** : राधा, ऐक ना, ..........

.......... (नवीन घर घेतल्याची बातमी सांगणे)

**राधा** : वा! खूप छान वाटलं ऐकून. चला, तुझ्या मेहनतीचं फळ मिळालं.

## ६ शब्दयोगी अव्यये लिहा.

(बद्दल, सोबत, बरोबर, शिवाय, सारखं, साठी)

**ओजसी :** ए रोहित, तू येतोयस ना (मी) (१) .................... ? मी व्यायाम करायला जातेय.

**रोहित :** व्यायाम... छेः गं! तेवढं सोडून काहीही सांग.

**ओजसी :** अरे, तुझ्या पोटाचा घेर पाहिलास का? कोनातल्या (आईस्क्रीम) (२) .................... दिसतंय. किती जाड झालायस!

**रोहित :** जाड काय; उलट बारीक झालोय मी. उगीच दुखवू नकोस मला.

**ओजसी :** बारीक? तू? कोणी रे सांगितलं तुला? आणि मी तुला दुखावत नाहीये. (तू) (३) .................... आपुलकी वाटते ना म्हणून बोलतेय. व्यायाम (करणे) (४) .................... तू रुबाबदार कसा दिसणार? चल ना ...

**रोहित :** हं... विचार करतो.

**ओजसी :** विचार नाही! (मी) (५).................... तुला यावंच लागेल. मैत्रीण आहे ना मी तुझी? मग येतोयस ना (मी) (६).................... व्यायामशाळेत?

**रोहित :** हो गं बाई, येतो. चल, जाऊ या.

## ७ खालील तक्ता पूर्ण करा.

| उदा॰ **मी + कागद** | **माझा कागद** | **माझ्या (कागद + वर)** |
|---|---|---|
| आम्ही + अर्ज | .................... | .................... अर्जावर |
| आपण + वर्ग | .................... | .................... वर्गाकडे |
| तू + हात | .................... | .................... हातावर |
| तुम्ही + वेळ | .................... | .................... वेळेवर |
| आपण + ओढ | .................... | .................... ओढीने |
| ती + बाग | .................... | .................... बागेचा |
| ती + संध्याकाळ | .................... | .................... संध्याकाळी |
| ते + घर | .................... | .................... घराला |
| ते + पुस्तक | .................... | .................... पुस्तकासोबत |
| ते + झाड | .................... | .................... झाडाखाली |
| ती + काम | .................... | .................... कामाचे |

## ८ जेरी कुठे आहे? रिकाम्या जागी शब्दयोगी अव्यये वापरून लिहा.



उदा॰ खोक्यावर   १. .................. २. .................. ३. ..................

४. .................. ५. .................. ६. ..................

**तुम्ही तयार केलेले शब्द वापरून जेरीची गोष्ट लिहा.**

## ९ तरी, निदान, आता तरी?

हॅलोऽऽऽ माय डिअर डायरी,

आज एक गंमत झाली. तुला रोज मी त्या ओमबद्दल सांगत असतेच. मी कितीही त्याच्याशी बोलायचा प्रयत्न केला, (१) .................. हा आपला गप्पच! मी म्हणते बोलू नकोस, पण (२) .................. बघ तरी माझ्याकडे! मुलं मुलींना पटवायला कित्ती गोष्टी करतात! फिरायला नेतात, भेटवस्तू आणतात आणि हा बघ! आता माझ्यासारखी हुशार स्मार्ट मुलगी तुला भाव देतेय, (३) .................. मला टाळू नकोस. पण याचं काहीतरी भलतंच! तो मला आवडतो, हे त्याला माहितेय तर (४) .................. बघून हसेल तरी की नाही! पण छे!

बरं, ते जाऊ दे. आज काय घडलं, ते ऐक आधी. आज चक्क त्या ओमने माझ्याशी गप्पा मारल्या. इतके दिवस या गोष्टीची वाट बघितली. शेवटी आज तो क्षण आला. माझं लक्ष त्याच्या बोलण्याकडे कमी आणि त्याच्याकडेच जास्त होतं, हे तुला सांगायलाच नको. त्याला गणिताच्या नोट्स हव्या होत्या. खरं तर नाही गं आवडत गणित मला. पण आता मात्र गणित आवडत नसलं, (५) .................. त्याच्यासाठी मी नोटस् पूर्ण करणारेय. चल, कामाला लागते आता. बाय. मी आज खूप खूश आहे!

**१०** **काही मित्रांनी प्रदर्शन बघायला जायचे ठरवले आहे. त्यांच्या ग्रुपवरचे संभाषण वाचा. नक्की किती जण जात आहेत प्रदर्शन बघायला?**

**सुशांत :** अरे सुमित, परवा जाऊ या का प्रदर्शन बघायला?

**सुमित :** हो, जाऊ या ना! कोण कोण येतंय त्यांनी हात वर करा.

**सुशांत :** मी आणि तू, आपण दोघे नक्की आहोत. केतनपण येईल. काय रे केतन?

**सुमित :** म्हणजे तिघे झालो आपण. मंदार, तुझं काय?

**सुशांत :** मी, तू, केतन आणि... हो की ! मंदारपण आहे ना! चौघे झालो. बाकीच्यांचं काय?

**सुमित :** बरं झालं मंदार येतोय. नाही तर 'तीन तिघाडा, काम बिघाडा'!

**११** **अंक / अपूर्णांक परिचय : (एक चतुर्थांश / पाव, अर्धे / निम्मे, पाऊण / तीन चतुर्थांश, दुप्पट, तिप्पट, चौपट, पाचपट इत्यादी)**

| | |
|---|---|
|  | एक अख्खे थालीपीठ |
|  | पाऊण / तीन चतुर्थांश थालीपीठ |
|  | अर्धे / निम्मे थालीपीठ |
|  | पाव / एक चतुर्थांश / चतकोर थालीपीठ |
| पगार x २ | दुप्पट पगार |
| पगार x ३ | तिप्पट |
| पगार x ४ | चौपट |
| पाच आणि पुढे : अंक + पट | पाचपट |

# भाषा

## ६












## चला, शिकू या...

- भाषेबद्दल बोलणे
- इच्छा व्यक्त करणे
- कारण आणि परिणाम सांगणे
- प्रश्नशब्द : का?
- संयुक्त वाक्ये : कारण, त्यामुळे, म्हणून
- सामान्य नामांची सामान्यरूपे
- 'च'चा वापर

**१ भाषा : कोणत्या देशात कोणती भाषा बोलली जाते ते सांगा.**

(हिंदी, उर्दू, इंग्रजी, बंगाली, चिनी, नेपाळी, जर्मन, फ्रेंच)

१. 
२. 
३. 
४. 

५. 
६. 
७. 
८. 

**२ योग्य जाहिरात निवडा.**

१. कैवल्य दक्षिण अमेरिकेला चाललाय. त्याला अगदी गरजेपुरतं स्पॅनिश शिकायचंय. त्याच्याकडे क्लास लावायला वेळ नाहीये. त्याला सगळं झटपट शिकायचंय.

२. मीनलला तिची कंपनी एका महिन्यासाठी जपानला पाठवतेय. तिला जपानी भाषेतील 'ओ' की 'ठो' देखील येत नाही. ती दोन महिन्यांनी जपानला जाणार आहे. ती भाषा शिकण्याचे क्लासेस शोधतेय.

३. सुजय पुण्यात राहतो व तिथल्याच एका कंपनीत काम करतो. त्याची कंपनी सध्या बंगळुरूला स्थलांतरित होतेय. त्यामुळे त्यालाही बंगळुरूला जावे लागणार आहे. पण त्याला कन्नड येत नाही. त्याच्या हातात जास्त वेळ नाहीये.

४. रेश्मा गृहिणी आहे. तिला भाषा शिकायला खूप आवडतात. तिला जर्मन भाषा येते. आता तिला घरबसल्या इटालियन भाषा शिकायचीये.

५. आशुतोष एका आयटी कंपनीमध्ये कामाला आहे. त्याला बरेचदा कामानिमित्त अमेरिकेला जावं लागतं. त्याला इंग्रजी येतं पण ते जरा कच्चं आहे. तो दोन महिन्यांनी जाणार आहे.

६. आदित्यला कविता वाचायला आणि करायला फार आवडतात. त्याला विशेषतः उर्दू कविता व शायरी ऐकायला आवडते. पण त्याला उर्दू वाचायला आणि लिहायला येत नाही. त्यामुळे त्याला उर्दू शिकायचंय.

**क**

डुओलिंगो
शिका भाषा
मोबाईलवरून
आजच ॲप
डाउनलोड करा.



**ख**

भाषांची आवड आहे,
पण क्लास लावून शिकायला
वेळ नाही. घरची कामे संपत नाहीत
आणि आवडही काही कमी होत नाही!
घाबरू नका. आता घरबसल्या खालील
वेबसाईटवरून भाषा शिका.
http://www.oneworlditaliano.com/english/home.htm

**ग**

اردو

भाषा शिका, जीवन समृद्ध करा
उर्दूचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू होत आहे
१ जुलैपासून...! तर त्वरा करा
लवकर प्रवेश घ्या ! प्रवेशप्रक्रिया चालू.
अधिक माहितीसाठी
संपर्क साधा: ०२२२६१३४७५८

**घ**



नोकरीसाठी शिका इंग्रजी
आपलं व्याकरण पक्कं करून घ्या.
न्यूनगंड विसरा आणि
फाडफाड इंग्रजी बोलायला शिका.
अधिक माहितीसाठी संपर्क साधा –
०२०३५४६५७६८

**च**




अकॅडमी ऑफ फॉरेन लँग्वेजेस
आमच्याकडे सर्व परकीय भाषा
शिकवल्या जातील.
अधिक माहितीसाठी
खालील पत्त्यावर संपर्क करा
ई-१, १०१, कल्पिता टॉवर्स,
अंधेरी पूर्व, मुंबई 022 2682 0786

**छ**

ಠ – म

कन्नड – मराठी बहिणी बहिणी
शेजाऱ्यांची भाषा शिका आणि
त्यांच्याशी मोकळा संवाद साधा.
अधिक माहितीसाठी आमचा
ई-पत्ता –
learn.kannadiga@rediffmail.com

३ **वाक्ये तयार करा.**

**१. परकीय भाषा का शिकावी?**

उदा॰ करियरविषयक संधी उपलब्ध होणे.

परकीय भाषा शिकावी कारण करिअरविषयक संधी उपलब्ध होतात.

क. नव्या संस्कृतीची ओळख होणे. ..........

..........

ख. कुतूहल वाढणे. ..........

..........

ग. त्या भाषेतील साहित्य वाचता येणे. ..........

..........

घ. जगाशी संवाद साधता येणे. ..........

..........

च. ज्ञान वाढवता येणे. ..........

..........

छ. भाषांतर करता येणे. ..........

..........

ज. व्यवसाय करता येणे. ..........

..........

झ. चांगल्या नोकरीची संधी उपलब्ध होणे. ..........

..........






२. 'म्हणून' / 'त्यामुळे' हे शब्द वापरून वरील वाक्ये पुन्हा लिहा.

उदा॰ करिअरविषयक संधी उपलब्ध होतात म्हणून परकीय भाषा शिकावी.

क. ..........

ख. ..........

ग. ..........

घ. ..........

च. ..........

छ. ..........

ज. ..........

झ. ..........

जगभरात निजभाषकांची संख्या (दशलक्ष)



४ खालील तक्ता पाहून विचार करा आणि जोड्या लावा.

| देश | पारंपरिक पेहराव | भाषा | खाद्यविशेष / पेयविशेष | निजभाषकांची संख्या (दशलक्ष) |
|---|---|---|---|---|
| १. केनिया |  | जपानी | लस्सी  | २२९ |
| २. इंग्लंड |  | हिन्दी | ब्लॅक फॉरेस्ट केक  | ४२० |
| ३. स्पेन |  | मँडरीन | उगाली  | १२७ |
| ४. भारत |  | फ्रेंच | सुशी  | ४९० |
| ५. जर्मनी |  | स्वाहिली | बरिटो  | ११ |
| ६. फ्रान्स |  | स्पॅनिश | फिश न चिप्स  | १०५१ |
| ७. चीन |  | जर्मन | क्रेप  | ५१० |
| ८. जपान |  | इंग्लिश | नूडल्स  | १३० |

| देश | भाषा | खाद्यविशेष / पेयविशेष | निजभाषकांची संख्या (दशलक्ष) |
|---|---|---|---|
| उदा० केनिया | स्वाहिली | उगाली | ११ |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

आणि मराठी?

## ५ आंतरराष्ट्रीय शब्द

प्रत्येक भाषेप्रमाणे मराठी भाषेतही सतत बदल होत आहेत आणि पुढेही होत राहतील. सभोवतालची परिस्थिती, वेगवेगळ्या संस्कृती आणि भाषांशी कळतनकळत होणारा संपर्क, अशी अनेक कारणे यासाठी देता येतील. गेल्या काही शतकात अनेक भाषांमुळे मराठीत बदल झाले. त्याची काही उदाहरणे म्हणजे अरबी / फार्सी, इंग्रजी, पोर्तुगीज अशा अभारतीय भाषांतून मराठीत आलेले शब्द. याखेरीज अनेक भारतीय भाषांतूनही मराठीने शब्द घेतले आहेत. प्रथम पाहू या अभारतीय भाषांमधून मराठीत आलेले शब्द.

**खालील शब्द कोणत्या भाषेतून आले आहेत ते ओळखा.**

| शब्द | भाषा | | |
|---|---|---|---|
| | अरबी / फार्सी | पोर्तुगीज | इंग्रजी |
| १. पाव | | | |
| २. दरवाजा | | | |
| ३. सायकल | | | |
| ४. प्लॅस्टिक | | | |
| ५. रबर | | | |
| ६. बटाटा | | | |
| ७. पेन्सिल | | | |









## ६ जोड्या लावा.

| इंग्रजी | मराठी |
|---|---|
| १. कॉम्प्युटर | क. कार्यालय |
| २. मोबाईल | ख. वृत्तपत्र |
| ३. पेपर | ग. संगणक |
| ४. इंटरनेट | घ. चालक |
| ५. स्टेशन | च. भ्रमणध्वनी |
| ६. ड्रायव्हर | छ. स्थानक |
| ७. ऑफिस | ज. आंतरजाल / महाजाल |









## ७ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरा.

(हात, वर्ग, दिवस, पाय, देव)

१. आई गं ऽ! ................ शाई लागली माझ्या.

२. “खेळता खेळता पडला अहो तो! ................ सूज आलीये.” आई फोनवर बाबांना सांगत होती.

३. मुलांनी ................ तोरण लावले.

४. आम्ही रोज संध्याकाळी ................ नमस्कार करतो.

५. शाळेत एका ................ ७ तासिका असतात.

## ८ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरा.

(डोळा, कावळा, रस्ता, आंबा, फळा)

उदा॰ या फळ्यावर किती लिहून ठेवले आहे!

१. माझ्या ................ लागले आहे.

२. स्वतःचे घरटे न बनवता ........................ घरट्यात कोकिळा अंडी देतात.

३. "........................ एवढे खड्डे पडले आहेत की पाठीचं नुसतं धिरडं होऊन जातं हो." एक त्रस्त मोटारवाहक खंत व्यक्त करत होता.

४. मला एक ........................ पेटी घ्यायची आहे.

९ रस्ता

१. ........................च्या रुंदीकरणाचे काम चालू आहे.

२. त्यानंतर ........................वर पट्टे आखण्याचे काम होईल.

३. या ........................ने पुढे गेल्यावर ........................ला दोन फाटे फुटतात.

४. ........................च्या दोन्ही बाजूंना झाडे दिसतात.

५. ........................ थुंकू नये.

१० **सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.**

**अकारान्त पुल्लिंगी** (अ → आ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| दिवस | दिवस | दिवसाला | दिवसाला |
| वर्ग | वर्ग | | |
| हात | | | |
| पाय | पाय | | |
| काळ | | | |
| शिक्षक | | | |
| देव | | | |

११ **सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.**
**आकारान्त पुल्लिंगी** (आ → या)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| रस्ता | | | |
| डोळा | | | |
| दिवा | | | |
| फळा | | फळ्याचे | फळ्यांचे |
| आंबा | | | |

१२ **सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून तक्ता पूर्ण करा.**
**आकारान्त पुल्लिंगी** (आ → आ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| राजा | राजे | राजाने | राजांनी |
| काका | | | |
| मामा | | | |

१३ **सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.**
**आकारान्त पुल्लिंगी** (सा → शा)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| पैसा | | | |
| मासा | मासे | | |
| घसा | | | |
| ससा | | सशाला | सशांना |

### १४ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरा.

(पैसा, काका, राजा, घसा)

१. अहमदनगरच्या .................................. युद्धाचे भारी वेड होते म्हणे.

२. कुमुदच्या .................................. कागद कापण्याची विचित्रच सवय होती.

३. "उसाचा रस पिऊ या का? .................................. कोरड पडलीये."

४. ".................................. ने आनंद विकत घेता येत नाही." – "हो पण, .................................. ने आनंद देणाऱ्या गोष्टी विकत घेता येतात नं, आजोबा."

### १५ सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.

**इकारान्त पुल्लिंगी** (ई → या)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| सहकारी | | सहकाऱ्याने | सहकाऱ्यांनी |
| विद्यार्थी | विद्यार्थी | | |
| प्राणी | | | |
| शिपाई | | | |
| कोळी | | | |
| पक्षी | | | |

### १६ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरा.

(पक्षी, सहकारी, शिपाई, विद्यार्थी, प्राणी, कोळी)

१. सर्व .................................. कळवण्यात येते की, शाळेतर्फे भाषादिन साजरा करण्यात येणार आहे. तरी सर्वांनी हजर रहावे.

२. '.................................. आणि .................................. मारू नका.' निसर्गप्रेमींचे लोकांना आवाहन.

३. ........................ सांग जरा त्या दुसऱ्या मजल्यावरच्या ऑफिसातून त्या फाईली आणायला," कुणा एका कार्यालयातून आवाज आला.

४. "हा पुरस्कार मी माझ्या सर्व ........................ समर्पित करतो."

५. "इथे ........................ केवढे मोठे जाळे आहे, बघ." "हो, वापरच नाहीये न या खोलीचा."

### १७ सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.

**इकारान्त पुल्लिंगी** (ई → ई)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| भटजी | | भटजीचा | भटजींचा |
| हत्ती | | | |
| दूरध्वनी | | | |

### १८ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरा.

(भ्रमणध्वनी, हत्ती, गणपती)

१. गाडी चालवताना कृपया ........................ वापर करू नये.

२. "सर्व केळी ........................ फस्त करायला दिली. बघायला काय मजा आली!"

३. " ........................ मोदक आवडतात म्हणून एकवीस मोदकांचा नैवेद्य दाखवायचा असतो, कळलं का?" आजी आपल्या चिमुकल्या नातवंडांना सांगत होती.

### १९ खालील वाक्ये वाचून नामाचे सामान्यरूप अधोरेखित करा आणि तक्ता पूर्ण करा.

१. ए मावशे, तराजूला वजनं नाही लावलीस नं खाली? केवढीशी भाजी दिलीयेस!

२. त्या मोठ्या चेंडूला केवढं वजन आहे!

३. बाई, रंगीत खडूंनी नका लिहू. मला फक्त पांढराच रंग दिसतो.

४. प्रत्येक शिष्य आपल्या गुरूंना खूप मानतो.

२० सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.

उकारान्त पुल्लिंगी (ऊ → ऊ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| चेंडू | | चेंडूला | चेंडूंना |
| खडू | खडू | | |
| तराजू | | | |
| झाडू | | | |
| गुरू | | | |
| चिकू | | | |
| साधू | | | |

२१ सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.

ऊकारान्त पुल्लिंगी (ऊ → वा)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| भाऊ | | भावाचा | भावांचा |
| लाडू | लाडू | | |

२२ सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.

ओकारान्त पुल्लिंगी (ओ → ओ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| खो खो | | | खो खोचा |

## २३ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरा.

**१. (मन, घर, झाड, नाव, विद्यापीठ)**

क. रंगारी ........................ रंग देतो.

ख. तू परीक्षेत नापास झालास ही गोष्ट ........................ लावून घेऊ नकोस.

ग. असं कसं तुला माहीत नाही गं? प्रत्येक ........................ काही ना काही तरी अर्थ असतोच.

घ. त्या ........................ हात लावू नकोस. त्याला खूप काटे असतात. टोचतील.

च. मुंबई ........................ खूप मोठा इतिहास आहे

**२. सामान्यरूपांचा सराव**

क. (घर) ........................ दोन दरवाजे आणि सात खिडक्या आहेत.

ख. आमच्या (घर) ........................ पाच माणसे राहतात.

ग. (घर) ........................ लागूनच एक बाग आहे.

घ. (घर) ........................ लागूनच रस्ता आहे आणि पलीकडे मैदान आहे.

च. आम्ही सर्व जण (घर) ........................ कामे करतो.

छ. (घर) ........................ मागे झाडी आहे.

## २४ सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.

**ईकारान्त नपुंसकलिंगी** (ई → या)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| पाणी | | पाण्याची | |
| दही | | | |
| लोणी | | | |

ऊकारान्त नपुंसकलिंगी (ऊ → वा)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
| --- | --- | --- | --- |
| कुंकू | | कुंकवाचा | |
| गळू | | | |
| अळू | | | |

एकारान्त नपुंसकलिंगी (ए → या)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
| --- | --- | --- | --- |
| गाणे / गाणं | | गाण्याला | गाण्यांना |
| कोडे / कोडं | | | कोड्यांचे |
| जोडपे / जोडपं | जोडपी | | |
| तळे / तळं | | | |
| केळे / केळं | | | |
| भांडे / भांडं | | | |
| नाणे / नाणं | | | |
| कडे / कडं | | | |
| टाळे / टाळं | टाळी | | |

२५ **रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरा.**

(गाणे, नाणे, तळे, केळे, भांडे, टाळे)

१. “किती हाडकुळा दिसतोस! .................... बरोबर रोज दूध पीत जा. वजन वाढतं,” सुमनआजी नुकतीच दहावीची परीक्षा संपलेल्या बाळूला म्हणाल्या.

२. उत्तम ....................साठी तुला रोज सराव केला पाहिजे.

३. सुषमा न चुकता .................... एक फेरी मारते.

४. त्या जोड्याकडे खूप साऱ्या .................... संग्रह आहे.

५. .................... भांडे लागले की आवाज होणारच!

६. बोल! आता का जीभ .................... चिकटली?

२६ **सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.**

**ऊकारान्त नपुंसकलिंगी** (ऊ → आ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| लिंबू | लिंबे / लिंबं | लिंबाचा | लिंबांचा |
| कोकरू | | | |
| वासरू | | | |
| पाखरू | | | |

**अकारान्त स्त्रीलिंगी** (अ → ए)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| बाग | | बागेत | बागांत |
| वेळ | | | वेळांना |
| गरज | | | |
| रेघ | | | |
| रांग | | | |
| वाट | | | |

२७ **रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरा.**

(वाट, बाग, बॅग, रांग, वेळ)

१. “डिझाइनर .................... हजारो रुपये खर्चेल, पण साधा मेंटेनन्स वेळच्यावेळी भरणार नाही,” नीलिमा शेजारणीबद्दल बोलत होती.

२. “अहो काका .................... उभे राहा की!” – “फर्स्ट क्लासचा पास काढायला रांग नसते रे.”

३. “काय हो ही मुलं! समजावा त्यांना जरा. .................... नुसतं क्रिकेटचं मैदान करून ठेवलंय,” जोशी आजोबा ओरडत होते.

४. “ ........................................ हाजीर तोच वजीर,” बाबांनी मध्येच सवयीप्रमाणे एक वाक्य फेकले.

५. “माझ्या ........................................ जाऊ नकोस तू, कळलं का? महागात पडेल,” राजू फोनवर कोणाला तरी सांगत होता.

२८ **सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.**

**अकारान्त स्त्रीलिंगी** (अ → ई)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| रात्र | रात्री | | रात्रींचा |
| सतार | | | |
| ओळ | ओळी | | |
| विहीर | | | |
| जमीन | | | |
| धूळ | | | |

२९ **रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्दांची योग्य रूपे वापरा.**

(विहीर, जमीन, भिंत, ओळ, बहीण)

१. “ओले हात ........................................ लावू नकोस.”

२. “यंदाचा दुष्काळ फार वाईट! किती भेगा पडल्यात ........................................!”

३. “शब्दाला शब्द आणि ........................................ ओळ जुळली की झाली कविता, असं भोळं मत आहे त्या नवकवीचं.

४. “ ........................................ पाणीच नाहीये. कसं होणार आपलं पावसाशिवाय?”

५. “रमेश, ........................................ त्रास देऊ नकोस.”

## ३० सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.

**आकारान्त स्त्रीलिंगी** (आ → ए)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| भाषा | | भाषेचा | भाषांचा |
| दिशा | दिशा | | |
| शाळा | | | |
| जागा | | | |
| शिक्षिका | | | |
| परीक्षा | | | |
| कथा | | | |
| घंटा | | | |

## ३१ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्दांची योग्य रूपे वापरा.

**१. (जागा, दिशा, परीक्षा, भाषा, घंटा)**

क. शाळेच्या पाचव्या ........................ मधली सुट्टी होते.

ख. "छोट्यातल्या छोट्या ........................ सुद्धा किती भाव आलेत! घर घेणं आता स्वप्नच राहिलं आहे."

ग. प्रत्येक ........................ बोलण्याच्या लकबी वेगळ्या असतात.

घ. "त्या जोशी कुटुंबाचं काही कळत नाही बुवा! ती बाई कामावर आणि नवरा घरात. प्रवाहाच्या उलट ........................ पोहणारं जोडपं आहे."

च. "तो राहुल ना, असलाच आहे. ........................ पण वेळेवर येत नाही. निर्लज्ज!" कुसुम कुमुदला सांगत होती.

**२. शाळा**

क. आमच्या ........................ चे पटांगण खूप विस्तीर्ण आहे.

ख. ........................ तील शिक्षक खूप मेहनत घेऊन शिकवतात.

ग. ................................त विद्यार्थी खेळ आणि अभ्यास दोन्हीमध्ये रस घेतात.

घ. ..............................ला उन्हाळ्याची सुट्टी लागली की ........................................मध्ये दुरुस्तीची आणि रंगरंगोटीची कामे केली जातात.

च. ................................च्या मोकळ्या जागेत झाडे लावण्याचे काम चालू आहे.

३२ सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.

**ईकारान्त स्त्रीलिंगी** (ई → या)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| ताई | | ताईने | तायांनी |
| साडी | साड्या | | |
| गाडी | | | |
| पेटी | | | |
| आजी | | | |

३३ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्दांची योग्य रूपे वापरा.

(गाडी, खिडकी, बाटली, आजी, खोली, साडी)

१. विकतच्या पाण्याच्या ................................ सील असेल तरच विकत घ्यावे.

२. "समीर, उद्या पुण्याला जायचं आहे. लक्षात आहे ना?" – "हो बाबा, ................................ पेट्रोल भरून घ्यायचं आहे."

३. "................................ खूप छान स्वयंपाक करता येतो. गुळाची आमटी तर फारच अप्रतिम. तोंडाला पाणी सुटलंय माझ्या आत्ताच."

४. (अ॰व॰)"............................................ ब्लाउज शिवा, .............................. फॉल लावा. किती कामं आहेत आज मला बाहेर."

५. माझ्या ................................ रोज एक खार येऊन बसते.

### ३४ उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवा.

उदा॰ ती गाडी नवीन आहे. त्या नवीन गाडीचा शुभारंभ उद्या करू या.

१. ती पिशवी महाग आहे. ........................ हट्टच धरून ठेवला आहे सईने.

२. त्या साड्या जरीच्या आहेत. ........................ दक्षिणेत खूप मागणी आहे.

३. ती विद्यार्थिनी हुशार आहे. ........................ मित्रमैत्रिणी कमी आहेत.

४. ती गृहिणी कर्तबगार आहे. ........................ घर सांभाळून स्वतःचा उद्योग सुरू केलाय.

### ३५ सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.

**ऊकारान्त स्त्रीलिंगी** (ऊ → ऊ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| काकू | | काकूशी | |
| जादू | | | |
| वाळू | | | |

**ऊकारान्त स्त्रीलिंगी** (ऊ → वे)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| जाऊ | | जावेचा | |

**ओकारान्त स्त्रीलिंगी** (ओ → ओ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| बायको | बायका | | |

## ३६ रिकाम्या जागा भरा.

(बायको, जादू, बाई, जाऊ, वाळू)

१. "........................ तर जपावंच लागेल, बाबा. त्यांच्याशिवाय आपले काय?" अतुल म्हणाला.

"काय रे, तू किती ........................शी लग्न केलंयस?"

२. चौपाटीवर ........................ किल्ला करायला मजा येते.

३. माझ्या ........................ मातृभाषा कन्नड आहे.

४. लहान मुलांना ........................ गोष्टी खूप आवडतात.

## ३७ खाली दिलेल्या शब्दांपासून उदाहरणाप्रमाणे वाक्ये तयार करा.

| | |
|---|---|
| उदा॰ पुस्तक - मुखपृष्ठ - छान असणे | पुस्तकाचे मुखपृष्ठ छान आहे. |
| १. मी - शाळा - दांडी - मारणे | |
| २. टपरीचा चहा - तोंड - नसणे | |
| ३. मी - सातबंगला - जाणे | |
| ४. पेटी - खूप सामान - भरणे | |
| ५. लीलावती रुग्णालय - रस्ता - समोर - आहे | |

## ३८ सामान्यरूपे. कोणताही विभक्तिप्रत्यय लावून खालील तक्ता पूर्ण करा.

| एकवचन / अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|
| फोन | फोनला | फोनना |
| मोबाईल | | |
| कॉम्प्युटर | | |
| मिक्सर | | मिक्सरना |
| कुकर | | |
| ओव्हन | | |
| फ्रीज | फ्रीजला | |

**३९** **षष्ठीचा वापर करून शब्द लिहा.**

उदा॰ शर्ट : शर्टाचे बटण

वही, शर्ट, कुत्रा, रस्ता, चव, फाईल, बॅग, वेळ, साडी, बटण, पाय, आयपॅड, सायकल, चार्जर, चप्पल, तिकीट, सोल, किंमत, पान, बटाटावडा, दुकान, काम, महत्त्व, उपयोग, आवड, नाटक, शिधापत्रिका, चाक, छंद, प्रत, जाहिरात, साखरपुडा, वाहनचालक परवाना, भाषा, समाजसेवा

**जीभ हा मानवी शरीरातील असा एकमेव अवयव आहे जो कधीच थकत नाही.**
**– इव्हान इसार**



**४०** **भाषा आणि जीभ यांचे फार जवळचे नाते आहे. पाहा, मराठीतील काही मजेशीर वाक्प्रचार.**

जिभेचे चोचले पुरवणे, जीभ रेटणे, जिभेला हाड नसणे, जीभ चुरुचुरु चालणे, जिभेवर साखर पेरून बोलणे, उचलली जीभ लावली टाळ्याला, जीभ टाळ्याला चिकटणे.

२. ते समोर आले की हिची जीभ चिकटलीच ............................!

३. रोहन, अरे इतका जिभेवर ............................ पेरून गोडगोड का बोलतोयस? पॉकेटमनी वाढवून हवा आहे का?

४. अरे मुलांनो, किती भांडताय! आणि काय ही तुमची भाषा! श्शी! जिभेला काही ............................ आहे की नाही?



**येतोय का वरील वाक्प्रचारांचा अर्थ लक्षात? रिकाम्या जागा भरा.**

१. चिंगीची जीभ एरवी कशी ............................ चालते. पण बाबांना फार घाबरते ती.

२. ते समोर आले की हिची जीभ चिकटलीच ............................!

३. रोहन, अरे इतका जिभेवर ............................ पेरून गोडगोड का बोलतोयस? पॉकेटमनी वाढवून हवा आहे का?

४. अरे मुलांनो, किती भांडताय! आणि काय ही तुमची भाषा! श्शी! जिभेला काही ............................ आहे की नाही?



# तोंडी परीक्षा - एकूण गुण ३०

## १. वाचन व आकलन (एकूण १२ गुण)

**१. पुढील उतारा वाचून दाखवा.** **(३)**

भाषा

जगभरात तुम्ही कुठेही जा, संवाद साधण्यासाठी भाषेवाचून तुम्हाला दुसरा काही पर्याय नाही. या आधुनिक जगात आपल्याला गुगलवर सगळं एका क्षणात कळतं. पण तुम्हाला माहीत आहे का, की फक्त भारतातच एकूण २३४ मुख्य भाषा आणि १२२२ बोलीभाषा आहेत? त्यातील २४ मुख्य भाषा या कोणाच्या ना कोणाच्या तरी मातृभाषा आहेत. प्रत्येक भाषेवर एक किंवा त्यापेक्षा अधिक परकीय भाषांचा प्रभाव आहे. भाषातज्ज्ञांच्या मते भारतीय भाषांवर फारसी आणि इंग्रजी भाषांचा सगळ्यात जास्त प्रभाव आहे. संस्कृत, तमिळ, तेलगु, उडिया, कन्नड, मल्याळम्, बंगाली आणि मराठी या भाषांना भारतीय समाजात एक उच्च दर्जा आहे. भारतात राज्यांची विभागणी ही भाषेनुसार केली आहे. साधारणपणे ज्या प्रादेशिक भाषांच्या उच्चारांत आणि लेखनात साम्य आहे ते सगळे प्रदेश आपल्याला नकाशात जवळ जवळ आढळून येतात. भारतीय घटनेनुसार शासकीय व्यवहाराच्या एकूण २२ भाषा (राजभाषा) आहेत. इतर सर्व भाषांच्या तुलनेत हिंदी भाषेला एक वेगळा मान आहे. ती देशांतर्गत व्यवहाराची एक मुख्य भाषा मानली जाते आणि त्याचबरोबर ती छत्तीसगढ, झारखंड, दिल्ली, मध्य प्रदेश, बिहार या राज्यांची राजभाषा आहे. याच भाषेच्या बाबतीत आणखी एक समजूत आहे, की ही भारताची राष्ट्रभाषा आहे. परंतु भारतीय राज्यघटनेने हा दर्जा कोणत्याही भाषेला दिलेला नाही.

**१. चूक की बरोबर?** **(३)**

क. हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा आहे.

ख. भारतात एकूण २२ शासकीय व्यवहाराच्या भाषा आहेत.

ग. भारतीय भाषांवर उर्दू आणि अरबी भाषांचा सगळ्यात जास्त प्रभाव आहे.

**२. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.** **(३)**

क. भारतात एकूण किती बोलीभाषा आहेत?

ख. भारतीय भाषांवर कोणत्या परकीय भाषांचा प्रभाव आहे?

ग. भारतात राज्यांची विभागणी करताना कोणता निकष लावला आहे?

**३. तुम्हाला मराठी भाषा का शिकावीशी वाटते?** **(३)**

२. खालील तक्त्यातील 'कारण' आणि 'परिणाम' यांच्या पट्ट्या कापून एक गठ्ठा कारणांचा व एक गठ्ठा परिणामांचा, अशा रीतीने दोन गठ्ठे तयार करून ठेवावेत. प्रत्येक गठ्ठ्यामधील पट्ट्या पिसून ठेवा. दोन्ही गठ्ठ्यांवर अनुक्रमे 'कारण' व 'परिणाम' असे लिहिलेले असावे. परीक्षार्थ्याला हे दोन्ही गठ्ठे द्यावेत व त्याने 'कारण' आणि' म्हणून' वापरून एकूण १० वाक्ये तयार करावीत. कोणती दोन वाक्ये जोडायची हे परीक्षार्थ्याने ठरवावे. (एकूण १० गुण)

| कारण | परिणाम |
|---|---|
| नेहा - लोकांना मदत करायला आवडणे | समाजसेवा हा विषय शिकणे |
| मदन - फिरायला आवडणे | नवीन गाडी, घेणे |
| आशिष - नवीन नोकरी, हवी असणे | मुंबईला येणे |
| मारिया - मुंबईला येणे | मराठी शिकणे |
| ईव्हा - मराठी शिकणे | मराठी बोलणारे मित्र मिळणे |

३. तुमची रोजनिशी पाहा आणि तुमच्या नोंदींनुसार तुमच्या मित्रांना व नातेवाइकांना शुभेच्छा द्या.

(एकूण ६ गुण)

| | |
|---|---|
| जानेवारी → | १ जानेवारी / नववर्ष आजोबांना फोन करणे आणि नववर्षाच्या शुभेच्छा देणे |
| जानेवारी → | १४ जानेवारी / मकरसंक्रांत मित्रांना शुभेच्छा देणे |
| मार्च → | १ मार्च / होळी नातेवाइकांना फोन करणे आणि शुभेच्छा देणे |
| एप्रिल → | २५ एप्रिल / भारतीचा वाढदिवस - भारतीला फोन करणे आणि वाढदिवसाच्या शुभेच्छा देणे |
| ऑगस्ट → | १ ऑगस्ट / बॉसच्या लग्नाचा वाढदिवस - त्यांना शुभेच्छा देणे |
| जून → | १३ जन / सलील स्पेनला जाणार आहे, त्याला शुभेच्छा देणे |

**४. दोन-दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या कराव्यात. प्रत्येकाने पुढीलपैकी एक भूमिका करावी. एक जण भाऊ आणि एक जण बहीण होईल आणि दोघे पुढील विषयावर संभाषण करतील. (एकूण गुण**

तुम्हाला तुमच्या आईवडिलांच्या लग्नाच्या २५व्या वाढदिवसाला त्यांना काहीतरी भेट द्यायची आहे. त्याबद्दल तुमच्या भावाशी किंवा बहिणीशी सल्लामसलत करा. पुढील चित्रात तुमच्या व तुमच्या भावाच्या / बहिणीच्या कल्पना आहेत. त्यांच्या आधारे कोणतीही एक भेट ठरवा. प्रत्येकाने निदान दहा वाक्ये बोलायची आहेत.

















# लेखी परीक्षा - एकूण गुण ७०

**१. खालील उतारा वाचा आणि त्यावरील स्वाध्याय सोडवा.** **(एकूण ९ गुण)**

भारतात जशी भाषांची विविधता आहे, तशीच भारतीय संस्कृतीत सणांमध्येसुद्धा विविधता पाहायला मिळते. अगदी वर्षाच्या सुरुवातीपासून ते वर्ष संपेपर्यंत प्रत्येक महिन्यात कोणता ना कोणता तरी सण साजरा केला जातो. धर्मानुसार सण वेगवेगळे असतातच, पण एकाच धर्मात वेगवेगळ्या प्रदेशानुसारही ते वेगळे आणि वेगळ्या नावांनी साजरे होत असतात. उदाहरणार्थ महाराष्ट्रात ज्याला 'बैलपोळा' म्हणतात त्याला कर्नाटकात 'बेंदूर' म्हणतात. प्रत्येक सणाची आपली अशी एक खासियत आहे. हिंदू समाजात नववर्षाची सुरुवात 'मकरसंक्रांत' या सणापासून होते. या दिवशी मराठी लोक काळ्या रंगाचा पोशाख परिधान करतात. एकमेकांना तिळगूळ देतात आणि 'तिळगूळ घ्या आणि गोड बोला' असं आपुलकीने म्हणतात. त्यानंतर 'होळी' हा सण येतो. या दिवशी एकमेकांच्या अंगावर रंग उडवतात. जेवणात पक्वान्न म्हणून पुरणपोळी असते. यानंतर 'गुढीपाडवा' हा सण येतो. त्या दिवशी सूर्योदयाबरोबर गुढी उभारून तिची पूजा केली जाते. या दिवशी नव्या कामाची सुरुवात केली जाते. घरात एखादी नवीन वस्तू आणली जाते. लहान मुलांना प्रथमच शाळेत दाखल केले जाते. या दिवसापासून हिंदू नवीन वर्षाची सुरुवात होते.

त्यानंतर येतो तो 'गणेशोत्सव'. तो सार्वजनिक आणि घरगुती अशा दोन पद्धतींनी साजरा केला जातो. या सणाच्या निमित्ताने 'मोदक' हा खास मराठी गोड पदार्थ घरोघरी केला जातो. गणपती हे लहान मुलाचं अत्यंत लाडकं दैवत आहे. शेवटच्या दिवशी गणपतीचं पाण्यात विसर्जन केलं जातं. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या', असं म्हणत त्याला निरोप दिला जातो.

यानंतर येतो तो 'नवरात्र' हा देवीचा सण. नावाप्रमाणेच हा सण नऊ दिवस चालतो. रोज रात्री देवीची पूजा केली जाते. हा खास स्त्रियांचा आणि मुलींचा सण असतो. या काळात त्या अनेक पारंपरिक खेळ खेळतात आणि गाणी म्हणतात. दहाव्या दिवशी दसरा नावाचा सण असतो. याही दिवशी नवे उपक्रम सुरू केले जातात आणि नवे संकल्प सोडले जातात.

नंतर येणारा 'दिवाळी' हा सण महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात अतिशय उत्साहाने साजरा केला जातो. चार दिवसांचा हा सण प्रकाशाचा आणि समृद्धीचा सण म्हणून साजरा होतो.

**१. खालील चित्रे कोणते सण सूचित करतात ते लिहा.** **(५)**







**२. खालील प्रश्नांची दोन वाक्यात उत्तरे लिहा.** **(४)**

क. गणेशोत्सव कसा साजरा केला जातो?

ख. गुढीपाडवा या सणाची खासियत काय?

## २. व्याकरण (एकूण १६ गुण)

**१. दिलेल्या शब्दयोगी अव्ययांपैकी योग्य ती वापरून वाक्य पूर्ण करा.** **(५)**

(बद्दल, बरोबर, सारखं, शिवाय, साठ)

क. मी आणि महेश एकत्र अभ्यास करतो.

मी नेहमी महेश अभ्यास करतो.

ख. मी एकटा नाही सिनेमाला जाणार.

रोहीत ........................ मी सिनेमा बघत नाही.

ग. मेघनाचं अक्षर किती छान आहे.

तिच्या ........................ लिहायला मला जमत नाही.

घ. छान साडी आहे ना ही?

ही मी प्राजक्ता ........................ घेतेय.

च. किती स्तुती करतोयस?

कोणा ........................ बोलतोयस तू?

**२. कंसातील योग्य शब्द रिकाम्या जागी भरा.** **(५)**

(आता तरी, तरी, निदान, आता तरी, निदान)

क. छान झोप झालीय ना? ........................ अभ्यासाला बस.

ख. मी मनापासून काम केलंय. पगारवाढ नाही, ........................ प्रशंसेचे चार शब्द तरी बोला.

ग. त्यांची तब्येत बरी नव्हती, ........................ ते व्याख्यानाला आले.

घ. अरे, पावसाचा जोर वाढलाय. ........................ छत्री उघड.

च. माझं ऐकत नाहीसच तू, पण ........................ डॉक्टर सांगताहेत म्हणून तरी औषध घे.

३. **पुढील वाक्यांतील रिकाम्या जागी सर्वनामांची योग्य रूपे लिहा.** **(६)**

क. (ते) .................................. आग्रहामुळे मी गाणं म्हटलं.

ख. वेलींवर फुले फुलली होती. (ती) .................................. सुगंध हवेत दरवळत होता.

ग. (आम्ही) .................................. शेजारी एक मोठे कलाकार राहतात.

घ. (मी) ..................................बरोबर तीसुद्धा येतेय नाटकाला.

च. (ती) ..................................कडे खूप छान कल्पना असतात गोष्टी लिहिण्यासाठी.

छ. आईने (तू) ..................................साठी किती कष्ट उपसले, आठवतंय ना?

## ३. शब्दसंपदा (एकूण २८ गुण)

१. **खालील तक्ता पूर्ण करा.** **(११)**

| लिंग | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| | पतंग | |
| | बातमी | |
| | वाढदिवस | |
| | | काळज्या |
| | सोहळा | |
| | | माळा |
| | | पाने |
| | निमंत्रण | |
| | | केळी |
| | प्रसंग | |
| | वर्ष | |

**२. पुढील खाद्यपदार्थ ओळखून त्यांची नावे लिहा.** **(५)**



..............................................................................



..............................................................................



..............................................................................



..............................................................................



..............................................................................

**३. कंसातील योग्य पर्याय अधोरेखित करा.** **(६)**

क. नव्या अवघड शब्दांचा अर्थ इथे सापडतो. (वही / शब्दकोश / पुस्तक)

ख. आमच्या शाळेत प्रमुख पाहुणे म्हणून एक जपानी गृहस्थ आले आहेत. त्यांचे भाषण आम्हाला लगेच कळावे म्हणून आम्ही कोणाला बोलावणे जास्त योग्य ठरेल? (दुभाष्या/ भाषांतरकार/ भाषातज्ज्ञ)

ग. सणांच्या दिवशी साधारणपणे असे पदार्थ खातात. (गोड / आंबट / कडू)

घ. दिवाळीत घरावर लावतात तो... (राष्ट्रध्वज / गुढी / आकाशकंदील)

च. कंपासपेटीत नक्की सापडते ते... (दप्तर/ टोकयंत्र / गणित)

छ. हा सण साजरा करताना मिरवणुका निघतात. (क्रिसमस/ दिवाळी/ गणेशोत्सव)

**४. तुमच्या आवडत्या सणाबद्दल किमान दहा ओळी लिहा.** (६)

## ४. चित्रफीत (एकूण ७ गुण)

**१. चित्रफीत पाहा आणि कंसातील शब्दांची योग्य रूपे रिकाम्या जागी भरा.**

(तांदूळ, गरज, तो, मोदक, ती, भांडं, उकड)

या चित्रफितीमध्ये उकडीच्या मोदकांची पाककृती दाखवली आहे. त्यासाठी सर्वात आधी अर्चनाताईंनी उकड काढली. उकड काढण्यासाठी त्यांनी आधी एका ..................त पाणी, मीठ, तूप / तेल घेऊन ते उकळून घेतले. मग त्यात .................. इतकेच ..................चे पीठ घालून ते मिश्रण मळून घेतले. सारण तयार करण्यासाठी एक चमचा तूप, खवलेलं ओलं खोबरं, गूळ आणि वेलची पावडर याचं मिश्रण केलं आणि ते परतून घेतलं. सारण तयार झाल्यावर मळून घेतलेल्या ..................चा लहान गोळा करून ..................ची पातळ पारी केली आणि ..................च्या पाकळ्या काढल्या. त्यात सारण भरून .................. उकडून घेतले.

## ५. श्रुतलेखन (एकूण १० गुण)

मातृभाषेवर प्रत्येकाचे मनापासून प्रेम असते. आपल्या भाषेवर प्रेम नाही असा माणूस शोधूनही सापडणार नाही. भाषेचे खरेखुरे बारकावे ती भाषा जन्मापासून बोलणाऱ्याला माहीत असतात. परक्या भाषेतील शब्द आपल्या भाषेत खुबीने सामावून घेणे फक्त एखाद्या निजभाषकालाच जमते. वेगळ्याच शब्दाला खास आपला पेहराव चढवून, आपल्या ढंगात त्याला वळवून, वाकवून त्याचा वापर केला, की तो शब्द परका न राहता आपल्या भाषेत इतका एकरूप होतो, की त्याच्या बदलेल्या रूपात तो त्याच्या निजभाषकालाही ओळखू येत नाही. आणि केवळ शब्दच नाही, तर संपूर्ण परकी भाषा शिकतानासुद्धा आपण ती भाषा आपल्या बोलण्याच्या ढंगात बोलतो. त्यामुळेच एक जर्मन, एक गुजराती आणि एक महाराष्ट्रीय अशा तीन व्यक्ती जेव्हा इंग्लिशमध्ये बोलू लागतात, तेव्हा त्यांना एकमेकांचे बोलणे समजणे अवघडच होते.

# दैनंदिन व्यवहार

## ७




## चला, शिकू या...

- ◎ रोजच्या घडामोडींवर संभाषण करणे
- ◎ व्यवसाय आणि कार्यक्षेत्रे यांबद्दल बोलणे
- ◎ द्वितीया आणि चतुर्थी विभक्ती
- ◎ प्रश्नशब्द : कोणाला
- ◎ विशेषनामांची सामान्यरूपे
- ◎ विकारी विशेषणांची सामान्यरूपे
- ◎ विध्यर्थ - असणे आणि नसणे

## १ योग्य क्रियापदांच्या जोड्या लावा.

| | |
|---|---|
| १. छंद | क. पावणे |
| २. वेळ | ख. जोपासणे |
| ३. पटापट सगळी कामे | ग. लागणे |
| ४. मरण | घ. वाया घालवणे |
| ५. टोचणी | च. आटपणे / उरकणे |

## २ खालील वाक्यांमध्ये योग्य शब्द लिहा.

(अभ्यासक्रम, स्वतंत्र व्यवसाय, विश्लेषण, पुरवणी, संगणक, उपाययोजना, उजळणी, मतभेद, महत्त्वाच्या बातम्या.)

१. मी मराठीच्या वर्गात नवीन नवीन शब्द शिकतो. ते लक्षात राहण्यासाठी आम्ही नेहमी .................................... करतो.

२. हल्ली कामात लोक कागदपत्रांचा उपयोग कमी करतात. बहुतेक कार्यालयात .................................... वापरला जातो.

३. प्रदीपला नोकरी करायची इच्छा नाही, म्हणून तो .................................... करणार आहे. तिथे तो स्वतःच साहेब असेल.

४. अमरला संपूर्ण वृत्तपत्र वाचायला वेळ मिळत नाही. पण तो रोज .................................... आवर्जून वाचतो.

५. सध्या शाळांचा .................................... कठीण होत चालला आहे. त्यात वेगवेगळ्या विषयांचा समावेश होत आहे.

६. स्वस्त दरात शिक्षण मिळण्यासाठी सरकारने आतापर्यंत काय .................................... केल्या आहेत?

७. 'लोकसत्ता' या वृत्तपत्राच्या 'वास्तुरंग' नावाच्या ....................................मध्ये घरखरेदी व विक्रीविषयी सगळी माहिती मिळू शकते.

८. दोन पिढ्यांमध्ये .................................... होणे स्वाभाविक आहे.

९. 'नासा'तील शास्त्रज्ञ सतत अवकाशातील घडामोडींचं .................................... करत असतात.

## ३ विशेषनामांची योग्य सामान्यरूपे करून वाक्ये बनवा.

उदा॰ मला - पांढरा - आवडतो - **आयफोन** - रंग. (चा / त)
मला पांढऱ्या रंगाचा आयफोन आवडतो.

१. सध्या – अधीन - **भारत** - सोशलनेटवर्किंगच्या - तरुण पिढी - झाली आहे. (ची / त)

.............................................................................................................

२. दंगल - **आमीर खान** - या - केला आहे - सिनेमात - अभिनय - चांगला. (चा / ने)

.............................................................................................................

३. **डिअर जिंदगी** - मन - प्रेक्षकांचे - जिंकले - निमित्ताने - **गौरी शिंदे**. (ला / च्या, ने / ची)

.............................................................................................................

४. प्रोफाईल पिक्चर - **फेसबुक** - तुझं - छान - आहे. (ला / चा)

.............................................................................................................

५. उपयोग - आजकाल - लहान मुलं - **स्मार्टफोन** - करतात. (ची / चा)

.............................................................................................................

## ४ विशेषनामांची सामान्यरूपे

ऑनलाईन विवाहमंडळ सुरू करायची तयारी संपतने आधी आपल्या मित्रमंडळींपासूनच केली. अमरावतीहून संपतने करमरकरांच्या मेधाला एक मेल पाठवली. त्यात करमरकरांच्या शीतलसाठी गायकवाडांच्या सुदीपचे स्थळ सुचवले होते. पण अमेरिकेत स्थायिक झालेल्या साठ्यांच्या आशुतोषशी अहमदाबादेत राहणाऱ्या शीतलने आधीच चॅटींग करायला सुरूवात केली होती, त्यामुळे संपतचा हा खटाटोप वायाच गेला.

**१. वरील परिच्छेदातील सर्व विशेषनामांची सामान्यरूपे झाली आहेत का, आणि असल्यास कशी ते समजून घ्यायला खालील तक्ता भरा.**

| विशेषनाम | सामान्यरूप + प्रत्यय | तयार शब्द |
|---|---|---|
| उदा॰ करमरकर | करमरकरां + च्या | करमरकरांच्या |
| क. संपत | | |
| ख. मेधा | | |
| ग. शीतल | | |

| | | |
|---|---|---|
| घ. गायकवाड | | |
| च. सुदीप | | |
| छ. अमेरिका | | |
| ज. साठे | | |
| झ. आशुतोष | | |
| ट. अहमदाबाद | | |
| ठ. शीतल | | |
| ड. संपत | | |

### ५ योग्य प्रतिक्रिया लिहा.

(मला सगळं आवडतं / मला नाही आवडत; मला नाही असं वाटत / मला असंच वाटतं; मला सगळं कळतं / तुला काही कळत नाही; मला अजिबात पटत नाही / मला सगळं पटतं; मला सगळं चालतं / मला नाही चालत; मला सगळं येतं / काही येत नाही.)

१. मोठी बहीण : अगं, किती भरभर पाणी पितेयस! जरा हळू पी. ठसका लागेल.

लहान बहीण : (मनातल्या मनात) सुरू झाल्या सूचना! (मोठ्याने) तू मला शिकवू नकोस.

(क) ........................................

मोठी बहीण : (रागात) अजिबात नाही.

(ख) ........................................ .

२. अनघा : अरे, हे अन्न शिळं आहे. खाऊ नकोस.

यश : (क) ........................................ .

अनघा : पण (ख) ........................................ .

यश : मी तुझ्यासारखा नाटकी नाहीये.

३. तेजल : आजकाल आई-वडील मुलांच्या संसारात किती ढवळाढवळ करतात!

कनक : (क) ........................................ .

तेजल : पण (ख) ........................................ .

४. करंदीकर : हल्ली शासन सारखे नवीन नवीन कर शोधून काढतंय.

(क) ........................................

(ख) ........................................ .

गोंधळेकर : पण सरकार गरिबांच्या भल्यासाठी करतंय, त्यामुळे

(क) ..........................................................................

(ख) .......................................................................... .

५. काका : हल्ली तरुण मुलींना स्वयंपाक येत नाही, घरातली कामं करता येत नाहीत.

सारिका : असं नाहीये काका.

(क) .......................................................................... .

काका : खरंच! पण माझ्या मुलीला

(ख) .......................................................................... .

६. माई : मला टीव्हीवर मोजकेच कार्यक्रम बघायला आवडतात.

आक्का : माझं असं काही नाही.

(क) .......................................................................... .

अगदी बातम्यांपासून फॅशन शोपर्यंत.

माई : फॅशन शो?

(ख) .......................................................................... .

## ६ योग्य प्रतिक्रिया लिहा.

१. हल्ली छोट्या शहरातसुद्धा गर्दी वाढतेय.

२. मी पालेभाज्या खात नाही.

३. मी वर्तमानपत्र वाचत नाही. हल्ली पत्रकार काहीही लिहितात. बरोबर ना?

४. नवीन पिढी सार्वजनिक वाहतूकव्यवस्था वापरत नाही. त्यांना खाजगी वाहनेच लागतात.

५. बँका सतत नियम बदलत असतात. माझा याला विरोध आहे.

६. मला ही नवीन फॅशन कंटाळवाणी वाटते. आधीचीच छान होती.

७. बरेचदा काही लोकांच्या डोक्यात काय शिजत असतं, काही समजत नाही, हो ना?







## ७ जोडीदार ओळखा आणि योग्य त्या जागी लिहा.

उदा. गायक - गायिका

| | |
|---|---|
| नर्तक | |
| शिक्षक | |
| | प्राध्यापिका |
| | नायिका |
| अध्यापक | |
| निवेदक | |
| | परिचारिका |
| सेवक | |
| | लेखिका |

## ८ रेशीमगाठी

**वरासाठी :**

| | स्वतःबद्दल | भावी जोडीदाराबद्दल |
|---|---|---|
| क. | मी कोमल. मी एक हसतमुख आणि आनंदी स्वभावाची मुलगी आहे. पुस्तके वाचणे व नृत्य करणे हे माझे छंद आहेत. मी जर्मन भाषा या विषयात पदवी घेतली आहे तसेच ग्योथं इन्स्टिट्यूटमध्येही जर्मन शिकले आहे. मला जगप्रवास करण्याची अतिशय इच्छा आहे. | माझा भावी जोडीदार समंजस व प्रामाणिक असायला हवा. डोक्याने शांत आणि मनाने स्वच्छ हवा. आमच्या आवडीनिवडी जरी सारख्या नसल्या तरी एकमेकांना खूश ठेवण्याची आमची वृत्ती असावी. दुसऱ्यांचीसुद्धा बाजू ऐकण्याची आणि समजून घेण्याची क्षमता त्याच्यात असावी. |
| ख. | मी खुशबू. मी वाणिज्य शाखेतील पदवीधर आहे आणि मुंबईत सध्या एका कंपनीत लेखाधिकारी म्हणून पूर्ण वेळ जॉब करत आहे. मी माझ्या पालकांसोबत राहते. मला भावंडे नाहीत. पुस्तके वाचणे, गाणी ऐकणे हे माझे छंद आहेत. त्याचबरोबर मला छायाचित्रीकरणाची आणि प्रवासाचीसुद्धा आवड आहे. | नवरा उच्चशिक्षित असावा. सुस्वभावी आणि समजूतदार असावा. आर्थिकदृष्ट्या सबळ असावा आणि त्याचे स्वतःच्या मालकीचे घर असावे. लग्नानंतर काम करण्याच्या बायकोच्या इच्छेला त्याचा विरोध नसावा. शक्यतो मुंबई-पुण्यातला असावा. वयात जास्त अंतर नको. |

| | | |
|---|---|---|
| ग. | मी गौरी. मी उंचीने कमी, सावळी आणि मध्यम बांध्याची मुलगी आहे. मी एका उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेली, सर्वांची लाडकी, माझ्या आई-बाबांची एकुलती एक मुलगी आहे. माझे एम.एससी झाले असले तरी मी 'ई-कॉमर्स' क्षेत्रात कार्यरत आहे. मला वाचायला खूप आवडते. जेन ऑस्टेन ही माझी आवडती लेखिका असल्यामुळे मी तिची सर्व पुस्तके वाचून काढली आहेत. मला घरकामाची आवड नाही. माझा स्वभाव अगदी मनमिळाऊ नसला तरी माझे कुटुंब व नातेवाईक माझे सर्व काही आहेत. | चांगला मित्र बनू शकेल असा जोडीदार मला हवा आहे. नेहमीच्या अपेक्षा तर आहेतच : चांगली नोकरी, उत्तम पगार आणि स्वतःचे एक घर. जास्त शिकलेला नसला तरी चालेल, पण किमान पदवीधर पाहिजेच. एकमेकांच्या आवडी अगदी तंतोतंत जुळणाऱ्या नसल्या तरी काही हरकत नाही, पण मने जुळणे अत्यंत महत्त्वाचे. समवयाचा असावा किंवा वयात २-३ वर्षांचे अंतर चालेल. त्याला नवीन गोष्टी करायला आणि अनुभवायला आवडत असेल तर फारच छान! |

**वधूसाठी :**

| | स्वतःबद्दल | भावी जोडीदाराबद्दल |
|---|---|---|
| क. | मी प्रसाद. मी पत्रकारितेचे शिक्षण घेतले असून सध्या फ्रीलान्स एडिटर म्हणून पुण्यात स्थायिक आहे. मी पुरोगामी विचारांचा असून 'जुनं तेच सोनं' असे मानत नाही. मी सुस्वभावी आणि मनमिळाऊ आहे, असे मला वाटते. वाचन, पोहणे, व्यायाम करणे आणि मित्रांना भेटणे हे माझे काही छंद. तसेच मी हिंदुस्थानी शास्त्रीय पद्धतीत / शैलीत व्हायोलिन शिकत आहे. हौशी कुक आहे. | माझी भावी बायको उच्चशिक्षित आणि स्वावलंबी हवी. लग्नानंतरही नोकरी करण्याची अथवा पुढील शिक्षणाची तिची इच्छा असावी. शक्यतो सडपातळ असावी. पुरोगामी विचारांची आणि काळाला अनुसरून जगणारी हवी. कला आणि साहित्याची आवड असेल तर उत्तमच! जात, धर्म आणि ठिकाण यांचे बंधन नाही. |
| ख. | मी शिशिर. मी एक व्यावसायिक आहे. माझ्या कुटुंबाचा कपड्यांचा पारंपरिक धंदा आहे. तोच मी सध्या सांभाळत आहे. मला एक धाकटी बहीण आहे. माझ्या पालकांचे आता वय झाले आहे त्यामुळे सर्व जबाबदाऱ्या माझ्या खांद्यांवर आहेत. मी अत्यंत सरळ आणि साध्या स्वभावाचा आहे. मी साधा राहतो, साधेच जेवतो, साधे बोलतो आणि माझे आचरणही साधेच आहे. मला कसलेही व्यसन नाही. | माझी भावी जोडीदार माझ्या प्रत्येक निर्णयात मला साथ देणारी असावी. माझ्या खांद्याला खांदा भिडवून माझ्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यास मदत करणारी असावी. माझ्या आई-वडिलांची तिने काळजी घेऊन संपूर्ण घर सांभाळावे. व्यवस्थित स्वयंपाक करता आला पाहिजे. सुस्वभावी आणि मनमिळाऊ असावी. शिक्षणाविषयी कोणत्याही अपेक्षा नाहीत. |

**१. कोमल, खुशबू आणि गौरीचे नातेवाईक त्यांच्या अटी व अपेक्षा काही स्थळांना सांगतायत. वाचा आणि ओळखा ते कोणाबद्दल बोलतायत.**

क. ..........

तिला वयात जास्त अंतर नकोय. दोघांच्या आवडीनिवडी एकसारख्या असणे तिच्यासाठी महत्त्वाचे नाही. मुलाचे स्वतंत्र असे घर असावे. उच्चशिक्षित नसला तरी चालेल. मुलाने तिच्याशी मनमोकळेपणाने व मित्रत्वाने वागावे.

ख. ..........

मुलाने बायकोला समजून घ्यावे. वयात कमी अंतर असावे. स्वतःच्या नावावरचे घर असावे. पुरोगामी विचारांचा मुलगा असावा.

ग. ..........

मुलगा समजूतदार असावा. आवडी-निवडी भिन्न असल्या तरी हरकत नाही. दोघांनीही एकमेकांच्या इच्छांचा आदर करावा आणि एकमेकांना आनंदात ठेवावे.

**२. खालील अपेक्षा कोणी व्यक्त केल्यायत ते सांगा.**

क. माझी भावी बायको उच्चशिक्षित आणि स्वावलंबी हवी. पुरोगामी विचारांची आणि काळाला अनुसरून जगणारी हवी. ..........

ख. माझी भावी जोडीदार माझ्या प्रत्येक निर्णयात मला साथ देणारी असावी. सुस्वभावी आणि मनमिळाऊ असावी. शिक्षणाविषयी विशेष अपेक्षा नाहीत. ..........

**३. वेगवेगळ्या पद्धतीने अपेक्षा व्यक्त करा.**

उदा॰ चालेल / चालणार नाही. सिगारेट ओढणारा चालेल. सिगारेट ओढणारा चालणार नाही.

क. असावा / असू नये

ख. हवा / नको

ग. असणे महत्त्वाचे / नसणे महत्त्वाचे

घ. पाहिजे / नको

च. असेल तर छान नसेल तर मुळीच नको

छ. असेल तर हरकत नाही / हरकत आहे





## ९ 'सैराट'




**१. गाळलेल्या जागा भरून या चित्रपटाबद्दल लिहा.**

क. गेल्या बऱ्याच दिवसांपासून 'सैराट' विषयीच्या .................... पोस्ट्स, हॅशटॅग आणि .................... चर्चांना उधाण आले आहे. ( विविध / उलटसुलट)

ख. सध्या ॲक्शन, .................... किंवा .................... चित्रपटांना प्राधान्य दिले जाते. (थरारक / विनोदी)

ग. अशातच 'सैराट'च्या निमित्ताने दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी रिंकू राजगुरू आणि आकाश ठोसर या .................... अभिनेत्यांच्या साथीने प्रेक्षकांच्या मनाचा ....................च ठाव घेतला आहे. (नवा / चांगला)

घ. .................... वयात प्रेमात पडणे, ते प्रेम घरच्यांनी समजून न घेणे, आणि त्यातूनच घेतले जाणारे .................... निर्णय या गोष्टींचे दिग्दर्शकाने चांगलेच निरीक्षण केले आहे. (अल्लड / चुकीचा)

च. या गोष्टी दिग्दर्शकाने चित्रपटामध्ये .................... दृश्यांच्या माध्यमातून मांडण्याचा .................... प्रयत्न केला आहे. (प्रभावी / चांगला)

छ. .................... आणि .................... संवादांच्या मदतीने या चित्रपटाने बाजी मारली आहे. (सरळ / साधा)

ज. रिंकू राजगुरूने आजच्या काळातील .................... आणि .................... मुलीची भूमिका अगदी छान साकारली आहे. (बिनधास्त / बडबडा)

झ. आणि म्हणूनच ती .................... तसेच .................... पिढीला भावते. (जुना / तरुण)

ट. 'परश्या' हा त्याच्या .................... आणि .................... स्वभावामुळे सगळ्यांनाच हवाहवासा वाटतो. (शहाणा / खट्याळ)

ठ. तरीही एका टप्प्यानंतर चित्रपट फारच .................... जात आहे असे वाटते. (ताणला)

ड. कलाकारांच्या .................... आणि .................... अभिनयासाठी हा चित्रपट एकदा तरी नक्की पहावा. (चांगला / सहज)

२. वरील सराव परत वाचा. खालील शब्दांचे अर्थ ओळखा आणि जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| क. दिग्दर्शक | भीती नसलेला |
| ख. बिनधास्त | आवडणे |
| ग. भावणे | पटकथेचे चित्रपटात रूपांतर करणारी व्यक्ती. |

३. जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| क. चर्चांना उधाण येणे | एखादी गोष्ट कशी आहे याचा अभ्यास करणे |
| ख. प्राधान्य देणे | (नाटकात / चित्रपटात) एखादी व्यक्तिरेखा उभी करणे. |
| ग. मनाचा ठाव घेणे | एखाद्या विषयावर खूप चर्चा होणे. |
| घ. निरीक्षण करणे | एखाद्याच्या मनाच्या तळाशी जाणे. |
| च. भूमिका साकारणे | महत्त्व देणे |

४. खालील संवाद वाचा आणि एकमेकांशी इतर चित्रपटांचे नाव वापरून पुन्हा संवाद साधा.

**जुईली :** 'सैराट' हा चित्रपट बराय का?

**आदित्य :** हो, खूपच चांगलाय.

**शिवानी :** ए नाही हं! माझ्या मते तरी तो चित्रपट इतका काही छान नाहीये.

**आदित्य :** का गं? छान न वाटण्यासारखं काय आहे त्यात?

**शिवानी :** तो फारच मोठा आणि नकारात्मक आहे.

**जुईली :** पण त्यात तर नवीन अभिनेते आहेत ना?

**आदित्य :** हो, त्यांचा अभिनय मात्र फारच सुंदर झालाय.

**शिवानी :** हो, हे मात्र खरं आहे.

**जुईली :** मग तो थिएटरमध्ये बघण्यासारखा आहे की नाही?

**शिवानी :** हो, हो, त्यांच्या अभिनयासाठी तरी तो नक्कीच बघण्यासारखा आहे.



## १० अर्थपूर्ण वाक्य तयार करा.

१) कर्णधार विराट - यशस्वी - नव्हता - आतापर्यंत

२) लंडनमध्ये राहणाऱ्या - तिची आई - लताशी - स्काईपवर - गप्पा मारते - दर शनिवारी

३) नव्या चित्रपटात - कथा - आमीर खानच्या - सांगितली आहे - गीता फोगटची

४) खूप मेहनत - अमेरिकेला - कुमारांच्या लेकाने - केली आहे - जाण्यासाठी

५) माहिती - नुकतीच - पुण्यातील - ऐकली - शनिवारवाड्याविषयीची - रेडिओवर - मी

## ११ कुणाचं काय स्वप्न आहे? 'असणे' आणि 'नसणे' यांची योग्य विध्यर्थी रूपे लिहा.

१. बाबांना वाटतं पटापट कामं संपवण्यासाठी एक झक्कास आयपॅड ........................ आणि कुठेही झटपट पोचण्यासाठी घरी चार गाड्या ........................ .

२. आईचं स्वप्न? घरी ........................ भांड्यांचा ढिगारा आणि ........................ सगळ्यांच्या डब्याची धावपळ.

३. ताईला वाटतं, मैत्रिणीशी गप्पा मारायला मोबाईलमध्ये ........................ खूप सारा बॅलन्स आणि कपाटात ........................ प्रत्येक प्रसंगासाठी नवे नवे कपडे.

४. मला वाटतं घरात ........................ खाण्यापिण्याची रेलचेल आणि कधीच ........................ गृहपाठाची कटकट.

५. आमच्या आजीला मालिका पाहण्यासाठी मोठा टीव्ही ........................ असं वाटतं.

६. आजोबांना मात्र अजूनही सर्वांकडे त्यांच्याशी गप्पा मारायला वेळ ........................ असं वाटतं.

## १२ योग्य पर्याय निवडा.

१. मी दूध आणायला गेलो होतो, पण दुकान बंद असल्यामुळे / ........................ मला दूध मिळाले नाही.

क) दुकान बंद होते, म्हणून ख) दुकान बंद राहते ग) दुकान बंद असेल

२. कामगारांना चांगलं काम करण्यासाठी पगार देण्यात येत आहे / ........................

क) पगार दिला आहे ख) पगार देत आहे ग) पगार दिला होता

३. पोलिसांमुळे कार्यक्रम बंद करण्यात आला / ........................

क) बंद करायला हवा ख) बंद केला आहे ग) बंद करू या.

४. राजाला चिकन आणायला पैसे देण्यात आलेले आहेत / ........................

क) पैसे दे ख) पैसे दिले पाहिजे ग) पैसे दिलेले आहेत.

५. तुम्ही सांगितलेले एकही काम करण्यात आले नाही / ........................

क) काम केलेले नाही ख) काम करायचे नाही ग) काम नाही.

## १३ रिकाम्या जागा भरा.

(शिवाय, बद्दल, सारखा, जवळ, मुळे, सोबत, कडे, बरोबर)

**ट्रॅफिक हवालदार :** लायसन्स दाखवा!

**तुषार :** काय झालं हवालदारसाहेब?

**ट्रॅफिक हवालदार :** नाहीये का लायसन्स तुमच्याजवळ? पावती फाडू?

**तुषार :** अहो थांबा, आहे (१) माझ्या.................................! पण झालं तरी काय?

**ट्रॅफिक हवालदार :** (२) तुमच्या................................. मागे किती ट्रॅफिक खोळंबलं ते बघितलं नाही का? कुठं उलट्या दिशेनं गाडी घातलीये? एकेरी मार्ग आहे, माहीत नाही? गाडी मागं घ्यायला सांगितली तर का घेतली नाहीत?

**तुषार :** अहो, मी शिकाऊ आहे अजून आणि (३) माझ्या................................. नेमकं आज चालवणारं कोणी नव्हतं.

**ट्रॅफिक हवालदार :** अहो शिकाऊ आहात आणि ‘एल’ न लावता चालवताय?

**तुषार :** अहो, म्हणजे शिकून झालंय. माझं लायसन्सपण आहे; पण सराव नाहीये म्हणून जरा प्रॉब्लेम झाला. नाहीतर (४) सोबती................................. नाही चालवली मी गाडी कधी.

**ट्रॅफिक हवालदार :** काय हो, (५) तुमच्या................................. फॅमिलीवाला माणूस आणि अशी कारणं देताना लाज वाटत नाही?

**तुषार :** जाऊ द्या ना साहेब. पुढच्या वेळी काळजी घेईन. (६) माझ्या................................. माझी मैत्रीण गाडीत आहे.

**ट्रॅफिक हवालदार :** आजकालची पिढी ही अशीच. कशाविषयी आणि कोणाबद्दल काहीच आदर वाटत नाही.

**तुषार :** अहो, असं नाहीये! (७) सगळ्यां................................. वाटतो आदर. मी म्हणतो नं, माझी चूक झाली!

**ट्रॅफिक हवालदार :** बरं बरं, जा आता! आणि तो 'एल’ लावून घ्या पुन्हा.

**तुषार :** हो हो. थँक यू. खरंच आभारी आहे.

# करावे तसे भरावे

८















## चला, शिकू या...

- विध्यर्थ, आज्ञार्थ : सकारात्मक / नकारात्मक
- सर्वनाम / नाम + तृतीया
- कधीतरी / काहीतरी
- सूचना देणे / सल्ला देणे / नियम सांगणे
- हवंय / नकोय
- जिथे / तिथे, जिकडे / तिकडे, ज्याने / त्याने, ज्याच्याशी / त्याच्याशी, ज्याला / त्याला
- आधी / मग, पूर्वी / आत्ता, अगोदर / नंतर
- जोडक्रियाविशेषणे : इकडेतिकडे, रात्रीअपरात्री ...

१ 'ने' / 'नं' किंवा 'शी' यांपैकी योग्य प्रत्यय लावून रिकाम्या जागी कंसात दिलेल्या शब्दांची योग्य रूपे लिहा.

१. (तो) .................... गाडी रस्त्याकडेला थांबवली.

२. मी (गडबड) .................... दुसरीकडे पाहायला लागलो.

३. मजा येते (ती) .................... गप्पा मारायला.

४. इन्स्पेक्टर (तो) .................... बोलला.

५. त्याच्याकडे बघताना असं जाणवलं की, कुणी तरी (आपण) .................... बोलावं असं त्याला वाटतंय.

६. कसं बोलायचं असतं अशा वेळी मोठ्या (माणसं) ....................?

७. आम्ही (दोघं + ही) .................... दचकून वळून बघितलं.

८. वेग कमी करून (तो) .................... मागेपुढे पाहिलं.

९. (माणूस) .................... भांडावं. चांगलं कडकडून भांडावं अन् मोकळं व्हावं.

**२. खालील वाक्ये उदाहरणाप्रमाणे पूर्ण करा. सर्व विशेषनामे आदरार्थी वापरायची आहेत. विशेषनामात होणाऱ्या बदलाकडे लक्ष द्या.**

उदा. सखदेवांनी काढलेलं चित्र भोसल्यांनी पुसलं.

१. (शर्मा) (क) .................... काढलेली रांगोळी (सामंत) (ख) .................... पुसली.

२. (जोशी) (क) .................... केलेला नियम (आपटे) (ख) .................... मोडला.

३. (भिडे) (क) .................... लिहिलेले पत्र (कलमकर) (ख) .................... फाडले.

४. (टिळक) (क) .................... लिहिलेले गाणे (वैद्य) (ख) .................... गायले.

५. (सुराणा) (क) .................... सांगितलेला निरोप (गुजर) (ख) .................... मिळाला.





## ३ खालील तक्त्यात क्रियापदांची विध्यर्थी रूपे भरा.

१. क्रियापद अकर्मक असल्यास त्याचे रूप कायम नपुंसकलिंगी, एकवचनी असते.

| | | तू | तुम्ही | आपण |
|---|---|---|---|---|
| उदा. | जाणे | जावेस / जावंस | जावे / जावं | जावे / जावं |
| क. | येणे | | | |
| ख. | धावणे | | | |
| ग. | थांबणे | | | |
| घ. | असणे | | | |
| च. | झोपणे | | | |

२.

| | | तू | त्याने | त्यांनी |
|---|---|---|---|---|
| उदा. | पळणे | पळावेस / पळावंस | | |
| क. | रडणे | | | |
| ख. | हसणे | | | |
| ग. | चालणे | | | |
| घ. | भेटणे | | | |
| च. | येणे | | | |

## ४ खालील व्यक्तींना काय सल्ला द्याल?

| | उदा. विद्यार्थ्यांना | ख. |
|---|---|---|
| १. | मैत्रिणीला | |
| २. | भावाला | |
| ३. | आजोबांना | |
| ४. | शर्वरी आणि अदितीला | |
| ५. | अनोळखी व्यक्तीला | |
| ६. | आईला | |
| ७. | वडिलांना | |
| ८. | मयूर आणि श्यामला | |
| ९. | आजीला | |

क. हळू बोलावंस
ख. हळू बोलावं

ग. रागवू नयेस
घ. रागवू नये

## ५ विध्यर्थ

**१. रिकाम्या जागी कंसातील क्रियापदांचे विध्यर्थी रूप लिहा.**

(मागे फिरणे, लोळणे, पळणे, कळणे, तळणे)

उदा॰ प्रिय मित्रा, तू ज्या रस्त्याने जात आहेस तो खूप घातक आहे.

तू मागे फिरावेस असे मला वाटते.

क. मित्रा, तुझ्या प्रेयसीचा भाऊ तुला धमकावायला येत आहे.

.................................. असे मला वाटते.

ख. प्रिये, तुझ्या आवडीच्या भज्यांसाठी अडीच किलो कांदे पाठवत आहे.

.................................. असे मला वाटते.

ग. मित्रांनो, इतक्या उदाहरणांनंतर तरी माझा मुद्दा बरोबर आहे

हे तुम्हाला .................................. असे मला वाटते.

घ. आणि तुम्ही हसून हसून

.................................. असे मला वाटते.

**२. पुढील कवितेतील रिकाम्या जागी कंसातील क्रियापदांचे विध्यर्थी रूप लिहा.**

(चालणे, राहणे, ठसवणे, पाहणे, जगणे, धरणे)

क.
चेहऱ्यावर स्मित हास्य
नेहमी बाळगून ..................................

ख.
येणाऱ्या जाणाऱ्याकडे
आनंदाने ..................................

ग.
जगात आहेत खूप भांडणतंटे
आपण शांत ..................................

घ.
सतत तोंडात मध आणि
मस्तकी बर्फ ..................................

च.
सत्याने वागून नेहमी
जीवन आपुले ..................................

छ.
प्रत्येक क्षण हेच जीवन
हेच मनी ..................................

६ खालील तक्त्यात क्रियापदांची विध्यर्थी रूपे भरा.

| | | उतारा / उतारे | कविता | पत्र / पत्रे / पत्रं |
|---|---|---|---|---|
| उदा. | वाचणे | (ए.व.) वाचावा<br>(अ.व.) वाचावे(त) | वाचावी<br>वाचाव्या(त) | वाचावे / वाचावं<br>वाचावी(त) |
| १. | बघणे | | | |
| २. | लिहिणे | | | |
| ३. | पाहणे | | | |

| | | आंबा / आंबे | पपई / पपया | फळ / फळे / फळं |
|---|---|---|---|---|
| ४. | खाणे | | | |
| ५. | धुणे | | | |
| ६. | आणणे | | | |

| | | प्रश्न | समस्या | प्रकरणे / प्रकरणं |
|---|---|---|---|---|
| ७. | मांडणे | (ए.व.)<br>(अ.व.) | | |
| ८. | वाढवणे | | | |
| ९. | मिटवणे | | | |

| | | आनंद | काळजी / काळज्या | कौतुक / कौतुके / कौतुकं |
|---|---|---|---|---|
| १०. | वाटणे | | | |

| + तृतीया | तो शर्ट | ते शर्ट | ती पँट | त्या पँट्स | ते जॅकेट | ती जॅकेट्स |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | मी शर्ट घालावा. / काढावा / घ्यावा / धुवावा | मी शर्ट घालावे(त). काढावे(त). घ्यावे(त). धुवावे(त). | मी पँट घालावी. काढावी. घ्यावी. धुवावी. | मी पँट्स घालाव्या(त). काढाव्या(त). घ्याव्या(त). धुवाव्या(त). | मी जॅकेट घालावे / घालावं. काढावे / काढावं. घ्यावे / घ्यावं. धुवावे / धुवावं. | मी जॅकेट्स घालावी(त). काढावी(त). घ्यावी(त). धुवावी(त). |
| आम्ही / आपण | मी शर्ट घालावा / काढावा / घ्यावा / धुवावा | | | | | |
| तू | तू शर्ट घालावास / काढावास / घ्यावास / धुवावास | | | | | |
| तुम्ही / आपण | तुम्ही / आपण शर्ट घालावा(त). / काढावा(त). / घ्यावा(त). / धुवावा(त). | | | | | |
| तो / ती / ते | त्याने / तिने / त्याने शर्ट घालावा. / काढावा / घ्यावा / धुवावा. | मी शर्ट घालावे(त) काढावे(त). घ्यावे(त). धुवावे(त). | मी पँट घालावी. काढावी. घ्यावी. धुवावी. | मी पँट्स घालाव्या(त). काढाव्या(त). घ्याव्या(त). धुवाव्या(त). | मी जॅकेट घालावे / घालावं. काढावे / काढावं. घ्यावे / घ्यावं. धुवावे / धुवावं. | मी जॅकेट्स घालावी(त). काढावी(त). घ्यावी(त). धुवावी(त). |
| ते / त्या / ती | त्यांनी शर्ट घालावा / काढावा / घ्यावा / धुवावा | | | | | |

## ८ सल्ला द्या.

सबीहा व तिची जिवलग मैत्रीण किआरा यांच्यात जोरदार भांडण झाले आहे. चूक सबीहाची आहे आणि ते तिला मान्यही आहे; पण आता काय करावे ते कळत नाहीये. तिला योग्य तो सल्ला द्या.

उदा॰ स्वत:ची चूक मान्य करणे - तू स्वत:ची चूक मान्य करावीस.

१. माफी मागणे - ..........

२. नमते घेणे - ..........

३. पुढाकार घेणे - ..........

४. स्वत:हून फोन करणे - ..........

५. स्वत:हून मेसेज करणे - ..........

## ९ पुढील ई-मेल वाचा आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

दिनांक : २०.०४.२०१६

प्रिय सौरभ,

कसा आहेस, बाळा? तू तिकडे गेल्यापासून मला चैन पडत नाहीये. खूप आठवण येते. आता तुला जाऊन दहा दिवस झालेत. म्हणून पत्र लिहितेय.

रमलास का आता तिथे? सगळं सामान नीट लावलंस ना? घरी करतोस तसा इकडेतिकडे पसारा करू नकोस. स्वत:च्या वस्तू नीट जागच्या जागी ठेव.

अभ्यासाकडे लक्ष दे. टंगळमंगळ करू नकोस. शिस्तीनं अभ्यासाचं वेळापत्रक आखून घे. तब्येतीची काळजी घे. अरबटचरबट खाणं, वेळीअवेळी जेवणं असं काही करू नकोस. दुखणंखुपणं बारीकसारीक असलं तरी दुर्लक्ष करू नकोस. वेळेवर उपचार कर आणि पथ्य सांभाळ. रात्रीअपरात्री वाचन करू नकोस. रोज वेळेवर झोप, पूर्ण झोप घे आणि सकाळी लवकर ऊठ. सकाळी उठून व्यायाम, प्राणायाम, सूर्यनमस्कार नियमितपणे कर. त्यानं शरीर आणि मन दोन्ही निरोगी राहायला मदत होते.

रिकामा वेळ चांगल्या कामांमध्ये घालव. आजूबाजूचा परिसर फिरून पाहा. तिथली माणसं, त्यांची जीवनशैली यांचं निरीक्षण कर. आणि या सगळ्याची तुझ्या दैनंदिनीमध्ये नोंद कर. अवांतर वाचनही कर अधूनमधून.

सगळ्यांशी नीट, शिस्तीनं आणि नम्रपणे वाग. प्रामाणिक राहा. हे सगळं खरं तर तुला सांगायची गरज नाही. पण आईचं मन आहे ना! काळजी वाटते, म्हणून लिहितेय हे सगळं.

माझ्या पत्रांना वेळेवर उत्तरही लिही, हं! मी वाट पाहतेय.

तुझी आई.

**१. पुढीलपैकी क्रियाविशेषणे ओळखा आणि तक्ता पूर्ण करा.**

क. इकडेतिकडे      ख. टंगळमंगळ      ग. अरबटचरबट

घ. वेळीअवेळी      च. बारीकसारीक      छ. दुखणंखुपणं

ज. रात्रीअपरात्री      झ. आजूबाजूचा      ट. अधूनमधून

| क्रियाविशेषणे | इतर शब्द |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |

**२. वरील पत्र विध्यर्थ वापरून लिहा.**

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

### १० रिकाम्या जागी क्रियापदाचे योग्य ते रूप लिहा.



मिंटूने केले फ्रुटसॅलड



**साहित्य** – केळे १, चिक्कू १, चेरी ५-६, अननस १ काप, सफरचंद २ काप, संत्रे १, साखर २ चहाचे चमचे, ताजे क्रीम १ वाटी

**कृती** - सर्व फळांचे लहान तुकडे करून (घेणे) (१)........................................ . क्रीममध्ये साखर घालून नीट (ढवळणे) (२) ........................................ . एका उभ्या काचेच्या भांड्यात सर्व फळे घालून त्यावर क्रीम, साखरेचे मिश्रण घालून नीट (मिसळणे) (३)........................................ . सर्वात वर चेरी घालून (सजवणे) (४) ........................................ .

### ११ चित्र पाहा आणि वाक्ये बनवा.

| | |
|---|---|
|  | |
|  | उदा. त्याने स्वच्छता ठेवावी. |

| | |
|---|---|
|  | |
|  | |
|  | |

## १२ परीक्षाकेंद्रातील सूचना



**१. योग्य ते क्रियापद निवडून त्याचे योग्य ते विध्यर्थी रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.**
(पाळणे, न बोलणे, ठेवणे, पाहणे, लिहिणे, जोडणे, पाहणे, घेणे, पोचणे, वाचणे)
उदा॰ परीक्षाकक्षात शांतता पाळावी.

परीक्षा चालू असताना विद्यार्थ्यांनी एकमेकांशी (क) ............................................ .

घरून निघताना पेन आणि पेन्सिल नीट तपासून (ख) ............................................ .

पेन्सिलीला टोक करून (ग) ............................................ .

बॉलपेनचे रिफिल भरलेले आहे ना हे तपासून (घ) ............................................ .

आपले हॉल तिकीट न विसरता बरोबर (च) ............................................ .

परीक्षेच्या वेळेआधी निदान १५ मिनिटे परीक्षाकक्षात (छ) ............................................

उत्तरपत्रिकेवर आधी परीक्षार्थी क्रमांक (ट) ............................................

उत्तरपत्रिकेला सर्व पुरवण्या नीट (ठ) ............................................

उत्तरपत्रिका देण्याआधी सर्व उत्तरे परत एकदा नीट (ड) ............................................

**२. जोड्या लावा.**

क. वाचनालयात शांतता पाळा. १. 

ख. खानावळीत बाहेरचे खाद्यपदार्थ आणू नका. २. 

ग. प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांना स्वतःजवळील पदार्थ खायला देऊ नका. ३. 

घ. वाचनालयाची पुस्तके वेळेवर परत करा. ४. 

च. शाळेचे आवार स्वच्छ ठेवा. ५. 

छ. उगीचच हॉर्न वाजवू नका. ६. 

ज. आपल्या परिसरात झाडे लावा. ७. 

झ. पाणी जपून वापरा. ८. 

## १३ रिकाम्या जागा भरा.

| काय | वर्गात काय करावे | वर्गात काय करू नये |
|---|---|---|
| उदा॰ हळू बोलणे (मोठ्याने बोलणे) | हळू बोलावे | मोठ्याने बोलू नये. |
| १) शांतता राखणे (दंगा करणे) | | |
| २) स्वच्छता ठेवणे (घाण करणे) | | |
| ३) शिक्षकांच्या प्रश्नांची उत्तरे देणे (उत्तरे न देणे) | | |
| ४) शिकवण्याकडे लक्ष देणे (इकडे-तिकडे लक्ष देणे) | | |



## १४ उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवा.

**आजोळी चाललोय राहायला, आईच्या सूचना संपतच नाहीत! ती म्हणते -**

उदा॰ वेळेवर उठणे - चिंगी, वेळेवर ऊठ!

दिवसात दोन वेळा दात घासणे, वेळेवर अंघोळ करणे, खूप वेळ टीव्ही न बघणे, जेवताना न सांडवणे, भावंडांशी न भांडणे, आजी-आजोबांचे ऐकणे, सुट्टीतील गृहपाठ पूर्ण करणे, घरकामात मदत करणे, खूप मज्जा करणे.

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................



.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

## १५ माझा योगाभ्यास

दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचे गट करा. प्रत्येक गटाने एक चित्र निवडून हे आसन कसे करावे हे उदाहरणाप्रमाणे इतरांना सांगा.



उदा॰ ताठ उभे रहा. कमरेत वाकून डोके गुढघ्याला लावा. दोन्ही तळहात मागे जमिनीवर ठेवायचा प्रयत्न करा.



क. ..................................................



ख. ..................................................



ग. ..................................................



घ. ..................................................



च. ..................................................



छ. ..................................................



ज. ..................................................

## १६ कधी काय करावेसे वाटते?

**१. उदाहरणाप्रमाणे क्रियापदाला '-ताना' प्रत्यय जोडून वाक्ये तयार करा आणि त्यातली गंमत पहा.**

उदा॰ तुला गाणं म्हणावंसं कधी वाटतं? (खेळणे, जेवणे, अंघोळ करणे)

मला अंघोळ करताना गाणं म्हणावंसं वाटतं. मला जेवताना गाणं म्हणावंसं वाटतं. मला खेळताना गाणं म्हणावंसं वाटतं.

क. तुला झोपावंसं कधी वाटतं? (सिनेमा बघणे, खेळणे, अभ्यास करणे)

मला .......................................................................................................................................................

ख. मिनूला रडावंसं कधी वाटतं? (शाळेत जाणे, लाडू खाणे, नवा फ्रॉक घालणे)

मिनूला .......................................................................................................................................................

ग. सुशांतला शिट्टी मारावी असं कधी वाटतं? (क्रिकेट मॅच बघणे, मारामारी करणे, चित्र काढणे)

सुशांतला .......................................................................................................................................................

घ. सुमितला चहा प्यावासा कधी वाटतो? (फिरायला जाणे, गाडी चालविणे, दमलेले असणे)

सुमितला .......................................................................................................................................................

च. निरंजनला कॉफी प्यावीशी कधी वाटते? (पाऊस पडत असणे, वेळ नसणे, दूध संपलेले असणे)

निरंजनला .......................................................................................................................................................

**२. क्रियापदाला '-ताना' प्रत्यय जोडून खालील वाक्ये पूर्ण करा.**

उदा॰ खेळ (खेळणे) खेळताना नियमांचे पालन करावे.

क. आजकाल लहान मुलंसुद्धा स्मार्टफोन (वापरणे) ........................................ दिसतात.

ख. काळाबरोबर तंत्रज्ञानसुद्धा प्रगत (होणे) ........................................ दिसते.

ग. सामजिक परिस्थितीवर प्रतिक्रिया (देणे) ........................................ विचार करावा लागतो.

घ. (जेवणे) ........................................ टीव्ही बघू नये.

च. ग्रंथालयात पुस्तक वाचत (असणे) ........................................ शांतता राखावी.

## १७ वाक्ये पूर्ण करा.

(तो (x२) / त्याने (x३) / ज्याला (x३) / ज्याची / त्याला (x३) / ज्याने / जो (x३)

१. आजकाल ........................ उठतो, ........................ मराठी शिकतो.

२. ........................ चहा हवा, ........................ चहा घ्यावा आणि ........................ कॉफी हवी, ........................ कॉफी घ्यावी.

३. ........................ वर्गात नेहमी दंगा करतो, ........................च बाईंनी मॉनिटर केले आहे.

४. ........................ ........................ मुकाट्याने आपापले काम करावे.

५. ........................ बॅट, ........................ कॅप्टन.

६. ........................ उशीर होईल, ........................ शिक्षा मिळेल.

७. ........................ पहिला येईल, ........................ बक्षीस मिळेल.

## १८ "आधी लगीन कोंढाण्याचे, मग रायबाचे", म्हणाले तानाजी मालुसरे.

**कंसातील शब्द वापरून उदाहरणाप्रमाणे वाक्ये तयार करा.**

(आधी, अगोदर, नंतर, पूर्वी, मग)

उदा॰ आधी अभ्यास, मग परीक्षा.



## १९ जान्हवीला सोडून गेलेला तिचा मित्र



हो हो, मीच तो टिनू.

तोच मी, जान्हवीला सोडून जाणारा तिचा जिवलग मित्र!
मित्र हो, रागावलात ना माझ्यावर ? पण...

**१. खालील उताऱ्यात उदाहरणाप्रमाणे मोकळ्या जागा भरा.**

जान्हवी माझी खूप जवळची मैत्रीण आहे. पण

उदा० जिने मला आधार दिला, तिलाच मी सोडले.

(जिच्याहून - तिला, जिने - तिला, जी - तिला, जिच्याशी - तिच्याकडे, जिच्यात - तिला, जिला - तिला)

क. ........................ माझ्यासाठी आई-वडिलांचा राग ओढवून घेतला, ........................ मी सोडले.

ख. ........................ माझ्यासाठी स्वतःची नोकरी सोडावी लागली, ........................ मी सोडले

ग. ........................ माझ्यासाठी काहीही करायला तयार असे, ........................ मी सोडून आलो.

घ. ........................ खेळताना वेळ कसा जायचा हे कळायचेही नाही, ........................ मी पाठ फिरवली.

च. ........................ जगात काहीही मोठे नाही असे मला वाटायचे, ........................ मी सोडले.

छ. ........................ माझे मन गुंतले होते, ........................ मी दूर लोटलं.

**२. योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

वाटलं ना असंच तुम्हाला? पण याला कारण मी एकटा नाही, तर टीना आहे. टीना कोण?

उदा० जिला पाहताच माझ्या हृदयाचा ठोका चुकला, ती टीना.

(जिच्यात - ती, जिच्यामागे - ती, जिला - ती, जिचा - ती, जिच्याहून - ती)

क. ........................ आवाज ऐकूनच मी वेडा झालो, ........................ टीना.

ख. ........................ भेटण्यासाठी मी आतुर झालो, ........................ टीना.

ग. ........................ माझं हृदय गुंतलं, ........................ टीना.

घ. ........................ सुंदर कोणी असूच शकत नाही असं मला वाटलं, ........................ टीना.

च. म्हणूनच ........................ मी धावलो, ........................ टीना.



अगदी मागे वळूनही पाहिलं नाही मी. पण तुम्हीही रागावू नका. बघा, मला इथे कोण सापडलंय! आहे की नाही मस्त पोरगा? आवडेल ना जान्हवीला?

## २० खालील पत्र वाचा आणि पुन्हा लिहून काढा.

(चंद्र, हनुमान, सूर्य, वड, नमस्कार, तारा, पत्र, राम, त्रिमूर्ती, किल्ला, बस, १०-२, २८८, २९, ए-२, दिवा-२, बी-२, कुत्रा, कंदील, रांगोळी, दरवाजा, टीव्ही, पंधरा, १९९२, क्रिकेट, फराळ, टी, के, साप, कमला, शिवाजी, ५, इ.)

**गमतीचं पत्र**

**वाचा आणि लिहून काढा.**

||श्री||


.................... बंगला,


.................... मंदिराजवळ,

४५०-१६२ ....................  .................... नगर,

पुणे, २१-१६ .................... .

दि. ४०-२०+९ ...................., ७+३ ...................., ३९८४÷२ ....................

प्रिय  .................... कांत यांना सप्रेम  .................... वि.वि.,

मी ५+७-२ .................... दिवसांपूर्वी  .................... ने Aकटा ....................

 गावहून येथे मामांकडे आलो.  ....................ळीची सुट्टी मजेत जात आहे.

 ....................ळीत मी,  ....................कर, बेB .................... व

 ....................कांतने  .................... केला,

 .................... बनवला,  ....................पुढे  ....................

घातली. रोज सकाळी  .................., दुपारी  ..................,

रात्री  .................. असा खूप मजेचा कार्यक्रम चालू आहे. मामांनी मला

E  ..................नीती, B ..................रबलच्या गोष्टी आणि

श्री  ..................कथा ही पुस्तK .................. दिली. मामांनी

A ........क  .................. पाळला आहे. त्याचे नाव T ..................पू.

 .................. पाठव.

कळावे.

तुझाच,

 ..................नाथ

**टीप :**

**‘कळावे’**

पत्र लिहून झाल्यावर आपण खाली लिहितो ‘कळावे’.

पण याचा पत्रातील आधीच्या मजकुराशी काही संबंध असतोच असे नाही.

  

# तोंडी परीक्षा – एकूण गुण ३०

## १. वाचन व आकलन (एकूण ९ गुण)

**१. पुढील उतारा वाचून दाखवा.** **(३)**

**व्यवसाय आणि कार्यक्षेत्रे**

आज जर आपण कुठल्याही तरुण-तरुणीला विचारलं, की तुझं स्वप्न काय? तर या प्रश्नावर एकच उत्तर मिळेल : माझं स्वतःचं असं एक कुटुंब असावं, एक छानशी नोकरी आणि सुंदर गाडी असावी. आता तुम्ही म्हणाल, की छानशी नोकरी म्हणजे नक्की कशी बुवा? तर, सध्या आपल्या अवतीभवती विविध कार्यक्षेत्रं आणि व्यवसाय दिसतात. उदाहरणार्थ बांधकाम, शेअर बाजार, सॉफ्टवेअर इंजिनीअरिंग इ. तसं बघितलं, तर या सगळ्याच क्षेत्रांमध्ये भरपूर पैसा कमावण्याची संधी असते, पण त्यासाठी त्या क्षेत्रांचं सखोल ज्ञान असण्याची गरज आहे. समाजातले काही ठरावीक लोक सोडले, तर इतर लोक सहसा या कार्यक्षेत्रांकडे वळत नाहीत आणि आपल्या शिक्षणाला साजेशी एखादी नोकरी शोधून चाकोरीतलं जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. परंतु हल्ली वेळच अशी आली आहे, की चांगलं शिक्षण घेऊनही चांगलं उत्पन्न देणारी नोकरी सहज मिळतच नाही. त्यामुळे लोक जोडव्यवसाय किंवा मासिक उत्पन्नाचं आणखी एक माध्यम म्हणून शेअर बाजाराकडे वळू लागले आहेत. जिथे तुम्हाला तुमच्या गुंतवणुकीच्या तुलनेत चांगलं उत्पन्न मिळण्याची संधी असते असं संपूर्ण जगभरात शेअरबाजार हे एक माध्यम आहे.

सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचं युग असल्यामुळे सॉफ्टवेअर क्षेत्रात खूप संधी आहेत. या क्षेत्रात पुस्तकी ज्ञानाबरोबर तुम्हाला ते किती उत्तमपणे अंमलात आणता येतं हेसुद्धा बघितलं जातं. त्याचबरोबर तुमची कल्पकतादेखील बघितली जाते. त्यामुळे या तिन्ही गोष्टी ज्याच्याकडे असतील तो या क्षेत्रात श्रेष्ठ मानला जातो. अशा उमेदवाराला कंपनी मागेल तेवढं वेतन द्यायला तयार असते. हेच सॉफ्टवेअर इंजिनिअर्स देशाच्या तांत्रिक विकासातदेखील महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

आणखी एक प्रतिष्ठित कार्यक्षेत्र म्हणजे वैद्यकीय व्यवसाय. या पेशाला विशेष असं मानाचं स्थान आहे. डॉक्टर स्वतःचा विचार न करता, वेळ पडली तर २४ तास उपलब्ध असतात. हातातली स्वतःची सगळी कामं बाजूला ठेवून रोग्यांच्या हाकेला तत्परतेनं 'ओ' देतात. त्यामुळे जगभरातले सर्वच समाज त्यांना'देव' मानतात. त्यामुळे चांगल्या उत्पन्नाबरोबरच कामातलं समाधान आणि समाजाचं प्रेम हीसुद्धा या क्षेत्राची मोठी जमेची बाजू आहे.

**२. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.** **(३)**

क. वरील उताऱ्यात कोणत्या व्यवसायांचा व कार्यक्षेत्रांचा उल्लेख झाला आहे?

ख. सॉफ्टवेअर इंजिनिअर बनण्यासाठी कोणत्या गुणांची आवश्यकता असते?

ग. डॉक्टरांना 'देव' का मानलं जातं?

३. तुमच्या आत्ताच्या किंवा आवडीच्या व्यवसायाबद्दल थोडे सांगा. (३)

## २. खालीलपैकी एका चित्राचे किमान दहा वाक्यांत वर्णन करा. (एकूण ५ गुण)

चित्रांचे वर्णन करण्यासाठी काही प्रश्नांची मदत : चित्रात कोण दिसत आहे? चित्रातील व्यक्ती काय करत आहेत? चित्रामध्ये इतर काय दिसत आहे? चित्रामध्ये कोणता विषय मांडला आहे? त्या विषयासंबंधीचे तुमचे काय मत आहे?









## ३. योग्य सल्ला किंवा सूचना द्या. (कोणतेही तीन) (एकूण ६ गुण)

१. तुमची मैत्रीण आंघोळ न करताच पोहायला उतरते.

२. तुमच्या मित्राचे पोट सुटले आहे.

३. तुमचा विद्यार्थी प्रश्नपत्रिकेतील सूचना न वाचताच उत्तरपत्रिका लिहायला लागतो.

४. तुमचे आजोबा पायात बूट न घालताच रस्त्यावर जातात.

५. तुमचा मित्र माहिती नसताना कुठल्याही विषयावर त्याचे मत व्यक्त करतो.

६. तुमचा मुलगा बाहेरून आल्यावर हात न धुताच जेवायला बसतो.

## ४. संभाषण करा. (एकूण १० गुण)

**दोन-दोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करा आणि खालीलपैकी एका प्रसंगावर एक संभाषण सादर करा.**

क. एका कंपनीचा बॉस तुमची मुलाखत घेतोय आणि अचानक तुमचं पोट दुखायला लागतं.

ख. तुम्ही नोकरीसाठी एका कंपनीत मुलाखतीसाठी आला आहात, मात्र तुमचे दाखले तुम्ही रस्त्यात कुठेतरी हरवले आहेत.

ग. खरं तर तुम्हाला बढती मिळायला पाहिजे होती, परंतु बॉसनं दुसऱ्याच कोणाला तरी बढती दिली.

## लेखी परीक्षा - एकूण गुण ७०

**१. खालील गोष्ट वाचा आणि तिचे संवादात रूपांतर करा.** **(एकूण ८ गुण)**

**बडबडं कासव**

एका तळ्यात एक कासव राहायचं, आणि तळ्याकाठी असलेल्या गवतात दोन बगळे चरत असायचे. एका वर्षी दुष्काळ पडला आणि तळ्याचं पाणी आटलं. कासव बिचारं घाबरलं. आता काय होणार? बगळ्यांनी त्याला दुसऱ्या तळ्याकडे घेऊन जाण्याची तयारी दाखवली. पण एक अट घातली, की कासवानं संपूर्ण प्रवासात एक शब्दही बोलायचा नाही. कारण कासव खूप बडबडं आहे हे त्यांना माहीत होतं. कासवानं अट मान्य केली. दोन्ही बगळ्यांनी एका काठीची टोकं चोचीत पकडली आणि ती मधोमध तोंडात पकडायला कासवाला सांगितलं. कासवानं काठी तोंडात पकडली आणि बगळ्यांनी आकाशात भरारी घेतली. दोन्ही बगळे वेगानं अंतर कापू लागले. कासव खालचं दृश्य एवढ्या उंचीवरून पहिल्यांदाच पाहत होतं. त्याचं भान सुटलं आणि 'किती सुंदर!' असं म्हणण्यासाठी त्यानं तोंड उघडलं. त्याच क्षणी काठी त्याच्या तोंडातून सुटली. ते खाली जमिनीवर आदळलं आणि त्याच क्षणी गतप्राण झालं.

**२. व्याकरण** **(एकूण २५ गुण)**

**१. खाली दिलेल्या घटनांच्या जोड्या लावा.** **(५)**

(पाय मोडला, डिग्री मिळाली, खड्डा खणला, लॉटरी जिंकली, नोकरी लागली, गरीब होती, स्वतःच त्यात पडला, खाली पडणे, श्रीमंत झाली, लखपती झाला 'आता, आधी, नंतर, पूर्वी, आत्ता, अगोदर, मग' हे शब्द आणि वरील जोड्या वापरून पाच वाक्ये लिहा.)

**२. खालील शब्दयोगी अव्यये योग्य त्या रिकाम्या जागी भरून वाक्ये पूर्ण करा.** **(५)**

(सारखं, सोबत, शिवाय, जवळ, मुळे, बरोबर, कडे, मुळे, बरोबर, बद्दल)

पोलीस : परवान्या.................................................. स्कूटर चालवणे गुन्हा आहे, माहीत नाही का तुम्हाला?

संग्राम : हे बघा, पोलीसदादा, मला तुमच्या.................................................. वाद घालायचा नाहीये. माझ्या.................................................. आत्ता परवाना नाही, कारण मी तो घरी विसरलोय, यावर तुम्ही विश्वास ठेवणार आहात का?

पोलीस : असा कसा विश्वास ठेवता येईल? तुमच्या.................................................. कारणं

सगळेच देतील. तुमच्या .................................... तुमचं ओळखपत्र आहे का? मला तुम्ही अठरा वर्षांखालचे वाटता. तुमच्या .................................... कोणी मोठी व्यक्तीही नाही. त्या .................................... तुम्हाला माझ्या .................................... पोलीस ठाण्यात यावं लागेल.

संग्राम : त्या .................................... आपण नंतर बोलू, कारण मी घरी एसएमएस केलाय आणि कोणीतरी माझा परवाना घेऊन येतच असेल. त्या .................................... त्याची गरज पडेल असं मला वाटत नाही.

**३. कंसातील शब्दांची सामान्यरूपे रिकाम्या जागी भरा.** **(१०)**

क. (भागवत) .................................... ना बढती मिळाल्याबद्दल त्यांच्या (मोठा) .................................... भावाने त्यांना मिठी मारली.

ख. (आंबा) ....................................चा (पिवळा) .................................... रंग पाहून आणि त्याच्या (वास) .................................... ने तोंडाला पाणी सुटले.

ग. (ताजा) .................................... फुलांचे गजरे माळायला (शकुंतला) ....................................ला फार आवडते.

घ. (कोल्हापूर) ....................................त जाऊन मिसळ नाही खाल्ली, (मालवण) ....................................त जाऊन मासे नाही खाल्ले, (नाशिक) ....................................त जाऊन द्राक्षं नाही खाल्ली, तर (महाराष्ट्र) ....................................ची ओळख झाली असं कसं म्हणता येईल?

**४. मला असं वाटतं की माझं समुद्रकिनाऱ्यावर घर असावं. तुम्हाला काय वाटतं? असणे आणि नसणे यांची योग्य ती विध्यर्थी रूपे लिहून वाक्ये पूर्ण करा.** **(५)**

क. मला असं वाटतं की, माझ्याकडे आय-फोन .....................................

ख. मला असं वाटतं की, प्राथमिक शाळेत परीक्षा .....................................

ग. मला असं वाटतं की, कॉलेजातपण युनिफॉर्म .....................................

घ. मला असं वाटतं की, मुला-मुलींना समान हक्क .....................................

च. मला असं वाटतं की, कोणालाच सिगरेट ओढण्याची सवय .....................................

### ३. शब्दसंपदा (एकूण २०)

१. चित्रांवरून व्यवसाय ओळखा आणि व्यवसायांची नावे लिहा. (८)

क. 

ख. 

ग. 

घ. 

च. 

छ. 

ज. 

झ. 

### ४. पुढील चित्रफीत पाहा आणि त्यापुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (एकूण ७ गुण)

१. या कवितेत काही विरुद्ध अर्थाचे शब्द येतात. उदाहरणाप्रमाणे अशा शब्दांच्या आणखी दोन जोड्या लिहा. (२)

उदा॰ जीवन × मरण

१. .................... × ....................

२. .................... × ....................

२. कवितेचे शीर्षक 'तेच ते नि तेच ते' आहे. कविता नीट ऐका आणि पुढील शब्दांच्या नंतर येणारे योग्य शब्द लिहा. (३)

क. तोच ...................., ख. तीच ...................., ग. तेच ....................

**३. कवी सारखं 'तेच ते, तेच ते' असं म्हणतो. यातून त्याची कोणती भावना व्यक्त ते?** **(१)**

क. आनंद

ख. दु:ख

ग. कंटाळा

घ. उत्साह

**४. कवी कशाबद्दल असमाधानी / नाराज आहे?** **(१)**

क. आयुष्य

ख. मरण

ग. जेवण

घ. रोजची दिनचर्या

## ५. श्रुतलेखन (एकूण १० गुण)

दैनंदिन व्यवहारांमुळे आयुष्यात एक कंटाळवाणेपणा येतो, तो घालवण्यासाठी आपण सण-उत्सव साजरे करतो. पण काही काळाने त्या सण-उत्सवांमध्येही तोच तोपणा येतो. सण साजरे करण्याची तीच पद्धत, तेच खाणंपिणं, भेटीगाठींच्या, शुभेच्छांच्याही त्याच रीतीभाती. मी अशावेळी निसर्गाकडे बघते. किती न संपणारं वैविध्य असतं निसर्गामध्ये! स्थिर आणि शांत वाटणाऱ्या निसर्गाकडे पाहिलं, की त्यात चालणाऱ्या असंख्य, नित्यनवीन घडामोडी दिसतात. रंगांची उधळण तर सतत सुरू असते. हिरव्या, पिवळ्या, केशरी, निळ्या रंगांच्या अगणित छटा निसर्गाच्या कॅनव्हासवर उमटत असतात, मिटत असतात. ऋतूंप्रमाणे पक्षीही आपलं रंगरूप बदलत असतात. फक्त आपल्या मानवकेंद्रित जगातून बाहेर येऊन त्यांच्याकडे बघण्याची इच्छा हवी.





# भ्रमंती

९



## चला, शिकू या...

- ◎ प्रवास, सुट्टी, सहल यांबद्दल सांगणे
- ◎ मुख्य शहरांची व पर्यटनस्थळांची माहिती सांगणे
- ◎ सामान्य भूतकाळ (सकर्मक)
- ◎ विशेषनाम, सामान्यनाम, सर्वनाम, क्रियापद + शब्दयोगी अव्यय
- ◎ -ऊन, -हून, -पासून, -पर्यंत, -कडून
- ◎ प्रश्नशब्द : कोणी, कोणाशी, कुठे
- ◎ प्रश्नशब्द + शब्दयोगी अव्यय (कुठे + पर्यंत = कुठपर्यंत)

## १ जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रेक्षणीय स्थळ | क. | जगातील सर्व लोकांना ते माहीत आहे. |
| २. | जगप्रसिद्ध | ख. | विविध स्थळांना भेट देणे, प्रवास करणे. |
| ३. | किल्ले भ्रमंती | ग. | पर्यटक ह्यांना बघायला जातात. |
| ४. | पर्यटन | घ. | बहुतांशी पायी केलेली लांब अंतराची आणि कठीण सहल |
| ५. | ट्रेक | च. | विविध किल्ल्यांना भेट देऊन त्यांचा इतिहास जाणून घेणे. |

**चित्रांच्याही जोड्या लावा.**


..........................................


..........................................


..........................................


ग. उदा॰ किल्ले भ्रमंती


..........................................

## २ खाली दिलेल्या वाक्यांचे वर्गीकरण करा.

माफ करा. तिकिट खिडकी कुठे आहे? - माझा पार गोंधळ उडाला आहे - हे रेल्वेस्टेशन अजून किती लांब आहे? - मला कळलं नाही - मी रेल्वेचं तिकिट कुठे काढू शकतो? - रेल्वेस्टेशन कुठे आहे ते तुम्ही, कृपया, सांगाल का? - मी हा पत्ता शोधत आहे. - मला समजलं नाही. - एक तिकिट द्याल का? - पुन्हा एकदा सांगाल का? - मला कुठे उतरावं लागेल? - कोणत्या फलाटावरून गाडी सुटेल? - मला पुन्हा एकदा समजावाल का? - पुढची गाडी कितीला सुटेल? - गाडी किती वाजता पोहोचेल? - रेल्वेस्टेशन किती जवळ आहे?





| मला रेल्वेचं तिकिट काढायचंय. | मला माहिती विचारायचीये. | मला सांगितलेली माहिती समजत नाहीये. |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## ३ निलेश, अश्विन, ऋजुता आणि हेमांगी आठवतात ना? दिवाळीच्या सुट्टीनंतर ते सगळे परत भेटले.

यांपैकी एकाची भूमिका घेऊन तुमच्या शेजाऱ्याबरोबर संवाद साधा. तुम्ही पुढील प्रश्न विचारू शकता आणि स्वतःचे निराळे प्रश्नपण विचारू शकता. ‘सहलीला कुठे गेलात? घरातून कधी निघालात? कसे गेलात? पोचायला किती वेळ लागला? तिथे सर्वात जास्त काय आवडले? फोटो किती काढले? तिथली खासियत काय? परत जायला आवडेल का?’

४ **दिल्लीवरून आलेल्या विनयने काल पुण्यात काय काय केले ते लिहा.**








उदा॰ ६.०० झोपून (उठणे) : विनय ६.०० वाजता झोपून उठला.

६.३० चहा (घेणे) : विनयने ६.३० वाजता चहा घेतला.

७.०० पर्वती (चढून जाणे) :

.................................................................................................................................... .

९.०० पुणेरी नाश्ता (घेणे) :

.................................................................................................................................... .

११.०० राजा केळकर संग्रहालय (भेट देणे) :

.................................................................................................................................... .

१२.३० जनसेवा खाणावळ (पुणेरी थाळी खाणे) :

.................................................................................................................................... .

१३-१४ विश्रांती (घेणे) :

.................................................................................................................................... .

१४-१६ शनिवारवाडा (पाहणे) :

.................................................................................................................................... .

१६-१८ सारसबाग (फिरणे) :

.................................................................................................................................... .

१८-२१ बालगंधर्व रंगमंदिर (नाटक पाहणे) :

.................................................................................................................................... .

२१.२२ रात्रीचे जेवण (घेणे) :

............................................................................................................................................................................. .

२२.०० हॉटेल (परत येणे) :

............................................................................................................................................................................. .





### ५ मंगळवारची धम्माल

बरेच महिने झाले. ऑफीसमध्ये रोज तेच तेच काम करून कंटाळा आला होता. तेच तेच चेहरे, तोच बॉस! मग काय, कुठे तरी भटकायला जायचे होते. यावेळी काही तरी नवीन करायचे ! उद्या मंगळवार आहे. चला तर, आपण मंगळावर जाऊ या... जायचे ठरले. धवलशी आणि त्रिवेणीशी याविषयी बोललो. "मंगळ?" दोघंही लगेचच "हो" म्हणाले. भल्या पहाटे निघालो. जाता जाता एक एक सदस्य आम्ही आमच्या गटात सामावून घेतला. सुरुवातीला सगळेच घाबरले होते. पण मग एक एक करत सर्वांनीच एक धाडसी अनुभव घेतला. तिथे पोहोचलो आणि आधी काय केलं, तर पोटपूजा! सर्वांनी मंगळावरच्या मिठाईचा झक्कास नाश्ता केला. पोटभरून नाश्ता केल्यावर दंगा सुरू झाला. अंताक्षरी खेळलो. प्रत्येकाने उंचावरून पृथ्वी पाहिली. तो निळा गोल खूपच सुरेख दिसत होता. ती सुंदर दृश्ये डोळ्यांत साठवली. आणि निसर्गाचा अविस्मरणीय अनुभवही! डोळे विस्फारून मी सगळीकडे पसरलेला लाल रंग, लाल आकाश, लाल माती, लाल दगड, लाल धूळ बघत होतो, इतक्यातच बॉस खेकसला, "अरे ए तांबे... काय चाललंय काय?" डोळे उघडले तर काय... तेच चेहरे, तोच बॉस!

**१. वर दिलेल्या प्रवासवर्णनातील भूतकाळी क्रियापदे अधोरेखित करा.**

**२. अशाच पद्धतीने तुम्ही अनुभवलेल्या सहलीचे वर्णन सामान्य भूतकाळात लिहा.**

६ **तुम्ही काल काय काय केले / काल काय काय झाले? एका वाक्यात लिहा. जर तुम्ही हे केले नसेल किंवा हे झाले नसेल तर नकारात्मक वाक्य लिहा.**

उदा॰ शाळेत जाणे - मी शाळेत गेलो. / मी शाळेत गेलो नाही.

१. लवकर अंधार पडणे

.......................................................................................................... .

२. जोरात वारा सुटणे

.......................................................................................................... .

३. वीज जाणे

.......................................................................................................... .

४. नवा सिनेमा लागणे

.......................................................................................................... .

५. दुपारी झोपणे

.......................................................................................................... .

६. मोगरा फुलणे

.......................................................................................................... .

७. पिंजऱ्यातला पक्षी उडणे

.......................................................................................................... .

८. गावभर फिरणे

.......................................................................................................... .

९. आनंद होणे

.......................................................................................................... .

१०. जोरात पळणे

.......................................................................................................... .

## ७ खालील शब्दकोडे सोडवा.




**उभे**

१. दादाने खाऊ (देणे) ..............................

२. ते कामात (गढणे) ..............................

३. त्याने गोष्ट (लिहिणे) ..............................

४. तिने चित्र (पाहणे) ..............................

५. मी झाडावर (चढणे) ..............................

६. मी पेन्सिली (मोजणे) ..............................

७. बाबांनी मला सायकल (देणे) ..............................

**आडवे**

क. मला तहान (लागणे) ..............................

ख. ती मुलगी (लाजणे) ..............................

ग. आईने मुलीला खीर (पाजणे) ..............................

घ. आम्ही एकत्र (जमणे) ..............................

च. माझी मैत्रीण घरी (जाणे) ..............................

छ. माझ्या बांगड्या चोरीला (जाणे) ..............................

८ चित्र पाहून वाक्ये बनवा. अनुजने काल काय काय केले?

| | | |
|---|---|---|
| लवकर उठणे |  | उदा॰ काल अनुज लवकर उठला. |
| सकाळी दोन तास पोहणे |  | |
| पाच मैल चालणे |  | |
| खूप दमणे |  | |
| डोंगरावर चढणे |  | |
| गुहेत शिरणे |  | |
| मित्राकडे जाणे |  | |
| खूप कंटाळणे |  | |
| रस्त्यात पडणे |  | |
| मोठ्याने रडणे |  | |
| लवकर झोपणे |  | |

९ **रोहितला ऑफिसला यायला उशीर का झाला त्याची कारणे क्रियापदांची भूतकाळी रूपे वापरून लिहा.**

उदा० उशिरा उठणे

रोहितला ऑफिसला यायला उशीर झाला, कारण तो उशिरा उठला.

१. गाडी उशिरा येणे

रोहितला ऑफिसला यायला उशीर झाला, कारण ................................................................................................ .

२. बस ट्रॅफिकमध्ये अडकणे

रोहितला ऑफिसला यायला उशीर झाला, कारण ................................................................................................ .

३. खूप पाऊस असणे

रोहितला ऑफिसला यायला उशीर झाला, कारण ................................................................................................ .

४. डबा आणि पाकीट घरी विसरणे

रोहितला ऑफिसला यायला उशीर झाला, कारण तो ........................................................................................ .

१० **काल काय केलं?**

उदा० काल मी पुस्तक वाचले. काल मी चारोळ्या लिहिल्या. काल मी कादंबरी विकत घेतली.

| सर्वनाम / कर्ता | सामान्यनाम / कर्म | क्रियापद |
|---|---|---|
| मी / आम्ही | पुस्तक | |
| तू / तुम्ही | वर्तमानपत्र | वाचणे |
| तो | कादंबरी | विकत घेणे |
| ती | ग्रंथ | लिहिणे |
| ते | चारोळ्या | |
| | ... | ... |





## ११ मागच्या आठवड्यात काय केलं?

उदा॰ मागच्या आठवड्यात मी अर्ज दिला. मागच्या आठवड्यात त्याने फोटो काढला.
मागच्या आठवड्यात मी उत्तर दिलं.

| सर्वनाम / कर्ता | सामान्यनाम / कर्म | क्रियापद |
|---|---|---|
| मी/ आम्ही | अर्ज | देणे |
| तू/ तुम्ही | फॉर्म | भरणे |
| तो | पत्र | लिहिणे |
| ती | फोटो | लावणे |
| | उत्तर | करणे |
| | सही | काढणे |
| | ... | ... |

## १२ भूतकाळ वापरून वाक्ये पूर्ण करा.



१. मीना काल मैत्रिणीकडे (जाणे) (क) ........................ . त्यांनी एक सिनेमा (पाहणे) (ख) ........................ आणि नंतर पिझ्झा (खाणे) (ग) ........................ . उशीर झाला म्हणून ती रात्री तिथेच (राहणे) (घ) ........................ .



२. काल अलका आजारी (असणे) (क) ........................ . तिने फक्त वरण - भात (खाणे) (ख) ........................ आणि ती फक्त सरबत (पिणे) (ग) ........................ .



३. सुनंदाने वर्तमानपत्रासाठी एक लेख (लिहिणे) (क) ........................ . तो बऱ्याच जणांनी (वाचणे) (ख) ........................ आणि तिला अभिनंदनपर पत्रे (पाठविणे) (ग) ........................ .



४. भारती शिक्षिका आहे. तिने विद्यार्थ्यांना गृहपाठ (देणे)

(क) .................................. . निधीने गृहपाठ (न करणे)

(ख) .................................. . म्हणून भारतीने तिला शिक्षा (करणे)

(ग) .................................. .



५. अरुंधतीने कागदाची फुले (करणे) (क) .................................. ती सगळ्या मैत्रिणींनी (मागणे) (ख) .................................. . तिने सर्वांना १-१ फूल (देणे) (ग) .................................. आणि उरलेली प्रदर्शनात (विकणे) (घ) .................................. .

## १३ योग्य त्या क्रमात शब्दयोजना करून वाक्ये लिहा.

| | |
|---|---|
| उदा॰ निघाली - लवकर - कामावरून - निकिता | निकिता कामावरून लवकर निघाली. |
| १. सकाळी - पडला - पाऊस - जोराचा | |
| २. सुटली - सहा - ट्रेन - वाजता | |
| ३. राजीव - परवा - खूप - झोपला. | |
| ४. वडिलांनी - मदत - केदारला - केली | |
| ५. तब्येतीबद्दल - विचारले - आईने | |
| ६. वाटतं - सूर्य - आज - उगवला - पश्चिमेला | |

## १४ सुट्टीचे दोन मजेदार दिवस

काल शनिवार होता. म्हणजे सुट्टीचा दिवस. निखिल आणि निकिता सकाळी फिरायला गेले. खरेदी केली आणि बाहेरच जेवले. घरी परतेपर्यंत संध्याकाळ झाली. दोघेही खूप थकले होते. रात्री दोघे सिनेमा बघायला गेले. घरी यायला उशीर झाला. निखिलने रात्री निकितासाठी सॅन्डविच बनवले.

रविवार उजाडला. काल काहीच काम न झाल्याने, घरातले कोण आवरणार यावर दोघांचा वाद झाला. निकिता चिडली आणि म्हणाली, “रोज मी काम करते. आज तू कर.” निखिलही चिडला आणि म्हणाला, “पण काल रात्री मी जेवण बनवलं.” “जेवण?” निकिता

म्हणाली “ते तर सॅन्डविच होतं. एकदम विचित्र लागत होतं.” निखिल इतका चिडला होता, की धाडकन दार लावून लिफ्टमध्ये शिरला. अचानक वीज गेली. लिफ्ट बंद पडली. निखिल लिफ्टमध्येच अडकला.



१. पुढे काय झालं असेल ते लिहा.

२. तुमचा सुट्टीचा दिवस कसा असतो?

३. नकारात्मक वाक्य करा.

उदा॰ निकिताला उशीर झाला. निकिताला उशीर नाही झाला.

क. निखिल सकाळी फिरायला गेला.

ख. दोघे खरेदीला गेले.

ग. निकिता आणि निखिल रात्री निघाले.

घ. निखिल सकाळी उशिरा उठला.

च. निकिता संध्याकाळी घरी आली.



## १५ खालील ई-पत्र पूर्ण करा.

प्रिय फिलीप,

माझी आई घरी परत आली. आणि मी माझे काम अजूनही पूर्ण केले नव्हते. अरे बाप रे!

गोंधळच झाला. मग मी पटापट सगळी कामे उरकली. मी ...

माझी आई केरळला गेली होती. आणि आता सगळी कामे फत्ते!

तिला आनंद झाला ते पाहून.

बरं. आता थांबतो.

कळव.

तुझा प्रिय मित्र,

मन्या



**१६** **नाम आणि सर्वनामांची योग्य ती सामान्यरूपे करून योग्य ते विभक्तिप्रत्यय लावून रिकाम्या जागा भरा.**

१. (मनीष) ........................ (प्रियांका) ........................ ५० रुपये दिले.

२. (घर) ........................ (बँक) ........................ पोचायला २ तास लागतात.

३. जयेश (मनीष) ........................ उंच आहे.

४. मी रोज (बस) ........................ (ऑफिस) ........................ जातो.

५. (हिमानी) ............ (ती) ............ (मित्र) ................ जेवायला बोलावले.

६. सर्व (मुले) ........................ (स्वतः) ........................ जागेवर बसावे.

७. (शिक्षक) (अ.व.) ........................ (मुले) (अ.व.) ........................ खूप स्वाध्याय दिले.

८. रानटी प्राणी (जंगल) ........................ राहतात.

९. आमच्या (घर) ........................ प्रत्येक (खोली) ........................ एक पंखा आहे.

१०. (झाड) ........................ खूप फळे लागली होती.

११. तो किती (सफाई) ........................ खोटं बोलतो!

१२. पुण्याच्या (तुलना) ........................ (मुंबई) ........................ फार उकडतं.

**१७** **नामाला 'ने' किंवा 'ला' हे विभक्तिप्रत्यय जोडून वाक्य पूर्ण करा.**

१. अमित (क) ........................ प्रिया (ख) ........................ नवीन गाडी घेऊन दिली.

२. तारखेने माझा ४ फेब्रुवारीला वाढदिवस असतो. आज तिथी (क) ........................ आहे.

३. मुला (क) .................. लग्न करायचे ठरवले आहे. तुम्ही लग्ना (ख) .................. यायचे आहे.

४. पाच वर्षांच्या छोटुश्या निनाद (क) ........................ व्हायोलिन शिकायला सुरुवात केली.

५. चार भिंती आणि एका छपरा (क) ........................ काय घर बनते? घरा (ख) ........................ घरपण आणले ते माझ्या नाती (ग) ........................ .

६. काल गायी (क) ........................ वासरा (ख) ........................ जन्म दिला. गाय आणि वासरू, दोघेही सुखरूप आहेत.

७. काळोखावर प्रकाशा (क) ........................ मात करता येते.

८. भाषे (क)................................ मरण नाही.

९. गुरुदक्षिणा देणे म्हणजे सूर्या (क)................................ दिवा दाखवण्यासारखे आहे.

१०. मनस्वी (क)................................ उत्तम चित्रकलेसाठी बक्षीस मिळाले.

## १८ कोणी कोणाला काय दिले? तृतीया आणि चतुर्थीचा वापर करून अर्थपूर्ण वाक्ये लिहा.

उदा॰ अमित - स्वतःचे पैसे - आई - साडी - देणे.
अमितने आईला स्वतःच्या पैशांनी साडी दिली.





१. डॉक्टर - रुग्ण - औषध - लिहून देणे.

२. राजा - राणी - गुलाबाचे फूल - देणे

३. बाबा - अमित - सल्ला - देणे

४. आई, बाबा - ऋतिका - गाडी - देणे

## १९ समिधाची आठवण

आज सकाळी कपाट साफ करताना मला हा जुना फोटो दिसला. तो फोटो माझा आणि माझ्या छोट्या भावाचा, सागरचा होता. फोटो पाहिल्याक्षणी मला माझे बालपण आठवले. लहानपणी रोज संध्याकाळी मी आणि सागर देवळात जात असू. तेव्हा सौरभ दिसायचा. एकदा मी एकटीच देवळात जात होते. तेव्हा मला सौरभ भेटला. तो म्हणाला की तू खूप सुंदर दिसतेस. मी मोठा झाल्यावर तुझ्याशीच लग्न करीन असं म्हणाला. तेव्हापासून आम्ही रोज भेटू लागलो आणि खूप गप्पा मारू लागलो.

१. समिधा आणि सागर कधी देवळात जात होते?
२. समिधाला जुन्या दिवसांची आठवण कशी झाली?
३. समिधा कोणाबरोबर देवळात जात होती?
४. समिधाला देवळात कोण भेटत असे?
५. सौरभ समिधाला काय म्हणाला होता?



## २० काय म्हणाल?

उदा. राज - काल रात्री - अमेरिकेला जाणे : राज काल रात्री अमेरिकेला गेला.
हे कळणे : राज काल रात्री अमेरिकेला गेल्याचे कळले.

१. तुम्ही - मुलगी होणे ........................................ .
हे नातेवाईकांना कळवणे ........................................ .
२. मुलगा - राष्ट्रीय पातळीवर खेळणे ........................................ .
हे मित्रांना कळणे ........................................ .
३. अमित - खूप बोलणे ........................................ .
त्याच्या प्रेयसीला कळणे ........................................ .
४. लाडआजोबा - निधन पावणे ........................................ .
हे त्यांच्या लाफ्टर क्लबला कळणे ........................................ .
५. जाहिद - व्यसनी असणे ........................................ .
हे त्याच्या बायकोला लग्नानंतर कळणे ........................................

## २१ खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

मी नट का झालो? कारण मला खोटं बोलायला आवडतं. खोटं असायला आवडतं. एकूणच नाटकातल्या खोट्या जगात जगायलाच आवडतं. त्यातही तालमींमध्ये मी जास्त रमतो. अगदी तासन्‌तास पाठांतर करायचं, एकच प्रवेश पुन्हा पुन्हा करायचा, मोडकं खोकं हेच कधी सिंहासन, तर कधी इराण्याच्या हॉटेलातली खुर्ची, तर कधी पंचतारांकित बार मानायचं. नायिकेचं काम करणारी नटी हीच जगातली सर्वात सुंदर स्त्री आहे असं स्वतःला बजावायचं. एखाद्या दिवशी ती आली नाही, तर चहावाल्यालाच तिच्या जागी उभं करायचं आणि 'प्रिये...' म्हणून रोमान्स करायचा.

मी आयुष्यात 'मी' म्हणून कमीच जगलो. जागा असतानाचा बहुतेक काळ मी कृष्ण किंवा अफाट बापू किंवा अप्पा बेलवलकर किंवा काकाजी म्हणूनच काढला. जेव्हा माझी सकाळ होते, तेव्हा दात घासताना मी आरशात बघतो. क्षणभर प्रश्न पडतो – हा कोण बुवा? नाटकातले लांबलचक संवाद न चुकता घडाघडा म्हणता येतात, पण 'मी' म्हणून बोलताना मला नेमके शब्द आठवत नाहीत. साधीसुधी वाक्यं रचता येत नाहीत. खऱ्याखुऱ्या आयुष्यातले खरेखुरे संवाद कुणी लिहून ठेवलेले नसल्यामुळे असा गोंधळ उडतो. पण 'आपण' नसण्यात, वेगळंच काही तरी असण्यात फार मजा असते.

## भ्रमंती

१. या नटाने आजवर कोणत्या भूमिका साकारल्या आहेत?

२. या उताऱ्यांचे मुलाखतीमध्ये रूपांतर तुम्ही करू शकाल का? योग्य प्रश्न तयार करा.

# नवी-जुनी पिढी

१०



## चला, शिकू या...

- नव्या-जुन्या पिढीची मते मांडणे
- सप्तमी (कोणावर, कोणात, कुठे)
- व्यक्ती आणि कामे
- व्यक्तिमत्त्व, प्रवृत्ती, राहणीमान
- नेट-नाद
- द्विकर्मक भूतकाळ

# १० नवी - जुनी पिढी

## १ रेडिओवर ऐश्वर्याची मुलाखत

**१. वाचा.**

आपण वेगवेगळ्या मित्रमैत्रिणींना भेटत असतो. आपण आज ज्या मैत्रिणीशी गप्पा मारणार आहोत, तिचं नाव आहे ऐश्वर्या पेंडसे आणि आपली ही मैत्रीण रत्नागिरीतल्या आंजर्ले या निसर्गरम्य ठिकाणी राहते. आणि तिथे राहून स्वतःचा व्यवसायसुद्धा करते. अजूनही बऱ्याच गोष्टी ती करते. तर तिच्याकडून आज आपण या विषयीच जाणून घेणार आहोत.

**मुलाखतकार :** ऐश्वर्या, तुला माझा आवाज येतोय का?

**ऐश्वर्या :** हो, हो, येतोय.

**मुलाखतकार :** तुझं युवातरंग या कार्यक्रमात खूप खूप स्वागत आहे.

**ऐश्वर्या :** धन्यवाद!

**मुलाखतकार :** बरं, ऐश्वर्या, आम्हाला सांग की तुझं शिक्षण कसं झालं? म्हणजे तुझ्या शिक्षणाबद्दल थोडंसं सांग.

**ऐश्वर्या :** मी दहावीपर्यंत आमच्या गावातल्या शाळेतून शिक्षण घेतलं. त्यानंतर मी पुण्याला गेले. तिकडे मी टेक्स्टाईल या विषयात एम॰ एस्सी॰ केलं.

**मुलाखतकार :** टेक्स्टाईलमध्ये एम॰ एस्सी॰ करावं हे कसं सुचलं तुला? त्याविषयी काही?

**ऐश्वर्या :** मला अभ्यासाची आवड अजिबात नव्हती. त्यामुळे आवडीचं आणि नवीन करायला मिळेल असं काही तरी शिकायचं होतं मला. आमचा जो अभ्यास होता, टेक्स्टाईलचा, त्याच्यामध्ये खूप काही नवीन करायला वाव होता. तर अभ्यासाची आवड कमी असल्यामुळे आणि आवडीचं काही तरी करायला मिळेल म्हणून मी ही शाखा निवडली.

**मुलाखतकार :** अरे वा! आणि सध्या मग तू काय करतेस?

**ऐश्वर्या :** मी सध्या कापडाच्या वेगवेगळ्या पर्सेस आणि बॅग्ज बनवते.

**मुलाखतकार :** अरे वा! मस्तच. श्रोतेहो, अजूनही आपल्याला ऐश्वर्याशी गप्पा मारायच्या आहेत. तिच्याकडून आपल्याला बरंच काही जाणून घ्यायचं आहे.





**२. वरील संवादाच्या आधारे योग्य प्रश्नशब्द निवडून प्रश्न तयार करा आणि पुढे दिलेले पर्याय निवडून उत्तर लिहा.**

(कशा, कसे, काय, कशाच्या, कशाची)

क. **प्रश्न :** आंजर्ले हे ठिकाण ............................ आहे?

**उत्तर :** ............................

१. गजबजलेले
२. निवांत
३. निसर्गरम्य

ख. **प्रश्न :** चालू असलेल्या कार्यक्रमाचे नाव ............................ आहे?

**उत्तर :** ............................

१. जलतरंग
२. युवातरंग
३. रागतरंग

ग. **प्रश्न :** ऐश्वर्याने ............................ मध्ये एम॰ एस्सी॰ केले आहे?

**उत्तर :** ............................

१. टेक्स्टाईल
२. डिझाईनिंग
३. बांधणी

घ. **प्रश्न :** ऐश्वर्या ............................ बॅग्ज आणि पर्सेस बनवते?

**उत्तर :** ............................

१. कागदाच्या
२. चामड्याच्या
३. कापडाच्या

च. **प्रश्न :** ऐश्वर्याला ............................ अजिबात आवड नव्हती?

**उत्तर :** ............................

१. खेळण्याची
२. अभ्यासाची
३. चित्रकलेची

## २ जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| १. एकदा एक ढग आकाशात | क. कारण मला पाण्याची भीती वाटते ना! |
| २. इतका वेळ झाला पण मास्तरांचा काही पत्ताच नाही. | ख. मोठ्यांशी बोलतं का कोणी असं? |
| ३. तेव्हा माझी ट्यूब पेटली. | ग. आणि पप्याच्या आईचा जीव भांड्यात पडला. |
| ४. असा कसा जाड झालास, | घ. कुठे गेले, कोणास ठाऊक? |
| ५. मग काय, तेल गेलं, तूप गेलं, हाती राहिलं धुपाटणं | च. अख्खं रामायण झालं आणि आत्ता तुला कळतंय, रामाची सीता कोण आहे ते. |
| ६. मी मुळीच पोहायला गेले नाही, | छ. आळशी, खादाड, लबाड. |
| ७. अगदी मूर्खासारखं बोललीस बघ. | ज. म्हणूनच अंथरूण पाहून पाय पसरावेत. |
| ८. तितका काही म्हातारा नाहीये | झ. स्वच्छंद फिरत होता. |
| ९. शेवटी एकदाचं लग्न उरकलं | ट. साठीला तर आलाय. |

## ३ जुन्या 'स्त्री'वरील कवितेचा अंश वाचून नव्या 'स्त्री'वर कविता लिहा.

| | |
|---|---|
| कर कर करा,<br>मर मर मरा;<br>दळ दळ दळा,<br>मळ मळ मळा;<br>तळ तळ तळा,<br>तळा आणि जळा.<br><br>- **विंदा करंदीकर** यांच्या 'स्त्रियांचे स्थानगीत' या कवितेतील अंश. | ..........................................<br>..........................................<br>..........................................<br>..........................................<br>..........................................<br>.......................................... |





## ४ रिकाम्या जागी योग्य ती नामे लिहा.

(कविता, गाणे, चित्रकला, मराठी भाषा, इतिहास, स्वयंपाक, गणित आणि नृत्य, म्हणी, व्याकरण आणि कॉम्प्युटर, शिव्या, गाणी, वाक्प्रचार)

१. तुम्ही कोणाला .................................... शिकवले (त)?

२. तुम्ही कोणाला .................................... शिकवली (त)?

३. तुम्ही कोणाला .................................... शिकवला (त)?

४. तुम्ही कोणाला .................................... शिकवल्या (त)?

५. तुम्ही कोणाला .................................... शिकवले (त)?

## ५ 'देणे' या क्रियापदाची योग्य भूतकाळी रूपे लिहा.



१. मी अनुजाला तिचं पत्र .................... .

२. आईने प्रतीकला नवीन कपडे .................... .

३. शिरीषने त्याच्या मित्राला एक कविता वाचायला .................... .



४. पाहुण्यांनी बाळाला चांदीच्या वाट्या .................... .

५. आम्ही अधिकाऱ्याला महत्त्वाची कागदपत्रे .................... .

६. तुम्ही आम्हाला खूप चविष्ट मिठाई .................... .

७. राहुलने त्याच्या बायकोला एक छानसा गजरा .................... .



८. मिहीरला मी काजू, बदाम खायला .................... .

९. निखिलने त्याच्या बहिणीला नवं पुस्तक .................... .

### ६ सप्तमी वापरून रिकाम्या जागा भरा.

(वर्ग, हात, प्रयोगशाळा, वाटी, बाटली, चित्र)



१. ........................ दहा विद्यार्थी आहेत.

२. चमचा ........................ आहे.

३. घड्याळ ........................ आहे.

४. पाणी ........................ आहे.

५. विद्यार्थी आणि विद्यार्थिनी ........................ आहेत.

६. हे चित्र बघा. ........................ एक घर आहे.

### ७ खालील प्रश्नांची उत्तरे द्या.



१. तो कुठे गेला? (घर) ........................

२. ते कुठे गेले? (शाळा) ........................

३. ती तुला कुठे भेटली? (रस्ता) ........................

४. कावळा कुठे उडाला? (आकाश) ........................

५. तू कुठे खेळतोस? (मैदान) ........................

### ८ रिकाम्या जागा भरा.

(लग्न, क्षण, व्यसन, ते)

१. ........................ बुडालेल्या माणसांना खूप अडचणींचा सामना करावा लागतो.



२. जे घडलं ........................ अंजलीचाही दोष आहे.

३. हे तुझं दु:ख या ........................ नष्ट होवो.

४. माझ्या मैत्रिणीच्या ........................ मी खूप मजा केली.

### ९ रिकाम्या जागा भरा. (अनेक उत्तरे अपेक्षित)

(पाऊस, कविता, आरडाओरडा, पहाट, परिस्थिती, पावसाळा)

१. तो कोणत्या .................... राहतो?

२. या सगळ्या .................... रेडिओ ऐकू येतोय कोणाला?

३. मुलं काय .................... करतात?

४. .................... कोणकोणते सण येतात?

५. आम्ही .................... उठतो.

६. .................... पक्षी गात होते.



### १० स्वतःचा कालचा दिनक्रम लिहा.

....................

....................

....................

....................

....................

### ११ कंसातील शब्दांचा योग्य रूपात वापर करून रिकाम्या जागा भरा.

१. गेल्या (रविवार) .................... (ती) .................... लग्न होतं.

२. (ते) .................... मला (आग्रह) .................... बोलवलं.

३. लग्न (सकाळ) .................... झालं.

४. (मी) .................... (संध्याकाळ) ....................
स्वागत (समारंभ) .................... गेलो होतो.

५. तिथे (फूल) .................... उत्तम सजावट केली होती.

६. (संदीप) .................... झकास सूट घातला होता.





७. (नवरी) .................... खूप दागिने घातले होते.

८. लोक (ते) .................... खूप भेटवस्तू देत होते.

९. सगळे (आराम) .................... जेवत होते.

१०. माझ्या (मित्र) .................... आणखी एक आईस्क्रीम (आणणे) .............................. .

११. (संदीप) ........................ निरोप घेऊन मी (निघणे) .................... .

### १२ कंसातील शब्दांचा योग्य रूपात वापर करून रिकाम्या जागा भरा.

(सातवी, कॉलेज, तुकडी, कंपनी, वर्ग, आठवी)

आई, हा मंदार, हा पवन आणि हा वसीम. मंदार (१) ........................ आहे, पण ‘ब’ (२) .............................. आहे. याला बास्केटबॉल खेळायला आवडतं. पवन (३) ..............................आहे, पण आमच्याबरोबरच असतो नेहमी. वसीम मंदारच्याच (४) ..............................आहे. याला सतार छान वाजवता येते. मंदार आणि पवन शेजारी राहतात. त्यांचे बाबा एकाच (५) .............................. काम करतात. वसीमची बहीण आपल्या शलाकाताईच्या (६) .............................. आहे. आणि पवन आहे नं, हा नकला मस्त करतो. परवा हा मंदारला म्हणाला, की आपण सगळे मोहितच्या शेतावर जाऊ या, म्हणून आज सगळे आपल्याकडे आले आहेत.

### १३ सप्तमी

| डबा | डब्यात | तो डबा | त्यात |
|---|---|---|---|
| पिशवी | | ती पिशवी | |
| घर | | ते घर | |
| खोल्या | | त्या खोल्या | |

## १४ क्रियापदाचे भूतकाळी योग्य रूप लिहा.

(म्हणणे, उघडणे, असणे, बघणे, बिघडणे, दाखवणे)

आज सकाळी मी वर्तमानपत्र .................. . वर्तमानपत्रात एक जाहिरात .................. 'जुना कुकर देऊन नवा घ्या.' मी जाहिरात आईला .................. . आईने जाहिरात .................. आणि आई .................., "बरं झालं बाई. नाही तरी आपला कुकर .................. आहे. कुकरचं झाकण नीट लागत नाही आणि मग शिट्टीही होत नाही. आता कुकर बदलायलाच हवा."

## १५ क्रियापदाचे भूतकाळी योग्य रूप लिहा.

| | |
|---|---|
| Outdated झालंय आयुष्य<br>स्वप्नही download होत नाही<br>संवेदनांना 'Virus' लागलाय<br>दु:खं send करता येत नाहीत<br>जुने पावसाळे उडून गेलेत<br>Delete झालेल्या fileसारखे<br>अन् घर आता शांत असतं<br>range नसलेल्या mobileसारखं<br>Hang झालेल्या PCसारखी<br>मातीची स्थिती वाईट<br>जाती माती जोडणारी<br>कुठेच नाही website<br>एकविसाव्या शतकातली<br>पिढी भलतीच 'cute' | Contact list वाढत गेली<br>संवाद झाले mute<br>Computerच्या chipसारखा<br>माणूस मनानं खुजा झालाय<br>अन् 'Mother' नावाचा board,<br>त्याच्या आयुष्यातून वजा झालाय<br>Floppy Disk Driveमध्ये<br>आता संस्कारांनाच जागा नाही<br>अन् फाटली मनं सांधणारा<br>Internetवर धागा नाही<br>विज्ञानाच्या गुलामगिरीत<br>केवढी मोठी चूक<br>रक्ताच्या नात्यांनाही<br>आता लागते Facebook...<br><br>**कवी :** बबलू वडार |

### १६ खालील संवाद पूर्ण करा.

**रमेश :** कुठे (असणे) ........................ तू? इतक्या उशिरा का (येणे) ........................?
दोन तास (होणे) ........................ तुझी वाट बघतोय.

**रेश्मा :** अरे, मला खरंच माफ कर, उशीर (होणे) ........................ .

**रमेश :** मला काहीही ऐकायचं नाहीए. अगं, तू रडतेस का? काय (होणे) ........................?

**रेश्मा :** अरे, माझं येताना सुधीरशी भांडण (होणे) ........................ .

**रमेश :** का?

**रेश्मा :** काल मी उशिरा घरी (पोहोचणे) ........................ तर आई मला (रागावणे) ........................ . मग नंतर माझं आणि सुधीरचं भांडण (होणे) ........................ . तो मला खूप (बोलणे) ........................ . आता येताना तो माझ्याशी परत (भांडणे) ........................ म्हणून मला उशीर (होणे) ........................ .

**रमेश :** पण एवढा उशीर?

**रेश्मा :** अरे, येताना मला रिक्षाच नाही (मिळणे) ........................ . किती वाट बघितली मी, पण नाहीच.

**रमेश :** मग आत्ता कशी (येणे) ........................ तू?

**रेश्मा :** मग शेवटी मी बसने (येणे) ........................ .

### १७ कंसातील शब्दाचे योग्य रूप लिहून रिकाम्या जागा भरा.

हे एकविसावं शतक आहे, मने! (माणूस) ........................ बघ किती प्रगती (करणे) ........................ आहे! केवढी टोलेजंग बांधकामं होत आहेत! (गाडी) ........................ धावत आहेत आणि त्यांना (रस्ता) ........................ अपुरे पडत आहेत. इथे हा झगमगता बाजार (दिसणे) ........................ आहे. खरेदी करणाऱ्यांची झुंबड उडते आहे. पैसे खर्च करण्यासाठी आपल्याला आणखी चार-दोन हात का (नसणे) ........................, अशी खंत त्यांना (वाटणे) ........................ आहे. मने, तिकडे कुठे बघते आहेस? तुला ना, नाही त्या वेळी नको त्या गोष्टी दिसतात. काय म्हणते (असणे) ........................? जगात बरीचशी माणसं गरीब (असणे) ........................, अनेक (मुलं) ........................ शिक्षण मिळत नाही, (पर्यावरण) ........................ नाश होतो, प्रदूषण वाढतं... झाली (ही) ........................

पिरपिर सुरू. मने, प्रगती करायची म्हणजे हे सगळं होतच असतं. अगं, खूप लोक गरीब असतात म्हणून तर काही लोक श्रीमंत होतात, एवढी साधी गोष्ट तुला कळत (कसं) ........................ नाही? फारच हट्टी (असणे) ........................ बुवा तू!

## १८ खालील वाक्ये नीट वाचून पूर्ण करा. नामाच्या जागी सर्वनामाचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.

उदा॰ हेमंत काकूंशी फोनवर बोलला. तो त्यांच्याशी फोनवर बोलला.

१. नीता काकूंशी फोनवर बोलली.

२. मी आणि संगीता काकांशी फोनवर बोललो.

३. साने, आजोबांशी फोनवर बोललात का?

४. अमित आणि आशिष, दोघेही काल माझ्याकडे येऊन गेले.

५. जोशींना श्रीधरराव ओळखतात का?



## १९ खालील उतारा वर्तमानकाळ वापरून परत लिहा.

आणखी काही गाड्या पार्किंगमध्ये शिरल्या. आमची गाडी रस्त्याला लागली, तसा वारा आत आला आणि उन्हाचा ताप जरा कमी झाल्याचा भास झाला. अचानकच बाबाने गाडी थांबवली आणि काहीच न कळल्याने आम्ही खाली उतरलो. बाबानं वाकून चारही टायर पाहिले. आपण उगाचच एखाद्या गोष्टीचा किती विचार करतो, असं वाटून त्याला हसू आलं.

## २० अर्थानुसार कंसातील शब्दाचे योग्य काळातील रूप लिहा.

आज आई-बाबाचं जोरदार भांडण झालं. आई (बाबा) ........................ (म्हणणे) ........................, "(घर) ........................ लोक जेवायला येणार आहेत, हे माहीत असताना तू ऑफिसमध्ये थांबलासच कसा? मी (एकटी) ........................ सगळी कामं करायची का? (तू) ........................ नेहमीच असं करतोस."

मग बाबा (म्हणणे) ........................, "अगं पण (मी) ........................ मुद्दाम करतो का?

(साहेब) .................... काम सांगितल्यावर मी नाही म्हणू (शकणे) .................... का?

(तू) .................... उगाचच चिडतेस. आणि टिंब्या (असणे) .................... ना?

(तो) .................... काही मदत करत नाही का? काय रे टिंब्या?"

(बाबा) .................... अचानक माझ्याकडे मोहरा वळवल्यामुळे (मी) ....................

गडबडलो. आता मात्र आई जास्तच खवळली. "(टिंब्या) .................... मध्ये आणू नकोस,"

ती (ओरडणे) .....................

## २१ कंसातील शब्दाचे योग्य रूप लिहा.

१. राकेश (रांग) .................... उभा आहे. रांग (मुंगी) .................... (गती) .................... पुढे सरकत आहे. ध्वनिक्षेपकावरून चित्रविचित्र सूचना दिल्या जात (असणे) ...................., परंतु त्यांतील एक अक्षरही समजत नाही आहे.

२. "उषा, मी (शिपाई) .................... तुझ्याकडे पाठवतोय. (तो) .................... एक अर्ज देतोय, त्यावर (तू) .................... सही हवीय, तेवढी करून दे."

३. "आजोबा, हा आदित्य बघा, मला चिडवतोय! (मी) .................... दात हलतोय ना, म्हणून मला म्हातारी (म्हणणे) ....................!"

४. गुरुवारी (सोहम) .................... वाढदिवस आहे. त्याच्यासाठी काय न्यावं? त्याला (गाडी) .................... वेड आहे. एखादं (गाड्या) .................... पोस्टर किंवा पुस्तक न्यावं, की त्यालाच विचारावं?

५. "आजी गं, हे बघ, जुने फोटो सापडलेयत. हे (कोण) .................... आहेत?"
"अरे, ह्यांच्या मुंजीचे दिसताहेत! कुठे सापडले तुला?"
"कपाटात."

६. मुलांचे कपडे कशामुळे मळतात? तर (माती) .................... खेळल्यामुळे. पण म्हणून (मुलं) .................... खेळूच द्यायचं नाही की काय?

७. "अय्या, सिद्धार्थ! तू केव्हा (येणे) ....................? आणि मुलं कुठे (असणे) ....................? अनिताही दिसत नाहीये. ती कधी (येणे) .................... आहे?"

## २२ योग्य पर्याय निवडा.

(त्याच, त्याचं)

१. मुंबईत पूर आला .................................. दिवशी माझ्या बहिणीला मुलगा झाला.

२. मुलगा जन्मतःच आजारी होता आणि .................................. वजनही पुरेसं नव्हतं.

## २३ कंसातील योग्य पर्याय निवडा.

(कोणत्या (x२), कोणता, कुठून, का (x३), कशासाठी, काय)

१. या शिबिराविषयीची माहिती तुला .................................. मिळाली?

२. तुला .................................. खेळांची आवड आहे?

३. यापूर्वी एखाद्या शिबिरात भाग घेतला होतास ..................................?

४. साहसी खेळांपैकी .................................. प्रकार तुला विशेष आवडतो?



५. तुझे इतर छंद किंवा आवडीच्या गोष्टी ..................................?

६. तुला एखादा मोठा आजार झाला होता ..................................?

७. तुला घरापासून दूर राहण्याचा अनुभव आहे ..................................?

८. या शिबिरात तुला .................................. सहभागी व्हायचं आहे?

९. शिबिरात प्रवेश मिळाला नाही, तर तू सुट्टीत दुसरं .................................. करशील?

## २४ क्रियापदाचे सामान्य भूतकाळी रूप लिहा.

१. गेल्या दिवाळीत मी दिल्लीमध्ये (असणे) .................................. .

२. आमच्या लहानपणी आम्ही फारच बावळट (असणे) .................................. .

३. सायली, तू (जाणे) .................................. तेव्हापासून आम्हाला करमत नाही.

४. नाटकाचा पहिला प्रयोग खूपच यशस्वी (होणे) .................................. .

५. उन्हातून आल्याबरोबर यश घटाघटा पाणी (पिणे) .................................. .

६. कालचा चित्रपट चांगला (नसणे) .................................. आणि त्याला फारशी गर्दी (नसणे) .................................. .

७. काल सकाळी पंतप्रधान जपानच्या दौऱ्यावर रवाना (होणे) ..................... .

८. "आम्ही चारच दिवसांपूर्वी दवाखान्यात जाऊन (येणे) ....................., तेव्हा काका बरे (असणे) ..................... .

९. आजी सांगलीला (जाणे) ..................... म्हणून घर बंद (असणे) ..................... .

१०. "अभिनंदन! तुम्ही आजोबा (होणे) .....................!"

## २५ योग्य पर्याय निवडा.

१. नाटकाचा पहिला अंक / आकडा सुरू झाला.
२. पहिल्या अंकात खूप पात्रं / मंडळी होती.
३. अंक संपल्यावर पडदा खाली आला / गेला.
४. चांगल्या नाटकाबद्दल आम्ही नाटककाराचं अभिनंदन / अभिवादन केलं.
५. मला बाजारात श्यामराव भेटले / मिळाले.
६. मी माझ्या मित्राची त्यांच्याशी ओळख करून दिली / ओळख करून घेतली.
७. मंगेश रिक्षाने / रिक्षात घरी गेला.
८. मी पायांनी / पायी घरी गेलो.

## २६ योग्य विभक्तिप्रत्यय लिहा.

१. (मुलं) ..................... (अभ्यास) ..................... तुम्ही फारच लक्ष घालता.

२. (सुट्टी) ..................... (घर) ..................... बसून नमन दिवसभर टीव्ही बघतो.

३. (कोर्ट) ..................... साक्ष देताना ऐन (वेळ) ..................... सोहम उलटला.

४. (दुष्काळ) ..................... (लोक) ..................... पाणी मिळत नाही.

५. सासूबाई या (वय) ..................... (हौस) ..................... (खरेदी) ..................... सुद्धा जातात.

६. मुलाखतीसाठी कसून तयारी करूनही ऐन (वेळ) ..................... (समीर) ..................... गडबड झाली.

## २७ रिकाम्या जागा भरा.

(तुझ्याकडून, तू, तुझ्या, तुझी, तुझ्याकडे, तुला)

“रेवती, इकडे ये. .................... काल कुठे होतीस? ताईंनी सात वाजेपर्यंत .................... वाट पाहिली. वर्गप्रमुख म्हणून .................... आपली जबाबदारी कळते ना? कपाटाच्या किल्ल्या .................... आहेत, हे .................... लक्षात कसं आलं नाही? पुन्हा अशी चूक झाली, तर .................... प्रमुखपद काढून ते शर्वरीला द्यावं लागेल, कळलं?”

## २८ पुढील वाक्ये भूतकाळ वापरून पुन्हा लिहा.

१. तू सामना जिंकतोस.

..........................................................................................

२. तुम्ही स्पर्धा आयोजित करता.

..........................................................................................

३. तू नाटक पाहतोस.

..........................................................................................

४. तुम्ही कविता रचता.

..........................................................................................

५. दोन गटांची मारामारी तणाव निर्माण करते.

..........................................................................................

६. माझा बॉस मला झापतो.

..........................................................................................

७. पोलिसांची गाडी रात्री गस्त घालते.

..........................................................................................

८. सकाळच्या बातमीने लोक चिडतात.

..........................................................................................

९. दिल्लीची गाडी उशिरा येते.

..........................................................................................

२९ **कंसातील शब्दांना योग्य विभक्तिप्रत्यय लावून ते रिकाम्या जागी लिहा.**

१. (तुम्ही) ........................ (परीक्षा) ........................ वेळापत्रक आलं का?

२. (आपण) ........................ वर्ग चांगला सजवला आहे.

३. (वर्ग) ........................(खिडकी) ........................ पाऊस आत येत होता.

४. (मी) ........................ (घर) ........................ (अंगण) ........................ अनेक पक्षी येतात.

५. (विकास) ........................ (माळी) ........................ (मुलगा) ........................ भांडण झाल्यामुळे विकासने (तो) ........................ अबोला धरला आहे.

३० **रिकाम्या जागा भरा.**

मधुरा आणि नेहा (मी + शी) ........................ फालतू कारणावरून भांडल्या. म्हणून मग मीही (त्या + शी) ........................ बोलत नाही. त्या मला कधीच (आपण + त) ........................ घेत नाहीत. जाऊ दे! (त्या + हून) ........................ भाग्यश्री किती तरी चांगली आहे. मी (ती + शी)........................ च मैत्री करीन.

३१ **रिकाम्या जागी योग्य ते विभक्तिप्रत्यय लिहा.**

१. तुझी बाहुली हिच्या........................ छान आहे की नाही?

२. अभिजित........................ दोन भाऊच आहेत.

३. आज आई........................ ऑफिस आहे.

४. मीना........................ आता बरे वाटते आहे.

५. तुम्ही विकास........................ बोलता का?

६. हे कपाट लाकडा........................ आहे.

७. मी जिन्या........................ आले.

८. हे पत्र बेळगाव........................ आले आहे.

९. अशोक सकाळी साडेआठ........................ बाहेर पडतो, तो रात्री दहा ........................ घरी येतो.



१०. तुम्ही विमाना.................... या, कार.................... येऊ नका.

११. मी केळी वीस रुपये डझना.................... आणली.

१२. हीच साडी पल्लवी.................... सातशे रुपयां.................... पडली.

## ३२ रिकाम्या जागा भरा.

“आई गं, मी एक पुस्तक टेबलावर (ठेवणे) .................... होतं, ते (कोण) .................... (पाहणे) .................... का?”, (मुग्धा) .................... विचारलं, “ते माझं (नसणे) ...................., माझ्या (मैत्रीण) .................... होतं. आतल्या पानावर तिचं नावही होतं. आज ते (ती) .................... परत करायचं आहे. सांग ना, तू (पाहणे).................... का ते?” ती रडवेल्या (आवाज) .................... म्हणाली.

## ३३ पुढील उताऱ्यांमध्ये सर्वनामे ज्या नामांऐवजी वापरलेली आहेत, ती नामे कंसात लिहा.

उदा॰ “कुत्रा पाळायचा असेल तर त्याची (कुत्र्याची) सगळी काळजी तू (मिहीर) घ्यायची आहेस. मी (बाबा) काहीही करणार नाही, कबूल?” बाबा मिहीरला म्हणाला.

१. सुधीर मुळे हे मोठे छांदिष्ट गृहस्थ आहेत. त्यांनी (....................) विविध प्रकारची नाणी गोळा केली आहेत. ते (....................) जगभर प्रवास करत असतात. प्रवासात त्यांना (....................) देशोदेशीचे छांदिष्ट लोक भेटत असतात. त्यांच्याकडून (....................) जुनी-नवी नाणी मिळवायची, कधी त्यांच्याशी (....................) आपल्या (....................) संग्रहातील नाण्यांची अदलाबदल करायची, तर कधी त्यांच्याकडून (....................) ती (....................) चक्क विकत घ्यायची, असा मुळ्यांचा छंद आहे.

२. ताई नाटकात काम करते. म्हणजे अभिनय नव्हे, प्रकाशयोजना करते. तिच्या (....................) कॉलेजच्या नाटकाचा प्रयोग असला, की मी तिच्याबरोबर (....................) जाते. तिथलं वातावरण मस्त असतं. कसला तरी खास वास असतो तिथे, आणि तो (....................) एकदा का डोक्यात बसला, की लवकर बाहेर निघत नाही. तिथल्या सगळ्या मुलांना आता मी (....................) ओळखते. प्रयोगाच्या वेळी ती (....................) वेगळीच दिसतात. त्यांचे

(..........) डोळे चमकत असतात. ती (..........) सारखी इकडून तिकडे धावत असतात. खूप छान वाटतं. "काय अपू, करणार का नाटकात काम?" कुणी तरी विचारतं. मी (..........) त्या कल्पनेनेच खुश होते.

३. घोडा खरेदी करताना प्रथम त्याचं (..........) तोंड उघडून दात पाहावेत व तो (..........) तरणा आहे की म्हातारा, ते पाहावं. नंतर त्याची (..........) शेंडी धरून डोळे पाहावेत. ते (..........) मोठे व तजेलदार असल्यास उत्तम. त्याचं (..........) कपाळ मोठं असावं व त्यावर (..........) भोवरा असावा. घोड्याचं आयुष्य साधारणपणे तीस वर्षांचं असतं. तो (..........) कुत्र्याइतका नसला, तरी बऱ्यापैकी बुद्धिमान असतो. त्याची (..........)झोप बहुतेक उभ्यानेच होते व ती (..........) पाच तासांहून जास्त नसते. तो (..........) ज्या देशात जन्माला येतो त्याचं (..........) नाव त्याला (..........) मिळतं. सव्वाशे वर्षांपूर्वीच्या पुस्तकांमध्ये ही माहिती मिळते.

## ३४ लिंग बदलून वाक्ये भूतकाळात लिहा.

| | |
|---|---|
| उदा॰ तो त्याच्या मित्राला भेटवस्तू देतो. | (ती) तिने तिच्या मैत्रिणीला भेटवस्तू दिली. |
| ते मुलांना नृत्य शिकवतात. | (त्या) |
| ती शिक्षकांना पगार देते. | (तो) |
| मी माझ्या आईला मोबाईल देतो. | (तू) |
| तुम्ही आम्हाला पत्र पाठवता. | (आम्ही) |
| तू तुझ्या बायकोला साडी देतोस. | (मी) |
| (ते) विद्यार्थी आम्हाला प्रश्न विचारतात. | (त्या) |
| तो त्याच्या मुलांना सिनेमा दाखवतो. | (ती) |

## ३५ रिकाम्या जागा भरा.

"काकू, तुम्ही (ताई) .................... पुस्तक दिलं होतं ना? (ती) ....................वाचायला वेळ झाला नाही म्हणून (ती) .................... ते परत दिलंय," छोटा अक्षय (अंगण) ....................(पायरी) .................... उभा राहून बोलत होता. "अगोबाई, अक्षय! इतक्या (पाऊस) .................... (तू) .................... कशाला पाठवलं (ती) ....................? (मी) .................... काही (पुस्तक) .................... घाई नव्हती," दरवाजा उघडत आई म्हणाली. एका (हात) .................... भली मोठी काळी छत्री आणि दुसऱ्या (हात) .................... पिशवी, असं (अक्षय) .................... ध्यान बघून (ती) .................... हसूच आलं. "आत ये अगोदर," ती म्हणाली. "नको, (पाय) .................... चिखल लागलाय," अक्षय म्हणाला आणि (तो) .................... एक पाय वर उचलून दाखवला. (चप्पल) .................... चिकटलेली (चिखल) .................... ढेकळे बघण्यासाठी (तो) .................... मान वाकडी केली आणि (तो) .................... तोल गेला. ती जड छत्री घेऊन तो धपकन खाली पडला.

"काकू, (शर्ट) .................... आणि (चड्डी) .................... आणि... आणि (पुस्तक) .................... पण चिखल लागला...!" तो रडवेला होऊन म्हणाला. आई हसत हसत (तो) .................... उचलायला धावली.









# तोंडी परीक्षा - एकूण गुण ३५

## १. वाचन व आकलन (एकूण ९ गुण)

**१. पुढील उतारा वाचून दाखवा.** **(३)**

**व्यवसाय आणि कार्यक्षेत्रे**

आज माझं वय आहे त्रेसष्ट. म्हणजे आत्ताच्या परिभाषेत म्हणायचं तर "यंग सिनियर" असं म्हणा. माझ्या शाळकरी वयात पुण्यात त्यावेळी बैलगाड्या सर्रास दिसायच्या. एखाद्या बैलगाडीला लोंबकळत गेलं, की चुटकीसरशी शाळा यायची. शाळेत शिसपेन्सिल, दौत-टाक, खडू-फळा एवढीच सामग्री असायची. आणे-पैशाची गणितं असायची. थोडी मोठी झाल्यावर सायकलनं शाळेत जाऊ लागले. तेही अंगवळणी पडलं. त्याच सुमारास फाऊंटनपेन म्हणजे शाईचं पेन वापरायला सुरुवात झाली होती. मोठ्यांकडून भेट म्हणून मुलांना पेन मिळायचं आणि त्या पेनाचं फार अप्रूप वाटायचं. पेनात ड्रॉपरनं शाई भरताना आपण अगदी मोठे झालोय असं वाटायचं. एक टेक्नॉलॉजी हातात आलीये असं वाटायचं.

आणि आता, म्हणजे केवळ पन्नासच वर्षांनी, मी स्मार्टफोन वापरायला आणि व्हॉट्सॲपवर संवादही साधायला लागले आहे. सायकल, नंतर स्कूटर, नंतर चारचाकी गाडी अशी प्रगत तंत्रज्ञानाने चालणारी वाहने सहजतेनं वापरतेय. आधी साधा कॉम्प्युटर, मग लॅपटॉप, नंतर पामटॉप, किंडल, टॅब या आवृत्या निघतच आहेत, आणि मीही त्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेते आहे.

मागे वळून बघताना नवल वाटतं, की तंत्रज्ञानाचे किती टप्पे पार केले आपण!

**२. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.** **(३)**

क. उताऱ्यात आधीच्या आणि आत्ताच्या कोणत्या लेखनसामग्रीचा उल्लेख झाला आहे?

ख. पूर्वी अस्तित्वात नसलेली कोणती माध्यमं आता सर्रास वापरली जातात?

ग. "मागे वळून बघताना नवल वाटतं, की तंत्रज्ञानाचे किती टप्पे पार केले आपण!" असं निवेदिका का म्हणते?

**३. जुन्या पिढीच्या लोकांनी आत्ताच्या प्रसारमाध्यमांचा वापर करावा का? असं तुम्हाला का वाटतं?** **(३)**



**२. खालीलपैकी दोन चित्रे निवडा आणि त्यात दाखवलेल्या प्रवासाबद्दल बोला. (एकूण १० गुण)**



- हा प्रवास / ही सहल कोणती आहे? (ट्रेक, एका दिवसाची सहल, अभ्यास-सहल, परदेशाची सहल, पावसाळी सहल, गिर्यारोहण)
- तुम्ही स्वतः अशा प्रकारचा प्रवास करताना काय काय तयारी कराल?

**३. प्रवासात किंवा सहलीत पुढील गोष्टी घडल्या तर तुम्ही कोणाकडे जाल आणि काय विचाराल? (कोणतेही तीन) (एकूण ६ गुण)**



उदा॰ रस्ता चुकणे :

आसपास कोणी व्यक्ती असेल तर मी त्या व्यक्तीला विचारेन, “अहो, मला हा पत्ता सांगाल का जरा?”



क. पासपोर्ट हरवणे

ख. लहानसे आजारपण येणे



ग. गाडी चुकणे



घ. सामान हरवणे



च. हवे ते शाकाहारी जेवण न मिळणे



**४. संभाषण करा.** **(एकूण १० गुण)**

**दोन – दोन विद्यार्थ्यांनी खालील प्रसंगावर एक संभाषण सादर करावे.**

घरात पुढील कामं करायची आहेत. वेळ थोडा आहे. खाली दिलेल्या भूमिका निवडा आणि संभाषण तयार करा. तुम्ही कामाची वाटणी कशी कराल? पुढे दिलेल्या कामांपैकी कोणती कामं तुम्ही कुटुंबातल्या कोणाला वाटून द्याल? प्रत्येकानं निदान ५ ते ६ वाक्यं बोलावीत.

**भूमिका :** (नवरा - बायको, भाऊ - बहीण, आजी - आजोबा)

**कामे :** एकूण ६ माणसांचा स्वयंपाक करायचा आहे.

सिनेमाची तिकिटे काढायची आहेत.

घराची साफसफाई करायची आहे.

भावाच्या वाढदिवसाला कोणाला बोलवायचं त्याची यादी करायची आहे.

बँकेतून पैसे काढून आणायचे आहेत.

## लेखी परीक्षा – एकूण गुण ६५

**१. खालील उतारा वाचून चूक की बरोबर ते सांगा.** **(एकूण १० गुण)**

**भ्रमंती**

जन्माला आल्यापासून मृत्यूपर्यंत माणूस कायमच भ्रमण करत असतो. भ्रमंती हा विषय तसा जुन्या आणि नव्याही पिढीच्या आवडीचा आहे. काळानुसार त्याची पद्धत बदलली आहे. पूर्वी माणसं संपूर्ण कुटुंबाबरोबर एकत्र प्रवास करायची. त्यांची सामान बांधायची पद्धतही वेगळी असायची. हा प्रवास ते कोणत्याही प्रवासी कंपनीच्या माध्यमातून करत नसत. साध्या बसचं किंवा रेल्वेचं बुकिंग करून प्रवासाला सुरुवात व्हायची. पण त्या काळी बुकिंग मिळवणं हेसुद्धा एक जिकिरीचं काम होतं. तासन् तास रांगेत उभं राहावं तेव्हा कुठे बुकिंग मिळत होतं. हे सगळं टाळायचं असेल, तर एखादी टमटम भाड्यानं घेतली जायची आणि त्यातून प्रवास केला जायचा.

पण हल्ली काळ बदलला आहे. आता प्रवास करायचा असेल तर एवढे कष्ट नाही घ्यावे लागत. आजकाल लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांकडेच स्मार्टफोन असतो, आणि कोणत्याही ठिकाणी जायचं असेल, तर त्याचं बुकिंगपण अगदी सहजपणे स्मार्टफोनवरून करता येतं. त्यासाठी प्रत्येक प्रवासी कंपनीनं स्वतःचं असं एक ॲप तयार केलं आहे. कंपनीमार्फत जायचं नसेल तरीसुद्धा चिंता करायची गरज नाही. स्वतःची गाडी काढायची आणि गुगलमॅप्सच्या मदतीनं इच्छित स्थळी पोचायचं. पूर्वीच्या काळी खाण्यापिण्याचं सामानही बांधावं लागायचं. आता तशी गरज भासत नाही. गुगलमॅप्सवर ह्याचीसुद्धा सोय आहे. प्रवासाच्या वाटेतल्या हॉटेलांची माहितीसुद्धा ह्या मॅप्सवर मिळते.

नवीन पिढीत होणाऱ्या बदलांवर लोकांचा कायमच आक्षेप असतो. पण जर हे बदल असे फायदेशीर असतील, तर त्यांच्याशी जुळवून घ्यायला काहीच हरकत नाही. कारण त्यामुळे प्रवास एकप्रकारे सुखरूप आणि सोयीचा झाला आहे.

१. माणूस अलीकडेच प्रवास करू लागला आहे. ..........

२. पूर्वी प्रवास करणं फार सोपं होतं. ..........

३. पूर्वी फक्त बसनंच प्रवास करता येत असे. ..........

४. आता तिकीट काढणं फारच सोपं आहे. ..........

५. प्रत्येक प्रवासी कंपनीचं स्वतःचं ॲप आहे. ..........

६. आता तिकीट स्मार्टफोनशिवाय काढता येत नाही. ..........

७. पूर्वी लोक स्वतःचं जेवण बरोबर नेत. ..........

८. गुगलमॅप्स रेस्टोरंटस कुठे आहेत हेही सांगतात. ........................

९. प्रवासी कंपनीतर्फे जायचं नसेल, तर स्वतःची गाडीच न्यावी लागते. ........................

१०. प्रवासाच्या पद्धतींत झालेले हे बदल फायदेशीर नाहीत. ........................

## २. व्याकरण (एकूण १० गुण)

**१. तुम्हाला योग्य वाटेल ते कारण लिहा.** **(५)**

उदा॰ जुईली लवकर झोपली, कारण तिचं डोकं दुखत होतं.

क. सईदा परीक्षेत नापास झाली, ........................

ख. मधू पावसात चिंब भिजला, ........................

ग. सायलीला ऑफिसात जायला उशीर झाला, ........................

घ. छोटं बाळ खूप रडत होतं, ........................

च. जेरी सिनेमाला गेला नाही, ........................

**२. तुम्ही वाढदिवसाला कोणाला काय दिले ते सांगा. 'देणे' या क्रियापदाचे योग्य भूतकाळी रूप वापरा.** **(५)**

(चॉकलेट, टेनिसचे बॉल, साडी, स्मार्टफोन, खेळणं)

क. मी आजीला ........................

ख. मी माझ्या मैत्रिणीला ........................

ग. मी माझ्या भावाला ........................

घ. मी माझ्या शिक्षकांना ........................

च. मी माझ्या कुत्र्याला ........................








## ३. शब्दसंपदा (एकूण २०)

**१. खाली दिलेल्या शब्दांचे लिंग आणि त्यांची अनेकवचनी रूपे लिहा.** (७)

| | |
|---|---|
| उदा. तो रस्ता | ते रस्ते |
| ............ गाभारा | ............ |
| ............ | ............ प्रवास |
| ............ देश | ............ |
| ............ इमारत | ............ |
| ............ | ............ जमिनी |
| ............ कट्टा | ............ |
| ............ | ............ मैदाने |

**२. खाली दिलेल्या शब्दांसाठी कंसातील विरुद्धार्थी शब्द निवडून लिहा.** (७)

(संथपणे, हट्टी, अगोदर, नोकर, कष्टाने, क्वचित, आळसावणे)

क. नेहमी

ख. सहजतेने

ग. झपाट्याने

घ. राबणे

च. समजूतदार

छ. मालक

ज. नंतर

**३. खाली दिलेल्या मदतीच्या आधारे तुम्हाला आवडणाऱ्या एखाद्या पर्यटनस्थळाबद्दल लिहा.** (६)

त्या पर्यटनस्थळाचे नाव - तिथे कसे जाता येईल? उदा. बस, ट्रेन इ. - तिथे बघण्यासारख्या एखाद्या ठिकाणाचे वर्णन - तिथल्या खाद्यपदार्थांमधील खासियत - त्या स्थळाबद्दलचे तुमचे एकूण मत

**४. चित्रफीत पाहा आणि त्यावरील स्वाध्याय सोडवा. (एकूण १५ गुण)**

**१. अनिश आणि जाई यांचा बघण्याचा कार्यक्रम आहे. 'कॉफी आणि बरंच काही' या चित्रपटाचा हा भाग पाहा आणि योग्य पर्याय निवडा. (५)**

क. अनिश आणि जाईनं एकमेकांशी कसं बोलावं असं आईबाबांना वाटतंय?

१. आदरपूर्वक

२. मित्रतापूर्वक

३. मोकळेपणे

ख. जाईच्या मते आई-बाबांचा काय हेतू आहे?

१. जाई आणि अनिशनं एकमेकांना समजून घेणं

२. आई - बाबांनी एकमेकांना समजून घेणं

३. यातलं काहीच नाही

ग. जाईचा हा बघण्याचा कितवा कार्यक्रम आहे?

१. बारावा-तेरावा

२. पाचवा-सहावा

३. पहिला

घ. आई - बाबांना कोणत्या गोष्टीचं दडपण (टेन्शन) येतं?

१. आपल्या मुलांच्या समवयस्कांची लग्न झालीयेत किंवा ठरलीयेत, याचं.

२. मुलांचं लग्न अजून ठरलं नाहीये, याचं.

३. मुलांना लोक कोणाच्या तरी नावानं चिडवतात, याचं.

च. आपलं लग्न होणं हा कोणाचा प्रश्न झालेला असतो?

१. कुटुंबाचा

२. जगाचा

३. समाजाचा

**२. 'बघण्याचा कार्यक्रम'आणि त्याचे बदलत गेलेले स्वरूप याविषयी तुम्हाला काय वाटते? सविस्तर लिहा. (१०)**

५. श्रुतलेखन (एकूण १० गुण)

बसचा वेग बेताचाच होता. रस्ताही चांगला होता. त्यामुळे फार जोराचे हिसके बसत नव्हते. उलट पाळण्यात घालून छान जोजवावे तसे वाटत होते. पांघरुणांमध्ये गुरफटून घेऊन सगळे गुडूप झोपले होते.

कधी तरी श्रीरंगला जाग आली. रात्रभर बसच्या खिडक्या बंद असल्यामुळे आता जरासे गुदमरल्यासारखे होत होते. गुडघ्यांत डोके खुपसून बसलेल्या श्रीरंगने पांघरुणातून हात बाहेर काढला आणि बाजूच्या खिडकीची काच थोडी वर उचलली. थंड, बोचरा वारा भसकन आत शिरला. श्रीरंगचे अंग शहारले. आपण कुठे आहोत ते पाहण्यासाठी त्याने गुडघ्यांतून डोके बाहेर काढले आणि डोळे किलकिले केले. अंधार विरत होता. पहाटेचा अंधुक  प्रकाश पसरत होता. श्रीरंगने खिडकीच्या काचेवर जमलेली वाफ हाताने पुसली. बाहेरचे दृश्य पाहून तो उद्गारला, "ओऽऽऽ!!"







## माय मराठी – पातळी २
## अंतिम चाचणी - पदविका परीक्षा
## तोंडी परीक्षा – एकूण ५० गुण

**१. खालील बातमी वाचून दाखवा.** **(३)**

पुणे, ता ९ : पुस्तकं वाचून झाली, की रद्दीत पडतात किंवा दुकानदाराला निम्म्या किमतीत विकली जातात. मात्र, अशा पुस्तकांचा पुरेपूर वापर व्हावा म्हणून दोन तरुणांनी मोबाईल ॲप तयार केले आहे. किरण जाधव आणि आशिष बारोकर यांनी 'सेलआउट' नावाचे हे ॲप सर्वांसाठी मोफत उपलब्ध करून दिले आहे.

आपण वाचण्यासाठी नवीन पुस्तके घेतो, पण एक-दोनदा वाचून झाल्यावर ती कपाटात पडून राहतात. याउलट, खूप लोकांना वाचनाची आवड असते, पण किमतीमुळे ते पुस्तके विकत घेऊ शकत नाहीत; तसेच पाठ्यपुस्तकेही शैक्षणिक वर्ष संपले, की पडून राहतात. त्यांचा पुरेपूर वापर व्हावा म्हणून हे ॲप उपयुक्त ठरणार आहे.

पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सहा महिने किंवा वर्षाने विविध विषयांची पुस्तके विकत घ्यावी लागतात. पन्नास टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांना नवीन पुस्तके घेणे परवडत नाही. त्यांना जुनी पुस्तके हवी असतात. या ॲपद्वारे जुन्या पुस्तकांचा फोटो टाकून आणि माहिती भरून ती पुस्तके आपल्या परिसरातील लोकांना कमी किमतीत विकत घेण्यासाठी उपलब्ध होऊ शकतात...
'सकाळ', पुणे, रविवार १० डिसेंबर, २०१७

**१. चूक की बरोबर ते सांगा.** **(४)**

क. 'सेलआउट' ही एक वेबसाईट आहे.
ख. 'सेलआउट'वर नवी पुस्तके निम्म्या किमतीत उपलब्ध असतात.
ग. ज्यांना नवीन पुस्तके विकत घेणे परवडत नाही, अशा लोकांसाठी 'सेलआउट' हे माध्यम खूप उपयुक्त ठरणार आहे.
घ. 'सेलआउट'वर विकत घेण्यासाठी जुन्या पुस्तकांची माहिती भरावी लागते.

**२. तुम्हाला 'सेलआउट' नावाचा हा उपक्रम कसा वाटतो? कारण सांगा.** **(८)**

२. खालीलपैकी दोन चित्रांचे वर्णन करा आणि त्यांत मांडलेल्या विषयाबद्दल बोला.

(एकूण १० गुण)



३. दोनदोन विद्यार्थ्यांच्या जोड्या करा. प्रत्येकाने टेबलावरील चिठ्ठ्यांतील तीन चिठ्ठ्या उचलाव्यात. चिठ्ठ्या पाहून एकमेकांना प्रश्न विचारा आणि उत्तरे द्या. (एकूण १५ गुण)

| | |
|---|---|
| **मराठीचा वर्ग**<br>कधी...? काय...?<br>कधीपासून...? कधीपर्यंत?<br>किती वेळ...? | **सण**<br>कोणता...? कसा...?<br>कोणासोबत...? काय...?<br>कधी...? |
| **व्यवसाय**<br>कोणता...? कामाची वेळ...?<br>कधीपासून...? कधीपर्यंत?<br>किती वेळ...? काय...? का...? | **ॲप्स**<br>कोणते...? आवडते..?<br>का...? फायदे...?<br>तोटे...? |

४. पुढीलपैकी एक विधान निवडा, त्याच्या बाजूने किंवा त्याच्या विरुद्ध आपले मत मांडा व जोडीदाराबरोबर चर्चा करा. (एकूण १० गुण)

क. कोणतीही प्रसारमाध्यमे न वापरता एक दिवस घालवणे सहज शक्य आहे.

ख. प्रवास स्वतःच सर्व ठरवून आणि आखून करणे जास्त चांगले असते.

ग. नियमित व्यायाम आणि संतुलित आहार यामुळे प्रकृती चांगली राहते.

घ. अधूनमधून व्यायामाला सुट्टी दिली आणि जंक फूड खाल्ले तरी काही बिघडत नाही.

च. फक्त आनंदाच्या प्रसंगात मित्र व नातेवाईकांची साथ द्यावी. इतर वेळी त्यांच्या आयुष्यात ढवळाढवळ करू नये.










# माय मराठी – पातळी २
## अंतिम चाचणी - पदविका परीक्षा
## लेखी परीक्षा – एकूण १०० गुण

**१. खालील जाहिराती वाचा आणि पुढे वर्णन केलेल्या व्यक्तींपैकी कोणी कोणत्या जाहिरातीला प्रतिसाद द्यावा ते सांगा.** **(एकूण ५ गुण)**

**जाहिरात** **व्यक्तीचे नाव**

१. **स्पॅनिश शिकायची अपूर्व संधी**
शिका, तुमच्याच गावात निजभाषकांकडून त्यांची भाषा!
संवादात्मक पद्धती, खास प्रशिक्षित शिक्षक
फी - १६००० रु., कालावधी - ४ महिने,
पुस्तके वर्गात उपलब्ध, किंमत - १२०० रु.
संपर्क - spnlearn@abc.com, मो.- ९१९८००००००,
ऑफिस आणि वर्ग - भाषाशिक्षण, नवी पेठ, नागपूर.



२. **सुट्टीत पोहायला शिका**
कालावधी २१ दिवस, हमखास यशाची खात्री.
उत्तम शिक्षक. मुली आणि स्त्रियांसाठी स्त्री-प्रशिक्षक.
वेळा - सकाळी ८ ते १०, संध्याकाळी ५ ते ७.
निराशा टाळण्यासाठी ताबडतोब नावनोंदणी करा.
बी.जी.एम. तरणतलाव, शंकरनगर, नागपूर.



३. **वजन कमी करण्याचा हमखास उपाय**
योग्य आहार आणि हवा तेवढाच व्यायाम हा तोल साधण्यासाठी
प्रसिध्द आहारतज्ज्ञ श्रीमती रुबीना यांच्याकडे या.
२५ दिवसांत ५ किलो वजन कमी होण्याची हमी. उचला फोन
आणि घ्या अपॉइंटमेंट, लगेच, आत्ताच, ताबडतोब!
फोन नं. – ९१९८००००००० श्रीमती रुबीना नागपुरात
फक्त २५ दिवसच आहेत. या संधीचा फायदा घ्या.



| जाहिरात | व्यक्तीचे नाव |
|---|---|

४ **इकेबाना**
ही जपानी पुष्परचनेची कला शिकण्याची अपूर्व संधी.
थोड्याच जागा शिल्लक. हा वर्ग परत लवकर होणार नाही,
तेव्हा लगेच नाव नोंदवा.
फी - ६००० रु॰, वर्गाचा कालावधी - ३ महिने,
सोम-बुध-शुक्र संध्याकाळी ५ ते ७,
जागा – प्रतीक्षा रंगमंदिर, नागपूर.



५ **सुट्टीत अक्षर सुधारा आणि शिक्षकांची शाबासकी मिळवा.**
वाईट हस्ताक्षरामुळे आपले गुण उगीचच कापले जातात असं वाटतं का? आपला प्रभाव पडत नाही असंही वाटतं का? काळजी करू नका. ह्या वर्गात नाव नोंदवा आणि बघा तुमच्या लिखाणात किती फरक पडतो! कालावधी - २१ दिवस,
वेळ - सोम॰ ते शुक्र॰ रोज सकाळी १० ते ११,
फी - १००० रु॰, स्थळ - जी॰जी॰बी॰ विद्यालय, नागपूर.




क. मुलांबरोबर सुट्टीत माहेरी नागपूरला आलेल्या मीनाक्षीला एका महिन्यात शक्य तितकं वजन कमी करायचंय. पण आई करत असलेले खाण्यापिण्याचे लाडही करून घ्यायचेत. शरीराला व्यायाम तर होईलच, आणि त्याचवेळी नवीन शिकताही येईल असं काही तरी ती शोधतेय!

ख. संजयला या तीन आठवड्यांत काही तरी नवीन शिकायचंय. त्याला रोज सकाळी कंटाळा येतो आणि काय करावं हे कळत नाही. पण त्याला परत मुंबईला जाऊन सर्वांची शाबासकी मिळवायचीय हे नक्की.

ग. अनुष्काचं लग्न ठरलंय. तिला घर सजवण्याची खूप हौस आहे. त्यासाठी तिला लग्नाआधी काही तरी नवीन शिकायचंय.

घ. साजिदाला एमबीए करण्यासाठी सिंगापूर विद्यापीठात प्रवेश मिळालाय आणि ती लवकरच सिंगापूरला रवाना होतेय. जाण्याआधी भारतातच आणखी काही नवं शिकून आपला बायोडेटा जास्त चांगला बनवण्याची तिची इच्छा आहे.

च. सानियाला सौंदर्यस्पर्धेत भाग घ्यायचाय. त्यासाठी तिला उत्तम शरीरयष्टी, नितळ कांती आणि चांगल्या आरोग्याची गरज आहे.

२. वाचन व आकलन (एकूण १० गुण)

**'नवी पिढी, जुनी पिढी'**

नात : नानी, तू किती पिढ्या बघितल्यास?

मी : मी नं ... ५. बघ हं... माझी आजी, आमची आई, मी, माझी मुलगी आणि माझी नात, तू.

नात : यांपैकी तुला कोणती पिढी सर्वात जास्त आवडते?

मी : तुझी.

नात : खरंच? पण का?

मी : कारण ती सर्वात जास्त रंगीबेरंगी आहे.

नात : म्हणजे कशी?

मी : म्हणजे असं, की माझ्या आजीच्या पिढीचा एकच रंग होता, घर. घरकाम, घरच्यांची सेवा आणि घरी येणाऱ्यांचे आदरातिथ्य. मग माझी आई. या घरकामाच्या रंगात अजून एक रंग वाढला, तो म्हणजे शिक्षणाचा. आणि या शिक्षणाबरोबर खेळ, कला, जवळपासचा समाज... यामुळे आईच्या जीवनात बरेच रंग आले. मग माझी पिढी. माझ्या पिढीत उच्चशिक्षण आणि जगाशी आलेला संबंध यामुळे आमचं क्षितिज बरंच रुंदावलं. नवनवीन प्रयोग, प्रवाह, पाऊलवाटा तयार होऊ लागल्या. पिढी रंगीत होऊ लागली. मग तुझ्या आईची पिढी. तंत्रज्ञानाचा एक जबरदस्त रंग बाकी सगळ्या रंगांना वरचढ होऊ लागला. स्पर्धेचा नवीनच रंग भराभर गडद होऊ लागला. नवनवीन पाश्चिमात्य रंग डोकावू लागले. जागतिकीकरणाचा पहाटरंग क्षितिजावर खुलू लागला. आणि त्यानंतर...

नात : मी! पण माझीच पिढी तुला का आवडते?

मी : कारण आधीच्या सगळ्या रंगांत घोळून आत्मविश्वासाचा प्रसन्न रंग लेऊन जन्मलेली आहे तुझी पिढी. तंत्रज्ञानाला तर तुम्ही आपला गुलाम बनवलंय! जग तुमच्या बोटांवर नाचतंय. ग्रहांच्या पलीकडे तुमचं क्षितिज विस्तारलंय. समानता खऱ्या अर्थानं तुमच्या नसानसांत भिनलीये. माझ्या आजीचं 'घर आणि संस्कार' ते तुमचं 'अवकाश' या प्रचंड कक्षेतील सगळे 'सुखद' रंग जपण्याचा आणि 'दु:खद' रंगांशी झुंजण्याचा तुमचा 'कूल' रंग मला फार आवडतो. तुमच्या या रंगात आधीच्या सगळ्या पिढ्या अक्षरश: न्हाऊन निघतात. व्हा धाडसी... बदलासाठी!

## चाचणी

**१. योग्य पर्याय निवडा.** **(५)**

क. वरील संवादात कोण कोण बोलत आहे?

१. आई-मुलगी २. आजी-नात ३. सासू-सून

ख. आजीला स्वतःच्या पिढीपेक्षा सध्याची पिढी जास्त आवडते, कारण...

१. सध्याची पिढी खूप रंगीबेरंगी कपडे घालते.

२. आजीच्या पिढीला एकाच रंगाचे कपडे घालायला मिळायचे.

३. आत्ताच्या पिढीच्या आयुष्यात खूप विविधता आहे.

ग. 'मी'च्या बोलण्यात येणारी पहिली पिढी तिच्या ................................ची आहे.

१. आजी २. आई ३. मुलगी

घ. 'मी'च्या मुलीच्या पिढीमध्ये कोणता मोठा बदल घडला?

१. तंत्रज्ञान वरचढ होऊ लागले. २. घरकामाशिवाय बायका शिक्षणही घेऊ लागल्या.

३. तंत्रज्ञान माणसाचे गुलाम बनले.

च. आजी किती पिढ्यांची तुलना करत आहे?

१. तीन २. पाच ३. चार

**२. आजीच्या कोणत्या मतांशी तुम्ही सहमत आहात, आणि कोणती मते तुम्हाला पटत नाहीत ते कारणांसह लिहा.** **(५)**

### ३. व्याकरण (एकूण ४५ गुण)

**१. खालील उताऱ्यात अधोरेखित केलेल्या शब्दांमधील शब्दयोगी अव्यये आणि क्रियाविशेषणे ओळखून त्यांच्या दोन वेगळ्या याद्या करा.** **(५)**

<u>जायच्या आधी</u> हे काम कर. <u>नंतर</u> करतो असं म्हणू नकोस. <u>आधीच</u> इतका उशीर झालाय, की मला <u>खाली</u> जाऊन भाजी आणायलाही वेळ नाही. <u>टोपीखाली</u> किल्ल्या आहेत त्या घे, आणि <u>गच्चीवर</u> जा. <u>गच्चीवरून</u> <u>अगोदर</u> फुलं आण, आणि <u>मग</u> देवाची पूजा कर. <u>वर्षापूर्वी</u> लावलेल्या मोगऱ्याला आता फुलं यायला लागलीयेत.

| शब्दयोगी अव्यये | क्रियाविशेषणे |
|---|---|
| | |

**२. कंसातील योग्य प्रत्यय वापरून रिकाम्या जागा भरा** **(५)**

(चा / ची / चे / च्या)

दीपाला गुलाबा.................. फुले आवडतात हे कळल्यावर मंदारलापण गुलाब फार आवडायला लागले, आणि गुलाबां.................. शेतीच करायची असे त्याने ठरवून टाकले. पण आपल्याकडे शेतजमीन नाही, हे लक्षात आल्यावर त्याने गच्चीवर कुंड्यांमध्ये गुलाब लावायचे, असे ठरवले. मग त्याच्या मित्राने, दिनेशने, दिलेल्या गुलाबां.................. झाडां.................. कुंड्या त्याने गच्चीवर आणून ठेवल्या. त्याच्या मित्राने त्यांत वेगवेगळ्या रंगां.................. गुलाब लावून दिले होते. दीपाला कोणत्या रंगा.................. गुलाब आवडतो हे मंदारला अजून माहीत नव्हते, पण येणारे पहिले फूल तिला द्यायचे असे त्याने ठरवले होते. ते फूल लाल रंगा.................. असावे अशी त्याची मनोमन इच्छा होती. एका झाडाला पहिली कळी लागली आणि ती कधी एकदा उमलतेय असे मंदारला झाले. एक गोष्ट त्याला बिचाऱ्याला माहीतच नव्हती. त्याच्या मित्राने गुलाब म्हणून सदाफुली.................. रोपटी त्याला दिली होती आणि झाडा फुलांचे अजिबात ज्ञान नसलेला मंदार पार फसला होता. दरम्यान दिनेशने दीपाला रोज वेगवेगळ्या रंगां.................. गुलाबां.................. गुच्छ देऊन कधीच पटवले होते.











३. **पुढील तक्त्यातील राजूची गोष्ट तिन्ही काळांत पूर्ण करा.** **(१०)**

| साधा वर्तमानकाळ | अपूर्ण वर्तमानकाळ | पूर्ण वर्तमानकाळ |
|---|---|---|
| राजू रात्री उठतो. | | |
| | मैत्रिणीला फोन करत आहे. | |
| | | हळूच गाडीची किल्ली घेतली आहे. |
| गाडी सुरू करतो. | | |
| | आणि तो स्वप्नातून जागा होत आहे. | |

४. **'असणे', 'नसणे' आणि 'होणे' या क्रियापदांची योग्य रूपे वापरून रिकाम्या जागा भरा. (५)**

विशाल : काल माझा मोबाईल इथे ..................., तो कुठंय?

अंजली : अरे, ................... की तिथेच.

विशाल : नाही ना, ................... इथे.

अंजली : नाही कसा? ................... तिथे, नीट बघ. मी पाहिलाय थोड्या वेळापूर्वी. तिथेच टेबल ...................

विशाल : (स्वतःशीच) आता काय करू मी? इतका कसा विसराळू ................... मी? असा तर कधीच ................... मी. लोक म्हणतात, माणूस म्हातारपणी विसराळू ..................., पण मी तर चाळीशीतच विसराळू ................... . खरंच का तो मोबाईल टेबलावर ...................?

५. **'ला' किंवा 'ना' हे विभक्तिप्रत्यय योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पूर्ण करा.** **(५)**

झाडा............ पाणी घालायला अभि झारी घेऊन बाहेर पडला, तेवढ्यात त्याला घरातून आजोबांची हाक ऐकू आली. "अरे अभि, सगळ्या झाडां............ पाणी घाल बरं, नाही तर फक्त एकाच झाडा............ घालून येशील. नंतर मोगऱ्या............ किती कळ्या आल्यायत तेही पाहून ठेव. कळलेलं बरं असतं रे. नाही तरी आपले शेजारीच सगळ्या कळ्या नेतात; पण आपल्याला माहीत हवं ना! हो, आणि आंब्या............ मोहोर आल्यापासूनच मळ्याकडे गावातल्या पोरांच्या फेऱ्या वाढल्या आहेत, त्या पोरां............ आवरायचं कामही तुझ्याकडेच आहे बरं! आता आंबे पाडाला आलेयत, जास्त लक्ष ठेवायला हवं. पेरू............ आणि चिकू............ कीड नाही ना लागली तेही बघ, आणि दुपारी संतोजी आणि तुकोजी या दोन्ही माळ्यां............ निरोप पाठवून बोलवून घे. बागे............ वेळच्या वेळी पाणी द्यावं लागेल. बरीच कामं निघणार आहेत आता."

**६. कंसात दिलेल्या शब्दांचे योग्य ते सामान्यरूप करून मोकळ्या जागा भरा.** **(५)**

क. (घर) ................त (पैसा) ................ला कमी नाही (ते) ................च्या, पण घरातील सगळेच फार कंजूष आहेत.

ख. मला (नवा) ................ (शर्ट) ................ गरज आहे.

ग. मला वाटतं, की (तू) ................ समजण्यात काही तरी चूक झाली आहे. भार्गव असा विचित्र निरोप कधीच पाठवणार नाही.

घ. (आम्ही) ................च्याकडे असं वागलेलं अगदी चालत नाही. (शहाणा) ................ मुलांनी (मोठा) ................ (माणूस अ.व.) ................चं ऐकावं, असं नेहमी सांगतात.

**७. कंसातील शब्दाचे सामान्यरूप करून त्याला योग्य विभक्तिप्रत्यय जोडून वाक्ये पूर्ण करा.** **(५)**

क. (पिशवी)................ आंबे होते, त्यांचा घमघमाट सुटला होता.

ख. (शाळा) ................ जाताना मुले (पाणी)................ खेळतखेळत जात होती.

ग. (ती) ................ अशी जादू होती, की (वर्ग) ................ ती येताच मुले शांत बसली.

**८. कंसातील शब्दाचे सामान्यरूप करून त्याला योग्य विभक्तिप्रत्यय जोडून वाक्ये पूर्ण करा.** **(५)**

क. आलोक................ (मी) ................ पेढा दिला.

ख. तिच्या (मैत्रीण)................ (ती) ................ छान भेट दिली.

ग. गल्लीतल्या (कुत्री)................ भुंकून भुंकून (सगळे)................ त्रास दिला.

घ. (गाडी)................ आलो आणि (गाडी)................ गेलो, तरी आम्ही प्रवासात दमून गेलो.

च. (आई)................ चविष्ट स्वयंपाक केला होता, त्यामुळे (सगळे)................ जेवणावर ताव मारला.







## ४. शब्दसंपदा (एकूण १५ गुण)

**१. योग्य पर्याय निवडा.** **(५)**

क. ........................ ही देशातील चालीरीती आणि परंपरा यांना सामावून घेते.

(संस्कृती / प्रकृती / व्यक्ती)

ख. शरीर आणि मन यामध्ये झालेल्या बिघाडाला ........................ म्हणतात.

(अंधार / आजार / औजार)

ग. चांगली मैत्री झाल्याशिवाय एकमेकांची ........................ कळत नाही.

(सांगड / भानगड / आवडनिवड)

घ. तुषार हा फक्त खादाड नाही तर चांगला ........................ आहे.

(खवय्या / माणूस / प्रवासी)

च. शेअरबाजारातील ........................ फार थोड्या लोकांना समजतात.

(व्यवहार / आजार / प्रकार)

**२. खालील शब्दांच्या त्यांच्या विरुद्धार्थी शब्दांशी जोड्या लावा.** **(५)**

| | |
|---|---|
| क. न्यूनगंड | १. हसरा |
| ख. रडका | २. आत्मविश्वास |
| ग. दुरावा | ३. कंटाळणे |
| घ. करमणे | ४. जवळीक |
| च. सडपातळ | ५. लठ्ठ |

**३. खालील शब्दांच्या त्यांच्या समानार्थी शब्दांशी जोड्या लावा.** **(५)**

| | |
|---|---|
| क. परिवार | १. कुटुंब |
| ख. चविष्ट | २. कल्पना नसताना |
| ग. अचानक | ३. आकडा |
| घ. क्रमांक | ४. रुचकर |
| च. होकार | ५. हो म्हणणे |

**५. तुमच्या मैत्रिणीची दिल्लीहून ई-मेल आली आहे. ती वाचा आणि तिला उत्तर लिहा.(एकूण ५ गुण)**

प्रिय सुखदा,

आज अगदी निवांतपणे तुला मेल लिहिते आहे, कारण रोजची घाई-गडबड नाही. निवृत्तीनंतरचा हा दुसरा आठवडा. आधी ठरवल्याप्रमाणे मी लगेच मराठीचे वर्ग सुरू केले आहेत. इथे असलेल्या मराठी कुटुंबांतील मुलांना मराठी शिकवण्याचे काम मी करत आहे. त्यामुळे वेळ कसा जातो कळत नाही.

आपलीच भाषा नव्याने शिकल्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर मला पाहायला मिळतो. पुढच्या वर्षी तूसुद्धा निवृत्त होशील ना? मग नंतर तू काय करायचं ठरवलं आहेस? तुझं तर याआधीच ठरलं असेल ना?

आता तू केव्हाही दिल्लीला ये. वेळ काढून ये. खूप गप्पा मारायच्या आहेत.

तुझी,

सविता

**६. श्रवणकौशल्य** **(एकूण २० गुण)**

**१. श्रुतलेखन** **(५)**

निसर्गात दिसणारे चमत्कार आपण अनेक वेळा पाहतो, अनुभवतो, आणि त्याची नवलाई मनात घर करून राहते. एकमेकांना त्याबद्दल आपण सांगतो, आणि मग त्या ठिकाणांना प्रसिद्धी मिळते. परदेशात अशा नवलाईच्या ठिकाणांचा पद्धतशीरपणे विकास केला जातो. त्या ठिकाणाचे वैशिष्ट्य जपून ठेवून पर्यटकांची सोय पाहिली जाते, त्यामुळे ते ठिकाण हे स्थानिक लोकांसाठी एक उत्पन्नाचे चांगले साधन होऊ शकते.

**२. ध्वनिफिती आणि वाक्ये यांच्या जोड्या जुळवा.** **(५)**

| वाक्ये | ध्वनिफीत |
|---|---|
| क. अगं आता काय करू? दादा फोनच उचलत नाहीये. | |
| ख. आई, बाबांनी फोन बंद करून ठेवलाय वाटतं! | |
| ग. अमृता दुसऱ्या कोणाशी तरी बोलतेय वाटतं! | |
| घ. चल लवकर! नाही तर ६.४३ ची गाडी जाईल आपली! | |
| च. सायली, नक्की हाच नंबर आहे ना फातिमाचा? | |

**३. पुढील ध्वनिफीत ऐका आणि योग्य पर्याय निवडा.** **(१०)**

क. 'ती'ची बस नेहमी एक किंवा दोन मिनिटांनी ..................................... .

१. सुटते

२. चुकते

३. पडते

ख. बस पकडता न आल्याने तिला आज कोण भेटलं?

१. अभिषेक

२. तिचे बाबा

३. तो

ग. तरीही मला त्याची ओळख ..................................... .

१. कळली

२. पटली

३. दिसली

घ. 'ती'ने त्याला लगेच ओळखलं.

१. चूक

२. बरोबर

३. याविषयी या ध्वनिफितीत काहीही नाहीये.

च. मधल्या काळात 'तो' ..................................... .

१. बराच बदलला होता

२. चांगलाच जाडा झाला होता

३. तो मुळीच बदलला नव्हता

छ. त्या दोघांची शेवटची भेट कुठे झाली होती?

१. घरी

२. बस-स्टॉपवर

३. वरीलपैकी कुठेही नाही

ज. त्या दोघांच्या भेटण्याचं प्रमाण कायम ..................................................

१. वाढत गेलं

२. कमी होत गेलं

३. बदलत राहिलं

झ. रिकाम्या जागा भरा :

प्रथम आमच्या भेटी दर दोन .................................................. होत, नंतर

दोन .................................................. होऊ लागल्या आणि मग काही ..................................................

१. दिवसांनी, आठवड्यांनी, महिन्यांनी

२. दिवसांत, आठवड्यांत, महिन्यांत

३. दिवसाला, आठवड्याला, महिन्याला

ट. त्यानं तिला ..................................................

१. नक्की ओळखलं

२. अजिबात ओळखलं नाही

३. ओळखलं की नाही हे तिला नक्की समजलं नाही.

ठ. त्या दोघांचं नातं काय आहे?

१. मित्र-मैत्रीण

२. भाऊ-बहीण

३. याविषयी या ध्वनिफितीत काहीही नाहीये.

# उत्तरे

## पाठ : मागील भागात

१. १) तुम्ही विद्यार्थी आहात का? २) तुम्ही पुण्यात राहता का? ३) टीव्ही बघणे हा तुमचा छंद आहे का? ४) तू विवाहित आहेस का? ५) तो म्यानमारचा आहे का? ६) त्या मुंबई विद्यापीठामध्ये जर्मन शिकवतात का? ७) तुला निळा रंग आवडतो का? ८) तुम्हाला 'पा' हा सिनेमा आवडतो का?
९) तो बँकेत काम करतो का?

२. १) काय खाली पडतायत? २) बाबा काय दुरुस्त करतोय? ३) किती वाजलेत? ४) डॉक्टर कुठे आहेत? ५) साक्षी कुठे जातेय? ६) कोण दंगा करतायत?

३.

| काल | आज | उद्या | परवा | तेरवा |
|---|---|---|---|---|
| शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार |
| मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
| सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार |
| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार |

४. १) ती पुरणपोळी - त्या पुरणपोळ्या २) ती पाणीपुरी - त्या पाणीपुऱ्या ३) ती पावभाजी - त्या पावभाज्या ४) तो वरणभात ५) तो तिळगूळ - ते तिळगूळ

५. १) कुस्करा २) करा ३) मिसळा ४) बनवा ५) घाला, करा ६) तापवा ७) बुडवा, तळा

६. १) तो पोपट, ते पोपट २) ती गाय, त्या गायी ३) ते मांजर, ती मांजरे ४) तो कुत्रा, ते कुत्रे ५) ती चिमणी, त्या चिमण्या ६) ते कबुतर, ती कबुतरे

७. १) दोन वाजून तीस मिनिटे किंवा अडीच २) बारा वाजून पंचेचाळीस मिनिटे किंवा पाऊण ३) आठ वाजून पंचावन्न मिनिटे ४) पाच वाजून पन्नास मिनिटे ५) तीन वाजून तीस मिनिटे किंवा साडेतीन ६) एक वाजून पंधरा मिनिटे किंवा सव्वा

९. १) तो खेळाडू धावत नाहीये. २) काही शास्त्रज्ञ गप्पा मारतायत. ३) मिस्टर गोखले, तुम्ही काय शोधाताहात? ४) ती लहान मुलं झोपत नाहीयेत. ५) आम्ही लंगडी खेळतोय. ६) त्या बायकांना गोष्टी सांगता येत नाहीयेत. ७) हल्ली तरुण मुलं कोणती गाणी ऐकतायत? ८) ते गाढव काय करतंय? ९) म्हात्रेकाका कुठे जातायत?

१०. १) ते खेळाडू धावत नाहीयेत. २) तू काय शोधतोयस? ३) ते लहान मूल झोपत नाहीये. ४) मी लंगडी खेळतेय. ५) ती बाई गोष्टी सांगत नाहीये. ६) ती कोणती गाणी ऐकतेय? ७) ती गाढवं काय करतायत?

११. १) ती झोपा काढतेय. २) ते पत्ते खेळतायत. ३) तो वृत्तपत्र वाचतोय. ४) सगळी मुलं गाणी ऐकतायत. ५) त्या कपडे धुतायत. ६) तो स्वयंपाक करतोय. ७) त्या बायका गप्पा मारतायत.

१४. १) पेन्शन कार्ड २) शेतकरी पासबुक ३) वाहनचालक परवाना ४) पारपत्र / पासपोर्ट ५) मतदार ओळखपत्र

१५. १) लिंग २) जन्मतारीख ३) वय ४) ई-मेल ५) पत्ता / घर क्रमांक / इमारत क्रमांक / अपार्टमेंट ६) रस्ता / मार्ग / गल्ली ७) विभाग / ठिकाण / क्षेत्र ८) उपनगर ९) शहर १०) पिनकोड
११) राज्य

१६. १) बानी, तुला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! २) वरुणदादा, तुझं खूप खूप अभिनंदन! ३) पीटर, तुला नाताळच्या शुभेच्छा! ४) काका-काकी, ही दिवाळी तुम्हाला आनंदाची जावो. दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! ५) आई, सॉरी, माझं फोनकडे लक्ष नव्हतं.

## पाठ १

१. १) क) पूर्वी या परिसरात खूप वस्ती नव्हती. ख) पूर्वी पुलाजवळ शाळा नव्हती. ग) शाळेपुढे मैदान होते. घ) खरेदीसाठी पूर्वी मॉल नव्हतं, बाजार होता. च) पूर्वी इथे हिरवी झाडे होती, इमारतींचं जंगल नव्हतं.
२) क) दोन वाजून सदतीस मिनिटे / दोन सदतीस ख) दहा वाजून बावन्न मिनिटे / दहा बावन्न ग) सहा वाजून एकोणपन्नास मिनिटे / सहा एकोणपन्नास घ) एक वाजून पंचेचाळीस मिनिटे / एक पंचेचाळीस / पावणेदोन च) चार वाजून त्रेपन्न मिनिटे / चार त्रेपन्न छ) तीन वाजून पंधरा मिनिटे / तीन पंधरा / सव्वा तीन ज) आठ वाजून पन्नास मिनिटे / आठ पन्नास झ) दोन वाजून अडतीस मिनिटे / दोन अडतीस
३) क) पावणेपाच झाले आहेत / पावणेपाच वाजले आहेत / पाचला पंधरा मिनिटे कमी आहेत.
ख) सव्वादोन झाले आहेत / सव्वादोन वाजले आहेत / दोन वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत.
ग) साडेपाच वाजले आहेत / साडेपाच झाले आहेत / पाच वाजून तीस मिनिटे झाली आहेत / सहा वाजायला तीस मिनिटे आहेत. घ) पावणेअकरा वाजले आहेत / पावणेअकरा झाले आहेत / अकराला पंधरा मिनिटे कमी आहेत. च) दीड वाजला आहे / एक वाजून तीस मिनिटे झाली आहेत / दोन वाजायला अर्धा तास बाकी आहे.
४) क) एक ख) दीड ग) पावणे दोन घ) अडीच च) साडेसहा

२. १) असते - असते २) होणं - असते ३) होते - होतो ४) होते - असतात ५) असतात ६) होते - असतो ७) होते ८) होते - असतो

३. १) घ २) ग ३) ख ४) क

४. १) क) मला गळू होतं. ख) माझी पळापळ होते. ग) माझी दमछाक होते. घ) मला अपचन होतं. च) मला खोकला होतो. छ) मला उलटी होते. ज) माझी फजिती होते. झ) मला कसंतरी होतं. ट) मधली सुट्टी होते. ठ) माझा पगार होतो. ड) माझे लग्न होते.
२) क) मला गळू झालं. ख) माझी पळापळ झाली. ग) माझी दमछाक झाली. घ) मला अपचन झाले. च) मला खोकला झाला. छ) मला उलटी झाली. ज) माझी फजिती झाली. झ) मला कसंतरी झालं. ट) नऊ वाजता माझी मधली सुट्टी झाली. ठ) माझा पगार झाला. ड) माझे लग्न झाले.
३) क) तेव्हा तिचे पोट बिघडते. ख) तेव्हा ती खुशीत असते. ग) तेव्हा त्याला राग येतो. घ) तेव्हा ते दमतात. च) तेव्हा ती जरा पडून राहते. छ) तेव्हा ती शांत बसून राहते.
४)

| क्रियापद | सामान्य वर्तमानकाळ | नकारात्मक रूप | सामान्य भूतकाळ | नकारात्मक रूप |
|---|---|---|---|---|
| असणे | आहे | नाही | होतो | नव्हतो |
| होणे | | होत नाही | झाला | झाला नाही. |
| | होतो | | | |

५. १) आहे - आहे २) होतास - होतो ३) होते - होते ४) होतात - होतो

६. १) नाहीत २) होतो ३) होती ४) होतो ५) होता-झालात ६) नव्हतो ७) नव्हते ८) नाही ९) आहे १०) आहे

७. १) क) आहे - होतं ख) आहे - होतं ग. आहे - होती घ) आहेत - होतं च) आहे - होती
छ) आहे - होती ज. आहोत - होतं
२) क) पूर्वी जुन्या शाळा होत्या, आता आधुनिक शाळा आहेत. ख) पूर्वी तंत्रज्ञानाचा अभाव होता, आता घराघरात आंतरजाल आहे. ग) पूर्वी नोकऱ्या शहरात होत्या, आता नोकऱ्या गावातही आहेत.

८. १) क) माझ्याकडे बायको आणि मुलं आहेत, पण मैत्रीण नाही. ख) माझ्याकडे पैसे आहेत, पण तारुण्य नाही. ग) माझ्याकडे खूप वेळ आहे, पण आरोग्य नाही. घ) माझ्याकडे घर आहे, पण जगण्याचा बिनधास्तपणा नाही.
च) माझ्याकडे काम आहे, पण ते करण्यासाठी चपळपणा नाही.
छ) माझ्याकडे चालण्याची काठी आहे, पण आता पायात शक्ती नाही. ज) माझ्याकडे औषधे आहेत पण तरीही दात आणि घनदाट केस नाहीत.
२. क) होतो - नव्हते ख) होतो - नव्हती ग) होतो - नव्हती घ) आहे - नाही च) होतो - नव्हतो

९. १) यशस्वी झाली नाही? २) सुंदर झाले नाही? ३) खूप गणिते सोडवली - पक्के झाले नाही? ४) खूप बदाम खाल्ले - तल्लख झाली नाही ५) खूप कष्ट केले - श्रीमंत झाला नाही? ६) व्यायाम केला - सडपातळ झाली नाही? ७) रोज दोरीवरच्या उड्या मारल्या - उंच झाला नाही? ८) रोज दूध-हळद प्यायली- निरोगी झाली नाही? ९) खूप प्रयत्न केले - झाले नाहीत?

१०.

| | |
|---|---|
| ती **उठली** आणि आपण? (उठणे) | आपण **उठलो.** |
| तो **भेटला** आणि आम्ही? (भेटणे) | आम्ही **भेटलो.** |
| मी (स्त्री०) **पळाले** आणि तुम्ही? (पळणे) | तुम्ही **पळालात.** |
| मी (पु०) **चढलो** आणि तो? (चढणे) | तो **चढला.** |
| मी (स्त्री०) **चालले** आणि ती? (चालणे) | ती **चालली.** |
| आम्ही **थांबलो** आणि ते (नपुं०)? (थांबणे) | ते **थांबले / थांबलं.** |
| तुम्ही **झोपलात** आणि ते (पु०)? (झोपणे) | ते **झोपले.** |
| तो **दमला** आणि त्या? (दमणे) | त्या **दमल्या.** |
| तुम्ही **कंटाळलात** आणि ती (नपुं०अ०व.)? (कंटाळणे) | ती **कंटाळली.** |

११. १) धावली - आली २) चढली - झोपली ३) दमले - झोपले ४) चाललो - पोहोचलो ५) आल्या - जेवल्या

१२. १) ग २) घ ३) ख ४) छ ५) छ ६) क

१३. १) सेल्फीमुळे आत्मविश्वास कमी होतो. २) सेल्फीमुळे मेंदूसंबंधीचे आजार होतात. ३) सेल्फीमुळे स्वतःबदल द्वेष निर्माण होतो. ४) सेल्फीमुळे स्वत:चीच भीती वाटते. ५) सेल्फीमुळे समाजाने नाकारण्याची भीती वाटते.

१५. १) जशी - तसं २) जसा - तसा ३) जशी - तशी ४) जशी - तशी

१६. १) क ) कशी झाली ख) कसा झाला ग) कसं झालंय घ) कशी होती च) कशी झाली छ) कसा झाला ज) कशी झाली - कसं झालं झ) कसा आहे ट) कसा झाला २) क) जसं - तसं
ख) ज्याला - त्याला ग. जरी - तरी घ. जे - ते

१७. १) ख २) ग ३) क ४) क ५) ख ६) ग

१८. १)

| | वचन | | होणे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकवचन | अनेकवचन | झाला | झाली | झाले | झाले / झालं | झाल्या |
| क. अनेक रात्री | | ✓ | | | | | ✓ |
| ख. चार आठवडे | | ✓ | | | ✓ | | |
| ग. एक महिना | ✓ | | ✓ | | | | |
| घ. दहा दिवस | | ✓ | | | ✓ | | |
| च. शंभर वर्षे | | ✓ | | ✓ | | | |
| छ. संध्याकाळ | ✓ | | | ✓ | | | |
| ज. एक रात्र | ✓ | | | ✓ | | | |

२) क) एक आठवडा झाला, मी मासे खाल्ले नाहीत. ख) तीन रात्री झाल्या, मी झोपले नाही. ग) किती दिवस झाले, मी वाट पाहते आहे. घ) दोन तास झाले, तिची बडबड थांबत नाही. च) दहाच मिनिटे झाली, त्याचा मोबाईल लपवलाय. छ) एक वर्ष झालं, त्याच्याशी काही संपर्क नाही. ज) काही क्षण झाले, तो भुंकायचं थांबला आहे.

## पाठ २

१. १) संपेल २) निघेल - घालवतील - करतील ३) नेणार / न्याल ४) करशील / करणार
५) जाणार - येणार ६) उठणार - काढणार - जाणार - भटकणार

२. १) शिवणार आहे २) येणार आहेत ३) सगळे मित्र मिळून अभ्यास करणार आहेत. ४) जाणार आहोत

३. १) येईन २) खाशील ३) होशील ४) जाऊ ५) देतील

४.

| | |
|---|---|
| १. सदरा शिवायला टाकला होता. | क. सदरा उद्या शिवून मिळेल ना? |
| २. बँकेत चेक भरला होता. | ख. बँकेत चेक जमा झाला का? / ना? |
| ३. काही पुस्तके मागवली होती. | ग. मागवलेली पुस्तके आली का? / ना? |
| ४. चकल्यांची ऑर्डर दिली होती. | घ. चकल्यांची ऑर्डर पूर्ण झाली का? |
| ५. मुलांचा प्रकल्प पूर्ण करायचा होता. | च. मुलांचा प्रकल्प पूर्ण झाला का? |
| ६. बायकोचा फोन दुरुस्त करायला टाकला होता. | छ. बायकोचा फोन दुरुस्त झाला का? |
| ७. संध्याकाळचा स्वयंपाक करायचा होता. | ज. संध्याकाळचा स्वयंपाक झाला का? |

५. १) ख २) ग ३) क ४) क ५) ख ६) ख

६. १) मी रोज दोरीच्या उड्या मारेन. २) मी सूर्यनमस्कार घालीन. ३) मी सकाळी ताज्या हवेत योगा करीन. ४) शरीराला प्रथिने मिळवीत म्हणून मी भाज्या आणि फळे खाईन. ५) जाडी वाढू नये म्हणून मी साखर, मैदा खाणार नाही.

७. १) क) हसेन ख) पडणार - करणार ग) उडेल घ) धावू २) क) आणू - लावू ख) करशील ग) चालवेल घ) वाचेन / वाचणार च) काढा ३) क) खाईन ख) येईन ग) जाऊ घ) आवरणार च) प्याल छ) देईल ज) होईल

८. १) मी आज ऑफिसला दांडी मारणार आहे. २) निखिल निमिषाला पुस्तके देणार आहे. ३) जोशीकाका नवीन गाडी घेणार आहेत. ४) शाळेतील मुले वृक्षारोपण करणार आहेत. ५) समुद्राची पातळी वाढणार आहे. ६) मुख्याध्यापक दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देणार आहेत. ७) शेतकरी या वर्षी कापसाचे बी पेरणार आहे. ८) कामगार दरवर्षीप्रमाणे मोर्चा काढणार आहेत. ९) शेजारची छोटी मुलगी काच फोडणार आहे.

९. १) परिचारिका : मी परिचारिका होईन. मी डॉक्टरला मदत करीन. २) सोनार : मी सोनार होईन. मी सोन्याचे दागिने घडवीन. ३) धोबी : मी धोबी होईन. मी लोकांचे कपडे धुवीन. ४) चांभार : मी चांभार होईन. मी तुटलेल्या चपला शिवून देईन. ५) शिंपी : मी शिंपी होईन. मी कपडे शिवून देईन. ६) कुंभार : मी कुंभार होईन. मी मातीची मडकी करीन. ७) न्हावी : मी न्हावी होईन. मी केस कापीन आणि दाढी करून देईन. ८) आचारी : मी आचारी होईन. मी उत्तम स्वयंपाक करून लोकांना खाऊ घालीन. ९) कलाकार : मी कलाकार होईन. माझ्या अंगी अनेक कला असतील. १०) उद्योजिका : मी उद्योजिका होईन. मी मालाची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करून विकीन.

## पाठ ३

१. १) नाचणे / सालसा करणे : मला उंच टाचांच्या चपला, सीडी आणि नाचाचा जोडीदार लागेल. २) वाचणे : मला शब्दकोश लागेल. ३) बागकाम करणे : मला बागकामाची अवजारे आणि फुलझाडे लागतील.

२. १) हे पुस्तक जाड आहे. २) ही खुर्ची मोठी आहे. ३) हा टॉप काळा आहे. ४) ही बांगडी हिरवी आहे. ५) हे झाड जुने आहे.

३. १) ही खिडकी छोटी आहे. या खिडक्या छोट्या आहेत. २) हा रुमाल पांढरा आहे. हे रुमाल पांढरे आहेत. ३) हे गाव चांगले आहे. ही गावे चांगली आहेत. ४) ही भाषा सोपी आहे. या भाषा सोप्या आहेत. ५) हा वारा बोचरा आहे. हे वारे बोचरे आहेत.

४. १) क. ३ ख. ४ ग. १० घ. ९ च. १ छ. ७ ज. २ झ. ५ ट. ६ ठ. ७
२) क) मला अद्ययावत स्मार्टफोन / मोबाईलवरून चॅट करायला आवडते / आवडतं. ख) मला अवाढव्य मॉलमध्ये फिरायला आवडते / आवडतं. ग) मला रहस्यमय चित्रपट बघायला आवडतात. घ) मला हुशार मित्रांसोबत गप्पा मारायला आवडतात / आवडते / आवडतं. च) मला कॉम्प्युटरवर फावल्या वेळात खेळ खेळायला आवडते / आवडतं. छ) मला तिखट पाणीपुरी खायला आवडते.
ज) मला शांत ठिकाणी निवांत पडायला आवडते / आवडतं. झ) साहसी खेळ खेळायला धाडसी वृत्ती लागते. ट) पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी जागरूक नागरिक असावे / असावं.

५. १) ही पुस्तके नवी आहेत. २) या जीन्स काळ्या आहेत. ३) हे मोबाईल मोठे आहेत. ४) ही गाणी चांगली आहेत. ५) ही फुले छोटी आहेत.

६. १) जांभळा २) काळ्या ३) निळे ४) पिवळी ५) पांढरे ६) हिरव्या ७) घारे ८) जांभळा ९) जांभळे १०) निळा ११)काळे १२) भुरे १३) पिवळा १४) हिरवी १५) जांभळी

७. १) स्व-निरीक्षण, असा मी, कसा मी? २) विकारी विशेषणे : नकटी, बरे, चांगले, कुरळे, मोठा, बुटका, गोरापान, अविकारी विशेषणे : गोल, टोकदार, लहान, सरळ, उंच, गंभीर, बोटभर, हुशार, विनोदी, लांब ३) विरुद्धार्थी विशेषणे : सावळा - गोरा, सरळ - कुरळे, लहान - मोठा, उंच - बुटका, गंभीर – विनोदी

८. १) हा जुना आरसा फुटका आहे. हा फुटका आरसा जुना आहे. २) ते काळे वाहन मोठे आहे. ते मोठे वाहन काळे आहे. ३) ती कच्ची केळी हिरवी आहेत.ती हिरवी केळी कच्ची आहेत.

९. सानिकाकडे पिवळा कुडता, १) पांढरे घड्याळ आणि २) गुलाबी पर्स आहे. तिचा ३) काळा पट्टा हरवला आहे, तर ४) निळ्या चपला तुटल्या आहेत. तिची ५) काळी जीन्स फाटली आहे. आज ती ६) हिरवी पर्स, ७) निळा पट्टा आणि ८) पिवळी जीन्स आणायला बाजारात जाणार आहे. येताना ती तिच्या मैत्रिणीसाठी ९) हिरवा चष्मा, १०) पांढरी सलवार, व ११) जांभळे पेनसुद्धा आणणार आहे.

१०. उदाहरणार्थ : राधिका - उंच, चपळ, जागरूक, सावळी, हसरी...(अनेक उत्तरे अपेक्षित)

१३. १) मला हास्ययोग करण्यात गंमत वाटते. २) मला ताय ची करायला भीती वाटते. ३) मला सायकल चालवण्यात आनंद वाटतो. ४) मला फेरफटका मारायला जाणं छान वाटतं. ५) मला वर्तमानपत्र वाचायचा कंटाळा येतो. ६) मला रेडिओवर गाणी ऐकायला मजा येते. ७) मला गाणी गायला मजा येते. ८) मला बासरी वाजवायला छान वाटते. ९) मला दोरीच्या उड्या मारायला नकोसं वाटतं.

१४.

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| पु० | असा मित्र | असे **मित्र** |
| स्त्री० | अशी **मैत्रीण** | अशा मैत्रिणी |
| नपुं० | असे / असं मित्रमंडळ | अशी **मित्रमंडळं / मित्रमंडळे** |
| | | |
| पु० | कसा **बंगला** | कसे बंगले |
| स्त्री० | कशी इमारत | कशा **इमारती** |
| नपुं० | कसे / कसं **घर** | कशी घरे / घरं |
| | | |
| पु० | जसा मुलगा | जसे **मुलगे** |
| स्त्री० | जशी **मुलगी** | जशा मुली |
| नपुं० | जसे / जसं मूल | जशी **मुलं / मुले** |
| | | |
| पु० | तसा लेख | तसे **लेख** |
| स्त्री० | तशी कादंबरी | तशा **कादंबऱ्या** |
| नपुं० | तसे / तसं **पुस्तक** | तशी पुस्तके / पुस्तकं |

# उत्तरे

१५. १) वैशाली नावाची चाळीशीची बाई, पण दिसायला तिशीची वाटेल अशी. ती काळी असावी. डोळे टपोरे. आणि ती धीट आणि चलाख असेल अशी. २) एक आजोबा साधारण पासष्टीच्या आसपास, पण जन्माला आले तेव्हापासूनच म्हातारे दिसतील असे. उजळ रंगाचे, मिचमिचित डोळे असणारे आणि स्थूल शरीराचे असतील असे. बुजरा स्वभाव, निरुत्साही आणि मंद बुद्धीचे. ३) एक विशीच्या आतला तरुण, ज्याचे नाव फिरोज असेल. उंच सडसडीत अंगकाठी आणि रंगाने गोरा असेल. तलख आणि उत्साही असलेला असा तरुण, ज्याच्यावर मुली लट्टू होतील.

१८. १) आमच्या वर्गात काही जण खेळतात. २) आमच्या वर्गात खूप जण गाणी ऐकतात. ३) आमच्या वर्गात काही जणांनी प्राणी पाळले आहेत. ४) आमच्या वर्गात कोणीच चित्रं काढत नाही.
५) अनेक उत्तरे शक्य

१९. १) नाटक - संग्रहालय - कॉम्प्युटर - खरेदी - मोबाईल - सिनेमा - पुस्तक - कट्टा - गाणे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ना | ट | क | फ | ब | ज |
| डा | म | ख | रे | दी | मो |
| फ | सं | ग्र | हा | ल | बा |
| कॉ | य | पु | सि | व | ई |
| म्प्यु | क | स्त | ने | क | ल |
| ट | ट्टा | क | मा | मी | ले |
| र | टी | भू | सा | गा | णे |

२)

| तो (पुल्लिंगी) | ती (स्त्रीलिंगी) | ते (नपुंसकलिंगी) |
|---|---|---|
| तो सिनेमा, ते सिनेमे | ती खरेदी, त्या खरेद्या | ते नाटक, ती नाटके |
| तो मोबाईल, ते मोबाईल | | ते संग्रहालय, ती संग्रहालये |
| तो कॉम्प्युटर, ते कॉम्प्युटर | | ते गाणे, ती गाणी |
| तो कट्टा, ते कट्टे | | ते पुस्तक, ती पुस्तके |

३) ती जीन्स, ती गाणी, तो गायक, तो टॉप, तो मुलगा, तो खेळ, तो अभ्यास, ते गाणं, ती पुस्तकं, त्या पँट्स, ती ॲप्स, ते नाटक

## पाठ ४

१. १) क) २ ख) २ ग) १ घ) १ च) २ छ) २

२) क) पीटरचे आई-वडील त्यांच्यासोबत त्यांच्या घरी राहिले नाहीत.

ख) पीटरच्या पिढीपासून कुटुंबाची व्याख्या थोडी बदलली. त्यांच्यासाठी कुटुंब म्हणजे फार कमी माणसे असलेले घर.

ग) पीटर आई-वडिलांना अधूनमधून नाताळ किंवा इतर सणांना गावी भेटायला जातात, पण मुली येतातच असे नाही.

घ) शाळा-कॉलेजांना नेहमी सुट्ट्या असतातच असे नाही आणि शिवाय त्यांना गावी करमतही नाही अशी कारणे पीटर देत आहेत.

च) माझ्या मते ही कारणे खरी आहेत, कारण खरंच हल्लीच्या काळात शाळा-कॉलेजांना सुट्ट्या फार कमी असतात आणि शहरात राहायची सवय असल्यामुळे तिथे सगळ्यांना करमतेच असे नाही.

छ) पीटरच्या आयुष्यात मित्रपरिवाराचं महत्त्व जास्त आहे.

ज) काही समस्या असतील तर मित्रपरिवारच मदत करतो, असे पीटरचे म्हणणे आहे.

३) क. चूक ख. बरोबर ग. चूक घ. बरोबर

२.

| | ए॰व॰ | अ॰व॰ | | ए॰व॰ | अ॰व॰ |
|---|---|---|---|---|---|
| १. त्या ताया | | ✓ | ५. त्या गाड्या | | ✓ |
| २. तो चमचा | ✓ | | ६. त्या मुली | | ✓ |
| ३. तो चेंडू | ✓ | | ७. वही | ✓ | |
| ४. ते कपडे | | ✓ | ८. ती पाने | | ✓ |
| | | | ९. त्या सासवा | | ✓ |

३.

| |
|---|
| १. पुल्लिंगी एकवचन |
| २. नपुंसकलिंगी अनेकवचन |
| ३. स्त्रीलिंगी एकवचन |
| ४. पुल्लिंगी एकवचन |
| ५. पुल्लिंगी अनेकवचन |

४. १) त्याने त्यांच्याशी गप्पा मारल्या. २) तिने त्याच्याशी मैत्री केली. ३) त्याने आणि तिने लग्न केले.

५. १) तुमचं २) आमच्या ३) तुमच्या ४) आपल्या ५) व्यायामाची ६) व्यायामाची ७) करण्याची
८) आमच्या ९) तुमच्या १०) आमचं ११) तुमचं

६. १) मावशी २) भाऊ ३) बहीण ४) बाबा ५) काका कोडे - मी

७. १) माझी बहीण २) माझा भाचा ३) नणंद ४) मामा ५) दीर ६) आजी ७) आजोबा ८) मामा

८. १) २ मुलगे, २ मुली २) २०, १०, ५

९. १) क) आई ख) ताई ग) काकी घ) जाऊ च) मामी छ) भाऊ ज) साडू झ) सासू ट) आजी
२) सगळे शब्द दीर्घ लिहिले जातात.
मराठीत शब्दातील शेवटची 'ई' आणि शेवटचा 'ऊ' दीर्घ लिहितात!
१०. १) ग २) क
११. १) तिचे २) त्याचा ३) आमचे ४) तुझे ५) त्यांची ६) माझे
१२. १) क) आमची ख) तिचा २) क) माझी ख) आमच्या ३) क) माझं ख) माझे ग) माझी घ) माझी
च) माझं ४) क) त्यांची ख) त्यांच्या ५) क) तिचे ६) क) त्यांचा ख) त्यांचे ग) त्यांचा
७) क) त्याचा ख) त्याच्या
१३. १) आमच्या २) त्यांची ३) तुझी ४) आपल्या ५) त्याच्या ६) तिच्या
१४. १) तिचा नवरा ना, तो डॉक्टर आहे. २) त्याची मोठी बहीण ना, ती छायाचित्रकार आहे. ३) माझा छोटा भाऊ ना, तो रॉकस्टार आहे. ४) त्याचे वडील ना, ते नट आहेत. ५) आमचे आजोबा ना, ते शेतकरी आहेत.
६) आमचे सासरे ना, ते नेता आहेत.
१५. १) स्वतःच्या २) स्वतःचा ३) स्वतःच्या - स्वतःची ४) स्वतःचा ५) स्वतःच्या
१६. १) क) ज्याचे कागद हरवले आहेत त्याने ते घेऊन जावेत. कोणाचे कागद हरवले आहेत?
ख) ज्याचे पुस्तक हरवले आहे त्याने ते घेऊन जावे. कोणाचे पुस्तक हरवले आहे?
ग) जिची बाहुली हरवली आहे तिने ती घेऊन जावी. कोणाची बाहुली हरवली आहे?
घ) ज्याची खेळण्यातली गाडी हरवली आहे त्याने ती घेऊन जावी. कोणाची खेळण्यातली गाडी हरवली आहे?
च) ज्यांची जुनी पत्रे हरवली आहेत त्यांनी ती घेऊन जावीत. कोणाची जुनी पत्रे हरवली आहेत?
छ) ज्याचा सदरा हरवला आहे त्याने तो घेऊन जावा. कोणाचा सदरा हरवला आहे?
ज) ज्याचे घड्याळ हरवले आहे त्याने ते घेऊन जावे. कोणाचे घड्याळ हरवले आहे?

| | |
|---|---|
| क) कागद<br>हा कागद तुझा आहे का?<br>नाही. हा कागद माझा नाही.<br>मग कोणाचा आहे?<br>तो ज्याचा आहे तो घेऊन जाईल. | कागद - पेन<br>हे कागद तुझे आहेत का?<br>हो. हे माझे कागद आहेत.<br>आणि ते पेन कोणाचे आहे?<br>माहित नाही. ज्याचे आहे त्याला विचार. |
| ख) पुस्तक<br>हे पुस्तक तुझे आहे का?<br>नाही. हे पुस्तक माझे नाही.<br>मग कोणाचे आहे?<br>ते ज्याचे आहे तो घेऊन जाईल. | पुस्तक - किल्ली<br>हे पुस्तक तुझे आहे का?<br>हो. हेमाझे हे पुस्तक आहे.<br>आणि तीकिल्ली कोणाची आहे?<br>माहीत नाही. ज्याची आहे त्याला विचार. |
| ग) बाहुली<br>ही बाहुली तुझी आहे का?<br>नाही. ही बाहुली माझी नाही.<br>मग कोणाची आहे?<br>ती जिची आहे ती घेऊन जाईल. | बाहुली - खुर्ची<br>ही बाहुली तुझी आहेका?<br>हो. ही माझी बाहुली आहे.<br>आणि ती खुर्ची कोणाची आहे?<br>माहित नाही. ज्याची आहे त्याला विचार. |

| | |
|---|---|
| घ) खेळण्यातली गाडी<br>ही खेळण्यातली गाडी तुझी आहे का?<br>नाही. खेळण्यातली गाडी माझी नाही.<br>मग कोणाची आहे?<br>ती जिची आहे ती घेऊन जाईल. | खेळण्यातली गाडी - चेंडू<br>ही खेळण्यातली गाडी तुझी आहे का?<br>हो. ही माझी खेळण्यातली गाडी आहे.<br>आणि तो चेंडू कोणाचा आहे?<br>माहित नाही. ज्याचा आहे त्याला विचार. |
| च) जुनी पत्रे<br>ही जुनी पत्रे तुझी आहेत का?<br>नाही. ही जुनी पत्रे माझी नाहीत.<br>मग कोणाची आहेत?<br>ती ज्याची आहेत तो घेऊन जाईल. | जुनी पत्रे - नोट<br>ही जुनी पत्रे तुझी आहेत का?<br>हो. ही माझी जुनी पत्रे आहेत.<br>आणि ती नोट कोणाची आहे?<br>माहित नाही. ज्याची आहे त्याला विचार. |
| छ) सदरा<br>हा सदरा तुझा आहे का?<br>नाही. हा सदरा माझा नाही.<br>मग कोणाचा आहे?<br>तो ज्याचा आहे तो घेऊन जाईल. | सदरा – पँट<br>हा सदरा तुझा आहे का?<br>हो. सदरा माझा आहे.<br>आणि ती पँट कोणाची आहे?<br>माहित नाही. ज्याची आहे त्याला विचार. |
| ज) घड्याळ<br>हे घड्याळ तुझे आहे का?<br>नाही. हे घड्याळ माझे नाही.<br>मग कोणाचे आहे?<br>ते ज्याचे आहे तो घेऊन जाईल. | घड्याळ - लॅपटॉप<br>हे घड्याळ तुझे आहे का?<br>हो. हे माझे घडयाळ आहे.<br>आणि तो लॅपटॉप कोणाचा आहे?<br>माहित नाही. ज्याचा आहे त्याला विचार. |

१९. १) कोणाचा - त्यांचा २) कोणाची - त्यांची ३) ज्याची

२०. क) माझ्या ख) तुझं ग) माझ्या घ) तुझे च) तुझ्या छ) तुझी ज) तुझ्या झ) तुझं ट) तुझ्या

२१. १) चे २) ची ३) चे ४) च्या

२२. १) मोटारसायकली २) मुलांशी ३) गाडीचा ४) बाबांना - पुण्याला ५) स्वतःशी

२३. १) राधा २) थोरली बहीण ३) बाबा ४) आई ५) आजी ६) आजोबा

२४. १) ज्याचं २) ज्याची - त्याची ३) जिचं ४) ज्याची ५) ज्याचा - त्याचा ६) ज्याचं

२५. मी माझ्या मैत्रिणीला गुलाबी पर्स आणि निळी साडी दिली - मी माझ्या मैत्रिणीला मस्त स्कर्ट दिला - मी तिच्या बहिणीला तपकिरी माऊचे पिल्लू आणि गोजिरवाणे कुत्र्याचे पिल्लू दिले- मी आमच्या नातवाला छोटी सायकल आणि निळे दप्तर दिले - मी माझ्या भावाला रेघारेघांचा टाय आणि जांभळा टी शर्ट दिला - मी त्याच्या आईला महागडा फोन दिला... अनेक उत्तरे अपेक्षित

२६. १) चोर उंदीर होता. २) चोराने पळवलेल्या गोष्टी - मन्याच्या आईच्या मोत्यांचा हार, स्वातीची बांगडी, आजीची नथ, पिंकीचा पैंजण, मन्याचे घड्याळ आणि अंगठी, पिंकीची पिशवी, मन्याचे पेन, लाडवाचे तुकडे, कुरतडलेल्या पोळ्या, चकलीचा तुकडा, सडका बटाटा.

२७. मला माझ्या नवीन घरासाठी लाकडाचा पलंग आणि काचेचे टेबल घ्यायला आवडेल - मला माझ्या नवीन घरासाठी कपड्यांचे लोखंडी कपाट, बांबूच्या खुर्च्या आणि चांदीची भांडी आणि लेदरचे घड्याळ घ्यायला आवडेल - मला कॉटनचे पडदे घ्यायला आवडतील.

२८. १) गाढवाला गुळाची चव काय. २) चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे. ३) अडला हरी, गाढवाचे पाय धरी. ४) आयजीच्या जिवावर बायजी उदार. ५) असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी. ६) नव्याचे नऊ दिवस.

# उत्तरे

## पाठ ५

१. १) दिवाळी- हार्दिक शुभेच्छा! लग्न - वैवाहिक जीवन सुखाचे जावो. परीक्षा - भरपूर यश मिळो. नववर्ष - पुढील वर्ष भरभराटीचे जावो. मकरसंक्रांत - तिळगूळ घ्या आणि गोड बोला. नवीन नोकरी मिळणे - हार्दिक अभिनंदन! बढती मिळणे - मनापासून अभिनंदन!

२. १) गणपतीचे - ढोलताशाच्या - ढोलताशाच्या - नाचते - मूर्ती - विद्येची - मोदक - जास्वंदीचे - आरती - विसर्जन

४. १) वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! २) एक चांगली बातमी सांगायची आहे. ३) अशीच खूप प्रगती कर. प्रगतीची शिखरे गाठ. ४) खूप छान वाटले. ५) अभ्यास कर आणि यश मिळव.

५. १) व्वा! फारच छान! ऐकून छान वाटलं. २) आयुष्यमान भव. खूप मोठी हो. ३) एक चांगली बातमी द्यायची आहे. ४) खूप आनंद वाटला, तुझा अभिमान वाटतो. ५) अगं, मी नवीन घर घेतलं.

६. १) माझ्याबरोबर / माझ्यासोबत २) आईस्क्रीमसारखं ३) तुझ्याबद्दल ४) केल्याशिवाय ५) माझ्याबरोबर / माझ्यासोबत ६) माझ्याबरोबर / माझ्यासोबत

७.

| | | |
|---|---|---|
| आम्ही + अर्ज | आमचा अर्ज | आमच्या अर्जावर |
| आपण + वर्ग | आपला वर्ग | आपला वर्गाकडे |
| तू + हात | तुझा हात | तुझ्या हातावर |
| तुम्ही + वेळ | तुमची वेळ | तुमच्या वेळेवर |
| आपण + ओढ | आपली ओढ | आपल्या ओढीने |
| ती + बाग | ती बाग | त्या बागेचा |
| ती + संध्याकाळ | ती संध्याकाळ | त्या संध्याकाळी |
| ते + घर | ते घर | त्या घराला |
| ते + पुस्तक | ते पुस्तक | त्या पुस्तकासोबत |
| ते + झाड | ते झाड | त्या झाडाखाली |
| ती + काम | तिचे काम | तिच्या कामाचे |

८. १) खोक्याखाली २) खोक्यापुढे ३) खोक्यामागे ४) खोक्यापासून लांब ५) खोक्याच्या बाजूला ६) खोक्याच्या आत.

९. १) तरी २) निदान ३) आता ४) तरी ५) निदान ६) तरी

१०. चार जण

११. पाचपट, सहापट, सातपट, आठपट, नऊपट, दहापट........ अशा प्रकारे.

## पाठ ६

१. १) हिंदी २) नेपाळी ३) जर्मन ४) फ्रेंच ५) इंग्रजी ६) चिनी ७) बंगाली ८) उर्दू
२. १) ख २) च ३) छ. ४) क ५) घ ६) ग
३. १) क) परकीय भाषा शिकावी कारण नव्या संस्कृतीची ओळख होते.
ख) परकीय भाषा शिकावी कारण जागरुकता वाढते.
ग) परकीय भाषा शिकावी कारण त्या भाषेतील साहित्य वाचता येते.
घ) परकीय भाषा शिकावी कारण जगाशी संवाद साधता येतो.
च) परकीय भाषा शिकावी कारण ज्ञान वाढवता येते.
छ) परकीय भाषा शिकावी कारण भाषांतर करता येते.
ज) परकीय भाषा शिकावी कारण व्यवसाय करता येतो.
झ) परकीय भाषा शिकावी कारण चांगल्या नोकरीची संधी उपलब्ध होते.
२) क) नव्या संस्कृतीची ओळख होते म्हणून परकीय भाषा शिकावी.
ख) जागरुकता वाढते त्यामुळे परकीय भाषा शिकावी.
ग) वेगळ्या भाषेतील साहित्य वाचता येते त्यामुळे परकीय भाषा शिकावी.
घ) जगाशी संवाद साधता येतो म्हणून परकीय भाषा शिकावी.
च) ज्ञान वाढवता येते म्हणून परकीय भाषा शिकावी.
छ) भाषांतर करता येते म्हणून परकीय भाषा शिकावी.
ज) व्यवसाय करता येतोम्हणून परकीय भाषा शिकावी.
झ) चांगल्या नोकरीची संधी उपलब्ध होते म्हणून परकीय भाषा शिकावी.

४.

| देश | भाषा | खाद्यविशेष | निजभाषकांची संख्या (दशलक्ष) |
|---|---|---|---|
| १. केनया | स्वाहिली | उगाली | अकरा (११) |
| २. इंग्लंड | इंग्लिश | फिश न चिप्स | पाचशे दहा (५१०) |
| ३. स्पेन | स्पॅनिश | बरिटो | चारशे वीस (४२०) |
| ४. भारत | हिन्दी | लस्सी | चारशे नव्वद (४९०) |
| ५. जर्मनी | जर्मन | ब्लॅक फॉरेस्ट केक | दोनशे एकोणतीस (२२९) |
| ६. फ्रान्स | फ्रेंच | क्रेप | एकशे तीस (१३०) |
| ७. चीन | मँडरीन | नूडल्स | एक हजार एकावन्न (१०५१) |
| ८. जपान | जपानी | सुशी | एकशे सत्तावीस (१२७) |

आणि मराठी?
पुरणपोळी, बटाटावडा, मोदक ...

५.

| शब्द | भाषा | | |
|---|---|---|---|
| | अरबी / फार्सी | पोर्तुगीज | इंग्रजी |
| १. पाव | | ✓ | |
| २. दरवाजा | ✓ | | |
| ३. सायकल | | | ✓ |
| ४. प्लास्टिक | | | ✓ |
| ५. रबर | | | ✓ |
| ६. बटाटा | ✓ | | |
| ७. पेन्सिल | | | ✓ |

६. १) ग २) च ३) ख ४) ज ५) छ ६) घ ७) क

७. १) हाताला २) पायाला ३) वर्गाला ४) देवाला ५) दिवसाला

८. १) डोळ्याला २) कावळ्यांच्या ३) रस्त्यावर ४) आंब्याची

९. १) रस्त्याच्या २) रस्त्यावर ३) रस्त्याने - रस्त्याला ४) रस्त्याच्या ५) रस्त्यावर

१०. अकारान्त पुल्लिंगी (अ - आ)

| **एकवचन** | **अनेकवचन** | **सामान्यरूप एकवचन** | **सामान्यरूप अनेकवचन** |
|---|---|---|---|
| वर्ग | वर्ग | वर्गाला | वर्गांना |
| हात | हात | हाताला | हातांना |
| पाय | पाय | पायाला | पायांना |
| काळ | काळ | काळाला | काळांना |
| शिक्षक | शिक्षक | शिक्षकाला | शिक्षकांना |
| देव | देव | देवाला | देवांना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

११. आकारान्त पुल्लिंगी (आ - या)

| **एकवचन** | **अनेकवचन** | **सामान्यरूप एकवचन** | **सामान्यरूप अनेकवचन** |
|---|---|---|---|
| रस्ता | रस्ते | रस्त्याला | रस्त्यांना |
| डोळा | डोळे | डोळ्याला | डोळ्यांना |
| दिवा | दिवे | दिव्याला | दिव्यांना |
| फळा | फळे | फळ्याला | फळ्यांना |
| आंबा | आंबे | आंब्याला | आंब्यांना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

१२. आकारान्त पुल्लिंगी (आ - आ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| राजा | राजे | राजाला | राजांना |
| काका | काका | काकाला | काकांना |
| मामा | मामा | मामाला | मामांना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

१३. आकारान्त पुल्लिंगी (सा - शा)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| पैसा | पैसे | पैशाला | पैशांना |
| मासा | मासे | माशाला | माशांना |
| घसा | घसा | घशाला | घशांना |
| ससा | ससे | सशाला | सशांना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

१४. १) राजाला २) काकाला ३) घशाला ४) पैशाने - पैशाने

१५. ईकारान्त पुल्लिंगी ई-या)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| सहकारी | सहकारी | सहकाऱ्याला | सहकाऱ्यांना |
| विद्यार्थी | विद्यार्थी | विद्यार्थ्याला | विद्यार्थ्यांना |
| प्राणी | प्राणी | प्राण्याला | प्राण्यांना |
| शिपाई | शिपाई | शिपायाला | शिपायांना |
| कोळी | कोळी | कोळ्याला | कोळ्यांना |
| पक्षी | पक्षी | पक्ष्याला | पक्ष्यांना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

१६. १) विद्यार्थ्यांना २) पक्ष्यांना - प्राण्यांना ३) शिपायाला ४) सहकाऱ्यांना ५) कोळ्याचे

१७. ईकारान्त पुल्लिंगी ई - ई

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| भटजी | भटजी | भटजीला | भटजींना |
| हत्ती | हत्ती | हत्तीला | हत्तींना |
| दूरध्वनी | दूरध्वनी | दूरध्वनीला | दूरध्वनींना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

१८. १) भ्रमणध्वनीचा २) हत्तीला ३) गणपतीला

१९. १) ए मावशे, तराजूला वजनं नाही लावलीस नं खाली? केवढीशी भाजी दिलीयेस! २) त्या मोठ्या चेंडूला केवढं वजन आहे! ३) बाई, रंगीत खडूंनी नका लिहू. मला फक्त पांढराच रंग दिसतो. ४) प्रत्येक शिक्षक आपल्या गुरूंना खूप मानतो.

२०. ऊकारान्त पुल्लिंगी (ऊ - ऊ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| चेंडू | चेंडू | चेंडूला | चेंडूंना |
| खडू | खडू | खडूला | खडूंना |
| तराजू | तराजू | तराजूला | तराजूंना |
| झाडू | झाडू | झाडूला | झाडूंना |
| गुरू | गुरू | गुरूला | गुरूंना |
| चिकू | चिकू | चिकूला | चिकूंना |
| साधू | साधू | साधूला | साधूंना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

२१. ऊकारान्त पुल्लिंगी (ऊ - वा)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| भाऊ | भाऊ | भावाला | भावांना |
| लाडू | लाडू | लाडवाला | लाडवांना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

ओकारान्त पुल्लिंगी (ओ - ओ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| खो खो | खो खो | खो खोचा | खो खोचा |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

अकारान्त नपुंसकलिंगी (अ - आ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| झाड | झाडे / झाडं | झाडाला | झाडांना |
| घर | घरे / घरं | घराला | घरांना |
| पान | पाने / पानं | पानाला | पानांना |
| नाव | नावे / नावं | नावाला | नावांना |
| उत्तर | उत्तरे / उत्तरं | उत्तराला | उत्तरांना |
| विद्यापीठ | विद्यापीठे / विद्यापीठं | विद्यापीठाला | विद्यापीठांना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

२२. १) क) घराला ख) मनाला ग) नावाला घ) झाडाला च) विद्यापीठाला २) क) घराला ख) घरात ग) घराला घ) घराला च) घरा छ) घरा

२३. ईकारान्त नपुंसकलिंगी (ई - वा)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| पाणी | - | पाण्याला | - |
| दही | - | दह्याला | - |
| लोणी | - | लोण्याला | - |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

उकारान्त नपुंसकलिंगी (उ - वा)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| कुंकू | कुंकवं / कुंकवे | कुंकवाचा | कुंकवांचा |
| गळू | गळवं / गळवे | गळवाचा | गळवांचा |
| अळू | अळू | अळवाचा | अळवांचा |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

एकारान्त नपुंसकलिंगी (ए - या)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| गाणे / गाणं | गाणी | गाण्याला | गाण्यांना |
| कोडे / कोडं | कोडी | कोड्याला | कोड्यांना |
| जोडपे / जोडपं | जोडपी | जोडप्याला | जोडप्यांना |
| तळे / तळं | तळी | तळ्याला | तळ्यांना |
| केळे / केळं | केळी | केळ्याला | केळ्यांना |
| भांडे / भांडं | भांडी | भांड्याला | भांड्यांना |
| नाणे / नाणं | नाणी | नाण्याला | नाण्यांना |
| कडे / कडं | कडी | कड्याला | कड्यांना |
| टाळे / टाळं | टाळी | टाळ्याला | टाळ्यांना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

# उत्तरे

२४. १) केळ्या २) गाण्या ३) तळ्याला ४) नाण्यांचा ५) भांड्याला ६) टाळ्याला

२५. उकारान्त नपुंसकलिंगी (उ - आ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| लिंबू | लिंबे / लिंबं | लिंबाचा | लिंबांचा |
| कोकरू | कोकरे / कोकरं | कोकराचा | कोकरांचा |
| वासरू | वासरे / वासरं | वासराचा | वासरांचा |
| पाखरू | पाखरे / पाखरं | पाखराचा | पाखरांचा |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

अकारान्त स्त्रीलिंगी (अ - ए)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| बाग | बागा | बागेला | बागांना |
| वेळ | वेळा | वेळेला | वेळांना |
| गरज | गरजा | गरजेला | गरजांना |
| रेघ | रेघा | रेघेला | रेघांना |
| रांग | रांगा | रांगेला | रांगांना |
| वाट | वाटा | वाटेला | वाटांना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

२६. १) बॅगेला २) रांगेत ३) बागेचं ४) वेळेला ५) वाटेला

२७. अकारान्त स्त्रीलिंगी (अ - ई)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| रात्र | रात्री | रात्रीचा | रात्रींचा |
| सतार | सतारी | सतारीचा | सतारींचा |
| ओळ | ओळी | ओळीचा | ओळींचा |
| विहीर | विहिरी | विहिरीचा | विहिरींचा |
| जमीन | जमिनी | जमिनीचा | जमिनींचा |
| धूळ | - | धुळीचा | - |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

२८. १) भिंतीला २) जमिनीला ३) ओळीला ४) विहिरीला ५) बहिणीला

२९. आकारान्त स्त्रीलिंगी (आ - ए)

| **एकवचन** | **अनेकवचन** | **सामान्यरूप एकवचन** | **सामान्यरूप अनेकवचन** |
|---|---|---|---|
| भाषा | भाषा | भाषेचा | भाषांचा |
| दिशा | दिशा | दिशेचा | दिशांचा |
| शाळा | शाळा | शाळेचा | शाळांचा |
| जागा | जागा | जागेचा | जागांचा |
| शिक्षिका | शिक्षिका | शिक्षिकेचा | शिक्षिकांचा |
| परीक्षा | परीक्षा | परीक्षेचा | परीक्षांचा |
| कथा | कथा | कथेचा | कथांचा |
| घंटा | घंटा | घंटेचा | घंटांचा |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

३०. १) क) घंटेला ख) जागेला ग) भाषेत घ) दिशेने च) परीक्षेला २) क) शाळेचे ख) शाळेतील ग) शाळेत घ) शाळेला - शाळेमध्ये च) शाळेच्या

३१. ईकारान्त स्त्रीलिंगी ई - या

| **एकवचन** | **अनेकवचन** | **सामान्यरूप एकवचन** | **सामान्यरूप अनेकवचन** |
|---|---|---|---|
| ताई | ताया | ताईला | तायांना |
| साडी | साड्या | साडीला | साड्यांना |
| गाडी | गाड्या | गाडीला | गाड्यांना |
| पेटी | पेट्या | पेटीला | पेटयांना |
| आजी | आज्या | आजीला | आज्यांना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

३२. १) बाटलीला २) गाडीत ३) आजीला ४) साड्यांना - साड्यांना ५) खोलीच्या - खिडकीत

३३. १) त्या महागड्या पिशवीचा हट्टच धरून ठेवला आहे सईने. २) त्या जरीच्या साड्यांना दक्षिणेत खूप मागणी आहे. ३) त्या हुशार विद्यार्थिनीला मित्रमैत्रिणी कमी आहेत. ४) त्या कर्तबगार गृहिणीने घर सांभाळून स्वतःचा उद्योग सुरू केलाय.

३४. ऊकारान्त स्त्रीलिंगी (ऊ - ऊ)

| **एकवचन** | **अनेकवचन** | **सामान्यरूप एकवचन** | **सामान्यरूप अनेकवचन** |
|---|---|---|---|
| काकू | काकवा | काकूला | काकवांना |
| जादू | जादू | जादूला | जादूंना |
| वाळू | - | वाळूला | - |

ऊकारान्त स्त्रीलिंगी (ऊ - वे)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| जाऊ | जावा | जावेचा | जावांचा |

ओकारान्त स्त्रीलिंगी (ओ - ओ)

| एकवचन | अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|---|
| बायको | बायका | बायकोचा | बायकांचा |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

३५. १) बायकांना - बायकां २) वाळूचा ३) जावेची ४) जादूच्या

३६. १) मी शाळेला दांडी मारते. २) टपरीच्या चहाला तोड नसते. ३) मी सातबंगल्याला जातो. ४) पेटीत खूप सामान भरले आहे. ५) लीलावती रुग्णालयाचा रस्ता समोर आहे.

३७.

| एकवचन / अनेकवचन | सामान्यरूप एकवचन | सामान्यरूप अनेकवचन |
|---|---|---|
| फोन | फोनला | फोनना |
| मोबाईल | मोबाईलला | मोबाईलना |
| कॉम्प्युटर | कॉम्प्युटरला | कॉम्प्युटरना |
| मिक्सर | मिक्सरला | मिक्सरना |
| कुकर | कुकरला | कुकरांना |
| ओव्हन | ओव्हनला | ओव्हनना |
| फ्रीज | फ्रीजला | फ्रीजना |

वेगवेगळे प्रत्यय लावून अनेक उत्तरे अपेक्षित...

३८. वहीचे पान, चपलेचा सोल, सायकलचे / सायकलीचे चाक, कामाचे महत्त्व, रस्त्यावरचा कुत्रा, बटाटेवड्याची चव, नाटकाची आवड, नाटकाचा छंद, तिकीटाची किंमत, आयपॅडचा चार्जर, वेळेचे महत्त्व, भाषेचा उपयोग, साडीचे दुकान, नाटकाची जाहिरात, शिधापत्रिकेची प्रत, समाजसेवेची आवड, फायलीचे पान, बॅगेची किंमत, पायांचा उपयोग, वाहनचालक परवान्याची प्रत, साखरपुड्याची वेळ

३९. १) चुरूचुरू २) टाळ्याला ३) साखर ४) हाड

## पाठ ७

१. १) ख २) घ ३) च ४) क ५) ग

२. १) उजळणी २) संगणक ३) स्वतंत्र व्यवसाय ४) ठळक बातमी ५) अभ्यासक्रम ६) उपाय ७) पुरवणी ८) मतभेद ९) विश्लेषण

३. १) सध्या भारताची तरुण पिढी सोशल नेटवर्कींगच्या अधीन झाली आहे. २) आमिर खानने 'दंगल' या चित्रपटात चांगला अभिनय केला आहे. ३) गौरी शिंदेने 'डिअर जिंदगी'च्या निमित्ताने प्रेक्षकांचे मन जिंकले. ४) तुझा फेसबुकचा प्रोफाईल पिक्चर छान आहे. ५) आजकाल लहान मुलं स्मार्टफोनचा उपयोग करतात.

४.

| विशेषनाम | सामान्यरूप + प्रत्यय | तयार शब्द |
|---|---|---|
| क. संपत | संपत + ने | संपतने |
| ख. मेधा | मेधा + ला | मेधाला |
| ग. शीतल | शीतल + साठी | शीतलसाठी |
| घ. गायकवाड | गायकवाडां+ च्या | गायकवाडांच्या |
| च. सुदीप | सुदीप + चे | सुदीपचे |
| च. अमेरिका | अमेरिके + त | अमेरिकेत |
| छ. साठे | साठ्यां + च्या | साठ्यांच्या |
| ज. आशुतोष | आशुतोष + शी | अशुतोषशी |
| ट. अहमदाबाद | अहमदाबादे + त | अहमदाबादेत |
| ठ. शीतल | शीतल + ने | शीतलने |
| ड. संपत | संपत + चा | संपतचा |

५. १) क) मला सगळं कळतं. ख) तुला काही कळत नाही. २) क) मला सगळं चालतं ख) मला नाही चालत. ३) क) मला सगळं चालतं. ख) मला नाही चालत. ४) क) मला अजिबात पटत नाही. ख) मला सगळं पटतं. ५) क) मला सगळं येतं. ख) काही येत नाही. ६) क) मला सगळं आवडतं. ख) मला नाही आवडत.

७.

| | |
|---|---|
| नर्तक | **नर्तिका** |
| शिक्षक | **शिक्षिका** |
| **प्राध्यापक** | प्राध्यापिका |
| **नायक** | नायिका |
| अध्यापक | **अध्यापिका** |
| निवेदक | **निवेदिका** |
| **परिचारक** | परिचारिका |
| सेवक | सेविका |
| **लेखक** | लेखिका |
| मार्गदर्शक | **मार्गदर्शिका** |

८. १) क) कोमल ख) खुशबू ग) गौरी २) क) प्रसाद ख) शिशिर ३) सुशिक्षित असावा आणि कोणतेही व्यसन असू नये - उंच हवा बुटका नको - स्वतःचे घर असणे महत्वाचे - मनमोकळ्या स्वभावाचा पाहिजे रागीट नको - व्यवसाय असेल तर छान I.T. क्षेत्रातला असेल तर मुळीच नको - एकत्र कुटुंब असेल तर हरकत नाही - स्वतःचे वाहन नसले तरी हरकत नाही. ....... अनेक उत्तरे अपेक्षित

९. १) क) विविध - बहुविध ख) थरारक - विनोदी ग) नव्या - चांगला घ) ढासळलेलं - चुकीचे च) प्रभावी - चांगला छ) सरळ - साध्या ज) बिनधास्त – बडबड्या झ) मोठ्या - तरुण ट) शहाण्या - खटयाळ ठ) मोठा ड) चांगल्या - सहज २) क) ३ ख) १ ग) २ ३) क) ३ ख) ५ ग) ४ घ) १ च) २

१०. १) आतापर्यंत कर्णधार विराट यशस्वी नव्हता. २) तिची आई लंडनमध्ये राहणाऱ्या लताशी दर शनिवारी स्काईपवर गप्पा मारते. ३) अमीरखानच्या नव्या चित्रपटात गीता फोगटची कथा सांगितली आहे. ४) अमेरिकेला जाण्यासाठी कुमारांच्या लेकाने खूप मेहनत केली आहे. ५) पुण्यातील शनिवारवाड्याविषयीची माहिती नुकतीच मी रेडिओवर ऐकली.

११. १) असावं - असाव्या / असाव्यात २) नसावा - नसावी ३) असावे - असावे ४) असावी - नसावी ५) असावा ६) असावा

१२. १) क २) ख ३) ख ४) ग ५) क

१३. १) माझ्याकडे २) तुझ्यामुळे ३) माझ्याबरोबर / माझ्यासोबत ४) सोबतीशिवाय ५) तुमच्यासारखा ६) माझ्यासोबत / माझ्याबरोबर ७) तुमच्याबद्दल.

## पाठ ८

१. १) त्याने २) गडबडीने ३) त्यांच्याशी ४) त्यांना ५. आपल्याशी ६. माणसांशी ७. दोघांनीही ८. त्याने ९) माणसाने

२. १) क) शर्मांनी ख) सामंतांनी २) क) जोश्यांनी ख) आपट्यांनी ३) क) भिड्यांनी ख) कलमकरांनी ४. क) टिळकांनी ख) वैद्यांनी ५) क) सुराणांनी ख) गुजरांना

३. १)

| | | तू | तुम्ही | आपण |
|---|---|---|---|---|
| क) | येणे | यावेस / यावंस | यावे / यावं | यावे / यावं |
| ख) | धावणे | धावावेस / धावावंस | धावावे / धावावं | धावावे / धावावं |
| ग) | थांबणे | थांबावेस / थांबावंस | थांबावे / थांबावं | थांबावे / थांबावं |
| घ) | असणे | असावेस / असावंस | असावे / असावं | असावे / असावं |
| च) | झोपणे | झोपावेस / झोपावंस | झोपावे / झोपावं | झोपावे / झोपावं |

२)

| | | तू | त्याने | त्यांनी |
|---|---|---|---|---|
| क) | विचारणे | विचारावेस / विचारावंस | विचारावे / विचारावं | विचारावे / विचारावं |
| ख) | येणे | यावेस / यावंस | यावे / यावं | यावे / यावं |
| ग) | थांबणे | थांबावेस / थांबावंस | थांबावे / थांबवं | थांबावे / थांबवं |
| घ) | असणे | असावेस / असावंस | असावे / असावं | असावे / असावं |
| च) | झोपणे | झोपावेस / झोपावं | झोपावे / झोपावं | झोपावे / झोपावं |

४. १) क / ग २) क / ग ३) घ ४) ख / घ ५)घ ६) घ ७) घ ८) ख / घ ९) घ

५. १) क) पळणे ख) तळणे ग) कळणे घ) लोळणे २) क) चालावे ख) पाहावे ग) राहावे घ) धरावा च) जगावे छ) ठसवावे

६.

| | | उतारा / उतारे | कविता | पत्र / पत्रे / पत्रं |
|---|---|---|---|---|
| १) | बघणे | (ए.व.) बघावा<br>(अ.व.) बघावे (त) | बघावी<br>बघाव्या (त) | बघावे / बघावं<br>बघावी (त) |
| २) | लिहिणे | (ए.व.) लिहावा<br>(अ.व.) लिहावे (त) | लिहावी<br>लिहाव्या (त) | लिहावे/ लिहावं<br>लिहावी (त) |
| ३) | पाहणे | (ए.व.) पाहावा<br>(अ.व.) पाहावे (त) | पाहावी<br>पाहाव्या | पाहावे/ पाहावं<br>पाहावी (त) |
| ४) | खाणे | आंबा / आंबे<br>(ए.व.) खावा | पपई / पपया<br>खावी | फळ / फळे / फळं<br>खावे/ खावं |
| | | **(अ.व.) खावे (त)** | **खाव्या (त)** | **खावी (त)** |
| ५) | धुणे | (ए.व.) धुवावा<br>(अ.व.) धुवावे (त) | धुवावी<br>धुवाव्या (त) | धुवावे/ धुवावं<br>धुवावी (त) |
| ६) | आणणे | (ए.व.) आणावा<br>(अ.व.) आणावे (त) | आणावी<br>आणाव्या (त) | आणावे/ आणावं<br>आणावी (त) |
| | | **प्रश्न** | **समस्या** | **प्रकरणे / प्रकरणं** |
| ७) | मांडणे | (ए.व.) मांडावा<br>(अ.व.) मांडावे (त) | मांडावी<br>मांडाव्या (त) | मांडावे/ मांडावं<br>मांडावी (त) |
| ८) | वाढवणे | (ए.व.) वाढवावा<br>(अ.व.) वाढवावे (त) | वाढवावी<br>वाढवाव्या (त) | वाढवावे/ वाढवावं /<br>वाढवावी (त) |
| ९) | मिटवणे | (ए.व.) मिटवावा<br>(अ.व.) मिटवावे (त) | मिटवावी<br>मिटवाव्या (त) | मिटवावे/ मिटवावं<br>मिटवावी (त) |
| | | **आनंद** | **काळजी / काळज्या** | **कौतुक / कौतुके / कौतुकं** |
| १०) | वाटणे | वाटावा | वाटावी /<br>वाटाव्या (त) | वाटावे /<br>वाटावी (त) |

७.

| + तृतीया | ते शर्ट | ती पँट | त्या पँट्स | ते जॅकेट | ती जॅकेट्स |
|---|---|---|---|---|---|
| आम्ही / आपण | घालावे / घालावेत<br>काढावे / काढावेत<br>घ्यावे / घ्यावेत<br>धुवावे / धुवावेत | घालावी<br>काढावी<br>घ्यावी<br>धुवावी | घालाव्या / घालाव्यात<br>काढाव्या / काढाव्यात<br>घ्याव्या / घ्याव्यात<br>धुवाव्या / धुवाव्यात | घालावे<br>काढावे<br>घ्यावे<br>धुवावे | घालावी / घालावीत<br>काढावी / काढावीत<br>घ्यावी / घ्यावीत<br>धुवावी / धुवावीत |
| तू | घालावे / घालावेस<br>काढावे / काढावेस<br>घ्यावे / घ्यावेस<br>धुवावे / धुवावेस | घालावी / घालावीस<br>काढावी / काढावीस<br>घ्यावी / घ्यावीस<br>धुवावी / धुवावीस | घालाव्या / घालाव्यास<br>काढाव्या / काढाव्यास<br>घ्याव्या / घ्याव्यास<br>धुवाव्या / धुवाव्यास | घालावे<br>काढावे<br>घ्यावे<br>धुवावे | घालावी / घालावीस<br>काढावी / काढावीस<br>घ्यावी / घ्यावीस<br>धुवावी / धुवावीस |
| तुम्ही / आपण | घालावे / घालावेत<br>काढावे / काढावेत<br>घ्यावे / घ्यावेत<br>धुवावे / धुवावेत | घालावी<br>काढावी<br>घ्यावी<br>धुवावी | घालाव्या / घालाव्यात<br>काढाव्या / काढाव्यात<br>घ्याव्या / घ्याव्यात<br>धुवाव्या / धुवाव्यात | घालावे<br>काढावे<br>घ्यावे<br>धुवावे | घालावी / घालावीत<br>काढावी / काढावीत<br>घ्यावी / घ्यावीत<br>धुवावी / धुवावीत |
| तो (त्याने) / ती (तिने) / ते (त्याने) | घालावे / घालावेत<br>काढावे / काढावेत<br>घ्यावे / घ्यावेत<br>धुवावे / धुवावेत | घालावी<br>काढावी<br>घ्यावी<br>धुवावी | घालाव्या / घालाव्यात<br>काढाव्या / काढाव्यात<br>घ्याव्या / घ्याव्यात<br>धुवाव्या / धुवाव्यात | घालावे<br>काढावे<br>घ्यावे<br>धुवावे | घालावी / घालावीत<br>काढावी / काढावीत<br>घ्यावी / घ्यावीत<br>धुवावी / धुवावीत |
| ते / (त्यांनी) त्या / (त्यांनी) / ती (त्यांनी) | घालावे / घालावेत<br>काढावे / काढावेत<br>घ्यावे / घ्यावेत<br>धुवावे / धुवावेत | घालावी<br>काढावी<br>घ्यावी<br>धुवावी | घालाव्या / घालाव्यात<br>काढाव्या / काढाव्यात<br>घ्याव्या / घ्याव्यात<br>धुवाव्या / धुवाव्यात | घालावे<br>काढावे<br>घ्यावे<br>धुवावे | घालावी / घालावीत<br>काढावी / काढावीत<br>घ्यावी / घ्यावीत<br>धुवावी / धुवावीत |

८. १) तू माफी मागावीस. २) तू नमतं घ्यावंस. ३) तू पुढाकार घ्यावास. ४) तू स्वतःहून फोन करावास. ५) तू स्वतःहून मेसेज करावास.

९.

| क्रियाविशेषणे | इतर शब्द |
|---|---|
| क. इकडेतिकडे | ग. अरबटचरबट |
| ख. टंगळमंगळ | च. बारीकसारीक |
| घ. वेळीअवेळी | छ. दुखणंखुपणं |
| ज. रात्रीअपरात्री | झ. आजूबाजूचा |
| ट. अधूनमधून | |

१०. १) घ्यावेत २) ढवळावे ३) मिसळावे ४) सजवावे

११. १) त्याने कचरा उचलावा. २) त्याने ऑम्लेट करावे. ३) त्याने गाडी थांबण्याची वाट पाहावी. ४) त्याने शिखर सर करावे.

१२. १) क) बोलू नये ख) पाहावी ग) ठेवावे घ) पाहावे च) घ्यावे छ) पोहोचावे ज) लिहावा झ) जोडाव्यात ट) वाचावीत. २) क) ४ ख) ५ ग) २ घ) ८ च) १ छ) ३ ज) ६ झ) ७

१३.

| काय | वर्गात काय करावे | वर्गात काय करू नये |
|---|---|---|
| १) शांतता राखणे (दंगा करणे) | शांतता राखावी. | दंगा करू नये. |
| २) स्वच्छता ठेवणे (घाण करणे) | स्वच्छता ठेवावी. | घाण करू नये. |
| ३) गाडी हळू चालवणे (जोरात चालवणे) | गाडी हळू चालवावी. | जोरात चालवू नये. |
| ४) सावध राहणे (बेसावध राहणे) | सावध राहावे. | बेसावध राहू नये. |

१४. चिंटू, वेळेवर दात घास - वेळेवर अंघोळ कर - चिंटू, खूप वेळ टी. व्ही. बघू नकोस - जेवताना सांडू नकोस - चिंटू, भावंडांशी भांडू नकोस - चिंटू, आजी-आजोबांचे ऐक - चिंटू, सुट्टीतला गृहपाठ पूर्ण कर - घरकामात मदत कर - खूप मज्ञा कर.

१६. १)
क) मला अभ्यास करताना, सिनेमा बघताना, खेळताना झोपावंसं वाटतं.
ख) मिनूला शाळेत जाताना, लाडू खाताना, फ्रॉक घालताना रडावंसं वाटतं.
ग) सुशांतला क्रिकेट मॅच बघताना, मारामारी करताना, चित्र काढताना शिट्टी मारावीशी वाटते.
घ) सुमितला दमलेला असताना फिरायला जाताना, गाडी चालवताना चहा प्यावासा वाटतो.
च) निरंजनला पाऊस पडत असताना, वेळ नसताना, दूध संपलेले असताना कॉफी प्यावीशी वाटते.
२) क) वापरताना ख) होताना ग) देताना घ) जेवताना च) असताना

१७. १) जो - तो २) ज्याला - त्याने - ज्याला - त्याने ३) जो - त्याला ४) ज्याने - त्याने ५) ज्याची - तो ६) ज्याला - त्याला ७) जो - त्याला

१९. १) क) जिने - तिला ख) जिला - तिला ग) जी - तिला घ) जिच्याशी - तिच्याकडे च) जिच्याहून - तिलाच छ) जिच्यात - तिला २) क) जिचा - ती ख) जिला - ती ग) जिच्यात - ती घ) जिच्याहून - ती च) जिच्यामागे - ती

२०. ||श्री||

त्रिमूर्ती बंगला,
हनुमान मंदिराजवळ,
२८८, शिवाजीनगर ,पुणे ५.
दि॰ २९/१०/१९९२

प्रिय चंद्रकांत यांना सप्रेम नमस्कार वि॰वि॰,
मी दहा दिवसांपूर्वी बसने एकटा वडगावहून येथे मामांकडे आलो. दिवाळीची सुट्टी मजेत जात आहे. दिवाळीत मी, कमलाकर, बेबी व सुरेन्द्रने किल्ला केला, कंदील बनवला, दारापुढे रांगोळी घातली. रोज सकाळी फराळ, दुपारी क्रिकेट, रात्री टीव्ही असा खूप मजेचा कार्यक्रम चालू आहे. मामांनी मला इसापनीती, बिरबलाच्या गोष्टी आणि श्रीरामाची कथा ही पुस्तके दिली.

मामांनी एक कुत्रा पाळला आहे. त्याचे नाव टिपू.
पत्र पाठव.

तुझाच,
तारानाथ

## पाठ ९

१. १) ग २) क ३) च ४) ख ५) घ

२.

| | | |
|---|---|---|
| मला रेल्वेचं तिकिट काढायचंय. | मला माहिती विचारायचीये. | मला सांगितलेली माहिती समजत नाहीये. |
| माझा पार गोंधळ उडाला आहे. | तिकिटखिडकी कुठे आहे? | मला कळलं नाही. |
| मी हा पत्ता शोधत आहे. | हे रेल्वेस्टेशन अजून किती लांब आहे? | मला समजलं नाही. |
| माफ करा. | मी रेल्वेचं तिकिट कुठे काढू शकतो? | पुन्हा एकदा सांगाल का? |
| | रेल्वेस्टेशन कुठे आहे ते तुम्ही कृपया सांगाल का? | मला पुन्हा एकदा समजावाल का? |
| | एक तिकिट द्याल का? | |
| | मला कुठे उतरावं लागेल? | |
| | कोणत्या फलाटावरून गाडी सुटेल? | |
| | पुढची गाडी कितीला सुटेल? | |
| | गाडी किती वाजता पोहोचेल? | |
| | रेल्वेस्टेशन किती जवळ आहे? | |

४. विनय ७.०० वाजता पर्वती चढून गेला. विनयने ९.०० वाजता पुणेरी नाश्ता घेतला. विनयने ११.०० वाजता राजा केळकर संग्रहालयाला भेट देली. विनयने १२.३० वाजता जनसेवा खाणावळीत पुणेरी थाळी खाल्ली. विनयने १३.१४ वाजता विश्रांती घेतली. विनयने १४.१६ वाजता शनिवारवाडा पाहिला. विनय १६.१८ वाजता सारसबागेत फिरला. विनयने १८.२१ वाजता बालगंधर्व रंगमंदिरात नाटक पाहिले. विनयने २१.२२ वाजता संध्याकाळचे जेवण घेतले. विनय २२.०० वाजता हॉटेलवर परत आला.

५. १) झाले - होता - होते - ठरले - बोललो - म्हणाले - निघालो - घेतला - होते - पोहोचलो - केलं - केला - झाला - खेळलो - पाहिली - होता - साठवली - होतो - खेकसला - उघडले

६. १) लवकर अंधार पडला / पडला नाही. २) जोरात वारा सुटला / सुटला नाही. ३) वीज गेली / गेली नाही. ४) नवा सिनेमा लागला / लागला नाही. ५) मी दुपारी झोपले / झोपले नाही. ६) मोगरा फुलला / फुलला नाही. ७) पिंजऱ्यातला पक्षी उडाला. / उडाला नाही. ८) मी गावभर फिरले / फिरले नाही. ९) मला आनंद झाला / झाला नाही. १०) मी जोरात पळाले / पळाले नाही.

७.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) दि | | | | | क) ला | २) ग | ली |
| ख. ला | ज | ली | | ३) लि | | ढ | |
| | | | | हि | | ले | |
| ४) ग) पा | ज | ली | | ली | | | ५) च |
| हि | | | | | ६) मो | | ढ |
| ले | | ७) दि | | | घ) ज | | लो |
| | च) गे | ली | | छ) गे | ल्या | | |

८.

| | |
|---|---|
| लवकर उठणे | काल अनुज लवकर उठला. |
| सकाळी २ तास पोहणे | काल अनुज सकाळी २ तास पोहला. |
| ५ मैल चालणे | काल अनुज ५ मैल चालला. |
| खूप दमणे | काल अनुज खूप दमला. |
| डोंगरावर चढणे | काल अनुज डोंगरावर चढला. |
| गुहेत शिरणे | काल अनुज गुहेत शिरला. |

# उत्तरे

| | |
|---|---|
| मित्राकडे जाणे | काल अनुज मित्राकडे गेला. |
| खूप कंटाळणे | काल अनुज खूप कंटाळला. |
| रस्त्यात पडणे | काल अनुज रस्त्यात पडला. |
| मोठ्याने रडणे | काल अनुज मोठ्याने रडला. |
| लवकर झोपणे | काल अनुज लवकर झोपला. |

९. १) कारण गाडी उशिरा आली. २) कारण बस ट्रॅफिकमध्ये अडकली. ३) कारण खूप पाऊस होता. ४) कारण तो डबा आणि पाकीट घरी विसरला.

१२. १) गेली - पाहिला - खाल्ला - राहिली २) होती - खाल्ला - प्यायली ३) लिहिला - वाचला - पाठवली ४) दिला - नाही केला - केली ५) केली - मागितली - दिले - विकली

१३.

| | |
|---|---|
| १. सकाळी - पडला - पाऊस – जोराचा | सकाळी जोराचा पाऊस पडला. |
| २. सुटली - सहा - ट्रेन – वाजता | ट्रेन सहा वाजता सुटली. |
| ३. राजीव - परवा - खूप - झोपला. | परवा राजीव खूप झोपला. |
| ४. वडिलांनी - मदत - केदारला – केली | वडिलांनी केदारला मदत केली. |
| ५. तब्येतीबद्दल - विचारले – आईने | आईने तब्येतीबद्दल विचारले. |
| ६. वाटतं - सूर्य - आज - उगवला – पश्चिमेला | आज सूर्य पश्चिमेला उगवला वाटतं. |

१४. ३) क) निखिल सकाळी फिरायला गेला नाही. ख) दोघे खरेदीला गेले नाहीत. ग) निकिता आणि निखिल रात्री निघाले नाहीत. घ) निखिल सकाळी उशिरा उठला नाही. च) निकिता संध्याकाळी घरी आली नाही.

१६. १) मनीष**ने** प्रियांका**ला** ५० रुपये दिले. २) घर**ातून** बँकेत पोचायला २ तास लागतात. ३) जयेश मनीष**हून** उंच आहे. ४) मी रोज बस**ने** ऑफिस**ला** जातो. ५) हिमानी**ने** **तिच्या** मित्र**ाला** जेवायला बोलावले. ६) सर्व मुल**ांनी** स्वतः**हून** जागेवर बसावे. ७) शिक्षक**ांनी** **मुलांना** खूप स्वाध्याय दिले.
८) रानटी प्राणी जंग**लात** राहतात. ९) आमच्या घर**ात** प्रत्येक खोलीत एक पंखा आहे. १०) झाड**ांना** खूप फळे लागली होती. ११) तो किती सफाई**ने** खोटं बोलतो! १२) पुण्याच्या तुलनेत मुंबई**त** फार उकडतं.

१७. १) क) अमितने ख) प्रियाला २) क) तिथीने ३) क) मुलाने ख) लग्नाला ४) क) निनादने
५) क) छपराने ख) घराला ग) नातीने ६. क) गायीने ख) वासराला ७) क) प्रकाशाने
८) क) भाषेला ९) क) सूर्याला १०. क) मनस्वीला

१८. १) डॉक्टरांनी रुग्णाला औषध लिहून दिले. २) राजाने राणीला गुलाबाचे फूल दिले.
३) बाबांनी अमितला सल्ला दिला. ४) आई-बाबांनी ऋतिकाला गाडी दिली.

१९. १) लहानपणी रोज संध्याकाळी समिधा आणि सागर देवळात जात होते. २) फोटो पाहिल्याक्षणी समिधाला तिचे बालपण आठवले. ३) समिधा तिच्या भावाबरोबर, सागरबरोबर देवळात जात होती. ४) समिधाला देवळात सौरभ भेटत असे. ५) सौरभ म्हणाला की तू खूप सुंदर दिसतेस. मी मोठा झाल्यावर तुझ्याशीच लग्न करीन असं म्हणाला.

२०. १) आम्हाला मुलगी झाली. आम्हाला मुलगी झाल्याचे नातेवाईकांना कळवले. २) मुलगा राष्ट्रीय पातळीवर खेळला. मुलगा राष्ट्रीय पातळीवर खेळल्याचे मित्रांना कळले. ३) अमित खूप बोलला. अमित खूप बोलल्याचे त्याच्या प्रेयसीला कळले. ४) लाडआजोबा निधन पावले. लाडआजोबा निधन पावल्याचे त्यांच्या लाफ्टर क्लबला कळले. ५) जाहिद व्यसनी आहे. जाहिद व्यसनी असल्याचे त्याच्या बायकोला लग्नानंतर कळले.

## पाठ १०

१. २) क. कसं - (३) निसर्गरम्य ख. काय - (२) युवातरंग ग. कशा - (१) टेक्स्टाईल घ. कशाच्या - (३) कापडाच्या च. कशाची - (२) अभ्यासाची

२. १) झ २) घ ३) च ४) छ ५) ज ६) क ७) ख ८) ट ९) ग

४. १) गाणं / गणित आणि नृत्य २) कविता / चित्रकला / मराठी भाषा ३) इतिहास / स्वयंपाक / व्याकरण आणि कॉम्प्युटर / वाक्प्रचार ४)कविता / म्हणी / शिव्या ५) वाक्प्रचार

५. १) दिलं २) दिले ३) दिली ४) दिल्या ५) दिली ६) दिली ७) दिला ८) दिले ९) दिलं

६. १) वर्गात २) वाटीत ३) हातात ४) बाटलीत ५) प्रयोगशाळेत ६) चित्रात

७. १) घरी २) शाळेत ३) रस्त्यात ४) आकाशात ५) मैदानात

८. १) व्यसनात २) त्यात ३) क्षणात ४) लग्नात

९. १) परिस्थितीत २) आरडाओरड्यात ३) पावसात / कवितेत / पहाटे / पावसाळ्यात ४) पावसाळ्यात ५) पहाटे ६) पावसात / कवितेत / पहाटे

११. १) रविवारी - तिचं २) त्याने - आग्रहाने ३) सकाळी ४) मी - संध्याकाळी - समारंभाला
५) फुलांनी ६) संदीपने ७) नवरीने ८) त्यांना ९) आरामात १०) मित्राने - आणले ११) संदीपचा- निघालो

१२. १) सातवीत २) तुकडीत ३) आठवीत ४) वर्गात ५) कंपनीत ६) कॉलेजमध्ये

१३.

| | | | |
|---|---|---|---|
| डबा | डब्यात | तो डबा | त्यात |
| पिशवी | पिशवीत | ती पिशवी | तिच्यात |
| घर | घरात | ते घर | त्यात |
| खोल्या | खोल्यांत | त्या खोल्या | त्यांत |

१४. उघडले / उघडलं - होती - दाखवली - बघितली - म्हणाली - बिघडला

१६. होतास - आलास - झाले - झाला - झालं - झालं - पोहोचले - रागवली - झालं - बोलला - भांडला - झाला - मिळाली - आलीस - आले.

१७. माणसाने - केली - गाड्या - रस्ते - दिसत - नाहीत - वाटत - आहेस - असतात - मुलांना - पर्यावरणाचा - हिची - कशी - आहेस.

१८. १) ती - त्यांच्याशी २) आम्ही - त्यांच्याशी ३) तुम्ही - त्यांच्याशी ४) ते ५) ते - त्यांना

१९. आणखी काही गाड्या पार्किंगमध्ये शिरतात. गाडी रस्त्याला लागते, तसा वारा आत येतो आणि उन्हाचा ताप जरा कमी झाल्याचा भास होतो. अचानक बाबा गाडी थांबवतो. आम्ही खाली उतरतो. बाबा वाकून चारही टायर पाहतो. आपण उगाचच एखाद्या गोष्टीचा किती विचार करतो, असं वाटून त्याला हसू येतं.

२०. बाबाला - म्हणाली - घरी - एकटीने - तू - म्हणाला - मी - साहेबाने - शकतो - तू - आहे - तो - बाबानी - मी - टिंब्याला - ओरडली.

२१. १) रांगेत - मुंगीच्या - गतीने - आहेत. २) शिपायाला - त्याला - तुझी ३) माझा - म्हणतोय
४) सोहमचा - गाड्यांचं - गाडीचं ५) कोणाचे ६) मातीत - मुलांना ७) आलास - आहेत - येणार

२२. १) त्याच २) त्याचं

२३. १) कुठून २) कोणत्या ३) का ४) कोणता ५) कोणत्या ६) का ७) का ८) कशासाठी ९) काय

२४. १) होतो २) होतो ३) गेलीस ४) झाला ५) प्यायला ६) नव्हता - नव्हती ७) झाले

८) आलो - आहेत  ९) गेली - होते  १०) झालात

२५. १) अंक  २) पात्रं  ३) आला ४) अभिनंदन ५) भेटले  ६) दिली  ७) रिक्शाने  ८) पायी

२६. १) मुलांच्या - अभ्यासात  २) सुट्टीत - घरात ३) कोर्टात- वेळी  ४) दुष्काळात - लोकांना
५) वयात - हौशीने - खरेदीला  ६) वेळी - समीरची

२७. तू - तुझी - तुला - तुझ्याकडे - तुझ्या - तुझ्याकडून

२८. १) तू सामना जिंकलास.  २) तुम्ही स्पर्धा आयोजित केली / केल्या.  ३) तू नाटक पाहिलेस.
४) तुम्ही कविता रचल्या / रचली.  ५) दोन गटांच्या मारामारीने तणाव निर्माण केला.
६) माझ्या बॉसने मला झापले.  ७) पोलिसांच्या गाडीने रात्री गस्त घातली.
८) सकाळच्या बातमीने लोक चिडले.
९) दिल्लीची गाडी उशिरा आली.

२९. १) तुम्हाला - परीक्षेचं  २) आपला  ३) वर्गाच्या - खिडकीतून  ४) माझ्या - घरी - अंगणात
५) विकासचे - माळ्याच्या - मुलाशी - त्याच्याशी

३०. माझ्याशी - त्यांच्याशी - आपल्यात - त्यांच्याहून - तिच्याशी

३१. १) हून  २) ला  ३) ला  ४) ला  ५) शी  ६) चे  ७) ने  ८) हून  ९) ला - ला  १०) ने - ने  ११) ने
१२) ला - ना

३२. ठेवलं - कोणी - पाहिलं / पाहिलंय - मुग्धाने - नव्हतं - मैत्रिणीचं - तिला - पाहिलं / पहिलायस - आवाजात

३३. १) सुधीर मुळ्यांनी - सुधीर मुळे - सुधीर मुळ्यांना - लोकांकडून - लोकांशी - सुधीर मुळ्यांच्या - लोकांकडून - नाणी  २) ताईच्या - ताईबरोबर - वास - अपू - मुलं - मुलांचे - मुलं - अपू
३) घोड्याचं - घोडा - घोड्याची - डोळे - घोड्याचं - कपाळावर - घोडा - घोड्याची - झोप - घोडा - देशाचं - घोड्याला

३४.

| | |
|---|---|
| ते मुलांना नृत्य शिकवतात. | (त्या) त्याने मुलांना नृत्य शिकवले. |
| ती शिक्षकांना पगार देते. | (तो) त्याने शिक्षकांना पगार दिला. |
| मी माझ्या आईला मोबाईल देतो. | (तू) तू तुझ्या आईला मोबाईल देतोस. |
| तुम्ही आम्हाला पत्र पाठवता. | (आम्ही) आम्ही तुम्हाला पत्र पाठवले. |
| तू तुझ्या बायकोला साडी देतोस. | (मी) मी माझ्या बायकोला साडी दिली. |
| (ते) विद्यार्थी आम्हाला प्रश्न विचारतात. | (त्या) त्या विद्यार्थिनींनी आम्हाला प्रश्न विचारले. |
| तो त्याच्या मुलांना सिनेमा दाखवतो. | (ती) तिने तिच्या मुलांना सिनेमा दाखवला. |

३५.

ताईला - तिला - तिने - अंगणात - पायरीवर - पावसात - तुला - तिने - मला - पुस्तकाची - हातात - हातात - अक्षयचं - तिला - पायाला - त्याने - चपलेला - चिखलाची - त्याने - त्याचा - शर्टाला - चड्डीला - पुस्तकाला - त्याला

# Photo Credits

## Cover Page

Sammati Balgi

Arya Kasture

Jiyoung Woo

Juilee Vaidya

Shrinidhi Kini

## Others

Ankita Deshpande

Mandar Deshpande

Trupti Choudhary

Sonalee Hardikar

Parineeta Dandekar

Manjiri Joshi

Chittaranjan Bhat

Anand Jadhav

Sayali Palande Datar

Dr. Mandar Dharmadhikari

Anjali Chipalkatty

Mitali Khargonkar

Kaustubh

Reshma Barve

Bhalchandra

Marathi Workbook for beginners Level 2:

- Creative exercises, tests, glossary & answer key
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the Language
- For young & adult learners
- For classroom study as well as self learners
- Language skills, understanding, speaking, reading, writing Marathi

The Set Contains:

1. A Textbook
2. A Workbook
3. Marathi glossary
4. DVD (with audio & audio-visual content)
   Online access link: https://mu.ac.in/mymarathi2

मुंबई विद्यापीठ

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

ISBN 978-93-5291-443-2

INR1250 | $25 | €20
(For the complete set of Textbook, Workbook, Glossary and 1 Free DVD)

https://www.learn-marathi.com rmvs.maharashtra.gov.in